Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४१ग
२१

४९म
२८.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ओ३म्

पुस्तक संख्या......

पञ्जिका संख्या......

पुस्तक पर सर्व प्रकार की निशानियां लगाना वर्जित है। कोई सज्जन पन्द्रह दिन से अधिक देर तक पुस्तक अपने पास नहीं रख सकते। अधिक देर तक रखने के लिये पुनः आज्ञा प्राप्त करनी चाहिये।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२५१८८

२१म
२१

स्टाक प्रमाणीकरण १९८४-१९८५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शेठ गोविंदराव कोरगांवकर ग्रंथमाला : पुष्प पहिलें

प्राचीन भारतीय विद्यापीठें

CHECKED 1973
Initial

: लेखक :

ना. गो. तवकर

पांच रुपये दहा आणे

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन, मुंबई

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकाशक :

श्री. माधुरी रतिलाल शहा
रजिस्ट्रार,
इंडियन इस्टिट्यूट ऑफ एज्युकेशन
११, हॉर्निमन सर्कल, मुंबई १

सर्वाधिकार स्वाधीन

मुद्रक :

वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो,
गिरगांव, मुंबई ४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुरस्कार

'प्राचीन भारतीय विद्यापीठें' हा ग्रंथ परिश्रमपूर्वक लिहून व तो प्रसिद्ध करून श्री. तवकर यांनीं मराठी भाषेंतील सांस्कृतिक व शैक्षणिक वाङ्मयांत मोठी भर घातली आहे. भारतांत प्राचीन काळापासून बाराव्या शतकाच्या अखेरपर्यंत कांहीं फार मोठीं विद्यापीठें अस्तित्वांत होतीं व तेथें हजारों विद्यार्थी उच्च शिक्षणाचा लाभ घेत होते. नालंदा, विक्रमशिला, वलभी व काञ्चीसारख्या अखिल भारतीय कीर्तीच्या विद्यापीठांची माहिती वाचून आमच्या पूर्वजांच्या शैक्षणिक कामगिरीबद्दल कौतुक व अभिमान न वाटणारा भारतीय क्वचितच सांपडेल. ऑक्सफर्ड-केंब्रीजसारखीं विद्यापीठें ४००।५०० वर्षें अव्याहत ज्ञानप्रसाराचें काम करीत आहेत हें ऐकून आम्हांला आश्चर्य वाटतें; पण नालंदासारखें विद्यापीठ निदान ८०० वर्षें अखंड ज्ञानज्योत तेवत ठेवूं शकलें हें वाचून क्षणभर मन प्रफुल्लित झाल्याशिवाय राहत नाहीं. कांहीं विद्यापीठांची कीर्ति भारतापलीकडील देशांत पसरली होती व त्या देशांतील विद्यार्थी संकटमय प्रवासाला तोंड देऊन मोठ्या उत्साहानें ज्ञानसंपादनार्थ भारताकडे येत असत. या कामांत चिनी विद्यार्थ्यांचा भरणा फार मोठा होता व त्यांनीं लिहून ठेवलेल्या वर्णनावरूनच आपणाला आज या प्राचीन भारतीय विद्यापीठांसंबंधीं बरीच माहिती उपलब्ध झाली आहे.

या प्राचीन भारतीय विद्यापीठांतील विद्यार्थ्यांची संख्या हजारांनीं मोजण्यासारखी होती व या सर्वांच्या रहाण्याची व खाण्यापिण्याची व्यवस्था विद्यापीठांकडून केली जात असे. राजेरजवाडे, धनिक नागरिक व सामान्य जनताहि हीं विद्यापीठें चालू ठेवण्यांत मोठ्या उत्साहानें भाग घेत असत. हरएक विद्यापीठाबद्दल अखिल जनतेला जिव्हाळा वाटत असे व विद्यापीठेंहि जनतेला आपुलकीनें वागवीत असत. ही प्राचीन परंपरा अलीकडच्या विद्यापीठांनीं आपल्या कार्यक्रमांत आणल्याशिवाय तीं प्राचीन विद्यापीठांची बरोबरी करूं शकणार नाहींत हें उघड आहे. स्वतंत्र भारतांत ही प्राचीन परंपरा पुन्हां सुरू करणें अशक्य नाहीं.

श्री. तवकर यांनीं एकूण १९ विद्यापीठांबद्दल माहिती दिली आहे. प्राक्कालीन शेंकडों विद्यापीठांपैकीं फक्त १९ विद्यापीठांची निवड त्यांतील वैशिष्ट्यांमुळें करण्यांत आली आहे असें त्यांचें म्हणणें आहे. मात्र अगदीं वायव्य सरहद्दीवरचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
तक्षशिला, उत्तर प्रदेश, बिहार व बंगालमधील काशी, नालंदा वगैरे, सौराष्ट्रांतील वलभी, महाराष्ट्रांतील सालोटगी आणि दक्षिणेकडील कान्ची-मदुरा वगैरे विद्यापीठें घेतल्यामुळें या विद्यापीठांची निवड करतांना त्यांनीं भारताचा जवळ जवळ सर्व प्रदेश आक्रमिला आहे यांत शंका नाहीं. तरी पण त्यांनीं उज्जयिनी, पुरी, पैठण व कऱ्हाड वगैरेंचा त्यांत समावेश केला असता तर फार बरें झालें असतें; कारण शैक्षणिक व सांस्कृतिक विचार पसरविण्याच्या कामीं या ठिकाणांनीं फारच मोठी कामगिरी केल्याचें समजतें.

विद्यापीठांचा एकंदर इतिहास देतांना वैदिक, बौद्ध व जैन परंपरा यांचे भिन्न प्रवाह कसे पसरत होते हें दाखविण्यांत आलें आहे; आणि म्हणून या भिन्न परंपरेनें उत्पन्न होणाऱ्या गुणदोषांचें चांगलेंच आविष्करण झालें आहे. विशेषतः बौद्ध परंपरेमुळें शिक्षणाचें कार्य कसें फोंफावलें व त्या धर्माचा प्रभाव भारतांत व भारताबाहेर कसा पडला हें चांगलेंच प्रत्ययास येतें. बौद्ध भिक्षूंच्या कामांत व नंतरच्या ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या कामांत बरेंच साम्य दिसून येईल. आजच्या शिक्षकांनीं असेंच काम हातीं घेतलें तर आजच्या शिक्षणाचा बिकट प्रश्न सहज सुटेल.

एकंदर ग्रंथाचा सूर पाहिला असतां श्री. तवकरांच्या दृष्टीसमोर आश्रमीय शिक्षणसंस्थांचें श्रेष्ठत्वच चमकत आहे असें स्पष्ट दिसतें. पण आजच्या शैक्षणिक विचारसरणीचा कलहि तिकडेच झुकतो आहे. रेसिडेन्शल स्कूल्स व कॉलेजेस निघावींत असें आतां सर्वांनाच वाटायला लागलें आहे.

सर्व ग्रंथ बरबर चाळला तरी त्यांत विद्वान् व चारित्र्यवान् अध्यापकांचा गुणगौरव केलेला आढळून येईल. प्राक्कालीन अध्यापकांचें ज्ञान सखोल, चारित्र्य निर्दोष, व शिस्त वाखाणण्याजोगी असे; त्यांच्यांत स्वार्थाचा अभाव व कार्यशक्ति भरपूर असल्यानें त्यांच्याकडून विधायक कार्यें भरपूर होत. विद्यार्थ्यांबद्दल तर त्यांना अत्यंत कळकळ वाटे. ज्या संस्थेंत ते कार्य करीत ती संस्था अप्रतिम करण्याचा त्यांचा अहर्निश प्रयत्न चालू असे, वाटेल तितक्या कठीण कार्यांची जबाबदारी अंगावर घेऊन वाटेल त्या ठिकाणीं जाण्याची त्यांची तयारी असे.

या ग्रंथांत नालंदादि विद्यापीठांतील ग्रंथसंग्रहाबद्दल माहिती दिली आहे. ती खात्रीनें वाचनीय वाटेल. निरनिराळ्या विद्यापीठांतून शिकविण्यांत येणाऱ्या विद्यांची यादी देण्यांत आली आहे. त्यावरून वैदिक विद्यापीठें मागें कां पडलीं व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बौद्ध विद्यापीठांकडे सामान्य जनता कां आकर्षिली गेली हें लक्षांत येईल. वैदिक परंपरेच्या विद्यापीठांतून ठराविक विषयच शिकविले जात; तक्षशिला प्रकरणांत त्यांबद्दल माहिती दिली आहे. पण बौद्ध व जैन परंपरांच्या विद्यापीठांतून या विषयांशिवाय पुष्कळच व्यावहारिक विषय शिकविले जात; त्यामुळें विद्यार्थ्यांस पुढील आयुष्यांत उपाशी राहण्याची पाळी येत नसावी. हे शिक्षणाचे विषय बौद्ध विद्यापीठांतून १८ असल्याचें व जैन विद्यापीठांतून ७२ असल्याचें तक्षशिला नालंदा, गुणशीला व वलभी विद्यापीठ प्रकरणांतून सांगितलें आहे.

याशिवाय जैन विद्यापीठांतून सहशिक्षण सर्वत्र रूढ असल्याचें सांगण्यांत आलें आहे; त्यामुळेंहि विद्यार्थी-विद्यार्थिनींचा भरपूर भरणा या विद्यापीठांतून होऊं लागला असावा.

जागद्दल विहार व ॲलेक्झँड्रीया विद्यापीठांची तुलना करून श्री. तवकरांनीं प्राचीन प्राश्चात्य विद्यापीठांच्या श्रेष्ठत्वाबद्दलची रूढ असलेली भ्रामक कल्पना दूर केली आहे.

'प्राचीन व मध्ययुगीन विद्यापीठें' या सदराखालीं पुस्तकाच्या शेवटच्या भागांत श्री. तवकर यांनीं बरीच उपयुक्त माहिती दिली आहे. तुलनात्मक अभ्यासास या माहितीचा खात्रीनें उपयोग होईल.

अशा प्रकारचे ग्रंथ लिहून ते प्रसिद्ध करणें हें मोठें परिश्रमाचें व खर्चाचें काम आहे हें सांगावयास नको. श्री. तवकर यांचा हा मौल्यवान ग्रंथ वाचकांना सादर करण्यांत मला मोठा आनंद व अभिमान वाटतो.

बोटावाला बिल्डिंग,
११, हॉर्निमन सर्कल
फोर्ट, मुंबई

रा. वि. परुळेकर
डिरेक्टर, इन्डियन इन्स्टिट्यूट
ऑफ एज्युकेशन, मुंबई

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



सहा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आरंभींचे चार शब्द

प्रादेशिक विद्यापीठें काढण्याची कल्पना जनतेंत प्रसृत झाल्यानंतर व सरकारनेंहि तें धोरण अमलांत आणण्याचें निश्चित केल्यानंतर महाराष्ट्रांतील लोकांनीं सरकारकडे एका महाराष्ट्र युनिव्हर्सिटीची मागणी केली. मुंबई सरकारनेंहि ती काढण्याच्या हेतूनें कांहीं वर्षांपूर्वी एक समिति नेमली. या समितीनें एक प्रश्नपत्रिका तयार करून ती शिष्टलोकांकडे पाठविली. आतां विद्यापीठ नक्की निघणार म्हणून लोकांना आशा वाटूं लागली. ही प्रश्नपत्रिका मला पहावयास मिळाल्यानंतर माझ्या मनांत आलें कीं, हें नवीन विद्यापीठ निघाल्यास तें पाश्चात्य विद्यापीठांच्या ध्येयांवर व कल्पनांवर आधारलेलें निघणार ! पण आपल्या भारतांत प्राचीन कालीं जीं विद्यापीठें होऊन गेलीं तीं कोणत्या ध्येयानें प्रेरित झालीं होतीं व कोणत्या कल्पनांवर उभारण्यांत आलीं होतीं हें जर कळलें तर आपणांस आधुनिक विद्यापीठें व प्राचीन विद्यापीठें यांतील फरक पाहावयास मिळेल.

ही कल्पना मनांत आल्यावर मी प्राचीन विद्यापीठांसंबंधानें माहिती मिळविण्याच्या मार्गाला लागलों. डॉ. ए. एस्. अळतेकर, एफ्. ई. के. (Keay) वगैरेंचीं या विषयावरील पुस्तकें मला पहावयास मिळालीं. त्यांत प्राचीन विद्यापीठांच्या शिक्षणक्रमासंबंधानें व इतिहासासंबंधानें माहिती देण्यांत आलेली दिसली. पण या विषयावर जितकी अधिक माहिती मिळेल ती मिळविण्याचा प्रयत्न मी करूं लागलों. या बाबतींत सेंट झेविअर कॉलेजांतील हिस्टॉरिकल रिसर्च इन्स्टिट्यूटच्या लायब्ररीचा मला फार उपयोग झाला हें नमूद करण्यास आनंद वाटत आहे. भारतीय विद्यापीठांसंबंधानें वाचीत असतांना मला असें आढळून आलें कीं वैदिक विद्यापीठांबरोबरच जैन व बौद्ध विद्यापीठांनींहि प्राचीन भारताच्या शिक्षणक्षेत्रांत विपुल काम केलें आहे. तेव्हां जैन व बौद्ध विद्यापीठांसंबंधानेंहि भरपूर माहिती मिळविण्याचा माझा प्रयत्न सुरू झाला.

प्राचीन भारतीय विद्यापीठांच्या इतिहासासंबंधानें स्वतंत्र अशीं पुस्तकें फारच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

थोडीं पाहण्यांत आलीं. त्यांत डॉ. संकालिया यांचें 'द युनिव्हर्सिटी ऑफ् नालंदा' हें एक विशेष नमूद करण्याजोगें पुस्तक दिसलें. श्री. र. मो. त्रिवेदी यांचें 'हिंदना विद्यापीठो–प्राचीन अने मध्यकालीन' हें गुजरातींत लिहिलेलें दुसरें एक पुस्तक मला वाचावयास मिळालें. हें पुस्तक मला फारच आवडलें. या पुस्तकाचा एकच भाग वाचावयास मिळाला. इतर जे ग्रंथ पहावयास मिळाले त्यांत विद्यापीठांच्या इतिहासविषयक भागाला गौणत्व दिलेलें होतें.

या विद्यापीठांसंबंधानें जसजशी जास्त माहिती मिळूं लागली तसतशी त्यासंबंधानें एक ग्रंथ लिहिण्याची कल्पना मनांत चमकून गेली; व त्या उद्देशानें मी अधिक माहिती मिळवूं लागलों. आपला देश आतां स्वतंत्र झाला आहे व आपल्या शिक्षणाच्या प्रश्नाकडे लोकांचें व सरकारचेंहि विशेष लक्ष लागलें आहे. तेव्हां तुलनात्मक दृष्टीनें विचार करण्यास या ग्रंथाचा उपयोग होईल असेंहि मला वाटलें.

आज शिक्षणासंबंधानें लोकांच्या मनांत एक प्रकारची घृणा उत्पन्न झाली आहे. शिक्षणसंस्थांबद्दल लोकांना आदर नाहीं. शिक्षक थट्टेचा विषय झाला आहे. शिक्षणाचा उपयोगहि फारच थोडा उपकारक झालेला दृष्टीस पडतो. पंधरा वर्षें शिक्षण घेऊनसुद्धां विद्यार्थी कर्तृत्ववान् बनत नाहीं. कारकुनी करण्यापलीकडे शिक्षण घेतलेल्या सामान्य जनतेचें पाऊल पडत नाहीं. ही स्थिति आपणांकडेच आहे असें नाहीं, तर त्या बाबतींत पाश्चात्य देशांतील थोर थोर विचारवंतांनींहि निराशेचे व हताशपणाचे उद्गार निरनिराळ्या वेळीं काढले आहेत. पाश्चात्य देशांतील शिक्षणपद्धतीचा उपयोग जगाला उपकारक झाला नाहीं. तेथील शिक्षण जागतिक शांतीचे विचार पसरूं शकलें नाहीं.

आपली प्राचीन संस्कृति थोर व टिकाऊ अशी ठरली आहे. हजारों वर्षांपूर्वीचे आपले प्राचीन ग्रंथ आजसुद्धां पहिल्या प्रतीचे मानले जात आहेत. आजच्या भारताच्या एकंदर जीवनमूल्यांवरहि प्राचीन संस्कृतीचाच पगडा बसलेला आहे. आपल्या प्राचीन काळच्या 'सुवर्णभूमी'बद्दल आपण स्तोत्रें गातो व प्राचीन काळचें गतवैभव मिळविण्याबद्दल विचार करतों. तेव्हां प्राचीन काळच्या थोर थोर आचार्यांनीं दिलेल्या शिक्षणाचा परिणाम तत्कालीं फारच फलदायी झाला होता यांत शंका नाहीं. त्यांनीं चालविलेलीं विद्यापीठें व इतर विद्यास्थानेंच हें शिक्षण देण्याचें कार्य करीत होतीं. पण आज आपणांस त्या वेळच्या शिक्षणपद्धतीसंबंधानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व शिक्षकांच्या कर्तृत्वासंबंधानें फारच थोडी माहिती आहे. हें सामान्य जनांचें झालें; पण शिक्षणकार्यांत रमून गेलेल्या आधुनिक शिक्षणतज्ज्ञांनासुद्धां प्राचीन विद्यापीठासंबंधानें माहिती नसते. तक्षशिला व नालंदा यांचीं नांवें आतां कोठें सर्वतोमुखीं होऊं लागलीं आहेत. पण अशीं शेंकडों व हजारों विद्यापीठें प्राचीन कालीं होऊन गेलीं. त्या सर्वांबद्दल संशोधन होऊन त्यांचा इतिहास अद्याप रचायचा आहे. यांपैकीं फक्त १९ विद्यापीठांची माहिती या ग्रंथांत दिली आहे. मदुरा, मिथिला, अयोध्या, गुणशील वगैरे विद्यापीठांबद्दल क्वचितच कोठें वाचावयास मिळणारी माहिती या ग्रंथांत पहावयास मिळेल.

प्राचीन विद्यापीठांचा नुसता रुक्ष इतिहास लिहिण्याचा लेखकाचा मानस नसल्यानें त्यांतील जीवनाचा व त्या जीवनाच्या दूरगामी होणाऱ्या परिणामांचाहि विचार या ग्रंथांत केला आहे. एकंदर विषय कंटाळवाणा न वाटावा म्हणून शक्य तितका प्रयत्न केला आहे.

निरनिराळ्या विद्यापीठांचा इतिहास लिहीत असतांना तीच तीच माहिती येऊन विधानांची द्विरुक्ति व पुनरुक्ति होण्याचा संभव असतो. कित्येक वेळां ती पुनरुक्ति टाळणेंहि शक्य नसतें; तरी पण ती शक्य तितकी कमी करण्याचा प्रयत्न या ग्रंथांत केला आहे.

'प्राचीन' या शब्दांत प्रागैतिहासिक कालापासून ब्रिटिश अमदानीअगोदरचा काल धरला आहे. म्हणून अगदीं इ. स. १८०० पर्यंत अस्तित्वांत असणाऱ्या एका विद्यापीठासंबंधानें माहिती दिली आहे. असें करण्याचें कारण इतकेंच कीं ब्रिटिश अमदानी सुरू होईपर्यंत अगदीं एकच अशी शिक्षणपद्धति प्राचीन कालापासून भारतांत चालू होती.

प्राचीन भारतीय शिक्षणतंत्र व आधुनिक शिक्षणतंत्र यांतील फरक हा ग्रंथ वाचल्यानें लक्षांत येईल. दोनहि शिक्षणतंत्रांत एक साम्य दिसेल. तें म्हणजे 'चालू परिस्थिति बदलून नवीन परिस्थिति उत्पन्न करण्याचा प्रयत्न करणें.' पण हें एक साम्य असूनहि दोन प्रकारच्या या शिक्षणतंत्रानें परिणाम मात्र दोन ध्रुवांइतके भिन्न घडवून आणले आहेत हेंसुद्धां हा ग्रंथ वाचल्यावर लक्षांत येईल.

आजचें शिक्षण घडवून आणणाऱ्या तज्ज्ञांना अगदीं इ. स. १९१४ पर्यंत वाटत होतें कीं आजच्या शिक्षणानेंच जगांत खरी व चिरकाल टिकणारी संस्कृति

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
पेरली जात आहे; आणि या नवीन विचारांची जी सांस्कृतिक लाट यूरोप–अमेरिकेवर गेल्या शतकाच्या उत्तरार्धापासून एकसारखी पसरत होती तिला ते तज्ज्ञ दुवा देत होते. पूर्वीचे लोक रानटी, आपण शहाणे; ते संकुचित वृत्तीचे, आपण उदार मनाचे; ते राक्षसी विचारांचे, आपण हळव्या मनाचे,–हीच कल्पना या नवीन संस्कृतीच्या अध्वर्यूंची होती ! पण १९१४ सालच्या पहिल्या जगड्व्याळ युद्धानें सर्वांचेच डोळे लख्ख उघडले. जिची आपण आतांपर्यंत स्तुति करीत होतों तिचा परिणाम तर यादवी, नरहत्या, शहरांचा नाश, सुंदर वस्तूंचा नाश इत्यादिकांत झाला ! मग हूणादि रानटी लोकांच्या संस्कृतींत व आधुनिक संस्कृतींत फरक तो काय ? प्रत्येक सुज्ञ मनुष्य असा विचार करूं लागला. नवीन संस्कृतीनें जगावर उपकार केलेले दिसत असतील, कदाचित् तसा प्रयत्नहि होत असेल, पण रानटी संस्कृतीनें अद्यापपर्यंत केलेल्या अनर्थापेक्षां कांहीं कमी अनर्थ या संस्कृतीनें खात्रीनें केला नाहीं. ही नवीन संस्कृति म्हणजे आपल्या नव्या शिक्षणाचाच परिणाम ! कारण तें तर या संस्कृतीच्या मुळाशीं. तेव्हां या अनर्थ घडवून आणणाऱ्या शिक्षणतंत्रांत फरक घडवून आणला पाहिजे, म्हणून विचार-प्रवाह सुरू झाला. नवीन नवीन प्रयोग सुरू झाले व हें काम जवळ जवळ २० वर्षेपर्यंत चालू होतें. इतक्यांत दुसरें जगड्व्याळ युद्ध सुरू झालें ! झालें, लोकांचीं सुखस्वप्नें पुनः एकदां पार मावळून गेलीं. या युद्धानें तर कहरच केला. जगाच्या पाठीवर असा एकहि महत्त्वाचा भाग राहिला नाहीं कीं ज्याला या युद्धाचा चटका बसला नाहीं; आणि शिवाय 'ॲटम् बॉम्ब' सारखीं विश्वभक्षक व भयंकर अस्त्रें निर्माण झालीं व जगाचा सत्यनाश होऊं घातला !!

ही परिस्थिति उत्पन्न करण्याला कारण शिक्षणच असल्यानें हा सर्व आधुनिक शिक्षणाचाच परिणाम आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं; कारण एक परिस्थिति बदलून तिच्या जागीं नवीन परिस्थिति उत्पन्न करण्याचें काम शिक्षणच करूं शकतें. 'वातावरण' बदलून टाकणें हें शिक्षणाचें एक महत्त्वाचें कार्य आहे.

आधुनिक शिक्षणानेंहि जगाचें वातावरण बदलून टाकलें आहे. ज्यांना ज्यांना या नवीन शिक्षणाचा अनुभव आला आहे त्यांना त्यांना आपण नवीन जगांत वावरत आहोंत असेंच वाटत असतें. या नवीन शिक्षणानें प्रत्येक बाबतींत केवढी तरी मोठी क्रांति घडवून आणली आहे. पण या शिक्षणानें एकच गोष्ट टाळली आहे. ती म्हणजे षड्रिपूंना ताब्यांत ठेवून प्राणिमात्राला सुख होईल असें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वातावरण उत्पन्न करण्याचें. आजचें शिक्षण 'सर्वभूतहिते रताः' असे लोक तयार करीत नाहीं; 'सर्वेऽपि सुखिनः सन्तु, सर्वे सन्तु निरामयाः, सर्वे भद्राणि पश्यन्तु, न कश्चिद् दुःखभाक् भवेत्' ही भाषा आजच्या शिक्षणाची सर्वस्वीं नाहीं. आपला स्वतःचा फायदा, स्वतःच्या देशाचा फायदा, स्वतःच्या पार्टीचा फायदा, व त्याकरितां इतरांचा संहार झाला तरी चालेल. हेंच आजच्या शिक्षणाचें अंतिम ध्येय दिसतें. नाहीं तर गेल्या दोनहि महायुद्धांत इतका मनुष्यसंहार झाला नसता; प्राणिमात्रांच्या सुखास आवश्यक लागणाऱ्या गोष्टींचा नाश केला गेला नसता !

शिवाय आजच्या शिक्षणानें खोटा राष्ट्राभिमान उत्पन्न केला आहे. आजचें शिक्षण काळा-गोरा वाद थांबवूं शकलें नाहीं. व्यापाराच्या चढाओढीच्या नांवाखालीं साम्राज्यसत्ता वाढविण्यास पोषक शैक्षणिक कल्पना पसरविल्या गेल्या. राष्ट्राराष्ट्रांत द्वेषमूलक भावनांचें बीज पेरलें गेलें. या बाबतींत 'प्रचार' (प्रोपोगँडा)-तंत्राचा उपयोग सुरू केला; व त्याकरितां वाटेल त्या असत्य कथा कशा पसराव्या, असत्य प्रसंग कसे उत्पन्न करावे, हें लिखाणानें, फोटोग्राफीच्या सहाय्यानें शिकविण्यांत आलें. निरनिराळीं प्रदर्शनें भरवून, निरनिराळे चित्रपट दाखवून, सर्रास सर्व वर्तमानपत्रांतून व नियतकालिकांतून आणि शाळा-कॉलेजांतील पाठ्यपुस्तकांतून हें नवीन तंत्र उपयोगांत आणलें गेलें. नीतिमत्तेच्या निरनिराळ्या व विकृत कल्पना पसरविण्यांत आल्या. या सर्वांचाच परिणाम आज सर्व मनुष्यजातीला भोगावा लागत आहे.

हा झाला शिक्षणाचा सर्वसाधारण परिणाम. पण आज शिक्षण म्हटलें कीं वरील गोष्टी आपल्या डोळ्यांसमोर येत नाहींत. शिक्षणाचा संबंध आपण केवळ शाळा-कॉलेजांत शिकविणाऱ्या गोष्टींकडे लावतो. शाळा-कॉलेजांच्या इमारती, त्यांतील पाठ्यपुस्तकें, तीं शिकविणारे शिक्षक, मुलांना द्यावयास लागणारी फी व या सर्वांसंबंधाचें शिक्षणतंत्रच आपणापुढें उभें राहतें. या शिक्षणाचा अंतिम परिणाम काय येणार आहे हें जर आगाऊ कळतें, याचा विचार जर पहिल्यानेंच केला गेला, तर मुलांस शाळा-कॉलेजांत पाठविण्याअगोदर पालकानें विचार केला असता; व अशा शिक्षणसंस्थेंत मुलांना न पाठविणें बरें असें त्यास वाटलें असतें.

तरी पण या व अशा प्रकारच्या शिक्षणाचा अगदीं खालच्या पायरीवरून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
आपण विचार करूं लागलों तरीसुद्धां, म्हणजे शाळा-कॉलेजांच्या मर्यादित वातावरणांतसुद्धां, आजच्या शिक्षणांतील खालील ठळक दोष सहज दिसून येतील.

(१) आजच्या शिक्षणाकरितां सरकार व जनता अतोनात पैसा खर्च करीत आहेत. पण हा पैसा खर्च होतो कशांत ? आपण केवळ कृत्रिम वातावरण उत्पन्न करण्यांतच हा पैसा खर्च करीत नाहीं का ? ज्या विद्यार्थ्यांकरितां हें शिक्षण आहे त्यांच्याकरितां यापैकीं किती पैसा खर्च होतो याचा आपण विचारच करीत नाहीं. उत्तम शिक्षणसंस्थांबद्दलची आपली आजची कल्पना म्हणजे त्यांच्या प्रशस्त इमारती व त्यांतील किंमती उपकरणें ! शिक्षक व विद्यार्थी नव्हत ! ! पण या इमारतींवर व शोभेकरितां ठेवलेल्या उपकरणांवर हा पैसा खर्च न करितां तो या शिक्षकांवर व विद्यार्थ्यांवर केला तर ? प्रत्येक संस्थेस हा असा बाह्य दिखाऊपणा उत्पन्न करण्यास मदत होत असते व प्रोत्साहन मिळत असतें. भव्य इमारती व दिखाऊ उपकरणांच्या अभावींसुद्धां उत्तम शिक्षक चांगले विद्यार्थी खात्रीनें तयार करूं शकतील.

(२) सर्वांना शिक्षणाचा लाभ सारखा मिळावा म्हणून ब्रिटिश अमदानी सुरू झाल्यापासून सार्वजनिक शिक्षणाची सर्रास योजना सुरू करण्यांत आली. पण या पद्धतींत अनंत दोष आहेत. या पद्धतीमुळें मुलांचे वैयक्तिक गुण विकास पावूं शकत नाहींत. ठराविक मुलांची संख्या असणाऱ्या वर्गांत निरनिराळ्या गुणदोषांचीं मुलें असणार. मुलामुलांच्या बुद्धीमध्यें फरक दिसून येणार. प्रत्येक विद्यार्थ्याची ग्रहणशक्ति व धारणाशक्ति निराळी. जसा वर्ग मोठा तसा हा फरकहि वाढत जाणार. अगदीं ३५।४० मुलांचा वर्ग घेतला तरी त्यांतील प्रत्येक व्यक्तीच्या गुणावगुणाकडे लक्ष देणें शिक्षकास शक्य होणार नाहीं. यामुळें कोणत्याहि शाळेंतील परीक्षांचे निकाल पाहिले तर शिक्षकांची मेहनत फुकट गेल्याचें कितीतरी विद्यार्थ्यांच्या बाबतींत दिसून येईल.

(३) आजच्या शिक्षणपद्धतींत मुलांच्या नैसर्गिक प्रवृत्तींच्या वाढीला फारच थोडा वाव आहे; व यामुळेंच त्यांच्या फाजील कार्यशक्तीला कोणत्याहि प्रकारचें वळण लावण्यांत येत नाहीं व मुलें उनाड व मवाली प्रवृत्तीचीं निघाल्याची ओरड सर्वत्र ऐकूं येते. आणि यामुळेंच शिस्तीचा सर्वत्र बिघाड झालेला दिसून येतो. या बाबतींत विद्यार्थ्यांना दोष देण्यांत येतो; पण दोष विद्यार्थ्यांचा नसून शिक्षणतंत्राचा आहे. नाहीं म्हणावयास या गोष्टीला कांहींसा आळा घालतां यावा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
म्हणून अलीकडे हस्तव्यवसायावर व अभ्यासाव्यतिरिक्त घेण्यांत येणाऱ्या कांहीं गोष्टींवर जोर देण्यांत येत असतो. पण त्यांचाहि उपयोग फारच थोड्या मुलांच्या बाबतींत फलदायी होऊं शकतो असा अनुभव आहे.

(४) शाळेंतील २०×२० चौ० फू० च्या खोलींतच सर्व शिक्षण होत असल्यानें मुलांची दृष्टि कोती बनते; व त्यामुळें दूरदृष्टीचे विद्यार्थी फारच थोड्या प्रमाणांत निघतात. मुलांची दृष्टि विशाल व्हावयास त्यांच्यापुढें दूरवर पसरणारा अफाट प्रदेश पाहिजे.

(५) मुलांचें नैतिक जीवन व आध्यात्मिक जीवन सुधारण्याचें साधन हल्लींच्या शिक्षणतंत्रांत मुळींच नाहीं. नुसतें बायबल् किंवा गीता पाठ म्हणून हें जीवन सुधारणार नाहीं.

(६) हल्लींच्या शिक्षणपद्धतीनें आपणांकडे तरी मुलांची शारीरिक उन्नति होऊंच शकणार नाहीं. मुलांच्या शरीराकडे पाहिलें म्हणजे फार वाईट वाटतें ! मुलें नुसतीं निःशक्त व निर्बलच बनत चाललीं नसून तीं फार खुजींहि होऊं लागलीं आहेत. शारीरिक शिक्षणासंबंधानें शिक्षण खात्याचे हल्लींचे प्रयत्न फलदायी झालेले दिसत नाहींत.

(७) आजच्या शिक्षणप्रणालींत शिक्षकाचें ज्ञान अत्यंत थोडें असतें. शाळा-कॉलेजांतील शिक्षकांपैकीं फारच थोडे शिक्षक विद्वान् म्हणून ओळखले जातात. कारण जीं ठराविक पुस्तकें शिकवावयाचीं असतील त्यांच्यापलीकडे त्यांचें ज्ञान गेलेलें नसतें ! त्यांच्याकडून ग्रंथालयाचा भरपूर उपयोग होत नाहीं; व शाळा-कॉलेजांतील ग्रंथालयें केवळ शोभेचा विषय बनलेलीं असतात. याचा परिणाम विद्यार्थ्यांवर न झाल्यासच आश्चर्य.

(८) आपल्याकडील आजच्या शिक्षणांतील सर्वांत मोठा दोष म्हणजे तें विनामूल्य घेतां न येणें हा आहे. यामुळें त्याचा फायदा सर्वांना मिळत नाहीं. पुष्कळांना तें मध्येंच सोडावें लागतें. उच्च शिक्षण तर केवळ श्रीमंतांकरितांच ही कल्पना अजूनसुद्धां पुष्कळांची आहे !

(९) शिक्षणसंस्था गांवांत असल्यानें विद्यार्थी घरींच राहतात; व शिक्षकांची त्यांच्यावर सतत देखरेख नसते. शिवाय त्यांच्या फाजील कार्यशक्तीला योग्य वळण लावण्याची सोय नसल्यानें शिस्तीचा प्रश्न सर्वत्र उद्भवतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(१०) आजचा सर्वसाधारण शिक्षक जसा ज्ञानी नाहीं तसा प्राक्कालीन शिक्षकाप्रमाणें चारित्र्यवान्हि नाहीं. शिक्षणाचें खरें कार्य चारित्र्यवान् शिक्षकच करूं शकेल.

(११) आजच्या शिक्षणक्रमांत शिक्षणाला फारच थोडा अवधि असतो या गोष्टीकडे फारच थोड्या लोकांचें लक्ष गेलें आहे. दिवसाच्या २४ तासांतून अवघे ४॥ तास शाळा. या ४॥ तासांतून प्रत्यक्ष शिक्षण ३ तासांहून जास्त वेळ देण्यांत येत नाहीं. बरें, वर्षांतून ३६५ दिवस शाळा नसते. सुटीचे हक्काचे कमींत कमी १०० दिवस; त्याशिवाय ५२ रविवार व ५२ शनिवारची अर्धा दिवस सुटी. म्हणजे वर्षांतून जवळ जवळ १७५ दिवसांवर शाळा बंद ! याशिवाय वार्षिक परीक्षांच्या वेळीं महिनाभर अभ्यास होत नाहीं हें निराळेंच. यावरून दररोज तीन तासांप्रमाणें सहा महिन्याच्या अवधींत कितीसें शिक्षण होणार ? आणि शाळा व कॉलेज यांतील १५ वर्षांच्या अवधींत मुलांना जर ५० ओळी नीट व शुद्ध लिहितां आल्या नाहींत तर दोष कोणाचा ? वास्तविक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आयुष्यांतील १२ महिन्यांपैकीं निदान ११ महिने दररोज कमींत कमी ९ तासांप्रमाणें शिक्षकाच्या देखरेखीखालीं जावयास पाहिजेत; व या वेळांत विद्यार्थ्यांच्या सर्व शक्तींचा योग्य व पूर्ण उपयोग करून घेतला पाहिजे. मुलांचें खाणें, पिणें, खेळणें, झोंपणें हें सर्व शिक्षकाच्या देखरेखी-खालीं झाल्यास त्या मुलांचें भावी आयुष्य उज्ज्वल कां होणार नाहीं ?

(१२) शिक्षणाची सर्वच सूत्रें सरकारच्या हातीं असावीं अशी आज सर्व लोकांची ओरड आहे. पण याचा परिणाम जगांत आतांपर्यंत काय झाला आहे याचा विचार करावयास पाहिजे. शिक्षणाचीं सूत्रें जर पूर्णपणें सरकारच्या हातीं राहिलीं तर ज्या तऱ्हेचें सरकार सत्तारूढ होईल त्या तऱ्हेचें शिक्षण दिलें जाईल. फॅसिस्ट राज्यपद्धति सुरू झाली तर शिक्षणसुद्धां फॅसिस्टांच्या तत्त्वाला अनुरूप व पोषक असेंच दिलें जाईल; कम्युनिस्ट किंवा कॅपिटॅलिस्ट राज्यपद्धतीबरोबर शिक्षणाची दिशाहि बदलेल. हें आपण जर्मनी, रशिया, इंग्लंड, अमेरिका व जपान या देशांत गेलीं २५ वर्षें पहात आलों आहोंत. स्वतंत्र विचाराचें शिक्षण कोठेंच मिळणार नाहीं. लोकसमुदायाला, मानवतेला, जगाला सुख मिळेल या हेतूनें कोठेंच शिक्षण दिलें जाणार नाहीं. देशांतील प्रभावी गटाची जी विचारसरणी त्याला पोषक होईल असें शिक्षण सक्तीनें सर्वांवर लादलें जाणार ! याचाच परिणाम जागतिक अशांतता, युद्धें, सर्वनाश !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तेव्हां कोणत्याहि देशांत शिक्षणाचीं सूत्रें केवळ सत्ताधार्‍यांच्या हातांत असणें लोक-हिताचें होणार नाहीं. तीं चारित्र्यवान् शिक्षकांच्या हातांत असावयास पाहिजेत. प्राचीन भारतीय विद्यापीठें चारित्र्यवान् शिक्षकांच्या हातांत असल्यानें त्यांनीं केलेली कामगिरी जगाला सुखावह झाली. त्यांच्याच कामगिरीची कीर्ति या ग्रंथांत गाईली आहे.

शिक्षकाचें काम दूषित वातावरण शुद्ध करण्याचें असतें. अंधारांतून तो उजेडांत आणतो; मृत्यूकडून तो अमृतत्वाप्रत नेतो; तो रानटी वृत्तीचा नाश करतो. मनुष्य जात्याच रानटी, सर्व प्राणिमात्रांत क्रूर. स्वतःच्या फायद्याकरितां इतर प्राण्यांचा तर तो नाश करीलच, पण स्वतःच्या जातीचाहि संहार करण्यास तो चुकणार नाहीं ! शिवाय तो राग-लोभ-कामादि षड्रिपूंच्या स्वाधीन. पण हा त्याचा स्वभाव नेहमींच न दिसण्याचें कारण तो वावरत असलेलें वातावरण होय. एकदां का हें वातावरण दूषित झालें कीं तो गेला मूळ स्वभावावर ! गळ्यांत गळा घालणारे लोक जमावानें एकमेकांवर हल्ले करण्यास तयार होतात; जातीय यादवी माजवितात; एकमेकांचीं घरें जाळतात !

चारित्र्यवान् शिक्षक एकंदर वातावरण कसें बदलूं शकतो व तें प्राणीमात्रांना सुखावह कसें होतें हें या ग्रंथांत दाखविलें आहे.

या ग्रंथांतील १९ विद्यापीठांची निवड त्यांतील कांहीं विशिष्ट गोष्टींमुळें करण्यांत आली आहे. हें वैशिष्ट्य पुढें दाखविलें आहे.

तक्षशिला : वैद्यकीय शिक्षण; शिल्पकला व युद्धकला यांचें साकल्यानें मिळणारें शिक्षण; येथें शिक्षण घेण्यास विद्यार्थी शेंकडों मैलांवरून येत.

नालंदा : ग्रंथसंग्रहालय; शिक्षकांचें चारित्र्य व त्यांचें ज्ञान; हजारों मैलांवरून विद्यार्थी येथें शिकण्यास येत व पुष्कळांना येथें प्रवेश मिळणेंहि कठीण जाई; सुव्यवस्थातंत्र.

विक्रमशिला : सुव्यवस्थातंत्र.

उदन्तपुरी : बौद्ध धर्माचा प्रसार हिंदुस्थानाबाहेर येथून झाला असावा.

जागद्दल : आजच्या विद्यापीठांप्रमाणें पदवी देण्याची प्रथा.

मिथिला : कोणत्याहि संस्थेंत स्वार्थ शिरला व आचार्यांचे विचार कोते व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
संकुचित होऊं लागलें म्हणजे ती संस्था उत्कृष्ट असूनसुद्धां लयास कशी जाते ह्याचें उदाहरण.

नवद्वीप : जगप्रसिद्ध विद्यापीठ स्थापण्यास एकादा तडफदार शिक्षकहि कसा कारणीभूत होतो याचें दिग्दर्शन.

काशी : कोणत्याहि प्रकारचें सुव्यवस्थातंत्र अमलांत नसतां केवळ प्राचीन परंपरेच्या भांडवलावरहि एकादें विद्यापीठ कसें टिकाव धरूं शकतें याचें चित्रण.

अयोध्या : प्राचीन काळीं राजपुत्रहि सर्व प्रकारचें शिक्षण घेण्यास गुरुगृहीं जात हें 'सगर' राजपुत्राच्या उदाहरणावरून स्पष्ट केलें आहे.

गुणशीला : स्त्रियांना शिकविण्यांत येणाऱ्या ६४ कलांची यादी दिली आहे; त्यावरून प्राचीन काळची सुसंस्कृत स्त्री कोणकोणते विषय शिकत होती याची कल्पना येईल.

कुण्डिनपुर : व्यायामशास्त्राचें महत्त्व गाइलें आहे.

वलभी : पुरुषांना शिकविण्यांत येणाऱ्या ७२ विद्यांची यादी दिली आहे.

कांची : अति प्राचीन कालापासून स्थापत्यकलेनें दक्षिण हिंदुस्थानांत किती प्रगति केली होती हें दाखविलें आहे. 'घटिका' संस्थांची माहितीहि याच प्रकरणांत दिली आहे.

मदुरा : नृत्यकलेची वाढ कशी झाली हें दाखविलें आहे. येथेंच तामीळ-संगमाचीहि माहिती दिली आहे.

मलकापुरम्, तिरुवोरियुर, तिरुमुक्कुडल वगैरे } मंदिरसंस्थांची माहिती दिली आहे.

विद्यापीठांच्या माहितीबरोबरच तदनुषंगानें येणाऱ्या कांहीं मुद्यांचाहि विचार केला आहे. त्यांतील महत्त्वाचे मुद्दे पुढें दिले आहेत: (१) 'विद्यापीठ' या शब्दानें सूचित होणाऱ्या अर्थाचें स्पष्टीकरण. (२) तक्षशिलेअगोदर जगावर एकहि ख्यातनाम विद्यापीठ असल्याचा दाखला इतिहासांत नाहीं; म्हणजे इतिहास-कालांतील तेंच पहिलें विद्यापीठ असलें पाहिजे. (३) युरोपांत गाजलेलें 'अलेक्झँड्रिया' विद्यापीठ फारच मागाहूनचें व भारतीय विद्यापीठांच्या मानानें कमी प्रतीचें. (४) धनुर्विद्येचा उगम हिंदुस्थानांतला; अल्ताई पर्वतांतला नव्हे. (५)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
बौद्ध धर्माच्या ऱ्हासाचें कारण हिंदु धर्माचें पुनरुज्जीवन नसून, बौद्ध धर्माचे प्रसिद्ध आचार्य तयार करण्याचे कारखाने–अर्थात् प्रसिद्ध विद्यापीठें–नाहींसे करण्यांत आले हें होय. (६) बौद्ध धर्माचा हिंदुस्थानांतून अस्त झाला; पण जगावरील हूणादि रानटी लोकांना बौद्ध आचार्यांनीं माणसाळविल्यामुळें त्यांच्याकडून जगावर होणारे हल्ले कायमचे टळले. इ. इ.

आपल्याकडील मध्ययुगीन विद्यापीठें व युरोपांतील तत्कालीन विद्यापीठें यांच्याबद्दल तुलनात्मक दृष्टीनें विचार करतां यावा म्हणून युरोपीय विद्यापीठांबद्दल एक परिशिष्ट जोडलें आहे.

ग्रंथ तयार होऊन बरेच दिवस झाले. स्वतःच तो प्रसिद्ध करून भयंकर जबाबदारी अंगावर घ्यावी किंवा नाहीं याबद्दल गेलें वर्ष विचार करण्यांत घालविलें व शेवटीं यंदां तो दोन भागांत प्रसिद्ध करावा असें नक्कीहि केलें. इतक्यांत 'द इंडियन इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन' या नामवंत संस्थेचे विद्वान् व उत्साही चिटणीस श्री. जे. पी. नाईक हे मदतीस आले व त्यांनीं हा सर्व ग्रंथ त्यांच्या संस्थेतर्फे एका भागांतच छापण्याचें आश्वासन दिलें. संस्थेचे वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध संचालक श्री. आर्. व्ही. परुळेकर, एम्. ए., एम्. एड्. (लीडस्) यांनींहि ग्रंथ पाहिला व तो छापण्याबद्दल त्यांनीं संस्थेस फर्माविलें. शिवाय त्यांनीं ग्रंथास 'पुरस्कार'हि लिहून दिला या सर्व गोष्टी नीट जुळून आल्यामुळेंच हा ग्रंथ आज वाचकांच्या हातीं येत आहे. याबद्दल श्री. नाईक व श्री. परुळेकर यांचा लेखक अत्यंत ऋणी आहे.

हा ग्रंथ तयार करण्याच्या कामीं पुष्कळ ग्रंथांचा उपयोग झाला आहे; त्यांचीं नांवें स्वतंत्र दिलीं आहेत. लेखक या सर्व ग्रंथकर्त्यांचा अत्यंत ऋणी आहे. त्यांतल्या त्यांत डॉ. अळतेकर, डॉ. मझुमदार, डॉ. मुकर्जी, डॉ. दासगुप्ता, श्री. र. मो. त्रिवेदी, श्री. बा. मा. दाभाडे वगैरेनीं तर लेखकावर फारच उपकार करून ठेवले आहेत.

ग्रंथ लिहिण्यास घेतल्यापासून पुष्कळ प्रेमळ मित्रांनीं व गुरुजनांनीं वेळोवेळीं निरनिराळ्या सूचना केल्या त्याबद्दल त्यांचाहि लेखक आभारी आहे. त्यांतल्या त्यांत सेंट झेव्हिअर कॉलेजांतील प्राध्यापक वर्ग, विशेषतः फादर हेरास, प्रो. एन्. के. भागवत, डॉ. गोखले वगैरे आणि श्रीमत्स्वामी कुवल्यानंद, डॉ. अ. पा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
करमरकर, एम्. ए., पी एच्. डी., बाबासाहेब दळवी, ती. दादासाहेब तवकर यांचा उल्लेख अवश्य करावयास पाहिजे. ग्रंथाचीं प्रुफें तपासण्याचें व सूचि तयार करण्याचें काम चि. शरच्चंद्र ना. तवकर, बी. कॉम्. यानें केलें. त्याबद्दल त्यालाहि धन्यवाद.

शेवटीं व सर्वांत विशेष आभार मानले पाहिजेत ते 'मौज प्रिंटिंग ब्यूरो' च्या व्यवस्थापकांचे व कामगारांचे. श्री. भागवत बंधूंनीं आपुलकीच्या भावनेनें खास लक्ष घातल्यामुळेंच हें सुबक छपाईचें काम पहावयास मिळालें.

भरपूर माहितीनें भरलेल्या अशा प्रकारच्या ग्रंथांत पुष्कळ दोष राहण्याचा संभव असणें साहजिक आहे. अशा प्रकारचे दोष सुज्ञ व विद्वान् वाचकवर्गानें नजरेस आणून खालील पत्त्यावर कळविल्यास पुढील आवृत्तींत ते दोष काढून टाकण्यांत येतील व त्याबद्दल लेखक त्यांचा उपकृत होईल.

दादर विद्यामंदिर,
दादर, मुंबई, १४
गांधी जयंती, २–१०–१९५०.

आदर्श शिक्षकांचा सेवक
ना. गो. तवकर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुक्रमणिका

		पान
१	तक्षशिला	९
२	नालंदा	२५
३	विक्रमशिला	५७
४	उदन्तपुरी	७४
५	जागद्दल	८९
६	काशी	९६
७	अयोध्या	१०५
८	गुणशीला	११०
९	कुण्डिनपुर	११६
१०	मिथिला	१२२
११	नवद्वीप	१२६
१२	वलभी	१३६
१३	काञ्ची	१४८
१४	मदुरा	१६१
१५	सालोटगी मंदिर	१६७
१६	तिरुमुक्कुडल मंदिर विद्यापीठ	१६९
१७	एण्णायिरम् मंदिर	१७१
१८	मल्लाकापुरम् विद्यापीठ	१७३
१९	तिरुवोरियुर मंदिर विद्यापीठ	१७८
परिशिष्ट १	: प्राचीन मध्ययुगीन युरोपीय विद्यापीठें	१८०
परिशिष्ट २	: संदर्भ ग्रंथ : प्राचीन भारतीय विद्यापीठें	२१३
परिशिष्ट ३	: संदर्भ ग्रंथ : प्राचीन व मध्ययुगीन युरोपीय विद्यापीठें	२१७
सूचि		२१८

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शुद्धिपत्र

पान	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१	१२	मेसापोटेमिया	मेसोपोटेमिया
२	२०	फा-हायान	फा-हायेन
४	५	कुशन्	कुशान
१०	१३	भूसमुद्राच्या	भूमध्यसमुद्राच्या
१६	४	हस्तविषय	हस्तव्यवसाय
२०	१८	वशिष्ट्य	वैशिष्ट्य
२३	१०-११	सूल्वसूत्रें	शुल्वसूत्रें
२५	१२	गुप्तराजे	राजे
२९	२९	et Seg	et Seq
४७	१७	पाहिजे; ती ही	पाहिजे ती ही
५१	८-९	ऊर्फ प्रसिद्ध विक्रमादित्य	(शब्द गाळणें)
७०	२७	बुद्धपादज्ञान	बुद्धज्ञानपाद
८९	२३-२४	नव्हे. . .निर्माण	(गाळणें व पान ९० मध्यें ओळ २२ नंतर वाचणें
९०	३	त्रिपटक	त्रिपिटक
९०	२२	. . .	'भारतच' या शब्दापुढें पान ८९ मधील शेवटच्या दोन ओळी वाचणें
१०१	१६	दीग्धनिकाया	दीघनिकाया
१३७	१९	आचायाच्या	आचार्यांच्या
१३७	२७	लागले	लागले.[२]
१५३	२९	म्हटलें आहे	म्हटलें आहे.[५]
१५४	७	आढळून येतात.[५]	आढळून येतात.[६]
१८८	१९	प्रेग	प्राग
१९१	३	स्टडिमय	स्टडियम्
२११	२७	गांवांतील	गांवांतील

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१ : तक्षशिला

[काळ : इ. स. पू. ८०० ते इ. स. ४०० अदमासें]

तक्षशिलेचें प्राचीनत्व

ज्या कांहीं प्राचीन विद्यापीठांची माहिती आज आपणांस उपलब्ध झाली आहे त्यांत तक्षशिला हें सर्वांत प्राचीन विद्यापीठ होय. ज्या जागेंत या विद्यापीठाची स्थापना झाली तिला 'तक्षशिला' हें नांव कां मिळालें हें पाहून काढणें हा एक मोठा मनोरंजक इतिहासच होईल. तक्षशिलेसंबंधानें सर्वांत प्राचीन उल्लेख रामायणें[1], महाभारतें[2] व जातकें[3] ग्रंथांतून मिळतो. जातककालीं तर तक्षशिलेचें महत्त्व नुसत्या भरतखंडांतच नव्हे तर आशिया खंडाच्या इतर भागांत व युरोपांतील बऱ्याच देशांत पसरलें होतें; ती एक आन्तरराष्ट्रीय शिक्षणसंस्था झाली होती. तिचा विशेष प्रभाव मगधदेशापासून थेट पश्चिम इराणपर्यंत, म्हणजे तत्कालीन पार्थिया, मिडिया, पर्शिया, उत्तर बॅक्ट्रिया, मेसापोटेमिया (इराक), व अरबस्तान या देशांत, पडला होता.

तक्षशिला येथें प्राचीन काळीं वैदिक धर्माचें शिक्षण, नंतर बौद्ध धर्माचें

फार फार प्राचीन कालीं म्हणजे इ. स. पूर्व ६ व्या शतका अगोदर येथें केवळ वैदिक धर्माचें शिक्षण दिलें जाई; पण मगधदेशांत व इतरत्र बौद्धधर्माचा जोरानें प्रसार झाल्यानंतर येथेंही बौद्धधर्मालाच प्राधान्य मिळालें. पण बौद्ध व जैन शिक्षणपद्धतींत कर्मठपणा व कडवेपणा नसल्यानें बौद्ध व जैन शिक्षणपद्धतींत तद्धर्मीय ग्रंथांबरोबरच वैदिक ग्रंथही अभ्यासिले जात; इतकेंच नव्हे तर धर्मग्रंथांव्यतिरिक्त जे जे अभ्यसनीय विषय असत ते ते येथें शिकविले जात. नालंदा,

१. रामायण : ७-१०१. १०–१६.
२. महाभारत : १. ३. २०.
३. सुसीम जा०; भीमसेन जा०; तेलपत्त जा०; संजीव जा०; इ. इ.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विक्रमशिला, उदन्तपुरी, वलभी वगैरे विद्यापीठांचा इतिहास वाचला असतां ही गोष्ट आपल्या लक्षांत येते.

प्राचीन विद्यापीठांत तक्षशिलेचें आद्यस्थान

ज्या कालांत तक्षशिलेची भरभराट झाली त्या कालांत भारतांत इतर पुष्कळ ठिकाणचीं विद्यापीठें नांवारूपास आलेलीं दिसून येतात. त्यांत उज्जयिनी, कान्यकुब्ज, काशी वगैरे ठिकाणचीं विद्यापीठें विशेष गाजलेलीं होतीं. पण ज्या अर्थी अशा दूरच्या प्रसिद्ध विद्यापीठें असणाऱ्या ठिकाणांहून सुद्धां तक्षशिलेला येणाऱ्या विद्यार्थ्यांची रीघ लागलेली असे त्या अर्थी त्या वेळच्या सर्व विद्यापीठांत याच विद्यापीठाला पहिलें स्थान प्राप्त झालें होतें ही गोष्ट निश्चित ठरते. शिवाय येणाऱ्या विद्यार्थ्यांत राजपुत्र व श्रीमान् व्यापाऱ्यांचीं मुलेंहि असत व तीं पायपीट करीत तक्षशिलेइतक्या दूर ठिकाणीं विद्याभ्यासाकरितां जात ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्याजोगी आहे.[४]

तक्षशिला विद्यापीठाच्या माहितीचीं साधनें

तक्षशिलेसंबंधानें जी त्रोटक माहिती आज आपणांस मिळूं शकते ती खालील साधनांवरून : (१) रामायण–महाभारतादि संस्कृत ग्रंथ व जातकादि पाली ग्रंथ यांत वेळोवेळीं आलेले 'तक्षशिले' संबंधीं उल्लेख; (२) पाश्चात्य लेखक, विशेषतः ग्रीक व चिनी लेखक, यांच्या ग्रंथांतून 'तक्षशिले' संबंधानें मिळणारी माहिती; त्यांतूनहि अरायन, प्लिनी, प्लुटार्क, टॉलेमी, स्ट्रॅबो, डायोनिशियन्,[५] हुएनत्संग व फा-हायान यांच्या ग्रंथांत आलेले उल्लेख; (३) व उत्खननांत मिळालेली माहिती.

तक्षशिलेसंबंधानें प्राचीन उल्लेख

महाभारतांतील 'सर्पसत्रा'वरून तक्षशिलेसंबंधानें सर्वांत प्राचीन उल्लेख आपणांस मिळतो. हा सर्पसत्र जनमेजयानें 'तक्षशिला' येथें करविला असा उल्लेख

४. धम्मभट्ठ कथा: १ (पानें ३३७–३३८)
Dr. B. C. Law : India as Described in Early Texts of Buddhism and Jainism, p. 280.

५. J. W. M'Crindle : Ancient India, p. 192.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे.[६] तक्षशिला नगरी भरतानें वसविली व राजपुत्र 'तक्ष' याचें नांव तीस देण्यांत आलें असा रामायणांत उल्लेख आहे. भरतानें तक्षास तक्षशिलेचें राज्य दिलें म्हणून रघुवंशांत सुद्धां सांगितलें आहे.[७] जातक या बौद्धग्रंथांतून तर तक्षशिलेचें अतिप्राचीनत्व सिद्ध करण्याला भरपूर पुरावा आहे; कारण त्यांत ठिकठिकाणीं तत्संबंधीं उल्लेख आले आहेत. तक्षशिलेचें अतिप्राचीनत्व सिद्ध करण्याला वरील आधार पुरेसे आहेत.

तक्षशिलेसंबंधाचे पाश्चात्य प्राचीन उल्लेख

तक्षशिला ही नगरी प्रसिद्ध जो गांधारदेश त्याची राजधानी. हा देश म्हणजे वायव्य सरहद्दीवरील कंदाहार प्रांत होय. त्याच्या प्राचीनकालच्या व आजच्या मर्यादा भिन्न असूं शकतील. फार प्राचीन कालापासून हा प्रदेश प्रसिद्ध असून धृतराष्ट्रपत्नी गांधारी ही या देशाच्या राजाची कन्या होती. भारताच्या व बाहेरील जगाच्या वेशीवरचा हा प्रदेश; अर्थात् दोन प्रतिस्पर्धी राज्यांच्या मर्यादा म्हणून राहिलेल्या या प्रदेशांत शांतता नांदणें शक्यच नव्हतें. भारतेतर राजांना या प्रदेशांतूनच भारतांत प्रवेश मिळणार! शिकंदर हा या देशांत (व अर्थात् तक्षशिलेला) आला त्यावेळीं हें शहर फारच भरभराटींत होतें असें अरायन् हा यावनी इतिहासकार म्हणतो.[८] प्लिनीच्या मतें या प्रदेशास 'आमन्द' हें नांव होतें.[९] हा प्रदेश फारच सुपीक होता असें स्ट्रॅबोनें लिहून ठेविलें आहे;[१०] व याच गोष्टीची ग्वाही हुएनत्संग वगैरे लेखक देतात.

तक्षशिलेवर निरनिराळ्या संस्कृतींचे आघात व त्यांचा परिणाम

निरनिराळ्या काळीं निरनिराळ्या परकी राजांनीं या देशावर स्वाऱ्या केल्या

६. Dr. V. S. Sukhthankar : A. S.R. 1914–1915, Part II, pp. 36-41
म. भा. १-३-२०.

७. रघुवंश : १५-८९.

८. Marshall : A Guide to Taxila, p. 2.
M'Crindle : The Invasion of India by Alexander The Great, p. 92.

९. Pliny : Hist. Nat., vi. 23.

१०. M'Crindle : Ancient India, (1901), pp. 32–34.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व आपापली भिन्न संस्कृति त्यांनीं तक्षशिलेवर लादली. त्यांत इराणच्या राजानें इ. स. पू. ६ व्या शतकांत, ग्रीस देशाचा अलेक्झँडर ऊर्फ शिकंदर यानें इ. स. पू. ४ थ्या शतकांत, इंडो-बॅक्ट्रियन् राजांनीं इ. स. पू. २ ऱ्या शतकांत, सिदियन् राजांनीं इ. स. पू. १ ल्या शतकांत व कुशन् राजांनीं इ. स. नंतर च्या १ ल्या शतकांत या देशावर स्वाऱ्या केल्या.[११] म्हणजे ७०० वर्षे एकामागून एक अशा सतत स्वाऱ्या या देशावर होत होत्या. कोणत्याहि राजानें एकाद्या देशावर स्वारी केली म्हणजे तो तेथील मुख्य राजधानीवर व इतर मोठ्या शहरांवर आपली संस्कृति सर्वतोपरि लादण्याचा प्रयत्न करीत असतो, व या गोष्टीची साक्ष आजपर्यंतचा इतिहास देत आला आहे. मुसलमानी अंमल व नंतर इंग्रजी अंमल हिंदुस्थानावर सुरू झाल्यानंतर त्यांची संस्कृति आपण कशी स्वीकारली हें सर्वांच्या चांगलेंच परिचयाचें आहे. त्याचप्रमाणें पहिल्यानें आर्य संस्कृति व नंतर इराणी, ग्रीक, बॅक्ट्रियन् व सिदियन् संस्कृति यांचा आघात गांधार देशावर म्हणजे तक्षशिला व इतर मोठ्या शहरांवर झाला व त्यामुळें तो तक्षशिला येथील विद्यापीठावरही झाल्यास आश्चर्य नाहीं. विद्यापीठावर हे निरनिराळे आघात झाल्यामुळें त्यांचा परिणाम तेथील अभ्यासक्रम, अभ्यासपद्धति, राहणी, पोषाख, भाषा इत्यादिकांवर होऊन त्यांत निरनिराळे फरक होत गेले असणार; व निरनिराळ्या संस्कृतींतील बरेवाईट गुणदोषही तक्षशिलेच्या विद्यापीठांत उतरले असणार. नवीन संस्कृतीचा संस्कार कोणतीही व्यक्ति किंवा संस्था एकदम करूं शकत नाहीं. उलट विरोधच करीत असते. अशा प्रकारें भिन्न संस्कृतींचा झगडा चालला असतांना जास्त बलवान् संस्कृति या झगड्यांत विजयी होते. तरी-पण एकीच्या बऱ्यावाईट गुणदोषांचा परिणाम दुसरीवर झाल्याशिवाय रहात नाहीं. तक्षशिलेवर असे पुष्कळच आघात निरनिराळ्या वेळीं झाले व तेथील एका संस्कृतीवर दुसऱ्या संस्कृतीची उभारणी होत गेली. या झटापटींत तक्षशिला विद्यापीठाच्या अंगीं एक चिवटपणाचा गुण भिनून त्यानें एक हजार वर्षांवर टिकाव धरला.[१२] सतत एक हजार वर्षांवर शिक्षणाचें कार्य करीत असलेल्या दुसऱ्या एखाद्या

११. J. W. M'Crindle : Ancient India, p. 34 (Note).

१२. F. E. Keay : " Indian Education in Ancient India and Later Times, p. 142.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिक्षणसंस्थेचें उदाहरण जगाच्या शैक्षणिक इतिहासांत नमूद केलेलें पहावयास मिळणार नाहीं. परंतु या संस्कृतिसंग्रामांत इराणी संस्कृतीनें तिच्यावर ‘ खरोष्ट्री ’ लिपी लादल्यामुळें तक्षशिलेला आपली ‘ ब्राह्मी ’ लिपी गमवावी लागली.[१३]

तक्षशिला विद्यापीठ कसें ?

प्राचीन कालच्या विद्यापीठांसंबंधानें विचार करतांना एक गोष्ट विसरतां कामा नये; ती म्हणजे आपली ‘ विद्यापीठा ’बद्दलची कल्पना. विद्यापीठाबद्दलची आपली आजची कल्पना हजारों वर्षांपूर्वीच्या विद्यापीठांवर सर्वतोपरि लादणें योग्य होणार नाहीं. ‘ विद्यापीठ ’ या शब्दाचा उल्लेख केल्यावर जीं मूलभूत तत्त्वें आपल्या डोळ्यांसमोर उभीं राहतात तीं या प्राचीन विद्यापीठांत अस्तित्वांत होतीं किंवा नाहीं हें आपण पाहिलें म्हणजे झालें. आधुनिक पाश्चात्य विद्वानांनीं व अधिकारी पुरुषांनीं सुद्धां ‘ युनिव्हर्सिटी ’ या शब्दांत अभिप्रेत असलेला अर्थ निरनिराळ्या प्रकारें व्यक्त केला असून एका विशिष्ट गुणालाच त्यांनीं महत्त्व दिलें आहे; ठराविक सांच्याचा व एकच अर्थ सर्वांना संमत नाहीं. वास्तविक ‘ युनिव्हर्सिटी ’ हा शब्द ‘ साकल्य ’, ‘ पूर्णता ’ दाखवीत असूनसुद्धां अधिकारी पुरुषांनीं त्याकडे एका विशिष्ट कोनांतूनच पाहिलें आहे. यामुळें न्यूमन्, कार्लाईल, गिबन, हॅझलिट, ॲल्डस हक्स्ले, सर किलर कूच वगैरे प्रसिद्ध विचारवंतांचीं मतें परस्पर भिन्न आहेत. कोणी सर्व प्रकारच्या विद्यासमुच्चयाला महत्त्व देतात, तर कोणी त्यांतील फक्त ग्रंथालयाला; कोणी आंतरराष्ट्रीयतेला विशेष मानतात, तर कोणी पदवीदानाला.

तरीपण ‘ युनिव्हर्सिटी ’ किंवा ‘ विद्यापीठ ’ हे शब्द उच्चारल्याबरोबर आपणां-पुढें पुढील कल्पना उभ्या राहतात : (१) विविध प्रकारचें उच्च शिक्षण देण्याचें स्थान; (२) भिन्नभिन्न स्थानाहून किंवा देशाहून आलेल्या प्रौढ विद्यार्थ्यांना प्रवेश; (३) सार्वजनिक परीक्षा घेणें; (४) पदवीदान करणें; (५) नामां-कित शिक्षकांना एकत्र आणणें; (६) शिक्षणपद्धति सूत्रबद्ध व व्यवस्थित ठेवणें; (७) नवीन नवीन गोष्टींचें व तत्त्वांचें संशोधन करणें व त्यांचे सिद्धांत बांधणें

---

१३. F. E. Keay : “ Indian Education in Ancient India and Later Times”, p. 142.
Dr. A. S. Altekar : “ Education in Ancient India ” (1944), p. 105.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वगैरे वगैरे. यापैकीं एकादी बाब नसली तरी त्यामुळें विद्यापीठाच्या विद्यापीठत्वाला कोणत्याहि प्रकारें बाध येऊं शकणार नाहीं. आज आपण तिसऱ्या व चौथ्या बाबीला मात्र विशेष महत्त्व देतों व सातव्या बाबीकडे आतां कोठें सर्व विद्यापीठांचें लक्ष प्रामुख्यानें वेधूं लागलें आहे. इतकें मात्र खरें कीं विद्यापीठांतून नुसती पदवी घेऊन बाहेर पडण्यापेक्षां तेथून बाहेर पडल्यावर एकंदर जनतेवर किंवा सरकारावर जो आपली छाप पाडूं शकेल त्यानेंच विद्यापीठांत घेतलेल्या शिक्षणाचें चीज केलें असें म्हणतां येईल.

प्राचीनकालीं ' विद्यापीठ ' शब्दाबद्दल वापरलेले निरनिराळे शब्दप्रयोग

पाश्चात्य देशांत ' युनिव्हर्सिटी ' हा शब्द तेराव्या शतकानंतर रूढ झाला.[१४] तत्पूर्वी विद्यापीठाला ' स्टडियम् जनरेल् ' हा शब्द वापरला जाई. हिंदुस्थानांत सुद्धां ' विद्यापीठ ' हा शब्द न वापरतां ' आश्रम ', ' परिषद् ', ' विहार ', ' मठ ', ' मंदिर ', ' घटिका ' वगैरे शब्द वापरले जात. अत्रि, वसिष्ठ, वाल्मीकि विश्वामित्र, कण्व वगैरे ऋषींच्या ' आश्रमां 'बद्दल उल्लेख संस्कृत ग्रंथांतून नेहमींच आढळतात. हे ' आश्रम ' म्हणजे विद्यापीठेंच होत. उत्तररामचरितांत वाल्मीकि ऋषीच्या आश्रमांतून एक तापसी अगस्त्य ऋषीच्या आश्रमांत ' निगमान्तविद्या ' म्हणजे ' वेदान्त ' शिकण्यास आल्याचें वर्णन आहे.[१५] शाकुन्तलांत कण्व व मारीच ऋषींच्या आश्रमांचा उल्लेख आहे.[१६] या अशा प्रकारच्या आश्रमांतून दहा दहा हजार विद्यार्थी रहात; व तेथील मुख्य आचार्यास ' कुल-पति ' म्हणत. या आश्रमांत सर्व प्रकारचे विद्यार्थी असत व सर्वांना शिक्षणाचा सारखा लाभ मिळे.

बृहदारण्यकोपनिषद्,[१७] छांदोग्योपनिषद्[१८] वगैरे ग्रंथांत ' परिषदां 'चा उल्लेख आढळतो. श्वेतकेतु हा शिक्षणाकरितां पाञ्चालांच्या परिषदेंत गेला होता असें वर्णन आहे.

---

१४. "The Mediaeval Universities" by Nathan Schachner (1938), p. 42.

१५. उत्तररामचरितम्, २.

१६. शाकुन्तल, १, ७.

१७. बृ० आ० उ० ६. २.

१८. छां० उ० ५. ३. १.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जैन व बौद्ध भिक्षूंचें शिक्षण 'विहारां'तून होई. दक्षिण हिंदुस्थानांत 'मठ' 'मंदिर' किंवा 'घटिकां' मधून शिक्षण दिलें जाई. काञ्ची नगरींत 'घटिका' असल्याचें वर्णन आहे; व मलकापुरम् वगैरे ठिकाणीं 'मंदिरां'तून शिक्षण देण्याची व्यवस्था होती.

तक्षशिला शिक्षणाचें केन्द्र; पण तेथें निरनिराळ्या स्वतंत्र शिक्षणसंस्था कीं एक विद्यापीठ ? :

तक्षशिला मात्र आश्रम, परिषद् वगैरेपैकीं कांहींच नव्हती. पण येथें निरनिराळे विषय शिकविणाऱ्या निरनिराळ्या संस्था असाव्या असें वाटतें. कदाचित् एका संस्थेंतच सर्व प्रकारचें शिक्षण देण्याचीही सोय असूं शकेल; पण निश्चित असें कांहींच सांगतां येत नाहीं. जातकांत नुसतें तेथें चारही दिशांत प्रसिद्ध असे आचार्य रहात होते इतकेंच वर्णन आहे.[१९] डॉ. अळतेकरांच्या मतें तक्षशिला येथें आपल्या आजच्या कल्पनेप्रमाणें 'युनिव्हर्सिटी' नव्हती, पण शिक्षणाचें केन्द्र मात्र तें खास होतें.[२०] हें त्याचें मत अगदीं बरोबर आहे. तरी पण ज्या अर्थीं सर्व हिंदुस्थानभर होणाऱ्या बौद्धधर्माच्या प्रसाराबरोबर तक्षशिलाही पूर्ण बौद्ध-धर्मीय बनली व ज्याअर्थीं सर्व बौद्धधर्मीय शिक्षणसंस्था एकसूत्रनिबद्ध होत्या त्या अर्थीं तक्षशिला येथें निरनिराळें शिक्षण देणाऱ्या संस्थाही व्यवस्थेच्या बाबतींत एका सूत्रांत गोंवलेल्या असल्या पाहिजेत. शिवाय हजार बारा़शें वर्षें शिक्षणाचें सतत कार्य करणारी ही संस्था एका विशिष्ट सूत्रांत नियमानें बद्ध झाली नसती तर सतत ७०० वर्षें होत असलेल्या भिन्न संस्कृतींच्या आक्रमकांच्या संग्रामांत तिचा केव्हांच चुराडा झाला असता.

तक्षशिला विद्यापीठांतील शिक्षणाचा खर्च

तक्षशिला येथें गरिबीमुळें कोणालाही शिक्षण नाकारण्यांत येत नव्हतें. श्रीमंत विद्यार्थ्यांकडून सर्व शिक्षणक्रमाबद्दल एक हजार सुवर्ण नाणीं घेण्यांत येत.[२१] सात

१९. एवरूपो दिसापामोक्खाचरियो इतो विसयोजनसतमत्थके गंधारठ्ठे तक्खसिलायाम् वसन्ति । – जा. २-२४७; ३-१२२.

२०. Dr. A. S. Altekar : Education in Ancient India (1944), p. 106.

२१. तिलमुट्ठिजा०

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आठ वर्षांचा अभ्यासक्रम धरल्यास व प्रत्येक सुवर्ण नाण्याची किंमत साधारणतः दहा रुपये मोजल्यास प्रत्येक श्रीमंत विद्यार्थ्यास साधारणतः ऐशीं ते शंभर रुपये मासिक खर्च येत असला पाहिजे; किंवा खर्चाकडे लक्ष न देतां एक ठराविक रक्कम गुरूला देण्याची प्रथा असेल. ही फी मात्र विद्यार्थी आगाऊच देत. हे विद्यार्थी कांहीं गरीब विद्यार्थ्यांना आपणांबरोबर सोबत म्हणून नेत व त्यांचीही फी ते अगाऊच देत. इतर गरीब विद्यार्थ्यांना फी माफ असे. इतकेंच नव्हे तर शिक्षण संपल्यावर असे विद्यार्थी घरीं परत जाऊं लागले म्हणजे वाटखर्चाला पुरेल इतका पैसाही त्यांना देण्यांत येई.[२२] विद्वत्तेकरितां प्रसिद्ध असणाऱ्या काशीसारख्या प्रसिद्ध ठिकाणाहून सुद्धां राजपुत्र व श्रेष्ठीपुत्र शेकडों मैल चालत चालत तक्षशिलेला विद्याभ्यासाकरितां जात, असें जातकांतून वर्णन आहे. हातांत एक काठी व छत्री, पायांत पायतण, अगदीं गरजेला पुरतील इतके कपडे व एक हजार सुवर्ण नाणीं ते बरोबर घेत. विद्यार्थी केवळ हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांतूनच नव्हे तर पश्चिमेस थेट ग्रीस व ईशान्येस थेट चीनमधून ते येत. गरीब विद्यार्थ्यांना तर नुसतें शिक्षणच नाहीं तर अन्न, वस्त्र, औषधपाणी व इतर आवश्यक वस्तूही फुकट देण्यांत येत. अर्थात् हीं गरीब किंवा अनाथ मुलें आपला अभ्यासक्रम संपल्यावर या ना त्या प्रकारें शिक्षणाचें ऋण फेडून टाकीत, असें निरनिराळ्या ग्रंथांतील उल्लेखांवरून कळून येतें.[२३] उपकोशलासारखे विद्यार्थी गुरूची खासगी सेवाहि करीत.[२४] अशा ठिकाणीं राजपुत्र-भिकारी, राव-रंक इत्यादिकांना सारखेंच वागविण्यांत येत असावें; यामुळेंच विद्यार्थ्यांच्या ठिकाणीं, उच्चनीचभाव रहात नव्हता. श्रीकृष्ण-सुदामा यांच्या निकट मैत्रीचें मूळ कारण हेंच असावें.

प्राचीन काळांतील विद्वान् अध्यापक

या प्राचीन विद्यापीठांतून प्रत्येक प्राध्यापक नामवंत असे. प्रत्येक आचार्याचें महत्त्व त्याच्या विद्वत्तेवर, चारित्र्यावर व कृतींवर अवलंबून असे. हें आचार्यपद प्राप्त करण्यास कोणत्याही प्रकारें जात, वय, पुरुष-स्त्रीभाव यांचा बाध येत नसावा.

---

२२. विनयपिटक ८.

२३. रघुवंश ५-१, १७.

२४. छां० उ० ४-१०.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नागार्जुन,[२५] अतीश,[२६] वासुदेव सार्वभौम[२७] इत्यादि महान् आचार्य याच गुणांमुळें प्रसिद्धीस आले; व त्यांनीं आपापलीं विद्यापीटें विभूषित केलीं.

या विद्वान् आचार्यांप्रमाणें विदुषी स्त्रिया, भिक्षुणी किंवा परिव्राजिकाही प्राचीन कालीं शिक्षणाचें कार्य करीत; त्यांनाही समाजांत इतर विद्वान् आचार्यांइतकाच मान मिळे. मोटमोठ्या पंडितांबरोबर त्याही वादविवाद करीत; व कित्येक वेळां ऋषितुल्य आचार्यांनासुद्धां त्या गप्प करीत. गार्गीनें याज्ञवल्क्याला अशाच प्रकारें गप्प करण्याचा प्रयत्न केल्याचा उल्लेख बृहदारण्यकोपनिषदांत आहे.[२८] मंडन-मिश्राची विदुषी पत्नी सरस्वती हिला तर दोन प्रसिद्ध पंडितांच्या वादांत अध्यक्ष म्हणून नेमलें होतें. हे पंडित म्हणजे दुसरे कोणी नसून एक तर अद्वितीय शंकराचार्य व दुसरा सरस्वतीचा खुद्द पति मंडनमिश्र हाच होता. कालिदासाच्या 'मालविकाग्निमित्र' नाटकांत एका परिव्राजिकेकडे दोन प्राध्यापकांत श्रेष्ठ कोण हें टरविण्याचें काम राजानें सोंपविलें आहे.[२९] एका काळीं इतक्या उच्च श्रेणीच्या विदुषी स्त्रिया आपल्या देशांत शेंकडोंनीं होऊन गेल्या व केवळ 'चूल नि मूल' हेंच स्त्रियांचें अंतिम ध्येय आहे अशा क्षुद्र कल्पना तत्कालीन लोकांच्या मनांत नव्हत्या हें वरील उदाहरणांवरून दिसून येईल.

प्राचीन काळीं शिकविण्यांत येणारे विषय

प्राचीन काळीं शिक्षणाचे विषय असंख्य असत; तरी पण प्रामुख्यानें शिकविण्यांत येणाऱ्या विषयांत वेदादि विषयांशिवाय १८ शिल्पें किंवा विद्या बहुतेक टिकाणीं असत.[३०] या विद्यांत इतिहास, पुराण, व्याकरण, पित्र्य, राशी (गणित), दैव, वाकोवाक्य, एकायन, देवविद्या (व्युत्पत्तिशास्त्र), ब्रह्मविद्या, भूतविद्या, क्षत्रविद्या, नक्षत्रविद्या, सर्पदेवज्ञानविद्या, श्लोक, सूत्र, अनुव्याख्यान, व्याख्यान, अनुशासन, नाराशंसी, गाथा, शरीरविज्ञानचिकित्सा, शिल्पज्ञान हे विषय समा-

---

२५. 'नालंदा विहार' पहा. २६. 'विक्रमशिला विहार' पहा.

२७. 'मिथिला विद्यापीठ' व 'नवद्वीप विद्यापीठ' पहा.

२८. बृ० आ० उ० ४. ३. ६. २९. मालविकाग्निमित्र १.

३०. जातक २-४७; २-८७. पहा:—तेसु बोधिसत्तो सोळसवस्सकाले तक्खसीलं गन्त्वा दिसापामोक्खस्स आचरियस्स सन्तिके तयो वेदे अट्ठारस सिप्पानि च उग्गण्हित्वा तस्सासिप्पे असीदसो हूत्वा बाराणसीं पच्चागमि etc. II 89.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विष्ट केले जात म्हणून प्राचीन ग्रंथांतून उल्लेख सांपडतात.[31] प्रत्येक आचार्य आपापल्या विषयांत तज्ज्ञ असत. शिकविण्याची पद्धतहि आकर्षक असे. त्यामुळें विद्यास्थान कोठेंही असलें तरी विद्यार्थी तिकडे आकर्षिले जात.

अमक्यानें अमकेच विषय शिकावे असाही आग्रह किंवा निर्बंध त्या काळीं नव्हता. म्हणून ब्राह्मणपुत्र वाटेल ती विद्या शिकत असे, व चांडाळाशिवाय इतर सर्वांस वेदादि विद्या शिकण्याची परवानगी असे.[32]

शिक्षणाचें माध्यम

हे विषय शिकण्याकरितां भारताच्या निरनिराळ्या भागांतून व भारताबाहेरील देशांतूनही विद्यार्थी येत. अर्थात् तत्कालीं हिंदुस्थानांत प्रचलित असलेली भाषाच या विद्यापीठांतील माध्यम असणार; व ही भाषा भारतेतर भागांतील विद्यार्थी शिकत असणार. फार फार प्राचीन कालीं म्हणजे इ. स. पू. ४००० च्या दरम्यान भूसमुद्राच्या आसपासच्या भागांत, त्याचप्रमाणें तक्षशिलेपासून गंगेपर्यंत आर्यन् व सेमेटिक् भाषा सर्वत्र रूढ होत्या; व या भाषा बोलणाऱ्यांमध्यें दळणवळण चालू होतें.[33] तेव्हां नंतरच्या कालांतील लोकांना प्रचलित भाषा समजण्यास किंवा शिकण्यास फारसें अवघड जात नसावें.

तक्षशिलेचें उत्खनन: तक्षशिला नगरीची निश्चित जागा

तक्षशिलेचें उत्खनन झाल्यामुळें ही नगरी कोठें होती हें आतां निश्चित झालें आहे. त्यासंबंधानें सर जे. मार्शल् हे आपल्या 'तक्षशिलेचा वाटाड्या' या सर्वमान्य ग्रंथांत म्हणतात:[34] रावळपिंडीच्या वायव्येस २० मैलांवर सराई-कला नांवाचें जें रेल्वे जंक्शन आहे त्याच्या ईशान्येस अगदीं लागून तक्षशिलेचे अवशेष सांपडले आहेत. ज्या खोऱ्यांत ते आहेत तें स्थळ अत्यंत रमणीय आहे. तेथें नद्यांचें भरपूर पाणी आहे; डोंगरांनीं त्या स्थळाचें संरक्षण केलें आहे. उत्तरेस व पूर्वेस

---

३१. छा० उ० ७. १. २; बृ० आ० उ० २.४.१०; श० प० ब्रा० ११. भीमसेन जा०; इ० A. K. Mazumdar : The Hindu History (1920), p. 457

३२. R. K. Mookerji : Ancient Indian Education, p. 482.

३३. H. G. Wells : The Outline of History, pp. 145-147.

३४. Sir J. Marshall : "A Guide to Taxila," p. 1.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बर्फाच्छादित हजारा व मूरी टेकड्यांनीं आणि दक्षिणेस व पश्चिमेस इतर लहान लहान टेकड्यांनीं त्याचें संरक्षण केलें आहे.

तक्षशिला हें नांव कां व कसें पडलें ?

तक्षशिला व नागसंस्कृति

तक्षशिला ही अत्यंत प्राचीन व प्रसिद्ध नगरी गांधार देशाची राजधानी होती म्हणून वर सांगितलेंच आहे. गांधार देश प्राचीन कालीं फारच प्रसिद्धीस आलेला असल्यामुळें तक्षशिला या राजधानीला फारच महत्त्व आलें होतें, असें ग्रीक व चिनी प्रवाशांच्या व इतर लोकांच्या लिखाणांवरून कळून येतें. पण ज्या-अर्थीं तक्षशिलासंबंधानें उल्लेख थेट रामायण-महाभारतांत सुद्धां सांपडतात व रामायण–महाभारत ग्रंथ ज्या लोककथांवर आधारलेले आहेत त्या लोककथा दृढमूल होण्याला शेंकडों वर्षें लागलीं असणार त्या अर्थीं तक्षशिला नगरीची ख्याति प्राग्–इतिहासकालापासून जगांत पसरली असली पाहिजे.

'तक्षशिला' नगरी एका नितान्तरमणीय खोऱ्यांत वसली होती म्हणून या नगरीचा व आजूबाजूला असलेल्या डोंगरांतील प्रचंड शिलांचा दाट संबंध असणें साहजिक आहे. अत्यंत प्रसिद्ध नागराजा 'तक्षक' व 'तक्षशिला' यांचा निकट संबंध निरनिराळ्या ग्रंथांतून वेळोवेळीं दाखविला गेला असल्यामुळें 'तक्ष' व 'तक्षक' एकच असूं शकतील. 'तक्ष' व 'तक्षक' हे दोनहि शब्द स्थापत्य-कलेंतील एका महत्त्वाच्या कृत्यासंबंधानें येत असल्यानें स्थापत्यकलेच्या दृष्टीनें त्या कलेंतील निष्णात अशा इंजिनिअरांकडून 'तक्षक' राजानें आजूबाजूंच्या खडकां-तील 'शिलां'च्या सहाय्यानें ही नगरी वसविली असण्याचा संभव आहे.[३५] या-नगरीला 'तक्ष-शिला' हें नांव मिळण्याचें कारणही हेंच असावें. स्थापत्यकला व शिल्प-कला शिकविण्याचें हें एक मुख्य केन्द्र होतें ही गोष्ट लक्षांत ठेविली म्हणजे वरील विधानांत अशक्यता नाहीं हें कळून येईल. शिवाय मोहेंजो–दडो व हरप्पा येथें झालेल्या उत्खननानें इतिहासमहालाचें केवढें तरी मोठें दालन खुलें केलें आहे; व त्यामुळें प्राग्–इतिहासकालांतील किती तरी गोष्टी स्पष्टपणें दिसूं लागल्या आहेत. त्यांतील दोन गोष्टींकडे आपलें विशेष लक्ष जातें : (१) फार फार

३५. J. W. M'Crindle : "Ancient India" (1901), p. 33 (Note 4).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्राचीन कालीं म्हणजे इ. स. पू. ३००० ते ४००० वर्षांपूर्वी सिंध व पंजाबांत फारच उच्च प्रकारची संस्कृति होती व तेथें स्थापत्यकलेंत आश्चर्यकारक प्रगति झाली होती. तक्षशिला या संस्कृतीच्या टापूंतच असल्यानें येथेंही स्थापत्यकलेंतील विशिष्ट कृत्यें दिसल्यास नवल नाहीं. (२) दुसरें त्या संस्कृतींत नागपूजा अस्तित्वांत असल्याचेंही दृष्टीस पडतें. त्यावरून या भागांतील लोकांचा व नागांचा त्या कालापूर्वी दाट संबंध असावा. अर्थात् नागराजानें तक्षशिला वसविली असावी या विधानास वरील गोष्टीनें पुष्टीच मिळते. शिवाय नाग लोकांच्या इतिहाससंबंधानें विचार करतां तक्षकाच्या पाताळांतील किंवा पाताळनगरींतील-सुद्धां सुंदर सुंदर इमारतींसंबंधानें किती तरी उल्लेख महाभारतादि ग्रंथांतून निरनिराळ्या ठिकाणीं आले आहेत. खांडववनांतही तक्षकानें वसाहत केल्याचा उल्लेख महाभारतांत आहे. तेथेंही उत्तम उत्तम इमारती होत्या, पण अर्जुनानें अग्नीच्या सहाय्यानें खाण्डववन जाळलें व ही वसाहत नाहींशी केली. तक्षशिला ही तक्षकाची राजधानी म्हणजे अर्थात् नाग लोकांचें एक आगरच. यामुळेंच जनमेजयानें या ठिकाणीं सर्पसत्र आरंभिलें व नाग लोकांचा संहार केला म्हणून महाभारतांत वर्णन आहे. रामायण-महाभारत रचण्यापूर्वी हजारों वर्षें अगोदर नाग लोकांची संस्कृति व राज्यें सर्व हिंदुस्थानांतच नव्हे तर प्रशांत महासागरांतील असंख्य बेटांत, आशिया खंडाच्या बहुतेक भागांत, यूरोपांत व कदाचित् अमेरिकेंत सुद्धां पसरलीं होतीं असें दिसतें. हें सांगण्याचें कारण नागसंस्कृतीचा व तक्षशिलेचा दाट संबंध होता हें दाखविणें हें होय. नाग लोक व हिंदुस्थानांतले असुर भिन्न नसावेत; आणि 'मय' हा प्रसिद्ध शिल्पकार असुरच; तेव्हां तक्षशिला व शिल्पकला यांचा संबंध अगदीं निकटचा. जेथें जेथें नाग लोक होते–मग दक्षिणेंत तामीळ देश असो, पूर्वेस मगध देश असो, पश्चिमेस गांधार देश असो–तेथें तेथें शिल्पकला फोंफावलेली होती. जातककालीं तक्षशिला येथें एक स्वतंत्र ' इंजिनिअरिंग कॉलेज ' होतें; व तेथें एका वेळीं पांचपांचशें विद्यार्थी शिक्षण घेत.

तक्षशिला येथील शिक्षणसंस्थेचा कालनिर्णय

यात्रमाणें तक्षशिला या नगरीची प्रसिद्धि इतर कोणत्याही कारणानें झाली असली तरी इ. स. पू. ७ व्या शतकांत येथें शिक्षण घेण्याकरितां जे दूरदूरचे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विद्यार्थी येत ते येथील शिक्षणाची कीर्ति ऐकून हें खास.[३६] म्हणजे इ. स. पू. ७ व्या शतकाच्याही अगोदर ही नगरी उत्तम प्रकारच्या शिक्षणाकरितां प्रसिद्ध होती व तिची कीर्ति दूरदूरच्या प्रदेशांपर्यंत पसरली होती; पण पुढें या नगरीचा व येथील शिक्षणसंस्थांचा हूण लोकांच्या रानटी व आक्रमक हल्ल्यामुळें इ. स. च्या ४ थ्या शतकानंतर नाश झाला.[३७] पुढें चिनी प्रवासी फा-हायेन इ. स. च्या ५ व्या शतकांत हिंदुस्थानांत आला. तेव्हां त्यास येथें विशिष्ट प्रकारची शिक्षणसंस्था दिसली नसावी; कारण त्यानें आपल्या प्रवासवृत्तांत तक्षशिलेच्या शिक्षण-संस्थांसंबंधानें कोणत्याही प्रकारचा उल्लेख प्रामुख्यानें केला नाहीं. पण त्या शहराची पूर्वीची कीर्ति तशीच सतत टिकली असणार; नाहींतर फा-हायेन मुद्दाम तेथें गेला नसता. ज्याप्रमाणें आपणांस उज्जयिनी, काशी वगैरेंची प्राचीनकालीन कीर्ति ऐकून आजही त्यांस भेट द्यावीशी वाटते, त्याचप्रमाणें फा-हायेन यास वाटून त्यानें तक्षशिलेस भेट दिली असणार.

तक्षशिलेचा पाश्चात्यसंस्कृतीशीं इतिहासकालांतील पहिला महत्त्वाचा संघर्ष

आज उपलब्ध असलेल्या इतिहाससाधनांवरून पाहतां तक्षशिला व हिंदु-स्थानाबाहेरील देश, विशेषतः पाश्चात्य देश, यांच्या संस्कृतीचा पहिला संघर्ष इ. स. पू. ५ व्या शतकाअगोदर झाला. इराणनें त्या वेळीं गांधारदेशावर व तक्षशिला नगरीवर स्वारी केली व हा प्रदेश काबीज केला. पुढें शिकंदर बाद-शाहानें इ. स. पू. ३२६ सालीं या प्रदेशावर स्वारी करून तो ताब्यांत घेतला. शिकंदरनें येथून नामांकित पंडित व तत्त्ववेत्ते आपल्याबरोबर नेले.[३८] या वेळेपासून हिंदुस्थानचा व यावनी लोकांचा दाट संबंध आला; व एकाच्या संस्कृतीचा परिणाम दुसऱ्यावर होऊं लागला; म्हणून शिकंदर बादशाहाची हिंदुस्थानावरील स्वारी पुष्कळ बाबतींत विशेष लक्षांत ठेवण्याजोगी आहे. या वेळीं रथ व हत्ती यांच्याऐवजीं घोडेस्वारांचा उपयोग केल्यानें युद्धकलेच्या बाबतींत या स्वारीनें फार मोठी क्रांति

३६. F. E. Keay : Indian Education in Ancient India and Later Times, p. 142.
३७. H. G. Wells : The Outline of History, p. 574.
३८. The Cambridge History of India, vol. i, p. 358.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घडवून आणली; व म्हणूनच ग्रीससारख्या नेहमीं आपापसांत भांडणाऱ्या लहान लहान राष्ट्रांतील एक राजा २००० मैल दूर असलेल्या हिंदुस्थानसारख्या देशावर स्वारी करून तेथील प्रसिद्ध राजांचा पराभव करूं शकला व तेथें आपली सत्ता स्थापून जगांत् अशक्य कांहीं नाहीं हीही गोष्ट सिद्ध करूं शकला.

तक्षशिलेच्या भरभराटीचा काळ

हिंदुस्थानांतील राजांपैकीं मौर्य राजांनीं हा प्रदेश इ. स. पू. तिसऱ्या शतकांत जिंकला होता. बिंदुसारानें तर अशोकाला तक्षशिलेचा सुभा म्हणून नेमलें होतें.[३९] बिंदुसाराचे वडील सम्राट् चंद्रगुप्त मौर्य व मुलगा अशोक या दोघांचेंही शिक्षण तक्षशिला येथेंच झालें असावें.[४०] या नगरीचा व भारतांतील थोर व्यक्तींचा संबंध आलेला आपणांस दिसून येईल. धौम्य ऋषि हे तक्षशिला येथील आचार्य होते म्हणून महाभारतांत उल्लेख आहे.[४१] जीवक, चाणक्य, पाणिनि[४२] वगैरेंचाही प्रामुख्यानें उल्लेख करावयास हरकत नाहीं. या व इतर गोष्टींचा विचार करतां तक्षशिलेच्या भरभराटीचा काल इ. स. पू. ८०० ते इ. स. ४०० म्हणजे एकूण १२०० वर्षांचा असावा. तक्षशिला सोडून इतर कोणतेंही विद्यापीठ हजार बाराशें वर्षांवर सतत चालू असल्याचा दाखला जगांतील कोणत्याही राष्ट्राच्या इतिहासांत नाहीं. नांवानें निर्देश करतां येईल असें भारताबाहेर एकच विद्यापीठ प्राचीन कालांत होऊन गेलें व तें म्हणजे 'ॲलेक्झँड्रिया म्युझियम्'. आशिया, आफ्रिका व यूरोप यांच्या सीमेवर हें वसविण्यांत आलें होतें. पण या विद्यापीठाचा भरभराटीचा काल अवघ्या शंभर वर्षांचा![४३] हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासाबद्दल अज्ञान असल्यामुळें पाश्चात्य इतिहासकार याच विद्यापीठाला 'आद्य विद्यापीठ'

३९. Dr. R. C. Mazumdar etc. : An Advanced History of India, (1948), p. 103.

४०. Upendra Nath Ball, M. A. : Ancient India, p. 193.
र. मो. त्रिवेदी : 'हिंदना विद्यापीठों'

४१. रामकृष्ण द. पराडकर : मोरोपंतांचे समग्र ग्रंथ, भा. १. (१९१२), आदि. २-१५.

४२. Nagendra Nath Mazumder; M. A. B. T. : "A History of Education in Ancient India" (1916) p. 90.

४३. H. G. Wells : The Outline of History, p. 375.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणून बहुमानानें संबोधतात ! वास्तविक कीर्तिमंदिराच्या शिखरावर चढून तक्षशिलेच्यीं कित्येक शतकें गेल्यानंतरच्च या विद्यापीठाचा जन्म झाला.

तक्षशिला येथें शिकविण्यांत येणारे विषय

अडीच हजार वर्षांपूर्वीचीं भारतीय विद्यपीठें कोणते विषय शिकवीत, शिक्षण देण्याची त्यांची पद्धत कोणती होती व विद्यार्थी व शिक्षक यांचें जीवन कशा प्रकारचें असे हें समजावून घेणें व त्यावद्दलची माहिती मिळविणें फारच उद्बोधक वाटेल. साहित्य व कला या दोहोंचा पूर्णपणें व अव्याहत मिलाफ म्हणजेच जर पूर्ण शिक्षण असेल तर तें तक्षशिला येथें मिळत होतें, हें येथें शिकविण्यांत येणाऱ्या निरनिराळ्या विषयांचा विचार केला असतांना कळून येईल. साहित्य व कला यांचा अद्भुत प्रवाह या विद्यापीठांतून वहात होता. येथील शिक्षणक्रमच असा आंखण्यांत आला होता कीं जेणेंकरून या दोनही अंगांत विद्यार्थ्यांना प्राविण्य मिळवितां यावें.

येथें १८ मुख्य विषय शिकविले जात.[४४] अर्थात् त्यांवर अवलंबून असणारे ल्हान-सहान विषय किती शिकविले जात असले पाहिजेत हें निराळें सांगावयास नको. विषय ऐच्छिक असल्यामुळें मुलांना जे जे विषय आवडत ते ते शिकण्याची त्यांना मुभा असे. यामुळेंच जादूसारखे विषयही कित्येक ब्राह्मण विद्यार्थी शिकत;[४५] व कित्येक ब्राह्मणमुलें युद्धकलेंत निष्णात होत.[४६] काशीच्या राजाचा जो पुरोहित त्याचा मुलगा जोतिपाल हा तक्षशिलेला जाऊन तेथें धनुर्वेद शिकला; यालाच पुढें काशीचा मुख्य सेनापति नेमण्यांत आलें.[४७] १८ विषयांशिवाय वेद व वेदान्त हे मुख्य धार्मिक विषय म्हणून शिकविण्यांत येत. वेद तर तोंडपाठ करून घेण्यांत येत. १८ शिल्पांमध्यें

४४. Journal of Buddhist Text Society of India, Vol. VII :"Universities in Ancient India."

४५. जातक २-१००.

४६. जातकत्थवण्णना by V. Fousboll (1883) Vol. iii, p. 219.
तदा एको बाराणसीब्राह्मणो माणवो तक्खसिलाय सब्बसिप्पानि उग्गण्हित्वा धनुकम्मे निप्फत्तिम् पत्तो चुल्लधनुग्गहपण्डितो नाम अहोसि।

४७. जातक ३-२१९.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हस्तिशिक्षा किंवा गजपरीक्षा, मृगया, धनुर्विद्या, आयुर्वेद किंवा वैद्यकीय ज्ञान, शिल्पकला अर्थात् आजच्या इंजिनिअरिंग कॉलेजमध्यें शिकविण्यांत येणारे विषय, चित्रकला, मूर्ति बनविणें, हस्तविक्रय वगैरे विषयांचा समावेश होई. या सर्व विद्यांचें तात्त्विक (Theoretical) आणि प्रात्यक्षिक (Practical) ज्ञान दिलें जाई. धर्म, तत्त्वज्ञान वगैरे विषयांचें ज्ञान हिंदुस्थानांतील शैक्षणिक विषयांच्या शीर्ष-स्थानीं असल्यानें त्यांचा सर्वतोपरि खोल अभ्यास होई; व यामुळेंच शिकंदरानें तक्षशिलेहून खास पंडित आपल्या देशांत नेल्याचा उल्लेख आहे.

तक्षशिला येथें शिकविण्यांत येणारे खास विषय

तक्षशिला येथें सर्वच विषय उत्तम प्रकारें शिकविले जात; पण त्यांतल्या त्यांत युद्धकला, वैद्यक व स्थापत्य यांच्या तोडीचें ज्ञान त्या कालीं इतरत्र क्वचितच दिलें जात असलें पाहिजे.

(अ) **वैद्यक विद्या :** बौद्धकालीन अत्यंत प्रसिद्ध वैद्य जो जीवक याच्या-संबंधानें माहिती विनयपिटकांत दिलेली आहे. या जीवकाचें शिक्षण तक्षशिला येथें झालें. त्याचें चरित्र पाहिलें म्हणजे तक्षशिला येथें कोणत्या प्रकारचें वैद्यकीय शिक्षण देण्यांत येत होतें याची चांगलीच कल्पना येते.

जीवक हा वेश्यापुत्र. वैद्यकीय ज्ञान मिळावें म्हणून हा राजगृहाहून थेट तक्षशिलेला गेला. तेथें गेल्यावर त्यानें एका प्रसिद्ध आचार्याजवळ ७ वर्षे आयुर्वेदाचा अभ्यास केला; व तो या विषयांत इतका पारंगत झाला कीं मोठ-मोठ्या नामांकित जुन्या वैद्यांनाहि जे रोग बरे करतां येण्याजोगे नव्हते तेही तो बरे करूं लागला. लहान मुलांच्या रोगांसंबंधानें तर त्याचा हातखंडा असे.[४८] तो उत्तम प्रकारची शस्त्रविद्याही जाणत होता; व त्यानें एका प्रसिद्ध व्यापाऱ्याच्या डोक्यावर शस्त्रक्रिया अत्यंत कुशलतेनें केल्याची माहिती विनयपिटकांत दिली आहे. त्यानें खुद्द बुद्ध देव, राजा बिंबिसार व राजा

४८. Radha Kumud Mookerji : Men and Thought in Ancient India, p. 61.
महावग्ग, पि. ११.; P. C. Ray : A History of Hindu Chemistry, P. XXXVIII.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चण्डप्रद्योत यांना भयंकर दुखण्यांतून बरें केलें; व त्याची कीर्ति श्रावस्तीपासून उज्जयिनीपर्यंत पसरली; व या भागांत तो प्रत्यक्ष वैद्यकी करूं लागला. मगधदेशाच्या बिंबिसार राजानें या जीवकाची आपला मुख्य वैद्य म्हणून नेमणूक केली.[४९]

जीवकानें सात वर्षे आपल्या गुरूकडे घालविलीं तरी पण गुरुजी शिक्षण संपल्याचें कांहीं बोलेनात. तेव्हां जीवकास राहवलें नाहीं व एकदां तो आपल्या गुरुजींस म्हणाला, "गुरुदेव, मी इतके दिवस शिकत आहें, माझें शिक्षण संपणार कधीं?" गुरुजी म्हणाले, "बाळा, एक कुदळ घे व तक्षशिलेच्या चारी बाजूंस जाऊन एक योजनाच्या आंत औषधयोजनेला निरुपयोगी अशा ज्या ज्या वनस्पती दिसतील त्या त्या घेऊन ये." "ठीक आहे, गुरुदेव." असें म्हणून जीवक निघाला. तो भटक भटक भटकला; पण त्याला एकहि वनस्पती निरुपयोगी दिसेना, तेव्हां तो परतला; व त्यानें गुरुजीस तसें सांगितलें. गुरुजी म्हणाले, "बाळा, फार चांगलें. तूं मिळविलेलें ज्ञान तुझ्या उपजीविकेला पुरेसें आहे. तुला घरीं जाण्याला हरकत नाहीं. आणि हें पहा, हा थोडा पैसा घे; हा तुला वाटखर्चाला लागेल."[५०] जीवक तेथून निघाला व थेट राजगृहाला गेला. त्यानें वाटेंत डोकें दुखण्याचे असाध्य रोग बरे केले. राजगृहास जाईपर्यंत त्याची कीर्ति वाढत चालली.

यावरून एका अनाथ मुलाला तक्षशिलेच्या आचार्यांनें कोणत्या प्रकारचें शिक्षण दिलें याची कल्पना येईल. एक हजार सुवर्णनाणीं देणाऱ्या राजपुत्राला किंवा श्रेष्ठीपुत्राला ज्या प्रकारचें शिक्षण देण्यांत येई त्यांत, व आईबापविरहित अशा अनाथ मुलाला कीं ज्याच्यापासून एका पैचीहि अपेक्षा करतां येणें शक्य नाहीं अशा मुलाला देण्यांत येणाऱ्या शिक्षणांत यत्किंचितहि फरक नव्हता हें जीवकाच्या उदाहरणावरून सहज समजण्याजोगें आहे. हें शिक्षण जीवकानें सात वर्षे सतत घेतलें; पण गुरूच्या मतें तें केवळ त्याच्या उपजीविकेचें साधन होण्यापुरतेंच होतें. पूर्ण शिक्षण घेण्यास कदाचित् त्याला आणखी ५।७ वर्षे लागलीं

४९. विनयमहावग्ग : ८. १. १, पान २७१ (राहुलसांकृत्यायनप्रत).
५०. विनयमहावग्ग : ८. १. १.; "भगवान गौतमबुद्ध" रा. ग. कोलंगडे व के. आ. पाध्ये पान २३८–२४१.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असतीं; पण सात वर्षांच्या अवधींत त्यास सर्व वनस्पतींचे गुणधर्म शिकविण्यांत आले. शिक्षण संपल्यावरहि गुरुजींनीं या मुलास घरापर्यंत जातांना अडचण पडूं नये म्हणून वाटखर्चाला सुद्धां पैसे दिले. जेथें परत जावयाचें तें अंतरहि कांहीं लहान सहान नव्हतें; एक हजार मैलांहूनहि जास्त होतें. तेव्हां इतके मैल चालून जावयास जितके दिवस लागतील तितक्या दिवसांना वाटेंत पुरेल इतका तो पैसा होता. आणि गुरुजींनीं फीची अपेक्षा तर केलीहि नाहीं. यावरून त्या वेळच्या शिक्षकांना शिष्यांबद्दल किती प्रेम वाटत होतें हें स्पष्ट दिसतें.

हा जीवक बुद्धाचा समकालीन असल्यानें तो इ. स. पू. ६ व्या शतकांत होऊन गेला. या सुमारास तक्षशिला ही वैद्यकीय ज्ञानदानाकरितां प्रसिद्ध असल्यानें येथील प्रसिद्ध वैद्य थेट इजित देशांत जात असावेत; कारण फार प्राचीन काळचे जे ख्रिस्ती धर्मगुरू व इतर लेखक होऊन गेले त्यांनीं अलेक्झँड्रियामध्यें सुद्धां हिंदुस्थानांतील लोक होते म्हणून लिहून ठेविलें आहे.[५१] शिवाय रोमशीं व्यापार करणाऱ्या अलेक्झँड्रियांतील व्यापाऱ्यांच्या पुष्कळच पेढ्या दक्षिण हिंदुस्थानांत-सुद्धां होत्या; तेव्हां जवळच्या गांधार देशाशीं तर त्यांचें दळणवळण जास्तच असणार. शिवाय पुढें म्हणजे इ. स. पू. ३ न्या शतकांत तर अलेक्-झँड्रियासुद्धां वैद्यकीय ज्ञानाकरितां प्रसिद्धीस आली. हिरोफिलस् हा तेथील शरीरविज्ञानवेत्ता होता. ज्या गुन्हेगारांना देहांताची शिक्षा असे अशांवर हा शस्त्रक्रियेचा प्रयोग करी.[५२] हेतु हा कीं त्यांत भलत्याचा जीव घेण्याची भीति नसे. पण तक्षशिलेचा जीवक तर हिरोफिलसच्या किती तरी शतकें अगोदर प्रसिद्ध श्रेष्ठींच्या डोक्यांवर शस्त्रप्रयोग करीत होता व आपला प्रयोग चुकेल ही भीतीहि त्यास शिवत नसे! शस्त्रक्रियेबद्दल इतका आत्मविश्वास त्याच्या मनांत होता. अलेक्झँड्रियाच्या अल्पायुष्यामुळें तेथील वैद्यकीय विद्येची प्रगतीहि खुंटली.

यानंतर हिंदुस्थानाबाहेर वैद्यकीय शास्त्रांत जीवकानंतर १५०० वर्षांनीं हालचाल दिसूं लागते. इ. स. च्या दहाव्या अकराव्या शतकांत बोखारा येथें एक प्रसिद्ध

५१. H. G. Wells : The Outline of History., p. 385.

५२. Ibid p. 375.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वैद्य जन्माला आला. त्याचें नांव अविसेन्न (Avicenna) किंवा इब्नसीना[५३] याला 'वैद्यराज' म्हणून संबोधण्यांत येतें. नांवावरून हा भारतीयच असावा असें दिसतें; व त्याचें नांव 'अविषण्ण' (कधींहि खिन्न न होणारा) किंवा अविषेण (सेना ज्याच्या सेवेशीं सिद्ध आहे असा) असें कांहीं तरी असावें.

हिंदुस्थानांत मात्र फार फार प्राचीन कालापासून थोर थोर धन्वन्तरी होऊन गेले आहेत; त्यांत अश्विनीकुमार, चरक,[५४] सुश्रुत, वाग्भट,[५५] धृचवल, नकुल, सहदेव वगैरेंचीं नांवें कोणीहि विसरूं शकणार नाहीं.

(आ) **धनुर्विद्या** : तक्षशिलेचें दुसरें वैशिष्ट्य म्हणजे येथील युद्धकलेचें शिक्षण. हें शिक्षण घेण्याकरितां लांब लांबून राजपुत्र येत. एका वेळीं येथें निरनिराळ्या राष्ट्रांतून १०३ राजपुत्र केवळ धनुर्विद्या शिकण्याकरितां आल्याचा उल्लेख जातकांत आला आहे.[५६] येथें जें शिक्षण देण्यांत येत होतें त्यानें पाश्चात्यांच्या युद्धतंत्रांत फारच मोठी क्रांति घडवून आणली. कारण त्या कालांत प्रसिद्ध असणाऱ्या पाश्चात्य राष्ट्रांत ग्रीस हाच पहिल्या प्रतीचा देश होता. मागाहून रोमन साम्राज्य उदयास आलें. पण या दोनहि ठिकाणच्या युद्धकलेंत भाले, तरवारी वगैरे हातांत बाळगतां येणाऱ्या शस्त्रांचाच उपयोग होई. फेंकून मारण्याचें प्रभावी शस्त्र पाहून काढण्यांत आलें नव्हतें; नाहींतर ग्रीक व रोमन युद्धांत त्यांचा उपयोग प्रामुख्यानें झाला असता. रथ व घोडेस्वार यांनीं मात्र विशेष प्रगति केली होती. अलेक्झँडरच्या कालापर्यंत हें प्रभावी शस्त्र म्हणजे बाण सर्रास उपयोगांत येऊं लागले होते. पुढें रोमन साम्राज्य एकसारखें वाढत होतें; व तें वाढावें म्हणून क्रेसस्[५७] सारखे बडे भांडवलदार युद्धें करण्याकरितां पैसा पुरवीत; व त्यामुळें हिंदुस्थानच्या वेशीपर्यंत हें युद्ध आलें होतें. त्याचा परिणाम असा झाला कीं त्यांचा पार्थियन् लोकांशीं संबंध आला. हे पार्थियन् लोक धनुर्विद्येंत निष्णात असून घोड्यावर बसून बाण

५३. Ibid. p. 626. ५४. Radhakumud Mookerji : Ancient Indian Education (1947), p. 319.—मुकर्जींच्या मतें चरकसंहिता लिहिणारा इ. स. पू. सहाव्या शतकाच्या आरंभीं झाला.

५५. Sir P. C. Ray. : A History of Hindu Chemistry. vol. i, p. Li.

५६. महासुत सोमजातक. ५. ४५७.

५७. H. G. Wells : The Outline of History, p. 463.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मारण्यांत पटाईत होते.[५८] त्यांनीं रोमन सैन्याचा धुव्वा उडविला. त्यांच्या धनुष्यबाणाचें जें वर्णन करण्यांत येतें तें वाचलें असतां[५९] शिवधनुष्य 'पिनाक' व अर्जुनधनुष्य 'गांडीव' यांच्या वर्णनाची आठवण येते. वेल्ससाहेबांच्या मतें टणत्कार करणाऱ्या धनुष्याचें आगमन मध्य आशियांतील अल्ताई पर्वताकडून झालें असावें;[६०] परंतु हें विधान त्यांनीं कशाच्या आधारावर केलें आहे हें सांगतां येत नाहीं. मात्र इ. स. पू. १ ल्या शतकांत अल्ताई पर्वताकडून येणाऱ्या पार्थियन् लोकांपूर्वी पांचशें वर्षे अगोदर म्हणजे इ. स. पूर्व ६ व्या शतकांत कीर्तिमंदिरावर कळस चढविणाऱ्या तक्षशिला येथें धनुर्वेदाचें सांगोपांग शिक्षण दिलें जात होतें व तें घेण्याकरितां निरनिराळ्या राष्ट्रांतून राजपुत्र येत होते याला मात्र प्राचीन ग्रंथांतून आधार आहेत.

चीन व हिंदुस्थान यांचा प्राचीन इतिहास अद्याप रचायचा आहे. आतां कोठें थोडीं थोडीं साधनें उपलब्ध होऊं लागलीं आहेत; व लोकांनाहि उत्खननादि गोष्टींत कांहींशी गोडी वाटूं लागली आहे. इतिहासाचीं साधनें भरपूर मिळाल्यानंतर कदाचित् हिंदुस्थानचा इतिहास पाश्चात्यांच्या प्राचीन इतिहासाबद्दलच्या कल्पना बदलून टाकील व त्यांचे सिद्धांत खोटे ठरवील.

(इ) **स्थापत्यकला व शिल्पकला :** स्थापत्यकला व शिल्पकला यांचें देण्यांत येणारें शिक्षण हें तक्षशिलेच्या शिक्षणांतील तिसरें वशिष्ट्य. आज इंजिनिअरिंग कॉलेजमध्यें ज्या विषयांचें ज्ञान दिलें जातें तें किंवा तशा प्रकारचें ज्ञान तक्षशिला येथें फार प्राचीन कालापासून दिलें जात होतें. प्रथम सर्व हिंदुस्थानभर स्थापत्यकलेचे निरनिराळे नमुने पहावयास मिळतात. पण या कलेंत तक्षशिला येथें एक सुंदर रूपान्तर होऊं लागलें. तक्षशिला येथील विद्यापीठाचा व ग्रीक कलेचा घनिष्ठ संबंध शिकंदरच्या लढाईनंतर आला; त्यामुळें तक्षशिला विद्यापीठाला ग्रीक कलेचे नमुने पहावयास मिळाले. या कलेंतील सौंदर्याची कल्पना तक्षशिला विद्यापीठानें आत्मसात् केली. म्हणून ग्रीक नमुन्यावर बुद्धाचे अत्यंत देखणे पुतळे येथें तयार करण्यांत येऊं लागले; व तेव्हांपासून सुंदर पुतळे

५८. Ibid. p. 363; p. 463-464.
५९. Ibid. p. 464.
६०. Ibid. p. 505.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

४१५
२१
२२१८८

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तयार करण्याची कला हिंदुस्थानांत रूढ झाली. स्थापत्यकलेचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून तक्षशिला येथील 'सूर्यमंदिरा'चा उल्लेख ग्रीक इतिहासकारांनीं केला आहे.[६१]

तक्षशिला येथें अभ्यासक्रम संपवून मुलें घरीं परत आल्यावर उत्सव

तक्षशिला येथें शिकण्याकरितां फार दूर प्रदेशांतून विद्यार्थी येत; आणि सात आठ वर्षें येथें राहून विद्या संपादन केल्यावर ते पुनः घरीं परत जात. त्याकाळीं आजसारखीं वाहनांचीं साधनें नसल्यामुळें मुलांस इतक्या दूर पाठविणें म्हणजे त्यांच्या जीवितास धोका. शिवाय एकदां मुलगा इतक्या दूर गेल्यावर पुनः त्याची व आईबापांची भेट होईलच हें सांगतां येत नसे; म्हणून विद्यार्थी शिक्षण संपवून घरीं परत आल्यावर मोठा उत्सव करण्यांत येई.[६२] आजकाल मुलगा एकादी परीक्षा पास झाला तरी त्याचे आईबाप सत्यनारायण करितात, तर एखादा विद्यार्थी इतक्या दूरहून इतक्या दिवसांनंतर शिक्षण संपवून सहीसलामत परत आला तर त्याच्या आईबापांनीं मोठा उत्सव केल्यास आश्चर्य नाहीं.

त्याकालीं तक्षशिला व इतर मोठालीं शहरें यांचें सतत दळणवळण चालू असावें; नाहींतर विद्यार्थी बिनधोक इतक्या लांब जाते ना! शिवाय दळणवळण सुखानें व्हावें म्हणून मोटमोठाले रस्ते तयार केलेले असावेत; रस्ते उत्तम असल्यानंतर त्यांच्या आजूबाजूला मोठाले छाया देणारे वृक्ष, वाटसरूंना रस्त्यांत पाणी पिण्याला मिळावें म्हणून विहिरी व तळीं, उतरण्याला धर्मशाळा वगैरेंचीहि सोय श्रीमान् व्यापाऱ्यांनीं केलेली असणारच. त्याकालीं बैलगाड्या, घोडे किंवा उंट यांचाच उपयोग वाहनांकरितां होत असावा; व विद्यार्थ्यांना इतक्या दूरवर जाण्याला हींच साधनें असावींत.

तक्षशिलेची कीर्ति तेथील विद्वान् आचार्यांमुळें

पण तक्षशिलेला एवढें मोठें स्थान कशामुळें प्राप्त झालें? मला वाटतें, त्याला एकच कारण असावें, व तें म्हणजे तेथील विद्वान् व निरलस शिक्षक.[६३] या प्राचीन

६१. Vaijanath Puri : India As Described By Early Greek Writers, p. 139.

६२. तिलमुट्ठिजातक, नं. २५२. "दिष्टया मे जीवमानेन पुत्रो दृष्टः।"

६३. R. K. Mookerji : Ancient Indian Education (1947), p. 478.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ऋषितुल्य शिक्षकांची स्तुति तत्कालीन ॲरिस्टोबौलस, सिसेरो, प्लिनि वगैरे पाश्चात्य पंडितांनीं मुक्त कंठानें केलेली आढळून येईल;[६४] आणि हिंदुस्थानांतील सर्वच विद्यापीठें अशा ऋषितुल्य पंडितांमुळेंच नांवारूपाला आलीं हें पुढें दिलेल्या निरनिराळ्या विद्यापीठांचा इतिहास वाचला असतांना लक्षांत येईल. आणि पंडितांची सभा म्हणजेच विद्यापीठ नाहीं तर काय[६५] ?

तक्षशिलासंस्कृति ही पाश्चात्य ग्रीकसंस्कृतिपूर्व

पाश्चात्य लेखकांनीं व आपल्या प्राचीन संस्कृतीची पूर्ण जाणीव नसणाऱ्या आपल्या येथील विद्वान् लोकांनीं आपला असा एक समज करून दिला आहे कीं हिंदुस्थाननें पुष्कळशा गोष्टी पाश्चात्यांकडून घेतल्या आहेत; विशेषतः ग्रीक व रोमन[६६] लोकांकडून त्या उचलल्या आहेत. याचें एक कारण असें असावें कीं आज पाश्चात्य सुधारणा म्हणून आपण जी म्हणतों ती ग्रीस व रोम येथील प्राचीन कालच्या सुधारणेचें पुनरुज्जीवन व पुनरुत्थापन होय. त्या देशांतील प्राचीन कालच्या ग्रंथांचा अभ्यास झाला व आजचे पाश्चात्य लोक शहाणे झाले; पण एक गोष्ट मात्र ते कबूल करतात कीं ग्रीक व रोमन संस्कृतींवरहि अरबस्तान व इजित या देशांतील संस्कृतींचा परिणाम झाला. पण इ. स. पूर्व ६ व्या शतकाअगोदरपासून तक्षशिला विद्यापीठ अत्यंत प्रसिद्धीस आलें होतें; व त्याला आन्तरराष्ट्रीय मान्यता मिळाली होती. तत्पूर्वीं एकहि प्रसिद्ध शिक्षणसंस्था पश्चिम आशिया किंवा पूर्व युरोपमध्यें अस्तित्वांत असल्याचा दाखला नाहीं. ज्याच्याबद्दल फारच गवगवा केला जातो तें 'अलेक्झँड्रिया म्युझियम्' फारच मागाहूनचें व त्याचें आयुष्यहि अवघें शंभर वर्षांचें ! पाश्चात्य आधुनिक संस्कृतीचे जे आद्यगुरु दाखविले जातात तेहि इ. स. पू. ५ व्या शतकानंतरचे ! प्रसिद्ध नाटककार सोफोक्लस् हा तर बुद्धानंतर १०० वर्षांनीं प्रसिद्धीस आला. हिरोडोटस्, एश्चिलस्, युरिपिडीज्, सॉक्रेटीस, प्लेटो, अरिस्टॉटल् वगैरे तर याहिनंतरचे ! वास्तविक तक्षशिला विद्यापीठाचा व दक्षिणे-

६४. J. W. M'crindle : Ancient India, pp, 67–68 (Note 1)
६५. H. G. Wells : The Out line of History, p. 375.
६६. P. C. Ray : A History of Hindu Chemistry, Vol. I (1904), pp XL–XLIII.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कडील काञ्ची-मदुरा विद्यापीठांचाच परिणाम ग्रीस, रोम, पश्चिम आशिया व इजिप्त येथील पंडितांवर झाला असला पाहिजे; कारण या सुमारास व कदाचित् त्याहिपूर्वीं ग्रीस-रोम वगैरे देशांचें दळणवळण दक्षिण हिंदुस्थानाशीं फारच दाट होतें.[६७] स्थापत्यकलेकरितां व नृत्यगायनाकरितां तर पहिल्यापासूनच मदुरा प्रसिद्ध; ग्रीक कला मागाहूनची. ग्रीसच्या चित्रकलेसंबंधानें तर मुळींच माहिती उपलब्ध नाहीं; व ग्रीक संगीतकला फारच कमी प्रतीची होती.[६८] हिंदुस्थानचें तत्त्वज्ञान तर फारच प्राचीन कालापासून प्रसिद्ध असून त्यावेळच्या स्त्रियासुद्धां मोठमोठ्या पंडिता होत्या. डॉ. थिबॉट्च्या मतें पायथॉगोरसचा प्रसिद्ध सिद्धांत त्याच्याहि अगोदर दोन शतकें हिंदुस्थानांत प्रस्थापित झाला होता, आणि 'सूल्व-सूत्रें' तर इ. स. पू. ८ व्या शतकांत रचिलीं गेलीं. श्रोडर् याच्या मतें ग्रीक तत्त्वज्ञानाचा झरा हिंदुस्थानांतच उत्पन्न झाला; आणि ज्या व्याकरणशास्त्राला आज विसाव्या शतकांतसुद्धां तोड नाहीं तें व्याकरणशास्त्र पूर्ण शास्त्रीय पद्धतीवर इ. स. पू. ७ व्या शतकांत रचिलें गेलें. तेव्हां भारतानें पाश्चात्यांकडून जें कांहीं ज्ञान मिळविलें असेल त्यापेक्षां पाश्चात्यांनींच भारताकडून अधिक ज्ञान मिळविलें ही गोष्ट सिद्ध होते.

तक्षशिलेचा नाश

पण भारताचें दुर्दैव म्हणूनच हजार-बाराशें वर्षांवर अव्याहत उच्च शिक्षणाचें पवित्र कार्य करणाऱ्या या महान् व अद्वितीय विद्यापीठाचा नाश हिंदुस्थानाबाहेरील रानटी आक्रमकांच्या हातून झाला. हे आक्रमक म्हणजे मध्य आशियांतील अल्ताई डोंगराच्या भागांत राहणारे रानटी भटके लोक. हेच हूण या नांवानें प्रसिद्ध आहेत. त्यांनीं निरनिराळ्या देशांवर स्वाऱ्या केल्या व त्यांची धूळधाण करून टाकली. यांना उपमा देतां आली तर टोळधाडीचीच देतां येईल! शेतकऱ्यांना कल्पनाहि नसतांना पिकानें समृद्ध झालेल्या शेतांवर अचानक या टोळांची धाड येते आणि शेतांतील पिकांचा सत्यानाश करते; तें खाऊन फस्त करते व मागें घाण व शेतकऱ्यांच्या वाट्याला दुःख ठेऊन जाते. त्याप्रमाणेंच या हूणांनीं केलें.

६७. H. G. Wells : The Outline of History, pp. 385, 490

६८. Ibid. p. 343.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिकंदरच्या काळीं यांच्या टोळ्या निरनिराळ्या प्रदेशांत पसरल्या. चीननें तर या आक्रमकांच्या स्वाऱ्यांना भिऊन चीन देशाभोंवतीं एक प्रचंड भिंत घातली.[६९] ही भिंतच पुढें जगांतील नऊ आश्चर्यांपैकीं एक ठरली. या भिंतीची लांबी १०,००० लि म्हणजे १४०० मैल असल्याचें सांगतात. ही गोष्ट इ. स. पूर्व तिसऱ्या शतकांतली होय. ही अभेद्य भिंत घातल्यामुळें हूण लोक पश्चिमेकडे व हिंदुस्थानच्या बाजूस वळले. त्यांनीं तक्षशिलेवर स्वारी केली व तक्षशिला विद्यापीठाचा नायनाट केला. ही स्वारी इ. स. ४५० ते ५०० च्या सुमारास झाली असावी.[७०] हूण लोकांच्या हातून तिचा जर नाश झाला नसता तर तिनें आणखी किती तरी वर्षें टिकाव धरला असता; पण दैवापुढें कोणाचें चालत नाहीं. इतकें मात्र खास कीं तक्षशिलेचा जरी नाश झाला व ती नाममात्र राहिली तरी हिंदुस्थानचाच नाहीं तर जगाचा प्राचीन इतिहास जोंपर्यंत जिवंत राहील तोंपर्यंत तक्षशिलेची कीर्ति अमर राहणार !

---

६९. Benziger Brothers (New York) : Round The World, Vol I, p. 39.

७०. Mandasor Stone Inscription of Yashovarman and Bhitari Stone Pillar Inscription of Skanda Gupta.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२ : नालंदा विहार

[इ. स. ४०० ते इ. स. १२००]

प्रास्ताविक

" नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण ". माणसाचें काय किंवा देशाचें काय, नशीब केव्हां उघडेल सांगतां येणार नाहीं. रंकाचा राव झाल्याचीं उदाहरणें मनुष्याच्या आवर्तींत सांपडतात त्याप्रमाणें अगदीं टाकाऊ व अपवित्र भूमि यात्रेचें ठिकाण व सर्वमान्य झाल्याचीं उदाहरणेंहि आहेत. मगध देशाचें असेंच झालें. एक काळ असा होता कीं या देशाकडे लोक तुच्छतेनें पहात. पण काळ बदलल्या-वर त्याच देशाकडे लोक प्रेमानें, आदरानें व भक्तिपूर्वक पाहूं लागले. जगांत आंतरराष्ट्रीय कीर्ति मिळविलेलें नालंदा विहार विद्यापीठ या मगध देशांतलेंच. नालंदाचा भरभराटीचा काल म्हणजे हिंदुस्थानच्या सांस्कृतिक इतिहासांतील सुवर्ण-कालाचें पर्वच ! यावेळीं यशोवर्मन्-हर्षवर्धनादि गुप्तराजे जन्मास येऊन त्यांनीं आपलीं नांवें इतिहासांत अजरामर करून ठेवलीं आहेत. हा काल म्हणजे जैन धर्म, बौद्ध धर्म व वैदिक धर्म या तिहींचाहि उच्चीचा; कारण याच कालांत पुराणग्रंथ रचले गेले; बौद्धमहायानाचा प्रसार झाला; जैनग्रंथ जन्मास आले. जीं काव्यें वाचण्यास आजहि आपणांस आनंद वाटतो त्यापैकीं बरींच काव्यें याच कालांत लिहिलीं गेलीं. जे कोष अर्थज्ञानाकरितां चाळावे लागतात ते तयार झाले. ज्योतिष-शास्त्रानें व अलंकारशास्त्रानें या कालांत जी प्रगति दाखविली ती इतर कालांत क्वचितच पहावयास मिळेल. न्यायशास्त्राचे अद्वितीय प्रवक्ते वसुबंधु व दिङ्नाग याच वेळीं जन्मास आले. दर्शनसूत्रांचे अंतिम ग्रंथ लिहिले गेले. जैन साधु सिद्धसेन दिवाकरांनीं या कालाला शोभा आणली. पण हें सर्व घडून यायला बव्हंशीं जर कोणतें कारण असेल, तर त्या नालंदासारख्या अद्वितीय शिक्षणसंस्थाच होत.

नालंदा विहार कोठें होता ?

आज ज्या भागाला आपण बिहार म्हणून ओळखतों त्या भागांत नालंदा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विहार होता. अलीकडे उत्खननांत या विहाराची जागा निश्चित झाली आहे. गंगेच्या कांठीं पाटणा शहराच्या नैर्ऋत्येस ४० मैलांवर वटगांव[1] नांवाचें एक खेडें आहे तेथें हा विहार होता. या जागेंत नालंदाचे अवशेष मिळाले आहेत.

या जागेंत विहार बांधला जाऊन त्याला अद्वितीय महत्त्व येण्याला निरनिराळीं कारणें झालीं असावींत. पण या जागींच विहार कां स्थापन झाला ? नालंदा हें कांहीं एकाद्या राजधानीचें शहर नव्हतें; किंवा येथें श्रीमान् श्रेष्ठींचें निवासस्थान नव्हतें; किंवा तें एकाद्या तीर्थाचें ठिकाणहि नव्हतें. असें असतांनासुद्धां ज्याअर्थी नालंदा विहार या ठिकाणीं स्थापला गेला व त्याला इतकें महत्त्व आलें त्याअर्थी तो स्थापन होण्याला एकच कारण दिसतें; व तें म्हणजे या ठिकाणीं एक विशिष्ट परंपरा पूर्वीपासून बरींच वर्षे चालत आली असावी व बुद्धकालापूर्वीहि हें स्थान गाजलें असावें. कदाचित् राजगृहाचें परिसर म्हणूनहि याला महत्त्व आलें असेल. बुद्धाप्रमाणें महावीराचा व नालंदाचा संबंधहि जैन ग्रंथकार लावतात; पण साधारण समज असा आहे कीं नालंदा विहाराची स्थापना आर्यदेवानें केली. त्याचे गुरु नागार्जुन यांनीं पहिल्यानें ही जागा निश्चित केली व आर्यदेवाला विहार स्थापण्यास त्यांनीं सांगितलें.

मगध देशाचा प्राचीन इतिहास व नालंदासंबंधानें आख्यायिका

ज्या भागाला आज आपण बिहार म्हणतों व जो आपल्या प्रिय राजेंद्रबाबूंचा देश तोच पूर्वी मगध म्हणून प्रसिद्ध होता. नालंदा, विक्रमशिला, उदंतपुरी वगैरे अत्यंत प्रसिद्ध विद्यापीठांतील असंख्य विहारांमुळेंच या मगध देशाला 'विहार'– 'बिहार' हें नांव मिळालें. ह्या देशाच्या इतिहासगंगेच्या मूळाचा शोध करीत करीत जसजसें मागें जाऊं तसतसें आपणाला मनोरंजक व आश्चर्यकारक घटना व प्रसंग पहावयास मिळतील. या देशांत मूळचे कोण लोक रहात होते याचा निश्चित पुरावा अद्याप मिळाला नाहीं. मात्र या देशानें बाहेरील 'मग' नांवाच्या लोकांना आश्रय दिला हें खास; पण इतकेंच नाहीं, तर त्यांचेंच नांवहि या देशानें धारण केलें ! कारण 'मग' लोकांना आश्रय देणारा देश म्हणजेच 'मग–ध'. वास्तविक या देशाचें मूळचें नांव 'कीकट'; तर मग हे 'मग'

१. "Ancient Geography of India"—Cunningham, p. 468.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोक आले कोठून ? व या देशानें त्यांना थारा कां दिला ? व या लोकांत असें काय होतें कीं त्यांचेंच नांव विशेषेंकरून या देशास देण्यांत आलें व या देशाचें मूळचें नांवच नाहींसें झालें ? इराणांतील लोकांचे धर्मगुरु जे 'मेगीस' त्यांचा व ह्या 'मग' लोकांचा कांहीं संबंध होता किंवा कसें ? व असल्यास ते याच देशांत कां आले व त्यांना या देशानें आसरा कां दिला ? या गोष्टींचें संशोधन फारच मनोरंजक होईल व हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासावर केवढा तरी प्रकाश पडेल.

इतकें मात्र खरें कीं या मग लोकांनीं हिंदुस्थानांत एक विशिष्ट स्थान प्राप्त करून घेतलें होतें. ते सूर्योपासक असल्यामुळें[२] त्यांची सूर्यमंदिरांतून नेमणूक करावी म्हणून प्राचीन संस्कृत ग्रंथांतून आदेश आहेत. हे मग ज्योतिषशास्त्रांत पारंगत असत. त्यांचीं सर्व भविष्यें खरीं ठरत; त्यांचें ग्रहांचें ज्ञान फारच सूक्ष्म असे; व ज्योतिषशास्त्रांतील ग्रहगणित, संहिता व होराशास्त्र यांवर त्यांचें प्रभुत्व असे.[३] भविष्यपुराणांतसुद्धां[४] या मगांबद्दल माहिती दिली आहे. असें म्हणतात कीं कृष्णपुत्र सांब याला दुर्वासस् ऋषींच्या शापानें महारोग जडला. तेव्हां त्यानें सूर्यपूजा आरंभिली. त्यानें एक सूर्यमंदिर बांधलें व शकद्वीपाहून १८ मगांचीं कुटुंबें आणलीं. सांबानें यांचा व द्वारकेच्या भोजांचा लग्नसंबंध घडवून आणला; म्हणून हे मग 'भोजक' म्हणून प्रसिद्धीस आले.[५]

पण आपल्या पूर्वकालीन आर्यांनीं या मगध देशाबद्दल फारच तुच्छतापूर्वक

---

२. बृहत्संहिता 60.19; P. V. Kane : Notes on "The Harshacharita" p. 23. A Commentator on Brihat Samhita is quoted : रविमर्चयित्वा पूजका हि भूयसा गणका भवन्ति । ये 'मगाः' इति प्रसिद्धाः भागवताः इत्यन्ये ।

३. बाणकृत 'हर्षचरित' उच्छ्वास ४ था.

४. Wilson's विष्णुपुराण (Hall's ed.) Vol. V p. 382 summarises the last 12 chs. of Bha. Purana, where the account of मगs is given.

५. P. V. Kane : Notes on "The Harsha Charita,' Uchh. IV–VIII, p. 23.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उद्गार काढले आहेत. या देशाबद्दल इतकी घृणा त्यांच्या मनांत उत्पन्न कां झाली याचें कारण पाहून काढण्याकरितां संशोधन होणें आवश्यक आहे. वाजसनेयीसंहिता,[६] पञ्चविंश ब्राह्मण,[७] श्रौतसूत्र,[८] ऐतरेय आरण्यक,[९] वगैरे आर्यधर्मांचा पुरस्कार करणाऱ्या ग्रंथांत या देशाबद्दल व येथील लोकांबद्दल अत्यंत वाईट शब्द वापरले आहेत. सांख्यायन आरण्यकांत तर या देशांत ब्राह्मणांनीं राहूं नये म्हणून म्हटलें आहे. बौधायनधर्मसूत्रांत[१०] मगध देशांत जाणाऱ्या ब्राह्मणास प्रायश्चित्त सांगितलें आहे. अथर्ववेदांत[११] तर "येथील लोकांना ताप येवो" अशीं शापमूलक वचनें आहेत; व या वचनांचा पगडा आजपर्यंत टिकला आहे हें आजच्याहि कांहीं लोकांच्या वागण्यावरून दिसून येतें. कारण आजसुद्धां मिथिलेचे ब्राह्मण मगधाच्या बाजूस असलेल्या गंगेच्या पाण्यांत स्नान करीत नाहींत ! गोष्टी इतक्या थरास जावयाला तशींच कांहीं कारणें झालीं असलीं पाहिजेत; पण कालाच्या उदरांत प्राचीन इतिहास गडप झाल्यानें तर्कवितर्क करूनच प्रत्येकजण आपलें समाधान करून घेणार.

पण नालंदासंबंधानें ज्या आख्यायिका रूढ आहेत त्यांत एक 'नागा-' संबंधानेंहि आख्यायिका आहे. एका काळीं नागलोकांनीं सारा भरतखंडच नव्हे तर आज प्रत्यक्ष माहीत असलेलें व समुद्राखालीं गडप झालेलें जें त्या वेळचें जग त्या सर्वांवर आपलें वर्चस्व बसविलें होतें, हें थेट स्कँडिनेव्हीयापर्यंत पश्चिमेकडे व दक्षिण अमेरिका, मध्य अमेरिका, पॅसिफिक महासागरांतील सर्व बेटें इत्यादि ठिकाणीं दिसून येणाऱ्या सर्पपूजेवरून किंवा सर्पांबद्दल दिलेल्या निरनिराळ्या उल्लेखांवरून व दंतकथांवरून त्याचप्रमाणें ड्रेगन्, मरमेन् व मरमेड् वगैरेंच्या काल्पनिक अस्तित्वाच्या गोष्टींवरून दिसून

६. वाजसनेयीसंहिता, ३०. ५. २२.
७. पञ्चविंश ब्राह्मण, १७. १६.
८. श्रौतसूत्र, ७. ६. २८.
९. ऐतरेय आरण्यक, २. १. १.
१०. बौधायन धर्मसूत्र, १. १२.
११. अथर्ववेद. ५. २२. १४.; Prof. Sammaddar : Glories of Magadha; p. 6.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

येतें.[१२] या नाग लोकांचें वर्चस्व आजहि आसाम प्रांतांत आहे; व नाग म्हणजे आसामांतीलच लोक ही आपली केवळ भ्रामक कल्पना आज दृढमूल झाली आहे. पण हिंदुस्थानांत जितकीं म्हणून नद्यांचीं खोरीं आहेत व जेथें जेथें डोंगराळ भाग आहे तेथें तेथें व विशेषतः कोंकणपट्टी सर्व व काश्मीरांतील सर्व प्रदेश यांत नागलोक एका काळीं नुसते रहात नसून त्यांचीच संस्कृति तेथें होती. मगध देशहि नाग लोकांचाच आगर; अगदीं इतिहासकालांतसुद्धां मगध देशाचा शिशुनाग हा 'नाग' नांव धारण करणारा प्रसिद्ध राजा होऊन गेल्याचें इतिहास सांगतो. या नाग लोकांच्या इतिहासांतील उत्तरार्धभागांत त्यांचा जो अधःपात झाला व जगांतील अत्यंत सुधारलेले लोक अत्यंत रानटी अवस्थेंतच जाऊन पोहोंचले त्यावेळीं वैदिक ऋषींचा व त्यांचा संबंध आला असेल व त्यांच्या रानटीपणामुळें व नरमांसभक्षकत्वामुळें त्यांच्या राहण्याच्या मगध देशांतील जागे-बद्दल वैदिक ऋषींना घृणा उत्पन्न झाली असेल व त्यांचीं तुच्छतादर्शक वचनें त्याकाळीं निघालीं असतील!

पण ह्या देशाला यापुढें उच्चीचे ग्रह अनुकूल झाले; ग्रहदशा बदलायला लागली; आणि भासवचनानुसार भाग्यपंक्ति चाकाच्या आरीप्रमाणें फिरूं लागली; व म्हणून या देशानें जी कामगिरी आजपर्यंत केली आहे ती जगाच्या पाठीवर एकाहि देशानें केली नसेल. नालंदा, विक्रमशिला, उदन्तपुरी वगैरे विद्यापीठें म्हणजे या कामगिरीचा सोनेरी कळसच होय.

जगांतील दोन महान् धर्मप्रवर्तक वर्धमान महावीर व गौतमबुद्ध यांनीं अनुक्रमें जैन धर्म व बौद्ध धर्म यांच्या पताका पहिल्यानें मगध देशांतच फडकविल्या; व या धर्मांचा फैलाव जगांत निरनिराळ्या ठिकाणीं होऊं लागला. यामुळें या

---

१२. i) Myths of Babylonia and Assyria, (The Gresham Publishing Company Ltd.) pp. VII, X, 77 etc.
ii) Myths and Traditions of the South Sea Islands, pp. vii, viii, 173, 217, 303.
iii) Myths of Crete and Pre-Hellenic Europe, pp. 167, 182, 307 etc.
iv) Myths of Pre-Columbian America, pp. IX, 36 et seg.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देशाला अत्यंत पावित्र्य प्राप्त झालें. विष्णुदास चाणक्य ऊर्फ कौटिल्य या देशांतच जन्मास आला[१३] व त्यानें नंद राजांच्या इतिहासांत क्रांति घडवून आणली. महान् नीतिशास्त्रज्ञ कामन्दक येथलाच. प्रसिद्ध व्याकरणकर्ते पाणिनि, पिंगल, वररुचि व पतञ्जलि यांना थोरपणा येथेंच प्राप्त झाला. ज्योतिःशास्त्राचा जनक आर्यभट्ट मगध देशांतच जन्मला. महाभारतांत ज्याचें नांव अद्वितीय राजा म्हणून गाजलें[१४] तो जरासंध मगध देशाचाच राजा. उत्तर भारतांत प्रथम साम्राज्य येथील राजांनींच स्थापलें. सम्राट् अशोक व सम्राट् समुद्रगुप्त यांचा व मगध देशाचा संबंध इतिहासाच्या कोणत्या अभ्यासकाला माहीत नाहीं ? या दोनहि सम्राटांनीं मगध देशाचें साम्राज्य व कीर्ति वाढविली. नालंदा, विक्रमशिला वगैरे विद्यापीठांनीं तर मगध देशाचें नांव सर्व आशिया खंडभर करून त्याला आन्तर-राष्ट्रीय कीर्ति मिळवून दिली.

मगध देशाच्या स्थापत्यकलेबद्दल तर सर्व हिंदुस्थान ऋणी आहे. मेगॅस्थेनीसच्या मतें मगध देशांतील इंजिनिअर्स व कुशल कारागीर यांनीं नुसत्या अद्वितीय इमारतीच बांधल्या नाहींत, तर एका दगडाचे असे स्तंभ उभारले कीं ते कसे उभारले असतील याचें आश्चर्य सर्वांस वाटतें. हें काम आजच्या महान् इंजिनिअर्सनांसुद्धां अशक्य वाटेल. मगध देशांतील त्यावेळच्या लोकांनीं चित्रकला वगैरे ललितकलेंतहि फारच प्रगति केली होती. त्यांनीं त्यावेळीं चित्रकलेंत वापरलेले रंग आजसुद्धां तयार करतां येत नाहींत. अशा प्रकारच्या मगध देशांतील कारागीरांकडून सर्व हिंदुस्थानांत निरनिराळीं देवळें बांधविण्यांत आलीं म्हणून पुरावे आहेत.[१५] मगध देशांतील वजनांचा उपयोग करण्याबद्दल खुद्द मनूची आज्ञा आहे.

---

१३. J. N. Samaddar : The Glories of Magadha (1927), p. 3
१४. हरिवंश ९०; Samaddar : The Glories of Magadha (1927), p. 323.
१५. रामायण ४०.२३.
Samaddar : Glories of Magadha, p. 4.
Broadley : The Buddhist Remains of Behar, J. A. S. B. 1872.
Smith : Early History of India, Asoka, p. 136.
Epigraphia India, XI. 188.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अशा या पार्श्वभूमीवर नालंदाची स्थापना व वाढ झाली; पण खुद्द नालंदा-संबंधानेंहि आख्यायिका व दंतकथा प्रचलित आहेत त्यावरून नालंदाचें प्राचीनत्व सिद्ध होतें. असें म्हणतात कीं पूर्वी येथें एक आम्रवन होतें; व त्यांत एक विस्तीर्ण सरोवर होतें. या सरोवरांत एक नाग रहात असे. व त्याचें नांव 'नालंद' होतें. त्याच्याच नांवावरून संघारामाचेंहि नांव 'नालंदा'[१६] पडलें. दुसरी एक दंत-कथा अशी आहे कीं बुद्धानें पूर्वीच्या एका जन्मांत या ठिकाणीं भयंकर तप आचरलें. जगांतील एकंदर दुःखें पाहून त्याला फार वाईट वाटे. म्हणून जे जे आपद्ग्रस्त लोक येथें येत त्यांना तो भरपूर साहाय्य करी. अशी एकहि गोष्ट नव्हती कीं जी त्यानें दुःखीजनांना दिली नाहीं. इतकें करूनहि त्याचें समाधान होईना. याच घटनेवरून या जागेचें नांव 'नालंद' (न+अलम्+दा=अधिक देऊं न शकणारी) व पुढें या नगरीवजा विहाराचें नांव 'नालंदा' पडलें.

एक अशीहि दंतकथा आहे कीं बुद्धशिष्य सारिपुत्त हा आपल्या ८०,००० शिष्यांसह येथें रहात होता; व हें स्थान फारच प्रसिद्ध होतें.

चिनी प्रवासी व नालंदा : फा-हायेन

नालंदासंबंधानें ज्यांचा पहिल्यानें संबंध आला असे पंडित म्हणजे नागार्जुन (सुमारें ३ रें शतक) व आर्यदेव होत. आर्यदेव हे नागार्जुनाचे शिष्य. नागार्जुनांनीं धर्मप्रचाराकरितां ही जागा नक्की केली व आर्यदेवांनीं येथें आश्रम स्थापला. पण त्यावेळेस विद्यादानाकरितां हें स्थान प्रसिद्धीस आलें नसावें. कारण फा-हायेन हा चिनी प्रवासी येथें आला होता; पण त्यानें येथील शिक्षणसंस्थेबद्दल कांहींहि लिहून ठेवलें नाहीं. तरी पण ज्या अर्थी त्यानें या जागेला भेट दिली त्या अर्थी ही जागा एकाद्या परकीय व्यक्तीनें भेट देण्याइतकी प्रसिद्ध होती हें खास; शिवाय ही जागा त्यावेळीं नालंदाऐवजीं 'नाल' या नांवानें ओळखली जाई.[१७]

१६. S. K. Das : The Educational System of Ancient Hindus, (1930), p. 359.

१७. Radhakumud Mookerji : Ancient Indian Education, (London, 1947) p. 558.
Phanindra Nath Bose : Indian Teachers of Buddhist Universities. (1923), p. 109.
Fa-Hien's Record of Buddhistic Kingdoms, by J. Legge, Oxford (1886) (A. D. 399-414); Watters, II, p. 172.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यावरून नालंदा हें नांव किती प्राचीन होतें याची कल्पना येईल. फा-हायेन हा येथें ४ थ्या शतकांत आला.

हुएनत्संग : दुसरा चिनी प्रवासी हुएनत्संग होता. याच्या नांवाचा उच्चार व्हान शांग् असाहि करितात. हा ७ व्या शतकांत नालंदा विहार पाहण्याकरितां आला. हा येथें आल्यावर विहारांत रमला व त्यानें या ठिकाणीं बरींच वर्षें कादलीं. हिंदुस्थानांतील इतर भागांतहि त्यानें प्रवास केला. निरनिराळ्या संस्था, निरनिराळे लोक, विचित्र आचारविचार त्याला पाहावयास मिळाले. या सर्व पाहिलेल्या गोष्टींबद्दल स्वतःच्या स्मरणशक्तीप्रमाणें व आकलनसामर्थ्यांप्रमाणें त्यानें लिहून ठेविलें आहे. नालंदासंबंधानें त्यानें जर लिहून ठेवलें नसतें तर आपणांस नालंदाबद्दल कांहींहि कळलें नसतें. त्यानें लिहिलेल्या गोष्टीहि पुष्कळांना काल्पनिक वाटल्या व अद्यापहि कांहींना त्या तशा वाटत आहेत.[१८] पण नालंदा-संबंधानें त्यानें लिहिलेलें खरें होतें हें आतां नालंदाचें जें उत्खनन झालें त्यावरून कळून आलें. नालंदाची कीर्ति एकसारखी कानांवर पडल्यानें 'नालंदा आहे तरी कशी ?' हें पाहण्याकरितां हा चिनी पंडित अत्यंत हालअपेष्टा सोशीत केवळ कुतूहलबुद्धीनें येथें आला, पण त्याच ठिकाणीं विद्यार्थी म्हणून तो किती तरी वर्षें राहिला. यावरूनच नालंदा ही संस्था त्या काळीं कशी होती याची कल्पना येईल. हुएनत्संग यानें नालंदासंबंधानें अगदीं बारीकसारीक गोष्टीसुद्धां लिहून ठेविल्या आहेत.

इत्सिंग : तिसरा चिनी प्रवासी इत्सिंग. हा सन ६७५ सालीं नालंदा येथें होता. हा येथें असतांना या विहारांत ३००० भिक्षु आचार्य होते असें त्यानें लिहून ठेविलें आहे. हा इत्सिंग नालंदा येथें १० वर्षें राहिला. "येथील गुरूंजवळ राहून प्रत्यक्ष त्यांच्याकडून मला शिकायला मिळालें हें केवढें माझें भाग्य!" असें त्यानें या विद्यापीठासंबंधानें लिहून ठेविलें आहे.[१९] इत्सिंगनें येथील ग्रंथसंग्रहा-ल्याचा भरपूर उपयोग करून घेतला.

१८. H. G. Wells : The Outline of History, p. 591.
१९. A Record of the Buddhist Religion (as practised in India and the Malay Archipelago), (A. D. 671-695) By I-Tsing (Tr. by J. Taka Kusu, B. A., Ph. D.), p. 185. Oxford, 1896. Dr. Altekar; p. 163.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चिनी प्रवाश्यांनीं वर्णिलेलें नालंदाचें आवार व तेथील संस्था

नालंदा विहाराची जागा फारच प्रशस्त होती. विद्यापीठ याच जागेंत होतें. येथें एक विस्तीर्ण बाग होती. या बागेंत निरनिराळ्या प्रकारचे तुंग वृक्ष व वेली फळाफुलांनीं बहरलेले असत. जेथें वृक्षवेली तेथें निरनिराळ्या प्रकारचे नादमधुर गाणीं गाणारे पक्षी असणारच. चित्रविचित्र रंगाचीं फुलपांखरेंहि पाहतांना केवढी मौज व आनंद वाटत असला पाहिजे. निसर्गाला प्रत्यक्ष पाहण्यानेंच विद्यार्थ्यांचें ज्ञान वाढत राहणार व मन उल्लसित होणार !

नालंदा विहाराच्या बागेंत नितान्तरमणीय अशीं सरोवरें होतीं; कालवेहि होते; व सरोवरांत निरनिराळ्या रंगांचीं कमलें उमललेलीं असत. नालंदाच्या वैभवांत या रमणीय वातावरणानें कमी भर टाकली नसेल. गुप्त राजांनीं येथें ज्या इमारती बांधून दिल्या त्याहि फार फार उंच. या इमारतींचें ह्युएनत्संग यानें फारच बहारीचें वर्णन केलें आहे. तो म्हणतो, येथील इमारतींच्या मनोऱ्यांवरून सूर्यास्ताची शोभा अवर्णनीय दिसते. येथील असंख्य मनोरेसुद्धां इतके उंच आहेत कीं ते प्रातः-कालच्या धुक्याला जाऊन भिडलेले दिसतात. असंख्य खांबांच्या मोठ्या खोल्यांतून रंगीत चित्रें काढलीं आहेत. आम्र व कनक वृक्षांनीं सुशोभित, सतत जलनृत्य करणाऱ्या कारंज्यांनीं युक्त, नागमोडी कालवे असलेलें व स्वच्छ पाण्यांत नील कमळें उगवलेलें रम्य वन इतरत्र कोठेंहि पहावयास मिळणार नाहीं. हिंदुस्थानांतील हजारों विहारांत नालंदाच्या तोडीचा एकहि विहार नाहीं.[२०] अत्यंत सुशोभित केलेले घुमट व आल्हाददायक मनोरे येथें एकत्र झालेले दिसतील. त्यांची येथें एकच गर्दी उडालेली दिसेल. सर्वांत वरच्या खोल्या ढगांत नाहींशा झालेल्या दिसतील.[२१] इमारतींतील कठडे मोतिया रंगाचे असून ते कोरलेले आहेत; व त्यांवर नक्षीकाम केलेलें आहे. छपरांवर कौलें असून त्यांच्यांतून निरनिराळ्या रंगांच्या छटा पसरतांना दिसतात; यामुळें एक प्रकारचें सौंदर्य उत्पन्न होतें.[२२]

---

२०. Havell, p. 199.

२१. Stone Inscription of Yas'ovarman, E. I. XX. p. 43.
cf. यस्यामम्बुधरावलेहि–शिखरश्रेणी विहारावली । मालेवोर्ध्वविराजिनी विरचिता धात्रा मनोज्ञा भुवः ॥

२२. Dr. Sankalia, ' University of Nalanda, ' p. 120.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सातव्या शतकांत ज्यावेळीं हुएनत्संग हिंदुस्थानांत आला त्यावेळीं नालंदा विहार वैभवाच्या शिखरावर चढलेला होता. एकामागून एक अशा गुप्त राजांनीं नालंदाचें वैभव वाढविण्यास मदत केली होती; किंबहुना त्यांच्याच औदार्यामुळें नालंदाला इतकें थोर पद प्राप्त झालें. पुढें पाल राजांनीं व कनोजच्या हर्षवर्धनानेंहि या विहारास सहाय्य केलें. हुएनत्संगाच्या वेळीं या विहारांत १०,०००[२३] ज्ञानपिपासु भिक्षु रहात होते. त्यांचें जेवणखाण, कपडालत्ता, रहाण्याची सोय, औषधपाणी व शिक्षण या विहारांतून विनामूल्य होई. त्यावेळीं येथें १००० मोटाल्या खोल्या अभ्यास घेण्याकरितां असत, व भिक्षूंना राहण्याकरितां ३।४ हजार खोल्या असत. नवीन दाखल झालेल्या विद्यार्थ्यांना या खोल्या देण्यांत येत नसत; जास्त दिवस वास्तव्य करीत असलेल्या विद्यार्थ्यांची या खोल्यांतून पहिल्यानें सोय लावण्यांत येत असे.

दरवर्षी या खोल्यांची वाटणी नव्यानें होई. उत्खननांत आतां दिसून आलें आहे कीं येथें कित्येक खोल्यांतून एकाचीच तर कित्येकांत दोघां भिक्षूंची सोय केलेली असे. तसेंच प्रत्येक खोलींत एक किंवा दोन उंचवटे झोंपण्याकरितां असत. शिवाय दिव्याकरितांहि कोनाडा असे.

हुएनत्संगच्या लिखाणावरून येथें असणाऱ्या भिक्षूंपैकीं हजारों विद्वान् व कर्तबगार होते; व त्यापैकीं शेंकडों भिक्षु प्रख्यात व कीर्तिमान् होते. अभ्यासांत व संवादांत त्यांना दिवस पुरत नसे. रात्रंदिवस ते वेळेचा उपयोग करून एकमेकांना मदत करीत. वॉटर्स लिहितो :[२४] पाश्चात्य देशांतून विद्यार्थी आपल्या शंकांचें निरसन करून घेण्याकरितां येथें येत व ख्यातनाम होत. कित्येक तर नालंदाशीं आपला नुसता संबंध जोडण्याचा प्रयत्न करीत, तरी त्यांना लोकांत मोठा मान मिळे व त्यांच्याबद्दल आदर उत्पन्न होई. यामुळें नालंदांत प्रवेश मिळावा म्हणून दूरदूरचे विद्यार्थी हजारोंनीं येत. येथें आपणांस शिक्षण घेतां यावें अशी प्रत्येकाची इच्छा असे; व म्हणून हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांतूनच

---

२३. Parkhurst C. A. : 'Bihar, The Land of The Blessed One' p. 8.
Havell E. B. : The History of Aryan Rule in India, p. 199.

२४. Thomas Watters : On Yuan Chwang's Travels in India, Vol. II (London 1905), p. 165,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नव्हे तर मंगोलिया[२५], कोरिया, तिबेट, तोखारा, सुमात्रा, चीन येथून शेंकडों विद्यार्थी येत.[२६] पण येथें येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यास प्रवेश मिळेलच याची खात्री नसे; व पुष्कळांना निराशेनें परतहि जावें लागे. विद्यार्थी दाखल करण्यापूर्वी त्याची प्रवेशपरीक्षा घेण्यांत येई. ही परीक्षा 'द्वारपंडित' घेत.[२७] अत्यंत विद्वान्, अनुभवी व हुशार आचार्यांसच द्वारपंडित नेमण्यांत येत असे. मोठमोठ्या नामांकित पंडितांचीं नांवें द्वारपंडित या पदावर असलेलीं आढळतील. आपल्या ज्ञानानें, बुद्धिवैभवानें व चारित्र्यानें या पंडितांना खुष केल्याशिवाय नवीन विद्यार्थ्यास विहारांत प्रवेश मिळत नसे. परीक्षा बहुतेक तोंडीच घेत, पण सामान्य विद्यार्थ्यास ती फारच कठीण वाटे व म्हणून आलेल्या विद्यार्थ्यांतून अवघे शेंकडा दहा घेतले जात. असें असतांना सुद्धां विद्यार्थ्यांची संख्या १०,००० वर असे. यावरून प्रवेश मिळण्याकरितां किती विद्यार्थी येत असले पाहिजेत याची कल्पनाच केलेली बरी !

हुएनत्संग म्हणतो कीं येथें जगप्रसिद्ध आचार्य शेंकडोंनीं होते. त्यानें तर जगांत कीर्ति पावलेल्या अशा येथील आचार्यांची एक यादीच दिली आहे. त्याच्या वेळीं येथें १५१० अध्यापक होते. येथें दररोज निरनिराळ्या पंडितांकडून निरनिराळ्या विषयांवर १०० व्याख्यानें होत. यामुळें विद्यार्थ्यांचें सामान्य ज्ञान वाढे. येथें असणाऱ्या १० हजार भिक्षूंमध्यें एक हजारावर भिक्षू दहा निरनिराळ्या विषयांत पारंगत होते; पांचशें भिक्षू तीस विषयांत निष्णात होते; हुएनत्संग धरून दहा आचार्य ५० विषयांत प्रवीण होते; स्वतः **शीलभद्र** यांनीं असा एकहि विषय ठेवला नव्हता कीं ज्याचें ज्ञान साकल्यानें त्यांना नव्हतें.[२८]

---

२५. Taka--Kasu : It-sing, p. 26.

२६. Hiue Li : Life of It-sing, Introduction, pp. XXVII–XXXVI.

२७. अशाच प्रकारच्या 'द्वारपंडित' पद्धतीचा अवशेष किंवा स्वतंत्र उपयोग युरोपांतील 'लेडेन' युनिव्हर्सिटींतून अद्याप पहावयास मिळतो. पहा : Charles E. Thomas : European Universities, (Boston, 1936) pp. 15,16.

२८. Havell E. B. : The History of Aryan Rule in India, p. 198.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विद्यार्थ्याला नालंदा विहारांत प्रवेश मिळण्यापूर्वी त्याचें वय साधारणतः १६ असे; व शिक्षणाकरितां सुमारें १२ वर्षे त्याला घालवावीं लागत.[२९] हिंदुस्थानांतील तत्कालीन जे पंडित असत त्यांनीं आपलें शिक्षण नालंदा येथें घेतलेलें असलें पाहिजे असा त्याकाळीं समज होता. त्यांनीं नालंदा येथें शिक्षण घेतलेलें नसलें तर तो कमीपणा समजला जाई.

येथील भिक्षूंचें चारित्र्य इतकें उज्ज्वल असे कीं ८०० वर्षांच्या या विद्या-पीठाच्या कारकीर्दींत एकहि विपरीत उदाहरण घडल्याचें दाखवितां येणार नाहीं. विद्या, ज्ञान व चारित्र्य याबद्दल नालंदाची सर्व भारतांत ख्याति होती.

नालंदाची भरभराट कोणी व कशी केली ?

नालंदाची भरभराट व्हावयाला निरनिराळ्या काळीं निरनिराळ्या व्यक्ति कारणी-भूत झाल्या आहेत. चारित्र्यवान् भिक्षु पंडितांनीं नालंदाची कीर्ति, विद्वत्ता व शिक्षण या बाबतींत वाढविली. त्याचप्रमाणें नालंदांत शिक्षण देतां यावें, तेथें विद्वान् भिक्षु आकर्षिले जावे, त्यांच्या व हजारों विद्यार्थी भिक्षूंच्या राहण्याची, जेवणाखाण्याची व इतर आवश्यक गोष्टींची सोय व्हावी म्हणून निरनिराळे राजे लोक आपुलकीनें झटले. यांत मगधाचे गुप्त राजे, मौखरी घराण्यांतील कांहीं राजे, कामरूप किंवा आसामचे राजे, नेपाळचा राजा अंशुवर्मन्, काठेवाडांत असलेल्या वलभीचे राजे वगैरेंचा समावेश होतो.[३०] कनोजच्या हर्षवर्धनानें व पाल राजांनींहि कांहीं कमी मदत केली नाहीं.[३१] अगदीं दूरच्या देशांतील, उदाहरणार्थ जावा-सुमात्राच्या राजानेंहि, नालंदाचें वैभव वाढविण्यास मदत केल्याचा उल्लेख सांपडतो.[३२]

नालंदाची भरभराट गुप्त राजांच्या भरभराटीवर बरीच अवलंबून होती. ज्या ज्या वेळीं गुप्त राजांवर संकटें आलीं त्या त्या वेळीं नालंदावरहि आलीं. अगोदर मगध देशाचे गुप्त राजे यांची परंपराच उज्ज्वल. हे राजे कुशल योद्धे, थोर पंडित, कवि व संगीतप्रिय होऊन गेले. यांनीं अश्वमेध यज्ञ केले. थेट काबूलपासून

२९. F. E. Keay : Indian Education in Ancient and Later Times (1938), p. 149.
३०. Rev. H. Heras, S. J., : Journal of the Behar and Orissa Research Society, Vol. XIV, 1928, Part I, p. 19.
३१. Upendranath Ball : Ancient India (1928), p. 225
३२. E. I. XVII. p. 310.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आसामपर्यंत व नेपाळपासून काञ्चीपर्यंत त्यांनीं आपलें साम्राज्य वाढविलें. त्यांनीं गुप्तशक सुरू केला; आपल्या राज्याचीं नाणीं पाडलीं. त्यांनीं आपल्या पदरीं अनेक विद्वान् व गुणी लोक ठेवून घेतले. हें घराणें जवळ जवळ २५० वर्षें टिकलें. या घराण्यांतील अत्यंत प्रसिद्ध राजे सम्राट् समुद्रगुप्त (इ. स. ३३०–३७५) व सम्राट् दुसरा चंद्रगुप्त (इ. स. ३७५–४१५) किंवा प्रसिद्ध विक्रमादित्य होत. या घराण्यांतील नंतरचे राजे कुमारगुप्त (इ. स. ४१५–४५५), स्कंदगुप्त (इ. स. ४५५–४८०) वगैरे झाले. हे राजे समुद्रगुप्त व चंद्रगुप्त यांच्या तोडीचे सम्राट् म्हणून नंतरच्या राजांत जरी गाजले नसले तरी नालंदाची भरभराट केवळ त्यांच्याचमुळें झाली असें म्हणावयास हरकत नाहीं. तरी पण नालंदाची उभारणी मात्र सर्व गुप्त सम्राटांच्या सुवर्णयुगाच्या पार्श्वभूमीवरच झाली असें म्हणणें जास्त सयुक्तिक दिसेल. गुप्तकाळाला सुवर्णयुग म्हणण्याचें कारण त्या काळीं हिंदुस्थानची सर्वांगीण उन्नति होत होती हें होय. गुप्त राजे रसिक, नीतिमान्, विद्वान्, दीर्घायुषी व पराक्रमी निपजल्यामुळें त्यांच्या प्रजेस फार सुख झालें. विद्या, कला, वाङ्मय, कलाकुसर, शास्त्रीय शोध, परदेशाशीं व्यापार, सुबत्ता वगैरे बाबतींत हिंदुस्थानांतील लोकांची प्रगति एक सारखी होत होती. त्यामुळें हिंदुस्थानची कीर्ति जगभर पसरली व ती अजरामर राहिली. उत्तर हिंदुस्थानांत शांतता व सुराज्य नांदत होतें, त्यामुळें निरनिराळ्या कलांचा उत्कर्ष झाला. गुप्त राजे स्वतः वैदिकपंथी असूनसुद्धां त्यांनीं बौद्धपंथीय विद्यापीठांची शोभा वाढविली. अनेक विद्वानांना त्यांनीं आश्रय दिला. या कालांत भारतांतील उत्तम उत्तम वाङ्मय निर्माण झालें; कालिदास, अमरसिंह, दण्डी, भारवी, इत्यादि कविरत्नें चमकलीं. पुराणें रचलीं गेलीं. ज्योतिष, शिल्प, चित्रकला, गणित, संगीत, मूर्तिखोदकाम वगैरे शास्त्रांना थोर दर्जा प्राप्त झाला. बीजगणितकार आर्यभट्ट, वराहमिहिर, ब्रह्मगुप्त जन्मास आले. गुप्तकालीन शिल्प उत्तम दर्जाचें. त्याचे उत्कृष्ट नमुने म्हणून सारनाथचें देऊळ, वेरूळचीं लेणीं, अजिंठ्याचीं लेणीं, नालंदाचा ७०।८० फूट उंचीचा बुद्धाचा पुतळा, समुद्रगुप्तानें उभारलेला दिल्लीचा लोखंडी स्तंभ हे दाखवितां येण्याजोगे आहेत. [३३] या पार्श्वभूमीवर नालंदाचा उत्कर्ष झाला.

---

३३. वि. सि. चितळे : हिंदुस्थानचा अभिनव इतिहास, पानें ७८–८०.
Allan : Gupta Coins, p. xliii

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पण एक काळ असा आला कीं ज्यावेळीं हूण लोकांशीं या गुप्त राजांना झगडावें लागलें. या हूणांचा राजा मिहिरकुल हा बौद्ध धर्मांचा द्वेष्टा होता. त्यानें बौद्ध भिक्षूंचा संहार केला; इमारतींचा व विहारांचा नाश केला; विद्यार्थ्यांना ठार केलें. नालंदा विहार यांतून सुटूं शकलें नाहीं.[३४] आज नालंदाचें उत्खनन झालें आहे त्यांत कांहीं इमारती जुन्या इमारतींवर रचलेल्या असाव्या किंवा खंड पावलेल्या इमारतींच्या भागावर त्यांची उभारणी केलेली असावी असें दिसतें.[३५]

नालंदा विहाराचा अशाच प्रकारचा नाश पुढें हर्षवर्धनाच्या वेळीं पूर्व बंगालच्या शशांक राजानें केला असावा असाहि विद्वानांचा समज आहे. हा शशांकसुद्धां बौद्ध धर्मांचा द्वेष्टा होता. त्यानें आपल्या दुष्टपणाचा नमुना हर्षवर्धनाचा भाऊ राज्यवर्धन याचा कपटानें खून करविण्यांत दाखविला होता. हर्षवर्धनानें याचा पूर्ण पराभव केला व नालंदाचे विहार पुनः बांधले. त्यानें एक पितळी विहार या ठिकाणीं बांधला म्हणून उल्लेख आहे.[३६] उत्खननांत या हर्षवर्धनाचीं नाणीं व मुद्रा सांपडल्या आहेत.[३७]

हुएनत्संगाच्या मतें गुप्त घराण्यांतील शक्रादित्यानें नालंदा येथें पहिल्यानें इमारती बांधून देण्यास सुरवात केली. त्यानें एक मोठा संघाराम येथें स्थापला. त्यानें केलेला मुहूर्त फारच शुभदायी ठरला; कारण त्याच्यानंतर येणाऱ्या प्रत्येक गुप्त राजानें येथें नवीन इमारती व संघाराम बांधून दिले. उदाहरणार्थ, शक्रादित्याचा मुलगा बुद्धगुप्तराज, नातू तथागतगुप्तराज, याच घराण्यांतील बालादित्य व त्याचा मुलगा वज्र या सर्वांनीं एकामागून एक इमारती बांधून नालंदा विहाराची शोभा वाढविली. इमारतींवर मजले चढविले व इमारती उंच उंच वाढूं लागल्या. चार चार मजली इमारतींची तर गर्दीच उडाली होती. परंतु वरील राजांनीं सहा सहा मजली

---

३४. Rev. H. Heras, S. J. : A Note on the Excavations at Nalanda and its History. J. B. B. R. A. S. II, N. S. P. 215, 216.

३५. R. K. Mookarji : Ancient Indian Education, p. 561.

३६. Beal : Buddhist Records of the Western world, II, p. 174.

३७. Heras, p. 17.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इमारतीसुद्धां बांधून दिल्या. एक इमारत तर नऊ मजली होती.[३८] या सर्व इमारतींवर उंचच उंच मनोरे होते; व हे मनोरे सकाळीं किंवा सायंकाळीं ढगांना भिडलेले फारच प्रेक्षणीय दिसत असले पाहिजेत. अशा एका उंच इमारतीमध्यें वेधशाळा (observatory) स्थापन करण्यांत आली होती; तीसुद्धां सकाळच्या धुक्यांत नाहींशी होई.[३९] इतर राजांनींसुद्धां या इमारतींत भर घातली. राजा हर्षवर्धनानें येथें १० फूट उंचीचा एक पितळी विहार बांधून दिला म्हणून वर सांगण्यांत आलें आहेच. एका राजानें तर सर्व विद्यापीठाभोंवतीं एक तट बांधला व या विहाराला एका किल्ल्याचें स्वरूप आणलें. हें इतकें होईपर्यंत नालंदाची कीर्ति दिगंतीं पसरली. लोकांना हें एक यात्रेचें ठिकाणच वाटूं लागलें. विद्यार्थी तर उत्तम प्रकारचें शिक्षण, श्रेष्ठ गुरूंची संगत, विविध शिष्यवृंदांत मिसळण्याची संधि यामुळें आकर्षिले तर आश्चर्य नाहीं; पण दूरदूरच्या विद्वान् पंडितांनासुद्धां दिगंतीं कीर्ति पसरलेली ही नालंदा आहे तरी कशी हें पाहण्याची इच्छा होई. चिनी प्रवासी पंडित हुएनत्संग, इत्सिंग वगैरे याच गोष्टीमुळें आकर्षिले गेले. विद्वान् पंडितसुद्धां एक वेळ आकर्षिले गेल्यास नवल नाहीं; पण जावा-सुमात्रासारख्या भारताबाहेरील द्विपांतील राजे लोकसुद्धां नालंदाकडे ओढले गेले. कारण या बेटांचा राजा बालपुत्रदेव यानेंसुद्धां येथें एक विहार बांधून दिला; विहाराबरोबर इमारतीहि बांधून दिल्यास आश्चर्य नाहीं.[४०]

बरें, गुप्त राजांनीं नुसत्या इमारतीच कांहीं बांधून दिल्या नाहींत; तर ही संस्था आपलीच आहे असें समजून त्यांनीं विहारांतील शिक्षण विनामूल्य देतां यावें, विद्यार्थ्यांची रहाण्या–खाण्याची चांगल्या प्रकारें सोय व्हावी, त्यांना येथें असेपर्यंत जरूरीपुरतें कपडेलत्ते मिळावे, शिक्षकांना कसलीहि ददात पडूं नये व त्यांना

---

३८. F. E. Keay, "Indian Education in Ancient and Later Times, p. 148.
S. C. Das : History of The Mediaeval School of Indian Logic. App. A.

३९. Dr. Sankalia H. D. : University of Nalanda, p. 120.

४०. E. I. XVII. p. 310.
cf नालंदा गुणवृन्दलुब्धमनसा भक्त्या च शौद्धोदनेः।
नानासद्गुणभिक्षुसंघवसतिस्तस्यां विहारः कृतः॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मानानें राहतां यावें या गोष्टींचा विचार करून नेहमींच्या खर्चाला म्हणून य नालंदा विहाराला १०० खेडीं इनाम दिलीं; आणि या विहाराची कीर्ति वाढल्या-वर या गुप्त राजघराण्याकडून आणखीं १०० गावें म्हणजे एकूण २०० गावें या विहाराच्या तैनातीला देण्यांत आलीं. याशिवाय जावा—सुमात्राचा बालपुत्रदेव यानें बंगाल्यांतील देवपालराज यास पांच खेडीं या विहारास देण्यास विनंति केली; कारण बालपुत्रदेव व देवपाल हे दोघे मित्र होते.

इतर लोकांकडूनहि आर्थिक मदत होत असलीच पाहिजे; कारण शिक्षणकार्याला मदत करणें हें भारताच्या परंपरेला साजेसेंच आहे. ज्ञानाइतकें पवित्र असें दुसरें कांहीं भारतांत मानण्यांत आलेंच नाहीं. मग नालंदासारख्या शिक्षणसंस्थेला लोकांनीं मदत करावयाची नाहीं तर दुसऱ्या कशाला? अशाप्रकारें विद्वान् पंडितांचा वृंद, थोर थोर राजे लोकांची सर्वतोपरि आर्थिक मदत, उंच उंच इमारती व त्यावरील प्रेक्षणीय मनोरे, उच्च प्रकारचें शिक्षण, आचार्यांच्या विद्वत्तेची व चारित्र्याची ख्याति, व कोणत्याहि बाबतींत उणेपणा पडूं न देण्याची दक्षता यामुळें नालंदा विहाराची कीर्ति भारताबाहेर जाऊं लागली व हजारों मैलांवरून विद्यार्थी व पंडित नालंदाकडे आकर्षिले गेले.

हुएनत्संग याच्या प्रवासाचें वर्णन व त्याचें नालंदांत स्वागत

ज्या विद्यापीठानें आपली कीर्ति भारतांत व भारताबाहेर ८०० वर्षांवर टिक-वली व ज्या विद्यापीठांत कोणत्याहि कालाला भूषणभूत होणारे आचार्य व ग्रंथलेखक होऊन गेले तेथें जर त्या कालांत विद्वत्तेकरितां प्रसिद्ध असणाऱ्या चीन देशाहून थोर चिनी पंडित आले नसते तर नालंदाचा इतिहास आपणांला कदाचित् कळ-लाहि नसता. पण भारताचें भाग्य थोर म्हणूनच या थोर चिनी पंडितांचे मुगुटमणि हुएनत्संग व इत्सिंग यांच्या कानीं नालंदाची कीर्ति एकसारखी जाऊन, भृंग ज्या-प्रमाणें सुगंधी फुलांकडे आकर्षिले जातात त्याप्रमाणें हे पंडितहि नालंदाकडे आकर्षिले गेले. वास्तविक त्या काळीं मोंगोलिया, तिबेट, कोरिया, तोखारा वगैरे भारताबाहेरील प्रदेशांतून विद्यार्थ्यांची रीघ नालंदाकडे लागलेली असे. त्यांपैकीं पुष्कळ विद्यार्थ्यांना नालंदा विहारांत प्रवेशहि मिळे; पण हुएनत्संग व इत्सिंग यांनीं नालंदाच्या कीर्तींत भर घातली. या दोघांहि पंडितांनीं आपला वृत्तांत लिहून ठेविल्या-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुळें भारतावर त्यांचे अनंत उपकार झाले आहेत. या पंडितद्वयांचा वृत्तांत इंग्रजींत भाषांतरित झाला; त्यावेळीं तो वृत्तांत वाचून तो केवळ चुकीचा, पाल्हाळवजा व उगाच फुगवलेला आहे असा पाश्चात्य पंडितांचा समज झाला.[४१] भारतवासी-यांनाहि इंग्रजीद्वारें नालंदा–तक्षशिला वगैरे प्राचीन विद्यापीठांची माहिती मिळाली व त्यांना कळून आलें कीं ७०० वर्षांपूर्वीं हिंदुस्थानांत जगप्रसिद्ध असें एक विद्यापीठ होऊन गेलें. तत्पूर्वीं इंग्रज ग्रंथकारांच्या व विचारप्रवर्तकांच्या ओंजळीनें पाणी पिण्याची चटक व संवय लागल्यानें हिंदुस्थान देश हा एक नादान रानटी वृत्तीचा व गुलामगिरीला लायक असा देश आहे अशी समजूत नवशिक्षण घेणाऱ्या हिंदवासीयांची झाली होती. पण संशोधनकार्य सुरू झालें व 'नालंदा'च्या उत्खननाला सुरवात झाली. या उत्खनना नंतर चिनी पंडितांनीं लिहिलेली हकीकत खरी आहे हें सर्वांना कळून चुकलें. झालें; यानंतर निरनिराळ्या नियतकालिकांतून यासंबंधानें माहिती चमकायला लागली. यापुढें तक्षशिला-नालंदाची माहिती पाश्चात्यांच्या इतिहासग्रंथांतून येऊं लागली; व त्यावर स्वतंत्र ग्रंथ लिहिले जाऊं लागले. आतां कोठें प्राचीन विद्यापीठांबद्दल लोकांच्या मनांत कुतूहल उत्पन्न झालें; व निरनिराळ्या प्राचीन विद्यापीठांबद्दल संशोधनकार्य सुरू झालें. पण या विद्यापीठांचा इतिहास देणारें स्वतंत्र असें पुस्तक अद्याप इंग्रजींत सुद्धां लिहिलें गेलें नाहीं. जी माहिती संकलित केलेली आज आपणांस पहावयास मिळते ती प्राचीन शिक्षणपद्धतींचा विचार करतांना गौणत्वानें देण्यांत आली आहे.

वर उल्लेखिलेल्या चिनी पंडितांपैकीं हुएनत्संग हा १२०० वर्षांपूर्वीं, म्हणजे इ. स. च्या ७ व्या शतकांत, हिंदुस्थानांत आला. सर्व हिंदुस्थानभर हा भटकला व त्यानें निरनिराळ्या विद्यापीठांना भेट दिली. या निरनिराळ्या विद्यापीठांतून आपणाला कांहींतरी शिकायला मिळावें ही त्याची इच्छा होती. त्यानें भेट दिलेल्या विद्यापीठांत खालील मुख्य होत : जालंधर येथील 'नगरधन विहार', 'श्रुघ्न विहार', 'मतिपुर विहार', 'कान्यकुब्ज विहार', 'तिलोशिक विहार', गया येथील 'महाबोधि विहार, 'मोंघीर विहार', 'पुण्यवर्धन विहार' व 'रक्तमृत्तिका विहार'.[४२] हे सर्व

४१. H. G. Wells : p. 591

४२. Radha Kumud Mookerji : Men and Thought in Ancient India, p. 180.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विहार हर्षवर्धनाच्या साम्राज्यांत होते. सर्वच विहार विद्वान् लोकांकरितां प्रसिद्ध होते; व तेथील चंद्रवर्मा, जयगुप्त, मित्रसेन, वीर्यसेन, क्षान्तिसिंह या पंडितांजवळून हुएनत्संग एक ना दोन किती तरी विद्या शिकला. या सर्व विहारांत नालंदा-इतका प्रभावी विहार त्याला दिसला नाहीं व म्हणूनच तो येथें रमला. हुएनत्संग आला तो केवळ कुतूहलबुद्धीनें, नालंदा विहार पाहण्याच्या हेतूनें! हिंदुस्थानांत येण्यास तो निघाला तेव्हां आजच्यासारखीं मोटार, आगगाड्या किंवा विमानें यांसारखीं प्रवास सुखकर करणारीं साधनें नव्हतीं. तो चीनहून पायींच निघाला व वाळवंटामधून, डोंगरकपारींतून, हिमालयाच्या बर्फमय प्रदेशांतून कसा तरी मार्ग काढीत, हिंस्र श्वापदांना तोंड देत गोबीसारख्या रणांत वाट चुकत चुकत व चारपांच दिवस पाण्यावाचून काढीत तो गांधार देशाकडून म्हणजे अफगाणिस्तानच्या बाजूनें हिंदुस्तानांत आला. अगोदरच विद्वान्; त्यांतून जास्त ज्ञान मिळावें म्हणून बुद्धदेवाच्या भूमीला यायला निघालेला; तेव्हां त्याला पहावयाला लोकांच्या झुंडीच्या झुंडी येत. जे भिक्षु एकसारखे एका विहारांतून दुसऱ्या विहारांत जात ते हुएनत्संगाच्या आगमनाची वार्ता, त्याच्या विद्वत्तेच्या कथा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं नेत. त्यामुळें पुढच्या विहारांत हुएनत्संग जाण्याअगोदर त्याची कीर्ति तेथें जाई व मागाहून हुएनत्संगाचें आगमन होई. अर्थात् अशा पुरुषाला पाहायला लोक जमल्यास व त्याचें दर्शन घेण्यास उत्सुक झाल्यास आश्चर्य नाहीं. अशा प्रकारें एका विहारांतून दुसऱ्या विहारांत जात जात ही स्वारी नालंदापर्यंत येऊन ठेपली. नालंदाला येत असतांना त्यांचें स्वागत करण्याकरितां नालंदा विहारांतून विद्वानांचें एक शिष्टमंडळ सामोरें आलें. नालंदाच्या द्वारापर्यंत या विद्वान् चिनी पंडिताची मिरवणूक निघाली. ही मिरवणूक झेंड्यापताकांनीं सुशोभित झाली होती. पूर्वी शंकराचार्य आले असतांना जसें त्यांचें स्वागत होई त्याप्रमाणें हुएनत्संगाचेंहि स्वागत झालें. या पंडिताला छत्रचामराचा मान देण्यांत आला होता. मिरवणुकींत जिकडे तिकडे ऊद व इतर सुगंधी द्रव्यें यांचा सुवास दरवळून राहिला होता. हुएनत्संग येतांच त्याला मोठा पुष्पहार घालण्यांत आला, व "आमच्या विहारांतील एक सन्मान्य पाहुणे म्हणून आपलें आम्ही मनःपूर्वक स्वागत करतों" असें त्यास सांगण्यांत आलें. यानंतर हुएनत्संग याला विहाराधिपति शांतचित्त असे जे शीलभद्र त्यांच्याकडे नेण्यांत आलें. त्यांनींहि या चिनी पंडिताचें मोठ्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रेमानें स्वागत केलें. शीलभद्रांच्या आज्ञेवरून हुएनत्संग याला एक खास जागा देण्यांत आली; त्याचें कोणत्याहि प्रकारें उणें पडूं नये म्हणून सर्वांना हुकूम सोडण्यांत आले होते. त्याच्या तैनातीला भरपूर लोक देण्यांत आले व कोणत्याहि प्रकारें त्याला त्रास होणार नाहीं अशी खबरदारी घेण्यांत आली. त्याला भोजनप्रसंगींसुद्धां भरपूर फळें व मगध देशांत फक्त राजघराण्याकरितां पिकविण्यांत येणारे विशिष्ट प्रकारचे सुवासिक तांदूळ देण्यांत आले. अशा प्रकारें एकाद्या राजाप्रमाणें किंवा शंकराचार्यप्रमाणें त्याची व्यवस्था ठेवण्यांत आली.[४३]

नाल्दाची कीर्ति ऐकल्यामुळें अत्यंत हालअपेष्टा सोसून हुएनत्संग हें विद्यापीठ केवळ पाहण्याच्या उद्देशानें आला, परंतु तेथून परत चीनमध्यें जाण्याची त्याला इच्छाच होईना. एकाद्या शंकराचार्यप्रमाणें तो आला व त्याचें स्वागत झालें, पण येथें येऊन तो एक सामान्य विद्यार्थी म्हणून राहिला व त्यानें शीलभद्राचें शिष्यत्व पत्करिलें; व तेंहि पांच सात वर्षें! कामरूपच्या (आसामच्या) कुमार राजानें हुएनत्संगाला तिकडे पाठवून देण्याबद्दल शीलभद्राकडे निकड लावली नसती, एकसारखे निरोप पाठविले नसते व फारच आग्रह धरला नसता, तर तो नालंदा विहारांत आणखी किती तरी वर्षें राहिला असता. कारण आपण येथें रहावें अशी त्याची व त्यानें तेथें रहावें अशी इतर सर्व भिक्षूंची इच्छा होती. शीलभद्रानेंहि मोठ्या दुःखानें त्यास जाण्याची परवानगी दिली. नालंदा सोडून जाण्याचें हुएनत्संगाच्याहि जीवावर आलें होतें.

नालंदा विहारांतील प्रसिद्ध आचार्य

कोणतीहि संस्था मोठी व्हावयास तेथील कार्यकर्तेंहि मोठे असावे लागतात; आणि कर्तृत्वशाली कार्यकर्त्यांची परंपरा लागली तरच ती संस्था टिकते; नाहीं तर मुख्य संस्थापक कार्यकर्त्यांच्या मागें ती संस्थासुद्धां नामशेष होते. अशीं पुष्कळच उदाहरणें आपणांस पहावयास मिळतात. नालंदा अत्यंत भाग्यवान्, म्हणूनच तिला एकाहून एक सरस कार्यकर्ते लाभले. हुएनत्संगनें या विद्यापीठाच्या भाग्यनिर्मात्या पंडितांची यादी दिली आहे. तो म्हणतो, "धर्मपाल, चंद्रपाल, गुणमति, स्थिरमति, प्रभामित्र, ज्ञानचंद्र, शीलभद्र, हे सर्व श्रेष्ठ कुलपति होऊन गेले. यांचे श्रम म्हणजेच

४३. E. B. Havell : The History of Aryan Rule in India, p. 198.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नालंदा." [४४] याशिवाय नागार्जुन, आर्यदेव, वसुबंधु, व दिङ्नाग या प्रसिद्ध पंडितांचा संबंधहि नालंदाशीं जोडण्यांत येतो. यापैकीं कित्येक आचार्यांनीं जे ग्रंथ लिहून ठेविले आहेत त्यांना विश्वकोषांचीच उपमा देतां येईल. कित्येकांनीं बौद्ध धर्मावर, कांहींनीं तत्त्वज्ञानावर, दुसऱ्यांनीं न्यायशास्त्रावर, इतरांनीं तांत्रिकपंथावर, अशा प्रकारें निरनिराळ्या पंडितांनीं निरनिराळ्या विषयांवर ग्रंथ लिहिले आहेत. दिङ्नागानें न्यायशास्त्रावर प्रचंड ग्रंथ लिहिला. स्थिरमतीनें पुष्कळ संस्कृत ग्रंथांचें तिबेटी भाषेंत भाषांतर केलें. धर्मपालनें शब्दशास्त्र, न्यायशास्त्र व अध्यात्मविद्या यांवर ग्रंथ लिहिले.

नालंदा विहारांत बाहेरील देशांतूनहि प्रसिद्ध आचार्य येत व नालंदाच्या चारित्र्यवान् आचार्यांना बाहेरून एकसारखीं आमंत्रणें येत. शांतरक्षित व कमलशील यांस तिबेटांतून खास आमंत्रण आल्यावरून ते तिकडील बौद्ध धर्माची विस्कटलेली घडी पुनः बसविण्याकरितां गेले. [४५] शान्तरक्षित तेथें १२ वर्षें राहिले. नालंदाच्या कुलपतींची चारित्र्य व विद्वत्ता याबद्दल सर्वत्र ख्याति असे. अशा प्रकारें शीलवान् आचार्यांची मालिका लागल्यानें नालंदाला आपली कीर्ति ८०० वर्षें टिकवितां आली.

नालंदाचा अभ्यासक्रम

नालंदा विहार हा कांहीं लहान मुलांकरितां नव्हता. या विहारांत प्रवेश मिळण्याकरितां परीक्षा द्याव्या लागत. या परीक्षा उत्तीर्ण केल्यास वरील श्रेणींतील अभ्यासक्रम समजण्यास विद्यार्थी पात्र आहे हें सिद्ध होई. या परीक्षेकरितां लागणारें ज्ञान आजच्या मॅट्रिक परीक्षेस लागणाऱ्या ज्ञानापेक्षां किती तरी पटीनें जास्त असे. परीक्षा घेणारे आचार्य फारच हुशार व कार्यक्षम पंडित असत; त्यांना 'द्वार-पंडित' म्हणत. विहारांत प्रवेश मिळण्याकरितां ही परीक्षा म्हणजे पहिलें 'द्वार'च होय. कांहीं विहारांत निरनिराळे विषय शिकविण्याकरितां निरनिराळी व्यवस्था असे; व प्रत्येक विषयाकरितां स्वतंत्र द्वार-पंडित असत. विक्रमशिला विहारांत सहा द्वारपंडित होते. द्वारपंडितांनीं घ्यावयाची परीक्षा फार कठीण असल्यानें फारच

४४. S. Beal : Buddhist Records of the Western World, Vol II, p. 171.

४५. H. D. Sankalia : University of Nalanda,(1934), pp. 130–134.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

थोड्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळे; यामुळें बऱ्याच विद्यार्थ्यांना हिरमुसलें होऊन परत जावें लागे. या विद्यार्थ्यांत आशिया खंडाच्या निरनिराळ्या भागांतून मुद्दाम नालंदांत प्रवेश मिळावा म्हणून आलेले विद्यार्थी असत. मोठ्या आशेनें आलेल्या विद्यार्थ्यांस परत जाण्याची पाळी आल्यानंतर त्यांच्या मनाची काय स्थिति होत असेल त्याचा विचार करणें कठीण आहे !

अर्थात् नालंदास येण्यापूर्वी ज्याला आपण प्राथमिक व दुय्यम शिक्षण म्हणतों त्याला आवश्यक लागणाऱ्या विषयांचा अभ्यास पूर्ण कसोशीनें ज्याचा झाला असेल व ज्याचें बाहेरचें वाचन भरपूर असून सामान्य ज्ञानहि ज्याचें भरपूर आहे अशा विद्यार्थ्यालाच प्रवेश मिळण्याची आशा ! कारण येथें मिळणारें शिक्षण म्हणजे प्रत्येक विषयाच्या शास्त्राचा खोल अभ्यास. तो समजण्याला बुद्धि तैल पाहिजे; विद्यार्थ्याची ग्रहणशक्तिहि वाढलेली असली पाहिजे.

व्याकरण, गद्यपद्य, साहित्य, तर्कशास्त्र, जातकग्रंथ, ब्राह्मणधर्म, महायानशाखा, १८ संप्रदाय व योगविद्या यांचा येथील अभ्यासक्रमांत प्रामुख्यानें निर्देश करावयास पाहिजे. एका ठराविक पंथाचाच केवळ अभ्यास येथें शिकविला जात नव्हता; म्हणून बौद्ध धर्माशिवाय जैन धर्म व हिंदु धर्माचेंहि येथें भरपूर अध्ययन होई व त्याकरितां विद्यार्थी येत व नालंदांत शिक्षण संपादन केल्याचा मान मिळवीत. बौद्ध धर्माच्या ' महायाना ' शिवाय ' हीनयाना ' चाहि येथें अभ्यास होई. योग-विद्येप्रमाणें तंत्र-विद्याहि येथें शिकविली जाई. धर्मग्रंथांशिवाय व्यावहारिक विषयहि येथें चांगले अभ्यासिले जात. चित्रकला, शिल्पशास्त्र, मंत्रविद्या वगैरेंचा प्रामुख्यानें उल्लेख करावयास पाहिजे. नालंदा येथें वेदविद्या, गणित-शास्त्र व वैद्यकविषय यांचाहि अभ्यास होई. न्यायशास्त्राकडे विशेष लक्ष दिल्यामुळें विद्यार्थी वादविवाद करण्यांत पारंगत होत. मोठमोठ्या पंडितांना वादविवादांत जिंकणें मोठ्या मानाचें व विद्वत्तेचें लक्षण समजण्यांत येत असे. नालंदा-उत्खननांत मूर्ति व इमारतीचे अवशेष सांपडले आहेत त्यावरून येथें शिल्प-कलेचा, विशेषतः बांधकाम, कोरीव काम वगैरेचा, फारच कसोशीनें अभ्यास होत असला पाहिजे असें दिसतें. अगोदर मगध देश शिल्पशास्त्रज्ञानाकरितां फार प्राचीन कालापासून प्रसिद्ध. नालंदा तर मगध देशाचा सोनेरी कळस. तेथें अर्थात् शिल्पकलेचें साकल्यानें शिक्षण दिलें जात असल्यास आश्चर्य नाहीं. येथें देण्यांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

येणाऱ्या शिक्षणांत सर्वारंभीं व्याकरणावर विशेष जोर दिला जाई; कारण व्याकरण म्हणजे भाषेला सांधणारें द्रव्य. येथें कलेकडेहि विशेष लक्ष देण्यांत येई. निरनिराळे ग्रंथ लिहून काढून त्यांच्या प्रति ग्रंथालयांत जपून ठेवीत; त्यामुळें 'हस्तलिखितें' करण्यांत विद्यार्थ्यांचा पुष्कळ वेळ जाई. पण त्यामुळें त्यांना त्या त्या विषयाची माहिती चांगली होत असे व त्यांचें हस्ताक्षरहि मोत्याच्या दाण्यासारखे बने. नालंदा येथें १०, ११ व १२ व्या शतकांत लिहिलेले लेख आजहि पहावयास मिळतात.[४६] येथें निरनिराळ्या भाषाहि शिकविल्या जात असाव्या, व निरनिराळे भाषाकोविद येथें असावेत; नाहीं तर चीन, तिबेट व हिंदुस्थानांतील निरनिराळ्या भागांतून येणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षण देतांच आलें नसतें. शिवाय येथील पंडित तिबेटला वारंवार जात, त्याअर्थी तिबेटी भाषा तर येथें सर्रास सर्वांनाच येत असावी.

नालंदा ग्रंथभांडार : धर्मगंज

एक हजार वर्षांपूर्वी मगध देशांत, म्हणजे हल्लींच्या बिहार प्रांतांत, आज मुंबई-कलकत्ता येथें विसाव्या शतकांतसुद्धां जो ग्रंथसंग्रह नाहीं तो होता असें म्हटलें तर कोणास खरेंसुद्धां वाटणार नाहीं. पण अशा प्रकारचा ग्रंथसंग्रह एकाच ठिकाणीं नसून दोन तीन प्रसिद्ध विद्यापीठांतून होता हें आतां सिद्ध झालें आहे. नालंदा विहारांतील ग्रंथसंग्रहालयाला 'धर्मगंज' असें नांव होतें. या धर्मगंजाकरितां तीन प्रशस्त व उंच इमारती असून त्यापैकीं एक इमारत तर नऊ मजली होती. आजसुद्धां मुंबईत नऊ मजली इमारत कोणास पहावयास मिळणार नाहीं. आणि निदान तीन मजली इमारती व्यापणारें ग्रंथसंग्रहालयहि आपल्या दृष्टीस पडणार नाहीं. पण नालंदा विहारांतील ग्रंथसंग्रहालय मात्र या नऊ मजली इमारतींत राहूं शकत नव्हतें म्हणून दुसऱ्या दोन सहा सहा मजली इमारती तेथें ग्रंथसंग्रहालयाला देण्यांत आल्या होत्या.[४७] यापैकीं प्रत्येक इमारतीला स्वतंत्र नांव देण्यांत आलें

४६. Dr. A. S. Alteker : Education in Ancient India, (1944), p. 123.

४७. Medieval School of Indian Logic, App. A.
F. E. Keay : Indian Education in Ancient and Later Times (1938), pp. 148–150. Watters II, 171.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होतें. एका इमारतींतील ग्रंथसंग्रहाल्याचें नांव 'रत्नसागर,' दुसऱ्याचें नांव 'रत्नोदधि' व तिसऱ्याचें नांव 'रत्नरंजक' असें होतें.[४८] दहा हजार विद्वान् भिक्षु ज्या ठिकाणीं रहात व जेथें निरनिराळ्या विषयांचा खोल अभ्यास चाले अशा ठिकाणीं मोठ्या ग्रंथभांडाराची आवश्यकता असणार हें सांगावयासच नको. उलटपक्षीं येवढ्या मोठ्या विद्यापीठांत जर ग्रंथसंग्रह नसता तर त्या विद्यापीठाला फारच कमीपणा आला असता. कित्येक विचारी पुरुषांच्या मतें तर ग्रंथसंग्रह म्हणजेच विद्यापीठ. अभ्यासु माणसाला बाष्कळ व्याख्यानांची आवश्यकताच नसते. ग्रंथ हेच गुरु व ग्रंथालय म्हणजेच विद्यापीठ. नालंदा विहारांतील ग्रंथसंग्रहालयाची नुसती कल्पना केली तर आपल्या इकडील आजच्या विद्यापीठांना नालंदाची बरोबरी करावयाला किती काळ लागेल सांगतां येत नाहीं. या ग्रंथालयाचा इत्सिंग यानें जितका फायदा करून घेतला तितका फायदा फारच थोड्या लोकांनीं करून घेतला असेल. कारण इत्सिंगनें येथील १० वर्षांच्या आपल्या वास्तव्यांत ४०० संस्कृत ग्रंथांचें चिनी भाषेंत भाषांतर करून नेलें असें त्यानें स्वतः लिहून ठेविलें आहे. विक्रमशिला व उदन्तपुरी येथील महाविहारांतसुद्धां मोठमोठाले ग्रंथसंग्रहालय होते.

तक्षशिला येथेंहि मोठें ग्रंथसंग्रहालय असावें; पण त्याबद्दल आपणांस कांहीं माहिती मिळूं शकत नाहीं. एक गोष्ट मात्र लक्षांत ठेवावयास पाहिजे; ती ही कीं प्राचीन काळीं छापण्याची कला नव्हती. सर्व ग्रंथ हातांनीं लिहीत. तेव्हां असे ग्रंथ जपून ठेवण्याकडे जास्त प्रवृत्ति असणें साहजिक आहे. त्या त्या पुस्तकांच्या कांहीं कांहीं प्रती करवून त्यांचा संग्रह करण्यांत येई; व अशा रीतीनें ग्रंथसंग्रह वाढत असे. असा विचार केला तर नालंदा विहाराच्या धर्मगंज ग्रंथसंग्रहाल्यांत लाखों ग्रंथ असणार यांत शंका नाहीं. जगांत इतका मोठा ग्रंथसंग्रह कोठेंहि इतरत्र असल्याचा उल्लेख नाहीं.

पाश्चात्य देशांत म्हणजे आशियाच्या पश्चिम भागांत बॅबिलोन येथें इ. स. पूर्व ७ व्या शतकांत असुर(अ) वनीपाल (Assurbanipal, Gk. Sardanapalus) यानें एक मोठा ग्रंथसंग्रह केला होता. ग्रंथ विटांवर लिहिले होते. हा ग्रंथसंग्रह हल्लीं उत्खननांत सांपडल्यामुळें पूर्वीच्या इतिहासाचे धागेदोरे पाहून

४८. Vidyabhushan : History of Indian Logic, p. 516.
A. K. Mazumder : The Hindu History (B. C. 3000 to 1200 A. D.) (1920), p. 830-831.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काढण्यांत त्याची फारच मदत होते. पण ज्या कालांतील हा ग्रंथसंग्रह आहे असें म्हणतात त्याच्या अगोदर निदान एक दोन शतकें तरी तक्षशिला विद्यापीठ जगांत सर्वप्रभावी असें होतें. तेव्हां या विद्यापीटाचा असुर(अ)वनीपालावर परिणाम होणें असंभवनीय नाहीं.

पाश्चात्य देशांत दुसरें गाजलेलें विद्यापीठ म्हणजे इ. स. पूर्व दुसऱ्या शतका-नंतरचें 'अलेक्झँड्रिया म्युझियम्'. येथील ग्रंथसंग्रहाबद्दल फारच बोलबाला झालेला आहे. पण वेल्सच्याच शब्दांत सांगावयाचें तर हें ग्रंथसंग्रहालय म्हणजे काळ्या कंदिलांतील दिवा होय.[४९] या कंदिलांतील दिव्याचा उजेड किती पडणार? प्रकाशनकला नसल्यानें ग्रंथप्रकाशन होत नसे. नुसत्या हाती लिहिलेल्या पत्रांमुळें किंवा हस्तलिखित ग्रंथांमुळें ज्ञानाचा प्रसार कितीसा होणार? असें वेल्ससाहेब प्रतिपादितात. पण मग नालंदांत कोठें छापील ग्रंथ होते? असें असतांनासुद्धां अलेक्झँड्रियाच्या अगदीं उलट परिणाम नालंदा विहारांतील धर्मगंजानें केला. एकट्या इत्सिंगनेंच येथून ४०० ग्रंथांचें भाषांतर आपल्या मातृभूमींत नेलें. अलेक्झँड्रियासंबंधानें वेल्ससाहेबांनीं दिलेलीं कारणें पटणारीं नाहींत.

नालंदा विहाराची अंतर्गत व्यवस्था

नालंदा विद्यापीट आन्तरराष्ट्रीय कीर्ति मिळविण्याइतक्या योग्यतेस कसें चढलें? नालंदाची अन्तर्गत व्यवस्था कशी होती हें आपणांस कळलें तर वरील प्रश्न आपोआप सुटेल. कोणतीहि संस्था मोठी होण्याला कांहीं ठराविक कारणें आवश्यक असावीं लागतात; तीं जेथें जेथें असतात, तेथें तेथें संस्था नांवारूपास आलेली दिसते. तक्षशिला विद्यापीठ एक हजार वर्षांवर सतत परकी हल्ले येऊनसुद्धां टिकलें; नालंदा ८०० वर्षांवर कीर्तिपथावर होती; पण तेंच अलेक्झँड्रिया म्यूझियम १०० वर्षांवर टिकूं शकलें नाहीं. माणसांत किंवा संस्थेंत जितकें सत्त्व जास्त तितकी त्यांच्यांत टिकाव धरण्याची पात्रता अधिक. परंतु एकदां कोणत्याहि प्रकारची विकृति शिरली कीं नाशास सुरवात झालीच म्हणून समजावें. बलाढ्य रोमन साम्राज्य व आजकालचीं साम्राज्यें वैभवसंपन्नतेचें शिखर गांठून नंतर धुळीस मिळालीं त्याचें कारण हेंच.

---

४९. H. G. Wells : The Outline of History, pp. 379, 380.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नालंदासारखी संस्था नितराम् कार्यक्षम व्हावयास कारण तेथील ध्येयवादी कार्यकर्ते होत. परंतु एकटा ध्येयवादी कार्यकर्ता तितका प्रभावी बनूं शकत नाहीं. त्याच ध्येयाप्रत जाणारा त्याचा अनुयायी वर्ग पाहिजे. हा अनुयायी वर्ग धीरगंभीर वृत्तीचा असेल तरच त्याचा संस्थेला उपयोग; नाहीं तर अधीर वृत्तीनें संस्थेचा मुळांतच नाश व्हावयाचा! कोणत्याहि सत्कार्याच्या सुरवातीस संस्थेस काय किंवा व्यक्तीस काय असंख्य आघात सहन करावे लागतात. मनुष्याची अशा प्रकारची स्थिति होते कीं कार्य सोडून द्यावें व स्वस्थ बसावें. म्हणून हे आघात सहन करण्याची शक्ति व उत्साह, वाटेल त्या संकटाला तोंड देण्याचें धैर्य कार्यकर्त्यांत व अनुयायी वर्गांत असावयास पाहिजे. कार्य सुरू केलें व द्रव्यबल नसलें तर पदोपदीं प्रगतीची चाल खुंटते. बरें, वरील सर्व गोष्टी जुळून आल्या व संस्थेची एकसारखी प्रगति होऊं लागली पण त्यांत स्वार्थ शिरला व कार्यांत गैरसमज पसरूं लागले तर ज्या संस्थेला कार्यक्षम करण्यास १०० वर्षें लागतात तिला मोडावयाला १०० दिवसहि लागत नाहींत! बांधणें कठीण, मोडणें सोपें; याकरितां कार्यकर्त्यांत समज व तडजोडीची वृत्ति आवश्यक असावयास पाहिजे. तडजोडीनें कठीण कठीण कार्यें साधलीं जातात; फुटीर वृत्ति नाहींशी होते; मोठमोठ्या संकटांना तोंड देतां येतें; विचार करण्याला अवधि सांपडतो. परंतु कोणतीहि संस्था तक्षशिला-नालंदाच्या तोडीची करण्याला आणखी एका विशिष्ट गोष्टीची आवश्यकता असते. ती म्हणजे मुख्य माणसाचें, संस्था चालविणाऱ्या प्रमुख व्यक्तीचें चारित्र्य. तें जर नसलें तर सर्व श्रम फुकट, निरर्थक! चारित्र्य ही सर्वांना वश करणारी गुरुकिल्ली आहे. कट्टर शत्रूलाहि आपल्या चारित्र्यांत दोष दाखवितां आला न पाहिजे. केवळ चारित्र्यवान् माणसेंच आपल्या हयातींत उत्तम प्रकारें संस्था चालवूं शकतात. या चारित्र्याला ज्ञानाची जर जोड मिळाली तर दुधांत साखर! पण संस्था आपल्या हयातीपर्यंतच न टिकतां ती चिरस्थायी व्हावी अशी चारित्र्यवान् पुढाऱ्याची इच्छा असेल तर त्यानें आपलें कार्य सुव्यवस्थातंत्रांत (Organisation) बसविलें पाहिजे; संस्था कार्यक्षम करण्याला सुव्यवस्थातंत्र हें एक अत्यंत प्रभावी शस्त्र आहे. चारित्र्यविहीन माणसांनींसुद्धां या तंत्राच्या सहाय्यानें संस्था कार्यक्षम बनविल्याचीं उदाहरणें आहेत. पण अशा संस्था चिरकाल टिकत नाहींत; कीर्तीपेक्षां त्यांची अपकीर्तीच पसरते; सुखदायी होण्यापेक्षां त्या तापदायीच ठरतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नालंदाचें किंवा तक्षशिलेचें भाग्य फारच थोड्या संस्थांच्या वाट्यास येतें. या दोनहि संस्थांत वरील सर्व गोष्टी होत्या व त्यामुळेंच त्या दीर्घकाल टिकल्या; नुसत्या टिकल्या नाहींत, त्यांची कीर्ति चोहों बाजूंना हजारों मैलांवर पसरली. नालंदा विहारांत चारित्र्यवान् आचार्यांबरोबर सुव्यवस्थातंत्रहि होतें. हें जर नसतें तर जिकडेतिकडे गोंधळ माजून राहिला असता. जेथें दररोज दहा हजारांवर भिक्षू रहावयास असत तेथें त्यांच्याबरोबर इतरहि व्यवस्था पाहण्यास शेंकडों नोकरचाकर असणारच! कारण अशींहि कामें असणार कीं या भिक्षूंना तीं करण्याजोगीं नसतील. या सर्वांची व्यवस्था लावणें किती कठीण काम असलें पाहिजे? येथें किती तांतडीचे प्रश्न दररोज उत्पन्न होत असतील! नुसत्या जेवण्याखाण्याचा प्रश्न घेतला तरी इतक्या लोकांना दोनहि वेळ पोटभर अन्नाची सोय निदान एक वर्षापुरती आगाऊ करून ठेवणें प्राप्त आहे. त्याकरितां चांगलें धान्य मिळविणें, त्याची निगा राखणें, त्याच्याकरितां योग्य कोठारें बांधणें वगैरेकरितांच एक स्वतंत्र खातें पाहिजे; व त्यावर सतत देखरेख पाहिजे. नंतर इतक्या भिक्षूंच्या वस्त्रप्रावरणाचा प्रश्न! अंथरायला, पांघरायला, अंगांत घालण्याला निरनिराळीं वस्त्रें पैदा करणें किंवा तयार करणें ही कांहीं लहान सहान गोष्ट नाहीं! यानंतर इतक्या लोकांचा स्वयंपाक! नालंदाला सर्वांचा स्वयंपाक एकत्र होत होता याबद्दल आतां प्राच्य-संशोधनखात्याला नालंदा–उत्खननांत पुरावा मिळाला आहे. इतक्या लोकांचें अन्न शिजवण्याकरितां आचारी, वाढप्ये, नियमित धान्य काढून देणारे, भाज्या वगैरेंची सोय लावणारे, त्या चिरून देणारे, निरनिराळ्या प्रकारची व्यवस्था ठेवणारे लोक मिळविणें व वेळेवर दोनहि वेळेला पुरेसें जेवावयास देणें हें किती कठीण काम! सर्वांत जास्त म्हणजे या सर्वाला लागणारी स्वच्छता संभाळणें. एकंदर विहाराचीच स्वच्छता राखण्याचें काम एखाद्या विशिष्ट खात्याकडे सोंपविलेलें असणार! नाहीं तर थोडेंसें दुर्लक्ष झाल्यामुळें खाण्याच्या पदार्थांत कांहीं विषारी पदार्थ गेला तर! सर्वांचेंच मरण! पण नालंदाच्या ८०० वर्षांच्या इतिहासांत एकहि विपरीत गोष्ट घडली नाहीं. हा तेथील अत्युत्तम सुव्यवस्थातंत्राचाच परिणाम आहे. शिवाय इतक्या लोकांत कोणी ना कोणी आजारी पडल्यास आश्चर्य नाहीं. त्यांच्याकरितां दवाखाने व शुश्रूषागृहें (Hospitals) असलींच पाहिजेत. त्याकरितां भरपूर डॉक्टर्सहि असणारच. नालंदा विहारांत उत्तम प्रकारचें वैद्यकीय शिक्षण दिलें जात होतें, तेव्हां तेथील विद्यार्थ्यांकडे आरोग्याचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्न सोंपविलेला असणार. या गोष्टींची सोय नसती तर हजारों मैलांवरून विद्यार्थी येथें आलेच नसते. व इतकें सर्व साधण्याला पैसा ! भरपूर द्रव्यसहाय्याच्या अभावीं इतक्या मोठ्या संस्था दोनचार वर्षांतच बंद करण्याची पाळी यावयाची. पण नालंदाचें भाग्य म्हणूनच एकामागून एक गुप्त राजे येऊन त्यांनीं द्रव्यसहाय्य केलें. इमारती बांधून दिल्या व भिक्षूंना राहण्याची सोय केली. दोनशें खेडीं या विहाराच्या तैनातीला लावून दिलीं व त्यामुळें धान्यादिकांचे व कितीतरी इतर प्रश्न सोडविण्यास मदत केली. गुप्त राजांप्रमाणें पाल राजे, कान्यकुब्जाचा हर्षवर्धन ऊर्फ प्रसिद्ध विक्रमादित्य, व थेट जावा-सुमात्रापर्यंतच्या राजांचें लक्ष या संस्थेकडे होतें. ही संस्था वर्धमान व्हावी अशी सर्वांची इच्छा होती; व तसें झालें. विद्यादान हें भारतवर्षांत पवित्र मानलें गेल्यामुळें धनिक लोकांकडूनहि एकसारखी मदत होत गेली असणारच.

महत्त्वाची गोष्ट राहिली ती विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम आंखण्याची. तो बरोबर शिकविला जात आहे कीं नाहीं हें पाहण्याची. विद्यार्थ्यांच्या आकलनशक्तीप्रमाणें व इच्छेप्रमाणें निरनिराळे विषय शिकविण्याची व्यवस्था करण्याची. पण या बाबतींत तर नालंदानें पहिल्यानें काळजी घेतली असली पाहिजे. या सर्व गोष्टींची व्यवस्था द्वारपंडितांकडे होती. द्वारपंडित हेच मुख्य शिक्षणाधिकारी. नालंदाचे द्वारपंडित निष्कलंक कीर्तीचे होऊन गेले.

संस्था चालविण्यास ज्या ज्या गोष्टींची आवश्यकता असते त्या त्या तर येथें स्वयं-सिद्धच होत्या; व यामुळेंच ह्युएनत्संगाच्या मतें येथें एकहि दूषणार्ह गोष्ट घडली नाहीं.

थोडक्यांत, नालंदा म्हणजे एका अवाढव्य तटाआंतील चार चार, सहा सहा, नऊ नऊ मजले असणारी व मनोरेच मनोरे दाखविणारी, दहा-पंधरा हजार वस्तींची नगरीच ! येथील सर्व लोक संतुष्ट असत. कामामुळें त्यांना दिवस लहान वाटे. विद्यार्थी एकमेकांना मदत करीत. रात्र नि दिवस ते पहात नसत. येथील एकंदर व्यवस्था अप्रतिम होती. केवळ भारतवासीय लोकांचें दुर्दैव म्हणूनच तिचा नाश झाला !

नालंदा विहारांतील कांहीं वैशिष्ट्यें

नालंदा विहार हा कांहीं प्राथमिक व दुय्यम प्रकारचें शिक्षण देणारा विहार नव्हता म्हणून मागें सांगितलें आहेच. आजच्या कॉलेजमध्यें देण्यांत येणाऱ्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिक्षणाप्रमाणेंच पण फारच वरच्या दर्जाचें शिक्षण या व अशाच प्रकारच्या इतर विहारांतून देण्यांत येई. पण या विहारांना आपणांस कॉलेज म्हणतां येणार नाहीं. कारण कॉलेजमध्यें देण्यांत येणारें शिक्षण एकांगी व फारच मर्यादित असतें. कॉलेजच्या शिक्षणाच्या कार्याचें क्षेत्रच मर्यादित. आर्ट्स कॉलेजमध्यें सायन्सचें किंवा मेडिसिनचें शिक्षण देतां येणार नाहीं; किंवा कॉमर्स कॉलेजमध्यें इंजिनिअरिंग किंवा फिलॉसफीचें शिक्षण दिलें जाणार नाहीं. पण नालंदासारख्या विहारांतून सर्व प्रकारचें शिक्षण देण्याची सोय केलेली असे. धार्मिक शिक्षणापासून युद्धकलेचें शिक्षण, त्याचप्रमाणें जादूटोणा शिकविणाऱ्या शिक्षणापासून स्थापत्य-कलेसारख्या श्रेष्ठ प्रकारच्या शिक्षणदानाची सोय या विहारांतून केलेली होती. डॉ. राधाकुमुद मुकर्जी म्हणतात :[५०] " नालंदा (हें कॉलेज नसून) विद्यापीठ होतें; कारण येथें (१) विषयांची विविधता असे; (२) विषय ऐच्छिक असल्यामुळें विषय निवडण्यांत स्वातंत्र्य असे; (३) ज्ञान देण्याची पद्धत केवळ तद्देशीय नव्हती; शिक्षकहि केवळ त्याच ठिकाणचे नसत तर ते हिंदुस्थानाबाहेरून सुद्धां येत व ते आपआपल्या पद्धतीचा उपयोग करून नालंदा विहारांत शिक्षण देत. ज्ञान आत्मसात् कसें करतां येईल हाच काय तो प्रश्न असे व त्याकरितां कोणत्याहि सोइस्कर पद्धतीचा उपयोग होई; (४) वादविवादपद्धतीची प्रथा येथें रूढ होती.

या वादविवादपद्धतींत हुएनत्संगानें नालंदाबाहेरील कांहीं भारतीय पंडितांना कसें जिंकलें व या पंडितांनीं हुएनत्संगाचें शिष्यत्व पत्करून त्यांनीं त्याची कीर्ति परप्रांतीं कशी पसरवली याची मजेदार माहिती डॉ. मुकर्जींनीं दिली आहे.[५१]

अशा विहारांतून गुरु-शिष्यांचे संबंध फारच जवळचे असत. गुरूला शिष्य स्वतःच्या मुलासारखा वाटे व शिष्याला गुरु प्रत्यक्ष वडिलांप्रमाणें वाटत. म्हणून आजच्या शाळाकॉलेजांतून दिसून येणारा शिस्तभंग होत नसे. पण याचा अर्थ असा नाहीं कीं शिष्यांकरितां कांहीं स्वतंत्र नियम नसत. विनयपिटकांत[५२] विद्यार्थी स्त्रीपुरुषांकरितां जे नियम घालून दिले आहेत ते किती आहेत हें ते वाचल्या-

---

५०. Dr. Radha Kumud Mookerji : Men and Thought in Ancient India, p. 182.

५१. Ibid. pp. 182–183.

५२. विनयपिटक, पान २७१ (राहुलसांकृत्यायन प्रत).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नंतर कळून येईल. शिक्षण नेहमीं वैयक्तिक पद्धतीनें देण्यांत येई. त्यामुळें मुलांना कोणताहि विषय कठीण वाटत नसे. शिवाय त्यांच्या शंकांचें निरसन ताबडतोब होई. नालंदा येथें तर दररोज निरनिराळ्या विषयांवर १००-१०० व्याख्यानें होत; त्यामुळें तीं ऐकणाऱ्याचें सामान्य ज्ञान फारच वाढे. विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या कामांत मदत करण्याकरितां प्रौढ विद्यार्थी नेहमीं तयार असत.

नालंदास लागलेली उतरती कळा व तिचा ऱ्हास

निसर्गाचा एक नियमच आहे कीं प्रत्येक सृष्ट वस्तूला जन्म, वाढ व नाश या अवस्था असावयाच्याच. कांहीं वस्तूंना या तीनहि अवस्था भोगण्यास फार थोडा अवधि लागतो; तर कांहींना अमर्याद काल लागतो; पण प्रत्येक सृष्ट वस्तूला या तीनहि अवस्थांतून जावें लागतें. जगांत थोर थोर पुरुष होऊन गेले; निरनिराळ्या संस्था झाल्या; राज्यें झालीं; पण तीं आलीं आणि गेलीं. कालाच्या या शक्तीच्या कमालमर्यादेचें आकलन सामान्य जनास होत नसल्यानेंच 'कालाय तस्मै नमः' असें म्हणावें लागतें. ज्या वस्तूंत सत्त्व जास्त ती टिकावहि जास्त काल धरूं शकते. नालंदानें आपला जिवंतपणा अव्याहत ८०० वर्षेपर्यंत दाखविला. या अवधींत तिला निरनिराळे आघात सहन करावे लागले. नालंदाच्या नशिबानें गुप्त व पाल सारखे राजे होऊन गेले व त्यांनीं सर्वतोपरि नालंदाची भरभराट घडवून आणली. पण हूण राजा मिहिरकुल व वंग देशाचा राजा शशांक यांनीं तिचा नाश करण्याचाहि प्रयत्न केला. असें असूनहि नालंदानें अव्याहतपणें आपलें कार्य शेंकडों वर्षें केलें.

असें कार्य चालत असतांना एकदम तिच्यावर आघात झाला व तिचा सर्वस्वीं नाश झाला. तेराव्या शतकाच्या आरंभीं बख्त्यार खिलजीनें बंगालच्या सेन राजांचें राज्य आपल्या ताब्यांत घेतलें. या सुमारास त्यानें पुष्कळ बौद्ध व वैदिक विद्यापीठांचा नाश केला. यांत नालंदा विहार सांपडला. बख्त्यारनें येथील इमारती पाडून टाकल्या; ग्रंथभांडार जाळून टाकला; विद्वान् आचार्यांना व भिक्षु विद्यार्थ्यांना ठार केलें; त्यानें एकंदर संस्थेचें वाटोळें केलें. बख्त्यार खिलजीनें केलेल्या कृत्यानें कोणाहि सुज्ञ माणसाच्या अंगावर कांटा उभा राहिल्याशिवाय राहणार नाहीं. खुद्द मुसलमान इतिहासकारांनींहि या कृत्याची सारवासारव करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येईल;[५३]

५३. Tabakat-i-Nasiri (1881) Vol. I, p. 552; Dr. Altekar, p. 278.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणजे त्यांनासुद्धां या गोष्टीचें गांभीर्य कळलें हें खास. यावरून हें कृत्य किती नीच असलें पाहिजे याची कल्पना येईल. अशा प्रकारें ८०० वर्षे अव्याहत शिक्षणाचें व धर्मप्रसाराचें कार्य नुसत्या भारतांतच नव्हे तर सर्व आशियाभर करीत असतां कांहीं रानटी आक्रमकांच्या कृत्यामुळें या विद्यापीठाचा बाजार एकदम आटपला; व या विहाराचा इतिहास सांगण्यास ना भिक्षु, ना आचार्य, ना एखादा ग्रंथ शिल्लक राहिला ! शिल्लक राहिलें फक्त नालंदा विहाराचें नांव !

पण या सुमारास नालंदा विहारांत एक फरक घडून येत होता; व त्यामुळें नालंदाच्या भरभराटीस उतरती कळा लागण्यास सुरवात होत होती. नालंदा विहाराच्या लगतच एक नवीन विद्यापीठ होऊं घातलें होतें. हें विद्यापीठ नालंदाहून अगदीं १५।२० मैलांच्या आंतच होतें. या विद्यापीठाकडे आचार्यांचें लक्ष जाऊं लागलें. या विद्यापीठाची स्थापना करणारेसुद्धां नालंदाचेच आचार्य ! एकदां या विद्यापीठाकडे विद्यार्थ्यांचें लक्ष वेधलें तें कायमचें. नालंदाइतकेच प्रसिद्ध आचार्य या विद्यापीठांत येऊं लागले; व त्याबरोबर त्यांचा शिष्यगण वाढूं लागला. एक ठिकाणचा शिष्यवृंद वाढूं लागला, अर्थात् दुसऱ्या ठिकाणचा कमी होऊं लागला. हें दुसरें विद्यापीठ म्हणजे 'विक्रमशिला विहार' होय. आरंभीं दोनहि विद्यापीठें एकाच घरचीं लेकरें म्हणून वावरत होतीं. कित्येक वेळां तर दोनहि विहारांचें सूत्रचालकत्व एकाच व्यक्तीकडे होतें. पण पुढें पुढें विक्रमशिला जास्त प्रभावी होऊं लागली व नालंदा निष्प्रभ बनूं लागली. यामुळेंच विक्रमशिलाच नालंदाच्या नाशास कारण झाली असा कांहीं विद्वानांचा समज आहे. पण त्यांत मुळींच अर्थ नाहीं असें आपणांस दिसून येईल. ते म्हणतात, विक्रमशिलेची जसजशी भरभराट होऊं लागली तसतशी नालंदा मागें पडूं लागली; विक्रमशिलेच्या कीर्तिरूपी इमारतीचे दगड जसजसे वर वर चढूं लागले, तसतसे नालंदाचे दगड निखळूं लागले. ही गोष्ट खरी असली तरी त्याला कारण विक्रमशिला विहार नव्हे; कारण प्रथितयश नालंदा जिवंत असतां दुसरें विद्यापीठ शेजारीं येऊंच शकलें कसें ? पण ज्याअर्थीं विक्रमशिलाहि नालंदाइतकें प्रभावी विद्यापीठ बनलें त्याअर्थीं नालंदा विहारांत कांहीं तरी विकृति सुरू झाली होती खास; व त्यामुळेंच विक्रमशिलेची स्थापना व भरभराट झाली असली पाहिजे.

नालंदा विहाराचें महत्त्व कमी होण्यास दुसरें एक कारण झालें. गुप्त राजे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वतः वैदिक धर्माचे असतांनासुद्धां त्यांनीं आतांपर्यंत नालंदा विहारास सर्वतोपरि मदत केली; केवळ त्यांच्याचमुळें नालंदाची भरभराट झाली असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं म्हणा ना. पण आतां गुप्तसाम्राज्य लयास गेलें; व त्या ठिकाणीं पाल राजांचें राज्य आलें. या राजांच्या कारकीर्दीला सुरवात इ. स. च्या आठव्या शतकारंभीं झाली. हे पाल राजे पूर्ण बौद्धधर्मीय होते. हें नवीन राजघराणें आल्याबरोबर त्यांनीं आपली कीर्ति वाढावी म्हणून नवीन विद्यापीठास मदत सुरू केली. नुसती मदतच नव्हे, तर विक्रमशिला विद्यापीठ म्हणजे पाल राजांचेंच विद्यापीठ ! त्यांनीं येथें पदवी देण्याचाहि उपक्रम सुरू केला. अर्थात् नालंदालाहि त्यांनीं मदत सुरू ठेविली. पण किती झालें तरी नालंदाची आतां सापत्न अपत्याप्रमाणें स्थिती झाली. पाल राजांचें पहिलें लक्ष विक्रमशिलेकडे, नंतर नालंदाकडे अशा स्थितींत नालंदा मागें पडल्यास आश्चर्य नाहीं !

नालंदाच्या ऱ्हासाला सुरवात हूण राजा मिहिरकुल याच्या हल्ल्यापासून झाली असावी. प्रसिद्ध आचार्य मारले गेले. इमारती पाडल्या गेल्या. भिक्षू पळून गेले असतील. अशा प्रकारें नालंदाचें सत्त्व नाहींसें व्हावयास कारणें मिळालीं; व एकदां हें सत्त्व क्षीण व्हावयास लागलें कीं तें पुनः स्थिरस्थावर करणें कठीण असतें. अशा स्थितींतहि नालंदाची पुनः उभारणी झाली. नरसिंह गुप्तानें या कामांत फार मदत केली.[५४] हा नरसिंह गुप्त म्हणजेच बालादित्य[५५] असें कांहीं संशोधकांनीं सिद्ध केलें आहे.

नालंदाची पिछेहाट व्हावयास आणखी एक कारण आहे. तें म्हणजे बौद्ध धर्माचें होऊं घातलेलें विकृत स्वरूप होय. वैदिक धर्म व बौद्ध धर्म या दोहोंमध्यें एकीकरण करण्याचा येथें प्रयत्न होत असावा. कारण 'तंत्र' विद्येच्या अभ्यासास येथें सुरवात झाली व विक्रमशिला येथें त्या पद्धतीचा परिपोष झाला. या तंत्रपद्धतींत कांहीं बौद्ध तत्त्वें व कांहीं वैदिक तत्त्वें याचें मिश्रण होतें. यामुळें बौद्ध धर्माच्या

---

५४. The Rev. Father Heras, J. B. O. R. S. p. 9. Vol. XIV, 1928, Part I.

५५. Ibid. p. 2; Allan : Gupta Coins, pl. LV; H. Heras : The Final Defeat of Mihirakula, I. H. Q. III, p. 12.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खऱ्या सेवकांनीं–श्रेष्ठ आचार्यांनीं–आपलें लक्ष येथून काढून घेण्यास सुरवात केली असली पाहिजे; व याचाच परिणाम म्हणजे नालंदाचा ऱ्हास असावा.

निसर्गच कोपला तेथें मानवी शक्ति काय करणार ? बौद्ध धर्मात परिवर्तन कां व्हावें ? हूणादिकांच्या हातून नालंदावर आघात कां व्हावेत ? विक्रमशिला विहार शेजारींच कां निघावा ? जादुटोणा करण्यास शिकविणाऱ्या तंत्रविद्येकडेच भिक्षूंना ओढा कां वाटावा ? आणि बख्त्यार खिलजीसारख्या रानटी वृत्तीच्या माणसानें स्वारी करून नालंदाचा सर्वनाश कां करावा ? 'कालाय तस्मै नमः' दुसरें काय !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३ : विक्रमशिला विहार

[सुमारें ८०० इ. स. ते १२०० इ. स.]

मगधांतील एक नवीन विद्यापीठ : नालंदाचे प्रतिस्पर्धी (?)

मगध देशांतील म्हणजे हल्लींच्या बिहार प्रांतांतील एका अत्यंत श्रेष्ठ व प्रसिद्ध विद्यापीठाची, अर्थात् नालंदा विहाराची माहिती मागील प्रकरणांत दिली आहे. या प्रकरणांत बिहारांतील जवळ जवळ तितक्याच प्रसिद्ध अशा दुसऱ्या एका विद्यापीठाची माहिती देण्याचा विचार आहे. हें विद्यापीठ म्हणजे 'विक्रमशिला' विहार होय. विक्रमशिलेला नालंदाचें प्रतिस्पर्धी विद्यापीठ संबोधण्यांत येतें. प्रतिस्पर्धी म्हटलें कीं परस्परांमुळें एकमेकांना बरेवाईट परिणाम भोगावे लागले असले पाहिजेत ही गोष्ट गृहीत धरली जाते. नालंदालाहि ते भोगावे लागले ही गोष्ट मानण्यांत येते. पण ही गोष्ट सर्वथैव बरोबर नाहीं. एकतर नालंदा विद्यापीठाच्या ऐन भरभराटीच्या वेळीं विक्रमशिलेचें नांवहि नव्हतें. शिवाय नालंदाच्या दुर्दैवानें तेथें अशाच कांहीं घटना घडून आल्या कीं जेणेंकरून नालंदाचा ऱ्हास व विक्रमशिलेचा उत्कर्ष होऊं लागला. वास्तविक नालंदा व विक्रमशिला हीं दोनहि विद्यापीठें एकमेकांच्या अगदीं जवळ जवळचीं; दोहोंमध्यें फारसें अंतरहि नव्हतें; अवघें १५।२० मैलांचें ! दोनहि विद्यापीठांना त्याच राजांचा आश्रय; व दोनहि विद्यापीठांची कीर्ति तेथील विद्वान् आचार्यांमुळें दिगंतीं पसरलेली. पण जसजशी विक्रमशिलेची भरभराट होऊं लागली, तसतसें नालदाचें तेज कमी व्हावयास लागलें; व शेवटीं दोनहि विहारांचा नाश एकाच शत्रूच्या हातून एकाच वेळीं झाला; व दोनहि नामशेष झालीं !

पण विक्रमशिला विद्यापीठाच्या भरभराटीला कारणहि नालंदाचे प्रथितयश आचार्यच झाले. त्यांनींच विक्रमशिलेला पुढें आणली. या सुमारास नालंदाच्या अंतर्गत व्यवस्थेंत कांहीं तरी बिघाड झाला असेल; बौद्धधर्मीयांच्या विचारांमध्यें कांहीं विकृति उत्पन्न झाली असेल; तेथील आचार्यांना तेथें राहण्यापेक्षां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुसरीकडे जावें असें वाटूं लागलें असेल; व विक्रमशिलेच्या रमणीय स्थळीं येऊन त्या आचार्यांनीं या नवीन विहाराची स्थापना केली असेल. आरंभींचे कांहीं प्रथितयश आचार्य येथें आल्यावर त्यांच्याबरोबर त्यांचा शिष्यवृंद व त्यांची कीर्तीहि येणारच. त्यांतून येथें एकदां चांगला जम बसूं लागल्यानंतर लोकांचें व विशेषतः राजे लोक व धनिकवर्ग यांचेंहि लक्ष जाऊन या विहाराला द्रव्यसहाय्य होत गेलें असणार. नालंदाला आतांपर्यंत गुप्त राजांची मदत होती. एक एक गुप्त राजा पुढें आला व त्यानें नालंदाच्या कीर्तींत भर घातली. पण आतां गुप्त राजे बदलून पाल राजे आले. त्यांना नवीन विद्यापीठाला मदत करून आपलें नांव करण्याची इच्छा कां होऊं नये? अर्थात् त्यांनीं जुन्या विद्यापीठाला एकमेव साह्य करण्याचें सोडून नवीनच कीर्तिपथावर जाऊं पहाणाऱ्या विद्यापीठाला मदत करण्याचें ठरविलें असेल. अशाप्रकारें विक्रमशिला विहाराला राजाश्रयहि मिळूं लागला. असें असतांनासुद्धां दोनहि विद्यापीठें शत्रूंप्रमाणें न राहतां एकाच घरांतील दोन भावंडांप्रमाणें रहात होतीं असें दिसतें; कारण दोनहि विद्यापीठांची व्यवस्था एकच आचार्य कित्येक दिवस पहात होते हें आचार्य शांतकीर्ति व आचार्य बुद्धकीर्ति यांच्या उदाहरणांवरून दिसतें[१]. विक्रमशिलेप्रमाणें नालंदालाहि पाल राजे मदत करीत होते. दोन विद्यापीठांचें दळणवळणहि एकसारखें चालू होतें. अशा प्रकारची स्थिति असतांना विक्रमशिला व नालंदा यांना एकमेकांचे प्रतिस्पर्धी म्हणणें चुकीचें होईल. इतकें मात्र खरें कीं, विक्रमशिलेच्या स्थापनेच्या सुमारास मोठमोठ्या आचार्यांचें व लोकांचें लक्ष बौद्ध धर्मांत होत असणाऱ्या स्थित्यंतराकडे जास्त जास्त वेधूं लागलें व लोक तंत्रविद्येलाच जास्त महत्त्व व मान देऊं लागले; व या तंत्रविद्येचा विशेष अभ्यास या विद्यापीठांत होत असल्यानें विद्यार्थ्यांची रीघ या संस्थेकडे जास्त लागली आणि या विद्यापीठाचें महत्त्व व वैभव वाढूं लागलें. एकाचें वैभव वाढलें व दुसऱ्याचें कमी झालें; विक्रमशिलेची भरभराट व नालंदाचा ऱ्हास एकाच वेळीं होऊं लागला. त्यांत

१. S. C. Vidya-Bhushan : History of the Mediaeval School of Indian Logic, (Calcutta, 1909), pp. 519-520.
S. K. Das : The Educational System of the Ancient Hindus, (1930), pp. 374.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शत्रुत्व, द्वेषभाव किंवा प्रतिस्पर्धित्व मुळींच नव्हतें. कालगतीप्रमाणें नालंदाचा ऱ्हास झाला. कांहीं अंशानें असेंहि म्हणतां येईल कीं विक्रमशिलेचें बीज नालंदांतूनच आलें; कारण एका दंतकथेप्रमाणें नालंदा येथील एका आचार्यानेंच विक्रमशिलेच्या जन्मापूर्वीं कित्येक शतकें विक्रमशिलेची जागा नक्की केली होती व तिच्या भरभराटीविषयीं भाकीत केलें होतें. नंतर येथील आचार्यांनींच विक्रमशिला स्थापन केली. बाहेरच्या आचार्यांची डाळ नालंदाच्या शेजारीं शिजली नसती. अशा प्रकारें विक्रमशिलेची स्थापना झाली व भरभराटहि झाली, पण ती नालंदाची कीर्ति नाहींशी करूं शकली नाहीं. नालंदाइतके विद्यार्थीहि ती घेऊं शकली नाहीं. तिच्या भरभराटीचा कालहि नालंदाच्या निम्माच म्हणजे ४०० वर्षांचा होता.

विक्रमशिलेचा कालनिर्णय

चौथ्या शतकाच्या शेवटीं शेवटीं जेव्हां चिनी प्रवासी फा-हायान हा हिंदुस्थानांत आला तेव्हां त्यानें विक्रमशिलेबद्दल कांहींहि लिहून ठेवलें नाहीं; त्याचप्रमाणें सातव्या शतकाच्या आरंभीं हुएनत्संग व सातव्या शतकाच्या शेवटीं इत्सिंग हे दोघे महान् चिनी प्रवासी पंडित नालंदाची कीर्ति ऐकून ती पाहण्याकरितां आले तेव्हां त्यांनींहि आपल्या प्रवासवृत्तांत विक्रमशिलेचा उल्लेख केला नाहीं. वास्तविक नालंदा व विक्रमशिला हीं ठिकाणें अगदीं जवळचीं. त्यांतून शेवटचे दोनहि चिनी पंडित कित्येक वर्षें येथें राहिले. असें असतांना ज्या अर्थीं त्यांनीं विक्रमशिलेचा उल्लेख केला नाहीं त्या अर्थीं सातव्या शतकाच्या शेवटपर्यंत विक्रमशिलेचें अस्तित्व नव्हतें ही गोष्ट नक्की होते. तेव्हां या विद्यापीठाची स्थापना सातव्या शतकानंतर झाली असावी. या विद्यापीठाची स्थापना धर्मपाल राजानें (८००–८२५ इ. स.) केली असें म्हणतात. या पाल घराण्यांतील दहा बारा राजांनीं ही मदत एकसारखी चालू ठेविली व विक्रमशिलेचा उत्कर्ष होत गेला.

विक्रमशिलेचा स्थलनिर्णय

पण विक्रमशिलेची नक्की जागा कोणती याबद्दल पंडितवर्गांत बराच मतभेद आहे. खात्रीलायक पुरावा नसल्यामुळें केवळ तर्कबुद्धीवरच आपणांस विसंबून रहावें लागतें. कालानें आपला हात फिरवितांच मोठमोठ्या खंडांच्या ठिकाणीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महान् सागर येतात, व सागरांच्या जागीं महान् पर्वत उत्पन्न होतात. तर मग एकाद्या लहान रम्य टेकडीवर विक्रमशिला स्थापन होऊन सातशें आठशें वर्षांनंतर तिचा मागमूसहि लागू नये यांत आश्चर्य तें कसलें ! तरी पण फणीन्द्रनाथ बोस[२] यांच्या मतें हें विद्यापीठ गंगेच्या कांठीं भागलपुर परगण्यांत एका टेकडीवर असावें. नंदलाल डे म्हणतात,[३] अंग राजांची राजधानी जें चंपानगर तेथून पूर्वेकडून २४ मैलांवर 'पथ्थरद्वार'[४] नांवाचें ठिकाण आहे; त्याच्याजवळच कोठें तरी विक्रमशिला असावी. डॉ. अळतेकरांचेंहि मत तसेंच असून ते म्हणतात कीं, या ठिकाणीं उत्खनन केल्यास इतिहाससंशोधनाच्या कामीं भरपूर सामुग्री मिळूं शकेल.[५] मझुमदार म्हणतात, ती गंगेच्या उत्तर किनाऱ्यावर खास होती.[६] कनिंगहॅम असें सुचवितो कीं, वटगांवजवळ शिलास[७] नांवाचें हल्लीं एक खेडें आहे तेंच विक्रमशिलेचें ठिकाण असावें.[८] 'मगधाचें वैभव' या पुस्तकांत समद्दर म्हणतात,[९] कॅनिंगहॅमचें हें मत चुकीचें असून नंदलाल डे यांचेंच मत ग्राह्य दिसतें; कारण तिबेटी ग्रंथकारांनीं सुचविलेली जागा ती हीच असावी. विद्याभूषणांच्या मतें[१०] भागलपुर परगण्यांतील सुल्तानगंज गांवच विक्रमशिला

---

२. Phanindra Nath Bose : Indian Teachers of Buddhist Universities (1923), pp. 32–33.

३. Nandlal De : The Vikramasila Monastery, J. A. S. B. Vol. V, 1909.

४. Patharghata Hill, J. A. S. B. vi. p. 7. (Jan. 1909)

५. Dr. A. S Altekar : Education in Ancient India (1944), p. 125 (footnote).

६. Mazumder : The Hindu History (B. C. 3000–A. D. 1200), p. 831.

७. 'Silao' near Baragaon, cf. A S R, viii. 75 as quoted by Dr. R. K. Mookerji in 'Ancient Indian Education,' p. 587.

८. A S R viii, p. 75–Cunningham.

९. Samaddar : Glories of Magadha, p. 157.

१०. Dr. S. C. Vidya-Bhushan : History of the Mediaeval School of Indian Logic, p. 79.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असावी. बॅनर्जीशास्त्र्यांच्या मतें[११] हुल्सगंजाच्या ईशान्येस नालंदाहून १५ मैलांच्या अंतरावर जें कौर म्हणून गांव आहे तेंच पूर्वीचें विक्रमशिला होय. अशाप्रकारें एका प्राचीन काळच्या प्रसिद्ध विद्यापीठाची जागा निश्चित करण्यालाहि इतका त्रास ! पण आज डे यांचें मत सर्वांना ग्राह्य झालेलें दिसतें.

चारशें वर्षें ज्या विद्यापीठानें आपलें वर्चस्व नुसत्या भरतखंडावरच नव्हे तर जगाच्या इतर भागांवरहि गाजविलें व नालंदासारख्या प्रथितयश विद्यापीठालाहि ज्यानें फिकें पाडलें त्या विद्यापीठाची जागा नक्की करण्यांत इतकी अडचण पडावी हें आपलें केवढें दुर्भाग्य ! पण या सर्वाला कारण मुसल्मानांची असहिष्णुता, स्वतःच्या धर्माबद्दल अंध व फाजील अभिमानाची वृत्ति व त्यांचें आक्रमक धोरणच होय. कारण त्यांनीं पूर्वीचीं देवालयें पाडून त्या ठिकाणीं मशिदी बांधल्या, गांवांचीं नांवें बदलून टाकिलीं व शैक्षणिक संस्था आणि ग्रंथालयें नाहींशीं केलीं. मग आपण केवळ काळाला दोष देण्यांतहि काय अर्थ आहे ? माणसाच्या रानटी वृत्ती-लाच आपण दोष दिला पाहिजे; व जगांतील ही रानटी वृत्ति कशी काढून टाकतां येईल इकडे सुधारलेल्या राष्ट्रांनीं व विशेषतः शिक्षणसंस्थांनीं आपलें लक्ष दिलें पाहिजे. म्हणजे जिकडे तिकडे शांति नांदून जगांतील कोणतीहि उच्च संस्कृति नाहींशी होणार नाहीं. जेथें सिंहादि हिंस्र श्वापदांनासुद्धां माणसाळवितां येतें तेथें रानटी वृत्तीच्या माणसाला संस्कृतिपथावर नेणें अशक्य आहे असें कोण म्हणेल ? महात्मा गौतमबुद्ध व महात्मा येशू खिस्त यांच्यानंतर त्यांचे असंख्य अनुयायी हें कार्य करण्यास बाहेर पडले व रक्तपिपासू लोकांनाहि त्यांनीं माणसांत आणलें, तर महात्मा गांधीजींचे खरे अनुयायी लाखोंनीं बाहेर पडले तर जगावर 'रानटी' हा शब्दसुद्धां कोशाबाहेर दिसणार नाहीं.

विक्रमशिलेची स्थापना कोणी व कशी केली ?

नालंदाच्या स्थापनेबाबत ज्याप्रमाणें कांहीं दंतकथा प्रचलित आहेत त्याप्रमाणेंच विक्रमशिलेच्या स्थापनेबाबतहि आहेत. एक दंतकथा अशी आहे : नालंदा विहारांत आचार्य काम्पील्य हे अत्यंत थोर भिक्षु होऊन गेले.[१२] तंत्र विद्येंत त्यांनीं

११. JBORS, XV, 276.

१२. Samaddar : The Glories of Magadha, p. 120; J. B. T. S. Vol. I, pp. 10–11.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रावीण्य मिळविलें होतें व त्यांना सिद्धिहि प्राप्त झाली होती. ते एकदां फिरत फिरत गंगेच्या उत्तर किनाऱ्यावर आले. तेथें त्यांना एक अत्यंत रमणीय असा खडकाळ डोंगर दिसला. तो पाहतांच त्यांना वाटलें, येथें एक सुंदर विहार बांधला जाईल तर किती बहार होईल? आणि लगेच त्यांच्या प्रभावी सिद्धी-मुळें त्यांच्या लक्षांत आलें कीं, नाहीं, येथें राजाश्रयावरच एक खास प्रख्यात विहार बांधला जाणार आहे; व त्याची कीर्ति दिगंतीं पसरणार आहे. असें म्हणतात कीं, कांहीं काळानें हे काम्पील्यच मगध देशांतील राजघराण्यांत धर्मपाल या नांवानें जन्मास आले. धर्मपाल मगध देशाचा प्रसिद्ध राजा होता व त्यानेंच या टेकडीवर विक्रमशिला नांवाचा मोठा विहार बांधला. चारहि दिशांना ह्या विहाराची कीर्ति पसरली; व निरनिराळ्या नांवांनीं तो ओळखला जाऊं लागला. तिबेटकडे मात्र विक्रमशिला या नांवानेंच त्याची प्रसिद्धी झाली.

दुसऱ्या दंतकथेप्रमाणें, येथील भिक्षु फारच चारित्र्यवान्; म्हणून त्यांच्या श्रेष्ठ चारित्र्यामुळें या जागेला विक्रमशिला नांव मिळालें.

तिसरी एक दंतकथा आहे ती अशी : या टेकडीवर एक यक्ष रहात असे व त्याचें नांव विक्रम होतें. त्याच्या नांवानेंच हा खडकाळ डोंगर ओळखला जाऊं लागला व त्याला पुढें विक्रमशिला हें नांव प्राप्त झालें. या यक्षाचा नंतर पराभव करण्यांत आला व या विहाराची स्थापना करण्यांत आली.

दंतकथा बाजूस ठेवल्या तरी एक गोष्ट सर्वांना मान्य आहे व ती म्हणजे मगध देशाच्या धर्मपाल राजानें ९ व्या शतकापासून या विहाराच्या भरभराटीचें काम हातीं घेतलें; आणि त्यानें याच वेळीं तिच्या भाविकाळच्या उन्नतीबद्दल पूर्ण लक्ष देऊन या संस्थेची उभारणी केली. त्यानें या बाबतींत जो दूरदर्शीपणा दाखविला त्यामुळें 'सुव्यवस्थातंत्रा'(Organisation) बद्दल या विद्यापीठाची ख्याति झाली. गुप्त राजांनीं नालंदा विद्यापीठाच्या खर्चाची सोय २०० खेडीं देऊन लावली होती. त्याचप्रमाणें पाल राजांनींहि या संस्थेच्या खर्चाची सोय पहिल्या-पासूनच लावून दिली. इतकेंच नव्हे तर येथें राहणाऱ्या शिक्षकांना, विद्यार्थ्यांना व पाहुण्यांना कोणत्याहि प्रकारें ददात पडूं नये म्हणून त्यांची सोय लावण्याकरितां स्वतंत्र व्यवस्था करण्यांत आली होती. धर्मपालानंतरहि नऊ दहा पाल राजांनीं-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुद्धां या विद्यापीठास मदत चालू ठेविली. यामुळेंच हें विद्यापीठ अव्याहत ४०० वर्षें चालू होतें. नालंदा-उदन्तपुरीप्रमाणेंच येथेंहि जर मुसल्मानांचा रानटी हल्ला झाला नसता तर विक्रमशिलाहि नालंदाप्रमाणें आणखी शेंकडों वर्षें टिकूं शकली असती. धर्मपाल राजानें येथें १०८ विहार बांधून दिले. येथें कित्येक शालाहि (मोठ्या खोल्या) बांधल्या. व सर्वांभोंवतीं एक तट बांधला. या तटाचा उद्देश शत्रुहल्ल्यापासून बचाव करण्यापेक्षां भिक्षूंच्या शिस्तपालनास मदत करणें हाच दिसतो. या राजानें १०८ विहारांतील विहाराधिपतींच्या म्हणजे मुख्य आचार्य व इतर शिक्षकवर्गाच्या उपजीविकेची खास सोय लावून ठेविली होती. यामुळें विद्वान् व प्रसिद्ध असे १०८ आचार्य विद्यार्थ्यांकरितां नेहमीं तयार असत. संस्था टिकण्याला ही एकच बाब घेतली तरी किती महत्त्वाची आहे हें लक्षांत येईल. हल्लींच्या कांहीं विद्यापीठांतून एकाद्याच्या नांवानें एक खास पगारी जागा ('चेअर') राखून ठेवण्याची पद्धत आहे, तशीच पद्धत धर्मपाल राजानें या १०८ आचार्यांच्या बाबतींत केली होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. एकदां संस्था नांवारूपास येऊं लागली कीं तिच्याकडे लोकांचें लक्ष वेधतें. त्यांतून राजे लोकांचा तिला आश्रय असून त्याठिकाणीं खरोखरच सत्कार्य दिसूं लागलें, तर श्रीमान् लोकांप्रमाणें सामान्य जनांकडूनहि तिला मदत होऊं लागते. अशा प्रकारें पैशाची काळजी सुटल्यानंतर येथील आचार्यांना आपली व आपल्या संस्थेची कीर्ति दिगंतीं पसरविण्यास फारसा त्रास पडला नसावा.

विक्रमशिलेची अन्तर्गत व्यवस्था

विक्रमशिलेची ख्याति जितकी येथील चारित्र्यवान् आचार्यांमुळें झाली तितकीच येथील अंतर्गत व्यवस्थेमुळेंहि झाली. नालंदाची अंतर्गत व्यवस्था कशी होती याबद्दल विशेष उल्लेख नाहींत; तरी पण १००००।१५००० लोकांची बिनबोभाट सर्व प्रकारची व्यवस्था जें विद्यापीठ शेंकडों वर्षें करूं शकलें तेथील अंतर्गत व्यवस्था चांगली नव्हती असें म्हणणें चुकीचें होईल. त्या व्यवस्थेविषयीं उल्लेख नाहींत इतकेंच. नालंदा येथील मुख्य विहाराधिपति-आपण त्यांना कुलपति म्हणूं या-असत तेच द्वारपंडितांच्या किंवा इतर चारित्र्यवान् भिक्षूंच्या मदतीनें सर्व व्यवस्था करीत असले पाहिजेत. त्यामुळें विद्यापीठाची सर्व प्रकारची जबाबदारी एकट्यावरच पडत असली पाहिजे. जबाबदारी एकट्यावरच पडल्यास कांहीं तोटे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याप्रमाणें कांहीं फायदेहि आहेत; कारण एकाद्या मुद्याची बाब उपस्थित झाली असतां मुख्याचा शब्द प्रमाण मानला जातो व त्याप्रमाणें सर्वांना वागणें भाग पडतें. यामुळें शिस्तीचा सहसा भंग होत नाहीं. त्यांतून विहाराधिपति पूर्ण विचारी, विद्वान् व आचारवान्, त्याचप्रमाणें स्वार्थपराङ्मुख असला तर कोणालाहि तक्रार करण्यास जागा रहात नाहीं. मग एकाद्याच्या विरुद्ध निकाल लागला तरी तो निकाल प्रेमानें मान्य करण्यांत येतो व वादाचा मुद्दा नाहींसा होतो. याच्या उलट सर्व व्यवस्था करण्याची जबाबदारी एकाद्या मंडळावर असली व त्या मंडळावर एकादा मुख्य असला तर त्या मुख्याला मंडळाच्या सभासदांच्या मताला मान द्यावा लागतो; व तेथें जर भिन्न मतें पडलीं तर त्या मुख्याची अवस्था विचित्र होते.

विक्रमशिलेची अंतर्गत व्यवस्था पाहण्याकरितां एक मंडळ नेमलेलें असे. या विद्यापीठाचा कुलपति म्हणजे विहाराधिपति मंडळाचा मुख्य असे. एका वेळीं मैत्रेय नांवाच्या एका भिक्षूच्या बाबतींत असाच एक प्रश्न उपस्थित झाला व त्यांत हा कुलपति जरी सर्वमान्य व सर्वप्रिय असा होता तरी त्याला तो प्रश्न सोडविण्याकरितां कौल मागावा लागला. या ठिकाणीं जर मंडळ नसतें तर त्या कुलपतीचा निकाल सर्वसंमत झाला असता.

तरीपण एकंदरींत विक्रमशिलेची अंतर्गत व्यवस्थेबद्दल सर्वत्र ख्याति होती. १०८ आचार्य येथील सहा विहारांत असत. प्रत्येक विहार म्हणजे एक स्वतंत्र कॉलेजच, व त्याचे मुख्य आचार्य म्हणजे त्या कॉलेजचे प्रिन्सिपॉल. पण त्या सहाहि विहारांतील एकंदर कामांत एकसूत्रीपणा आणतां यावा म्हणून धर्मपाल राजानें सर्व व्यवस्था पाहण्याकरितां सहा आचार्यांचें एक मंडळ बनविलें होतें व त्यावर विक्रमशिलेचे विहाराधिपति अध्यक्ष नेमण्यांत आले होते. अशा रीतीनें निरनिराळ्या वेळीं आचार्यांच्या मंडळानें विक्रमशिलेचा कारभार तिचा नाश होईपर्यंत पाहिला. नालंदा व विक्रमशिला यांच्या बाबतींत एक मोठा फरक दिसून येतो तो हा कीं मोठ्या नालंदा विद्यापीठांत एकाच द्वारपंडिताची सोय करण्यांत आली होती, तर विक्रमशिला विहारांत सहा द्वारपंडित होते. या विद्यापीठाच्या तटाला चार दिशेला चार मुख्य दरवाजे होते, व प्रत्येक दरवाज्यावर एकेका द्वारपंडिताची सोय केली होती. तसेंच आंतील दोन दरवाजांवर दुसऱ्या दोघां द्वारपंडितांची नेमणूक केली होती. सर्व विद्वान् व आचारवान् आचार्यांमध्यें जे श्रेष्ठ असत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांनाच द्वारपंडितांची जागा देण्यांत येई. विक्रमशिलेच्या व्यवस्थामंडळांतील जे सहा सभासद तेच हे सहा द्वारपंडित. या सात श्रेष्ठ आचार्यांचें काम म्हणजेच विक्रमशिला. निरनिराळ्या वेळीं आलेल्या या सहा द्वारपंडित व विहाराधिपति यांच्या मेहनतीचें फळ म्हणजेच विक्रमशिलेची कीर्ति.

विक्रमशिला येथें देण्यांत येणारें शिक्षण

नालंदा बौद्धधर्मीय असूनसुद्धां कोणत्याहि प्रकारचा भेदभाव न बाळगतां तेथें सर्व प्रकारचें शिक्षण देण्यांत येत असे. त्यामुळें बौद्ध धर्माप्रमाणें वैदिक धर्म व जैन धर्म यांचाहि येथें अभ्यास होई. म्हणून ज्याप्रमाणें येथें बौद्ध आचार्य निर्माण झाले त्याचप्रमाणें जैन आचार्यहि निर्माण झाले. गुप्त राजे मूळचे वैदिकपंथी; पण त्यांच्यामुळेंच बौद्धपंथीय नालंदाची भरभराट झाली. केवळ बौद्ध धर्माचीच येथें शिकवण असती तर गुप्त राजांकडून अशाप्रकारें सर्वतोपरि मदत झाली नसती.

पण विक्रमशिलेची गोष्ट निराळी. येथें तर केवळ बौद्ध धर्माच्या शिक्षणालाच प्राधान्य असे. इतर पंथांच्या शिक्षणाला गौणपद दिलें जाई. बौद्ध धर्माची जेणेंकरून वाढ होईल तशी शिक्षणाची दिशा ठरविणें हा येथील आचार्यांचा दृष्टिकोन होता. जगांत बौद्ध धर्माची जी वाढ झालेली दिसते त्याला बऱ्याच अंशीं विक्रमशिलाच कारणीभूत आहे. पण बौद्ध धर्माचें विकृत स्वरूप जें तंत्र त्याचा येथें विशेष अभ्यास होऊं लागला. इतर जे विषय येथें शिकविले जात त्यांत तत्त्वज्ञान, न्यायशास्त्र, व्याकरण व इतर धर्मांचा अभ्यास हे मुख्य होत. नालंदाला मात्र जितके म्हणून अभ्यसनीय विषय असत तितके सर्व शिकविले जात. परंतु विक्रमशिलेला तसें नव्हतें. या दृष्टीनेंहि विक्रमशिला नालंदाची बरोबरी कधींहि करूं शकलें नाहीं. विक्रमशिला येथील प्रत्येक द्वार विशिष्ट प्रकारच्या अभ्यास-विषयाचें सूचक असलें पाहिजे. ज्या भिक्षूला एकाद्या विशिष्ट प्रकारचें शिक्षण घ्यावयाचें असेल तर त्याला प्रवेश ठराविक द्वारांतूनच मिळूं शके. ठराविक द्वारपंडितच त्याची परीक्षा घेत व तो योग्य दिसल्यास त्यास प्रवेश देत. कुलपतींची सर्व कार्यावर सामान्य देखरेख व मार्गदर्शन असे.

येथें शिकविण्याच्याहि दोन पद्धति दिसतात. एक, विद्यार्थ्यांना बसवून शिकविणें व त्यांच्याकडून दररोज अभ्यास तयार करवून घेणें; दुसरी, निरनिराळ्या

५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विषयांवर व्याख्यानें देऊन विद्यार्थ्यांचें सामान्य ज्ञान वाढविणें. नाल्दाला दररोज निरनिराळ्या शंभर विषयांवर व्याख्यानें होत. हीच पद्धत येथेंहि अमलांत असावी. नालंदापेक्षां विक्रमशिलेची शैक्षणिक आंखणी उत्तम प्रकारची असावी हें येथें सहा द्वारपंडित नेमलेले असत यावरून कळून येतें. कांहीं विद्वानांच्या[13] मतें येथें नेमलेल्या प्रत्येक द्वारपंडिताच्या हाताखालीं १०८ आचार्य असत; म्हणजे सहा द्वारपंडितांच्या हातांखालीं एकूण ६४८ आचार्य होते. पण याबाबतींत कांहीं तरी गैरसमज झाला असावा. कारण विक्रमशिला ही नालंदापेक्षां आकारानें अगदीं ल्हान. नालंदा येथें जास्तींत जास्त १०,००० विद्यार्थी होते असा उल्लेख आहे; व जवळ जवळ १५०० शिक्षक त्यांना शिकविण्याकरितां व इतर व्यवस्था पाहण्याकरितां असत. नालंदा म्हणजे दहापंधरा हजार लोकांची एक नगरीच ! व ही नगरी म्हणजे एक घर किंवा कुटुंब. तेव्हां नालंदा प्रकरणांत पाहिल्याप्रमाणें शेंकडों कामें व जबाबदाऱ्या या शिक्षकांवर पडणें साहजिक आहे. ज्या शिक्षकांवर अशा प्रकारचीं इतर कामें व जबाबदाऱ्या असणार असे शिक्षक प्रत्यक्ष नियमितपणें शिकवून दररोजचे वर्ग घेऊं शकणें शक्य नाहीं. मिळेल त्या वेळांत प्रौढ विद्यार्थ्यांनाच ते शिकवीत असणार. अशा शिक्षकांकडून शिक्षणाच्या जास्त जबाबदारीची अपेक्षाहि कोणी करणार नाहीं. असे पांचशें एक शिक्षक बाजूला काढले तर नाल्दाला शिकविण्याचेंच काम करणारे शिक्षक हजारापेक्षां कमीच निघतील. शिवाय बरेचसे शिक्षक स्वतः प्रौढ विद्यार्थी म्हणून रहात असावे. हुएनत्संग स्वतः व इत्सिंगसारखे जाडे विद्वान् लोकहि विद्यार्थी म्हणूनच राहिले. तेव्हां अशांना शिकविण्याचें व शिकण्याचें अशीं दोनहि कामें करावीं लागत. असें असूनहि त्यांच्या ताब्यांत असणाऱ्या विद्यार्थ्यांचें प्रमाण एका शिक्षकाला १० विद्यार्थी याप्रमाणें पडतें.

पण विक्रमशिलेचें तसें नव्हतें. विक्रमशिला येथें जास्तींत जास्त ३००० विद्यार्थी असावेत.[14] येथील शिक्षकांच्या उपजीविकेची पूर्ण सोय पाल राजांनीं करून ठेविल्यामुळें हे शिक्षक प्रौढ विद्यार्थी नसावेत; त्यांच्याकडे फक्त शिक-

13. Dr. R. K. Mookerji : Ancient Indian Education, p. 587. Prof. Sammaddar : p. 123; Dr. S. K. Das : The Educational System of the Ancient Hindus (1930), p. 375.

14. P. N. Bose : Indian Teachers, p. 84; Dr. Altekar, p. 127.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विण्याचेंच काम असावें. असें असूनहि व विद्यार्थ्यांची संख्या सर्वांत जास्त घेऊनहि प्रत्येक शिक्षकामागें ४।५ च विद्यार्थी पडतात; कारण येथें जवळ जवळ ७०० शिक्षक व ३००० विद्यार्थी होते. सर्व दिवस शिकविणाऱ्या शिक्षकांनीं फक्त चारपांचच विद्यार्थी शिकवावयाचे हें विचित्र व असंभवनीय दिसतें !

नालंदाप्रमाणें येथेंहि प्रवेश मिळणें कठीण जाई; कारण विद्यार्थ्यास प्रवेश देण्यापूर्वी त्याची कसून परीक्षा घेतली जाई. अर्थात् ज्या विद्यार्थ्याचें ज्ञान अधिक, ज्याला आपलें चारित्र्य चांगलें असावें अशी तळमळ, जो शिस्तीचे नियम पाळण्याला तयार अशाच विद्यार्थ्याला येथें प्रवेश; मग तेथें गरीब–श्रीमंत, ब्राह्मण–अब्राह्मण हा प्रश्न नसे. मुलांच्या राहण्या-खाण्याचा, शिक्षणाचा, औषध–पाण्याचा, वस्त्रप्रावरणाचा वगैरे सर्व खर्च विहारांतून होई. गुप्त राजांप्रमाणें पाल राजांनींहि याची सोय आगाऊच लावून ठेविली.

शिक्षक व विद्यार्थी एकत्र रहात असल्यानें विद्यार्थ्यांना शिक्षकांपासून जितका फायदा व्हावयास पाहिजे तितका होई. दोघांनाहि एकमेकांच्या खासगी जीवनाबद्दल पूर्ण माहिती होत असल्यामुळें एकमेकांबद्दल आपलेपणा उत्पन्न होई; व विद्यार्थ्यांना शाळा ही आजच्याप्रमाणें नीरस वाटत नसे. उलट पक्षीं स्वतःच्या घराप्रमाणें ती आकर्षक वाटे. शिक्षकाबद्दलहि प्रेम व आदर स्वतःच्या वडिलाइतकाच, किंबहुना जास्तच, वाटे. वडील माणसें स्वतःच्या मुलांबद्दल जितकी काळजी घेणें शक्य आहे तितकी काळजी शिक्षक विद्यार्थ्यांबद्दल घेत. त्यामुळें विद्यार्थ्यांनाहि अभ्यासांत गोडी वाटून ते मन लावून अभ्यास करीत.

विद्यार्थ्यांच्या या राहणीच्या पद्धतीमुळें शिस्तहि आपोआप त्यांच्या अंगीं उतरे. शिस्तीकरितां निराळी उपाययोजना करावी लागत नसे. विक्रमशिला विद्यापीठ शिस्तीकरितां नालंदाइतकेंच प्रसिद्ध असे.

येथील आचार्यांना भरपूर वेतन असावें असें वाटतें.[१५] शिक्षक वर्ग संतुष्ट असल्याशिवाय संस्था चांगल्या प्रकारें चालणार नाहींत व नांवारूपास येणार नाहींत. पण त्याबरोबर संस्थेची भरभराट करण्यास केवळ पोटार्थी शिक्षकांचाहि उपयोग होत नाहीं. ध्येयवादी व स्वार्थत्यागी शिक्षकच संस्थेच्या ऊर्जितावस्थेस

१५. Dr. R. K. Mookerji : Ancient Indian Education, p. 587.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कारण होतात. फक्त दीर्घोद्योग व आशावाद यांचें सहाय्य त्यांना पदोपदीं घ्यावें लागतें. नुसतें भावनावश होऊनहि चालत नाहीं. म्हणून ध्येयवादी व दीर्घोद्योगी शिक्षकाच्या हातांत संस्थेचीं सर्व सूत्रें व सत्ता राहिल्यास कोणाला आश्चर्य किंवा वैषम्य वाटण्याचें कारण नाहीं. विक्रमशिलेचे द्वारपंडित व कुलपति हे अशा-प्रकारचे ध्येयवादी शिक्षक व सूत्रधार असत. त्यांची रहाणी साधी व विचारसरणी उच्च असे. मुलांच्या शिक्षणावर या गोष्टींचा किती परिणाम होत असला पाहिजे हें सांगावयासच नको.

विक्रमशिलेचे आचार्य

नालंदाप्रमाणें विक्रमशिलेची कीर्तिहि विद्वान् आचार्यांनींच वाढविली. या अशा विद्वान् व कर्तृत्ववान् आचार्यांची एक मालिकाच असे. वेगवेगळ्या वेळीं वेगवेगळे पंडित द्वारपंडित होऊन गेले. त्यांत रत्नवज्र, रत्नकीर्ति, रत्नाकरशांति, जेतारि, ज्ञानश्रीमित्र, प्रज्ञाकरमति, वागीश्वरकीर्ति, नरोप व दीपंकर ऊर्फ अतीश यांनीं विक्रमशिला ख्यातनाम करण्यास जें जें केलें तें इतरत्र क्वचितच एकाद्या आचार्यानें केलें असेल. अकराव्या शतकांत (इ. स. १०३४ ते १०३८) येथील मुख्य आचार्य दीपंकर हे सर्वांचे मुकुटमणि होते. हे 'अतीश' या नांवानेंच जास्त प्रसिद्ध असून अतीश म्हणजेच विक्रमशिला व विक्रमशिला म्हणजेच अतीश असें समीकरण मांडण्यांत येई. यांची कीर्ति इतकी वाढली कीं पुढें नागार्जुन व अतीश यांचीं चित्रें विक्रमशिलेच्या प्रवेशद्वारावर चितारण्यांत आलीं. उद्देश इतकाच कीं विक्रमशिलेंत प्रवेश करण्याअगोदर अतीश यांची मूर्ति विद्यार्थ्यांच्या डोळ्यापुढें यावी. या अतीशांनीं तिबेटमध्यें जाऊन तेंथील धर्माची विस्कटलेली घडी पुनः बसवावी म्हणून तिबेटच्या राजानें केवढा प्रयत्न केला ! शेवटीं त्याला यश येऊन अतीश तिबेटांत गेले व तेथील धर्माची घडी त्यांनीं सुव्यवस्थित बसविली. त्यांनीं तेथें केलेलें काम तिबेटचे लोक कधींहि विसरणार नाहींत. ते वयाच्या ७३ व्या वर्षी तिबेटांतच कालवश झाले. त्यांनीं संस्कृतांत २०० वर ग्रंथ लिहिले असें म्हणतात.[१६]

दीपंकर ऊर्फ अतीश यांचा गौड राजघराण्यांत इ. स. ९८० त जन्म झाला.

१६ Bose : Indian Teachers, p. 84; Dr. Altekar (1944), p. 126.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांचें जन्मस्थान गयेजवळचें विक्रमणिपुर. अतीशांचें पूर्वीचें नांव चंद्रगर्व. आचार्य जेतारिजवळ राहून त्यांनीं वयाच्या २५ व्या वर्षाअगोदर अभ्यासाचा बराचसा महत्त्वाचा भाग संपविला, व उच्च प्रकारच्या अभ्यासाची तयारी करून ठेविली. त्यांनीं धर्म व तत्त्वज्ञान यांचा अभ्यास आरंभिला; हीनयान व महायान या दोनहि विषयांत प्राविण्य मिळविलें; व हें सर्व २५ वर्षें वयाच्या आंत! यावरून त्यांची बुद्धि किती तीव्र असली पाहिजे याची कल्पना येईल. वृद्ध भिक्षूंनाहि जो मान मिळणें कठीण तो त्यांना अवघ्या ३१ व्या वर्षी मिळूं लागला! आचार्य शीलरक्षित यांनीं त्यांना 'दीपंकरश्रीज्ञान' हें नांव देऊन सुवर्णद्वीपाला पाठविलें. तेथें ते १२ वर्षें राहिले. तेथून मगध देशांत परत आल्यावर ते विक्रमशिलेचे मुख्य आचार्य झाले. त्यांना 'धर्मपाल' ही पदवीहि देण्यांत आली. या वेळीं मगध देशाचा राजा नयनपाल हा होता. तिबेटांतील खालावलेल्या बौद्ध धर्माचा उद्धार करण्याकरितां तेथील राजानें अतीशांना वारंवार निमंत्रणें पाठविलीं; पुष्कळ सोनें देऊं केलें; पण ते तेथें जाईनात; कारण विक्रमशिलेची जबाबदारी फारच मोठी होती. शेवटीं त्यांस नेण्याकरितां इ. स. १०३८ मध्यें तिबेटहून खास वकील आला. अतीशांना पाहण्याकरितां तो आला त्यावेळीं एक सभा भरली होती; व मोटमोठे आचार्य आपापल्या जागेवर येऊन बसत होते. या तिबेटी वकिलानें अतीश यांना पाहिलें नसल्यामुळें कोणी मोठा आचार्य आला व सभेकडून त्याचें स्वागत होऊं लागलें कीं हेच अतीश असावे असें त्याला वाटे. त्यानें या प्रसंगाचें सुंदर वर्णन केलें आहे :[१७]

" सकाळीं ८ वाजले व सर्व भिक्षुपंडित सभागृहांत जमूं लागले. एक वृद्ध भिक्षु सर्वांनाच आपापल्या बसावयाच्या जागा दाखवीत होते. मला विद्यार्थ्यांमध्येंच बसविण्यांत आलें. नंतर त्या सभेचे अध्यक्ष आले. दिसावयाला भव्य, पण मुद्रा शांत व गंभीर. येत असतांना सुमेरु पर्वताप्रमाणें वाटत होते ते. मी शेजारील विद्यार्थ्याला विचारलें, 'का हो, हेच का ते अतीश ?' तो म्हणाला, 'हे अतीश यांचे गुरु. यांचें नांव विद्याकोकिल. हे या सभेचे अध्यक्ष आहेत. नंतर अशीच एक दुसरी थोर व्यक्ति आली. मी विचारतांच, मला सांगण्यांत आलें कीं ते आचार्य अतीश यांचे दुसरे गुरु आचार्य नरोप. नंतर मी आचार्य अतीश कोठें आहेत हें

१७ Das : J. A. S. B., I, part 1, 1891, pp. 46–53.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पहात असतां विक्रमशिलेचे राजे आले; व ते एका उच्चासनावर विराजमान झाले. पण आश्चर्य हें कीं लहानथोर, कोणीहि भिक्षु उठून उभे राहिले नाहींत. नंतर आणखी एक आचार्य आले. त्यांचीहि मुद्रा भव्य व शांत होती. सावकाश सावकाश येत होते ते. उदाचा सुवास पसरवीत लहानथोर भिक्षु उठून त्यांना सामोरे गेले. राजेसाहेबहि उठून उभे राहिले. नंतर इतर सर्वच लहानथोर भिक्षु उठून उभे राहिले. या व्यक्तीला एका खास राखीव जागेवर बसविण्यांत आलें. ते वीरवज्र आहेत असें मला सांगण्यांत आलें. बहुतेक सर्व पंडित स्थानापन्न झाल्यावर महाभाग अतीश आले असें मला खुणविण्यांत आलें. तेथें बसलेल्या सर्व पंडितांपेक्षां त्यांची मुद्रा एकदम मनांत भरण्याजोगी दिसली. पाहिल्याबरोबर त्यांच्या पायांवर लोटांगण घ्यावें असें तेथील सर्वच भिक्षूंना वाटे. मग माझी तर गोष्टच काय ! मला वाटूं लागलें, त्यांच्या मुद्रेकडे एकसारखें पहात रहावें. कितीहि पाहिलें तरी डोळ्यांचें समाधान होईना. येत असतांना त्यांची मुद्रा प्रफुल्ल, आनंदी व हंसरी होती. तोंडावर तेज चमकत होतें. त्यांच्या एका कडेला किल्ल्यांचा भला मोठा जुडगा लोंबत होता. खुद्द विक्रमशिलेच्याच नव्हे तर नेपाळ, तिबेट वगैरे ठिकाणाहून आलेल्या लोकांना सुद्धां ते आपलेच आहेत असें वाटत होतें. हास्यमुद्रा व साधेपणा यामुळें त्यांची छाप त्यांना पाहाणाऱ्यावर ताबडतोब पडे. त्यांची रम्य मुद्रा व हंसरें तोंड प्रत्येकाचें मन आपल्याकडे ओढून घेई. अशा प्रकारें अतीशांना त्यांच्या वैभवांत पाहण्याची मला संधि मिळाली. ”

या वकिलाबरोबर अतीश जे तिबेटांत गेले ते पुनः परत आले नाहींत. तेथें त्यांनीं धर्माची विस्कटलेली घडी पुनः बसविली.

विक्रमशिलेची कीर्ति व अब्रू तेथील द्वारपंडितांच्याच हातांत असे; व त्यांनीं ही कीर्ति नुसती जपून न ठेवतां ती एकसारखी वाढविण्याचा प्रयत्न केला. आचार्य जेतारि यांनीं तर किती तरी महान् आचार्य तयार केले. महान् आचार्यांचा आचार्य जेतारि हा केवढा महापंडित असला पाहिजे ! रत्नाकरशान्ति व अतीश हे जेतारीचेच शिष्यवर. विक्रमशिला विहारांत दुसरेहि महान् आचार्य होऊन गेले. त्यांत बुद्धपादज्ञान, वैरोचन, अभयकरगुप्त, तथागतरक्षित, हे प्रसिद्ध पंडित होत. या सर्वांनीं संस्कृतमध्यें ग्रंथ लिहिले आहेत, व त्यांचीं भाषांतरें तिबेटी भाषेंत झालीं आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विक्रमशिलेचें वैशिष्ट्य

नालंदा व विक्रमशिला यांत एक महत्त्वाचा फरक पहावयास मिळतो. तो म्हणजे विक्रमशिला येथें अभ्यास पुरा झाल्यावर विद्यार्थ्यांस पदवी देण्यांत येत असे व त्याकरितां पदवीदान समारंभ होत असे. त्यावेळचा पदवीदान समारंभ व आजच्या विद्यापीठांतील पदवीदान समारंभ यांत तत्त्वतः मुळींच फरक दिसत नाहीं. तेथें राजा पदवी देत असे; आज कुलपति किंवा उपकुलपति पदवीदान समारंभ करतात. विक्रमशिला विद्यापीठांत 'पंडित' ही पदवी देण्यांत येई. राजा महीपालनें आचार्य जेतारि यांस व राजा कनक यानें आचार्य रत्नवज्र यांस 'पंडित' ही पदवी दिली होती.

नालंदाप्रमाणें विक्रमशिला विहारांत निरनिराळ्या इमारती बांधण्यांत आल्या होत्या, व सर्व विहाराभोंवतीं एक तट उभारण्यांत आला होता.

अंतर्गत व्यवस्थेबाबत विक्रमशिला विद्यापीठ नालंदापेक्षां जास्त कार्यक्षम असावें असें वाटतें. नाहीं तर अगदीं थोड्या अवधींत नालंदासारख्या विद्यापीठाला त्यानें निस्तेज केलें नसतें. येथील कामाची योग्य वाटणी येथील घटनानुसार झाली होती व सर्व कामें सहा द्वारपंडितांत वाटण्यांत आलीं होतीं. त्यामुळें येथील सर्व व्यवस्था ठाकठीक होत असे. या सहा द्वारपंडितांवर मुख्य आचार्य बुद्धज्ञानपाद व अतीश यांसारखे सर्वश्रेष्ठ आचार्य असत.

या विद्यापीठांत बौद्ध धर्माच्या शिक्षणावर व विशेषतः तंत्रपद्धतीवर विशेष जोर देण्यांत येई. नालंदा येथें कोणत्याहि एका धर्माला किंवा पंथाला प्राधान्य नसे.

'संस्था म्हणजे ती चालविणाऱ्या व्यक्तीचें किंवा व्यक्तींचें कार्य' असें जर समीकरण मांडतां आलें तर विक्रमशिलेला तें तंतोतंत लागू पडेल. कारण विक्रमशिलेची जी कीर्ति पसरली ती तेथील आचार्यांचीच कीर्ति होय.

या विद्यापीठांतील इमारतींत व इतर ठिकाणच्या इमारतींत एक फरक प्रामुख्यानें दिसण्याजोगा होता. तो म्हणजे येथील इमारतींच्या भिंती नुसत्या मातीचुन्याच्या व म्हणून जड अशा बनलेल्या नव्हत्या; तर त्यांत चैतन्य होतें. विद्यार्थ्यांना हलवून सोडण्याची, त्यांच्यांत उत्साह, कार्यक्षमता, दीर्घोद्योग, चारित्र्य वगैरे गुणांची प्रेरणा करण्याची शक्ति होती. कारण प्रवेशद्वाराच्या भिंतींवर एका

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बाजूस नागार्जुनाची[१८] व दुसऱ्या बाजूस संस्थेची कीर्ति दिगंतीं पसरविणाऱ्या अतीशाचीं चित्रें काढण्यांत आलीं होतीं. हीं दोन चित्रें पाहिल्याबरोबर विक्रमशिलेच्या आरंभापासून तों तिची कीर्ति सर्वत्र विस्तार पावली तोंपर्यंतचा सर्व इतिहास पाहणाऱ्याच्या डोळ्यांपुढें उभा राही. विद्यार्थ्यांना तर त्यामुळें केवढा तरी उत्साह वाटे. निरनिराळ्या आकांक्षा, ध्येयें वगैरे त्यांच्या मनासमोर मूर्तिमंत उभीं रहात व आपणहि तसें होण्याचा प्रयत्न करावा असें त्यांना वाटे.

नालंदाप्रमाणेंच विक्रमशिलेचा ग्रंथसंग्रहहि फारच मोठा होता. हजारों ग्रंथ यांत सांठविलेले होते. या ग्रंथसंग्रहामुळेंहि विक्रमशिलेच्या कीर्तींत भर पडली. दुर्दैवानें येथील ग्रंथभांडार जाळण्यांत आलें; व विक्रमशिलेबद्दल जी माहिती आज आपणांस मिळूं शकली असती तिचीं साधनें नाहींशीं झालीं.

बौद्ध भिक्षूंच्या पायापाशीं शिकावयास आलेल्या तिबेटी विद्यार्थ्यांकरितां येथें एक स्वतंत्र अतिथिगृह असे.[१९]

विक्रमशिलेचा नाश

कोणत्याहि वस्तूचा नाश तीन प्रकारें होऊं शकतो. एक तर स्वतःच्या मूर्खपणामुळें किंवा अज्ञानामुळें मनुष्य पुष्कळ वेळां आपला नाश आपणच करून घेतो. त्याच्या अधोगतीला सुरवात होते व शेवटीं त्याचा नाश होतो. दुसरें, कांहीं बाह्य अनिवार्य अशा नैसर्गिक किंवा दैवी गोष्टींमुळेंहि मनुष्याचा नाश होतो. साथीचा रोग आला, धरणीकंपादि गोष्टी घडल्या, म्हणजे दैवालाच आपण दोष देतों. कांहीं एक दोष नसतां बिहार-क्वेट्टांतील धरणीकंपानें हजारों लोक मृत्युमुखीं पडले. तिसरें, आपणापेक्षां जास्त शक्ति व क्रौर्य असणाऱ्या शत्रूकडून नाश होतो. तक्षशिला, नालंदादि महान् विद्यापीठें हूणादि रानटी जातींच्या अत्याचाराला बळी पडलीं. मुसल्मानांनीं नालंदाच्या सर्व इमारती पाडल्या व जमीनदोस्त केल्या, विद्वान् पंडितांना ठार केलें, ग्रंथालय जाळून टाकलें व अस्तित्वाचीं साधनेंच नाहींशीं केलीं. विक्रमशिलेचाहि नाश या तिसऱ्या प्रकारें म्हणजे बाह्य शत्रूमुळेंच झाला. या विद्यापीठाच्या नाशामुळें बौद्ध धर्महि हिंदुस्थानांतून नामशेष झाला. येथून

१८. S. C. Das : Indian Pandits in Tibet, JBTS, i, I–II.
१९. Das: Indian Pandits in the Land of Snow, p. 58.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पळून गेलेले कांहीं भिक्षु तिबेट, कांभोज, सिलोन, सुमात्रा वगैरे ठिकाणीं गेले व त्यांनीं बौद्ध धर्माची जोपासना केली. मुसलमानांनीं १२०३ सालीं विक्रमशिलेचा नाश केला तेव्हां तेथें मुख्य आचार्य शाक्यश्रीभद्र होते. या प्रसिद्ध विद्यापीठाचा नाश प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहण्याचें दुर्भाग्य त्यांच्या वाट्याला आलें ! बख्त्यार खिलजीनें जो या विद्यापीठाचा नाश केला त्याचा वृत्तांत 'तबाकात्–इ–नासिरी '[२०] या ग्रंथाच्या मुसलमान इतिहासकर्त्यानें लिहून ठेवला आहे. तो म्हणतो : " येथील बहुतेक लोक ब्राह्मण होते. त्या प्रत्येकानें मुंडण केलें होतें. त्या सर्वांना ठार करण्यांत आलें. हिंदु धर्मावर लिहिलेले पुष्कळ ग्रंथ तेथील ग्रंथालयांत होते. त्यांचा अर्थ समजावून घेण्याचा प्रयत्न त्या मुसलमानांनीं केला; पण त्यांना तो न समजून तेथील ब्राह्मणांस त्यांनीं ठार केलें. नंतर त्या मुसलमानांस कळून आलें कीं, आपण नाश केलेला किल्ला नसून ती एक पाठशाळा होती. "

अशा प्रकारें एका महान् विद्यापीठाचा ग्रंथ आटोपला.

---

२०. Dr. Altekar, p. 128; Dr. R. K. Mookerji : Ancient Indian Education, p. 594; Tabakat–I–Nasiri [Major H. C. Raverty (1881), i. 552.].

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४ : उदन्तपुरी महाविहार*

[सुमारें इ. स. ७०० ते इ. स. १२००]

विहारांची लोकप्रियता

हिंदुस्थान व हिंदुस्थानाबाहेर जे असंख्य विहार स्थापण्यांत आले त्यांना गरीब, श्रीमंत सर्वांची मनापासून मदत होत असे. श्रीमान् वणिक्वर्ग व राजे लोक यांची तर त्यांना फारच मदत झाली. अगोदर बुद्धदेवाबद्दल लोकांच्या मनांत आदर. त्यांतून अशोकासारख्या सम्राटांनीं बुद्ध धर्माचा प्रसार सर्व जगभर केला. तेव्हां-पासून तर प्रत्येक व्यक्तीचें, राजे लोकांचें व एकंदर राष्ट्राचें मन त्या धर्माकडे झुकूं लागलें. विहार म्हणजे या धर्मप्रसाराचें केंद्रस्थान, ज्ञानाचें आगर. तपश्चर्या, त्याग व सदाचार यांचे धडे येथेंच घ्यावे. त्यामुळें लोकांना विहारांबद्दल आदर व प्रेम वाटे. शिवाय येथें हजारोंनीं भिक्षु येणार; आपली ज्ञानवृद्धि करणार; सदाचाराचे, त्यागाचे व तपश्चर्येचे पाठ घेणार. अर्थात् हे विहार म्हणजे लहानापासून वृद्धांपर्यंत सर्वांना शिकण्याचें, ज्ञानसाधनेचें स्थान झाले. या विहारांची पुढें योग्य पायावर उभारणी होऊन थोर थोर विद्वान् लोक येथें उत्पन्न होऊं लागले व विहार म्हणजे विद्यापीठें बनलीं.

विहारांची स्थापना अगोदर जैन व बौद्ध संप्रदायांचा प्रसार करण्याकरितां झाली. जातिभेद नष्ट करावेत, लोकांच्या धर्माच्या कल्पना विकृतावस्थेप्रत गेलेल्या त्या नाहींशा कराव्यात, संसारांतील दुःखें दूर कशीं करतां येतील त्याचें शिक्षण द्यावें, सदाचार, सत्कर्म व सद्ज्ञान यांवर दृष्टि ठेवून लोकांस वागावयास शिकवावें, शुद्धाचरण, संन्यास व अहिंसा हे गुण लोकांच्या अंगीं पूर्णपणें बाणतील असें करावें, साधारण जनसमूह याला सहज करतां येण्याजोग्या गोष्टी म्हणजे सत्यपालन, प्रामा-णिकपणाचें आचरण, निष्पाप रहाणी, आत्मक्लेशाची संवय यांचे त्यांना पाठ द्यावे, हे विहार स्थापण्याचे हेतु; व यामुळेंच विहारांचें महत्त्व वाढलें. विहाराधिपति व

* S. K. Das : The Educational System of the Ancient Hindus.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विहारांतील सर्व कार्यकर्ते यांच्या अंगीं वरील सर्व गुण पूर्णपणें उतरलेले असल्यामुळें त्यांची छाप सामान्य जनतेवरच नाहीं पण धनिक वर्ग व राजे लोक यांवर पडली व त्यांचे अनुयायी लाखोंनीं होऊं लागले. जैन व बौद्ध आचार्यांच्या मनांत आलें असेल कीं असे विहार शेंकडोंनीं, हजारोंनीं कां निघूं नयेत ? त्या दृष्टीनें विहारांची स्थापना, रचना, व्यवस्था त्यांनीं ठरविली असेल. अशा आचार्यांच्या सभा भरून सर्व मतानें हे नवीन संप्रदाय जारी करतां यावे म्हणून निरनिराळे उपाय सुचविले गेले व त्यांची अंमलबजावणी करण्याचें काम सुरू झालें. अशा प्रकारची एक निर्णायक सभा सौराष्ट्रांतील वलभी विहारांत बोलाविण्यांत आली होती त्याबद्दल 'वलभी विद्यापीठ' या प्रकरणांत आपणांस वाचावयास मिळेल. बौद्ध परिषदाहि याकरितां निरनिराळ्या ठिकाणीं बोलावण्यांत येत. अशोक राज्यावर आल्यानंतर पाटलीपुत्र येथें तिसरी बौद्ध परिषद् भरविण्यांत आल्याचा उल्लेख महावंसांत आहे.[1] अशा प्रकारें शेंकडोंनीं, हजारोंनीं विहार उघडावयाचे तर त्याला योग्य व अधिकारी विहाराधिपति पाहिजेत व असे विहाराधिपति हजारांनीं, लाखांनीं पाहिजेत. त्यांचें शिक्षणहि असें करून घेतलें पाहिजे कीं आजूबाजूच्या कोणत्याहि प्रथितयश माण-सापेक्षां त्यांचेंच वजन जास्त पडावें. अशा प्रकारचा शिक्षणक्रम आंखण्यांत आला; त्यांत निरनिराळ्या विषयांची भरती करण्यांत आली. कारण इतकेंच कीं विहारा-धिपति पूर्ण ज्ञानी व्हावा; अशी एकहि ज्ञात गोष्ट राहूं नये कीं जी त्याला माहीत

---

१. महावंस, ५.२८० (१२. १–८) यांत पुढील माहिती देण्यांत आली आहे : पाटलीपुत्र येथें तिसरी परिषद् भरल्यानंतर तेथून मोग्गलिपुत्र तिस्स ऊर्फ उपगुप्त या त्याच परिषदेच्या अध्यक्षानें जगाच्या निरनिराळ्या भागांत निरनिराळ्या थेरांना (भिक्षूंना) धर्मप्रचार करण्याकरितां पाठविलें. त्यांत मज्झान्तिक यांस काश्मीर व गांधार येथें, महारक्षित यांस यावनी देशांत, विशेषतः बॅक्ट्रियास, मज्झिम यांना हिमालयांतील प्रदेशांत, धर्मरक्षित (हा ग्रीक मनुष्य असावा) यांना अपरान्त (कोंकण) प्रदेशांत, महा-धर्मरक्षित यांना महाराष्ट्रांत, महादेवांना महिषमंडळांत; रक्षित यांना वनवासी देशांत, शोण व उत्तर यांना सुवर्णद्विप (रंगूनजवळ) येथें, महेन्द्र, रिष्ट्रिया, उत्रिय, शंबल, भद्रसार यांना लंकेला याप्रमाणें पाठविण्यांत आलें.

cf. R. K. Mookerji : Men and Thought in Ancient India, (1924), p. 120.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहीं. नालंदा विहाराधिपति शीलभद्र यांच्याबद्दल हुएनत्संगानें लिहून ठेविलें आहे कीं असा एकहि विषय नव्हता कीं जो शीलभद्र यांना माहीत नव्हता. अशा प्रकारचे अधिकारी शिक्षक निरनिराळ्या विहारांना लाभल्यामुळेंच त्या त्या विहारांची प्रतिष्ठा वाढली. हे असे अधिकारी विहाराधिपति तयार करण्याचे कारखाने मगध देशांत सुरू झाले. कारण हाच देश म्हणजे 'जिन' महावीर व महात्मा गौतम बुद्ध यांची तपोभूमि. त्यांची ती कर्मभूमि. नालंदा, विक्रमशिला, उदन्तपुरी वगैरे विहार म्हणजे हे अधिकारी उत्पन्न करण्याचे फारच मोठे कारखाने. मग येथें दूरदूरच्या देशपरदेशांतून हुएनत्संगासारखे जाडे पंडित भयंकर हाल सोसूनसुद्धां आल्यास आश्चर्य नाहीं. अत्यंत विद्वान् पंडित म्हणून यावें व या विद्यापीठांचें शागीर्द बनावें–किती विचित्र घटना ! "आमचें केवढें भाग्य कीं येथील आचार्यांच्या हाताखालीं आम्हांस शिकावयास मिळालें" ही या परदेशी पंडितांची भाषा म्हणजेच या विहारांच्या उत्कृष्टतेची साक्ष. जोंपर्यंत असे श्रेष्ठ प्रकारचे पंडित तयार करण्याचे कारखाने सुरू होते तोंपर्यंत जगांतील विहार फोंफावले. हे कारखाने उध्वस्त केले गेले व जगांतील विहाराधिपति उत्पन्न करण्याचें काम थांबलें. विहार बंद पडूं लागले. विहारांना योग्य, कार्यक्षम, ज्ञानी माणसें मिळेनाशीं झालीं. अर्थात् जगांतील लोकांची सदाचार, सत्कर्म, सद्ज्ञान, अहिंसा, संन्यस्त वृत्ति यांबद्दलची शिकवण बंद झाली. जैन धर्म व विशेषतः बौद्ध धर्म मागें पडले. होतें तें नव्हतें झालें. आजच्या यांत्रिक युगांत कारखाने उध्वस्त झाल्याबरोबर त्यांचें कार्य थांबतें, मालपुरवठा नाहींसा होतो व जिकडे तिकडे अनावस्था माजते, हें सर्वांच्या चांगलें परिचयाचें झालें आहे. तसेंच नालंदा, विक्रमशिला, उदन्तपुरी यांच्या नाशानंतर झालें. नालंदा, विक्रमशिला, उदन्तपुरीसारखे विहाराधिपति उत्पन्न करण्याचे कारखाने पुनः हिंदुस्थानांत जर सुरू झाले तर एक अर्धशतकाच्या आंत आजची हिंदी संस्कृति सर्व जगभर पसरेल, आपल्या आकांक्षा पूर्ण होतील व जिन, बुद्ध, येशू व गांधी यांच्या कार्यांत अखंडिता राहील.

नालंदासारख्या विहारांनीं किती विहार उत्पन्न केले याची कल्पना आज सामान्य जनतेस असणें शक्य नाहीं. ती पुढील माहितीवरून येऊं शकेल. या विहारांनीं प्रत्यक्ष हिंदुस्थानांत किती विहार स्थापले व त्या त्या विहारांनीं काय काय कामगिरी केली हें सांगण्याअगोदर हिंदुस्थानाबाहेर या विहारांनीं काय काम केलें हें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पहिल्यानें दाखविलेलें बरें. हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीपलीकडून सुरवात करतां तक्षशिलेच्या पलीकडे अफगाणिस्तानापासून चीनपर्यंत हुएनत्संगाला तीन हजारांवर विहार माहीत होते; व नुसत्या उद्यान या महायानपंथाच्या ठिकाणीं १४०० विहार व १८००० भिक्षु होते.[२] यावरून नुसत्या एका दिशेला परदेशांत भारतांतून किती विद्वान् भिक्षु गेले असतील याची स्पष्ट कल्पना येते. पण हे विहार दक्षिणेस सीलोन व प्रशांत महासागरांतील अत्यंत दूर असलेल्या अशा बेटांतहि पसरले होते याबद्दल पुरावे सांपडूं लागले आहेत. फिजि बेट ऑस्ट्रेलिया खंडाच्याहि कितीतरी पूर्वेस, हिंदुस्थानपासून पांच सहा हजार मैलांहूनहि जास्त दूर! असें असतांना या बेटांत बौद्ध धर्माच्या खुणा सांपडतात हें कसें?[३] इंडोनेशिया, पॉलिनेशिया या सर्व भागांत बौद्ध धर्माचे संस्कार खात्रीनें झाले असावेत.[४] व हे संस्कार बौद्ध भिक्षूंनीं तेथें जाऊन बौद्ध धर्माचा तेथें प्रचार केल्याशिवाय कसे होणार? पाश्चात्य विद्वानांचें व संशोधकांचेंहि हेंच मत आतां स्थिर होऊं लागलें आहे.[५]

पण हजारों मैल दूर बौद्ध धर्माचा प्रचार केव्हां व कसा झाला? तो कोणत्या मार्गानें झाला? तो प्रचार कोणी केला? याबद्दलचें संशोधनहि खात्रीनें भारताच्या गतकालच्या कीर्तींत भर टाकील. अर्थात् हा धर्मप्रचार करणारे भिक्षुच असणार व ज्या ठिकाणीं अशा प्रकारचे धाडशी प्रचारक भिक्षु तयार करणारीं विद्यापीठें असत तेथूनच पाठविले जात असणार. विक्रमशिलेचे आचार्य अतीश यांना सुवर्णद्वीपाला नाहीं का पाठविलें? अतीश म्हणजे पहिल्या प्रतीचे आचार्य. पण तेहि सुवर्णद्वीपांत १२ वर्षें राहिले. असे कितीतरी आचार्य निरनिराळ्या ठिकाणीं व दूरदूरच्या प्रदेशांत पाठवण्यांत येत. त्यांना कसली भीति वाटत नसे; किंवा

---

२. Dr. R. K. Mookerji, : Ancient Indian Education (London, 1947), p. 509.
३. Myths from Melanesia and Indonesia (The Gresham Publishing Company, Ltd.), p. 90.
४. Ibid, p. 300 et Seq.
५. Myths and Traditions of the South Sea Islands (The Gresham Publishing Company, Ltd.), pp. 66, 67, 217, 340, etc.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घराहून इतका दूर कसा जाऊं म्हणून त्यांच्या मनांत संमोह उत्पन्न होत नसे. जिकडे विहार पाठवील तिकडे बेधडक जाणें ते आपलें कर्तव्य मानीत. विश्व-कल्याण, जनसेवा, कर्तव्य हींच त्यांच्यापुढें ध्येयें. स्वार्थ कधींहि त्यांच्या या कामाच्या आड येत नसे. या आचार्यांबरोबर इतरहि बरेच भिक्षु जात असावे. त्यांनींच जगाच्या निरनिराळ्या भागांत बौद्धधर्माचा व सदाचार, सत्कर्म व सद्ज्ञान यांचा फैलाव केला. या प्रशांत महासागराच्या इतक्या दूरच्या भागांत मात्र हे भिक्षु केव्हां गेले असावे हें आपण या प्रकारणाच्या शेवटीं शेवटीं पाहणार आहोंत.

उदन्तपुरीची स्थापना : उदन्तपुरीचे पालक पाल राजे

उदन्तपुरी महाविहार हा वर सांगितलेले श्रेष्ठ प्रकारचे भिक्षु तयार करण्याचा एक कारखानाच होता असें म्हटल्यास हरकत नाहीं. कारखाना म्हटल्यानें बिचकून जाण्याचें कांहीं एक कारण नाहीं. 'कारखाना' या कल्पनेंतील निर्जीवपणा वगळ-ल्यास व त्याच्यांतील यांत्रिक जीवन गाळल्यास कारखाना हाच शब्द नालंदा, विक्रमशिला, उदन्तपुरी यांना जास्त लागू पडेल. आजच्या युगांतील अद्ययावत् कारखाने उत्तम प्रकारें आपल्या गरजा भागवूं शकतात. त्याप्रमाणें बौद्ध धर्माच्या प्रचाराची गरज उदन्तपुरीसारखे विहारच भागवूं शकले. जसजशी या विहाराची भरभराट होऊं लागली तसतसें विद्यार्थी, इतर लोक व राजे यांचें लक्ष इकडे वेधलें गेलें. ज्याप्रमाणें गुप्त राजांनीं नालंदा म्हणजे आपलेंच विद्यापीठ म्हणून आपलेपणानें तीस मदत केली, त्याचप्रमाणें बंगालच्या पाल राजांनीं उदन्तपुरीस मदत केली. गुप्त राजे वास्तविक वैदिक धर्माचे व नालंदा बौद्धधर्मीय; असें असतांनासुद्धां गुप्त राजांमुळें नालंदा इतक्या प्रसिद्धीस आली. पण पाल राजे म्हणजे केवळ बौद्धधर्मीय. तेव्हां उदन्तपुरीस या पाल राजांनीं मनोभावें मदत करून उदन्तपुरीचें नांव सर्वतोमुखीं केलें असल्यास आश्चर्य नाहीं.

पाल राजे हे सूर्यवंशी क्षत्रिय. त्यांचा इतिहास ताम्रपटांतून पहावयास मिळतो. आठव्या शतकांत कनोजची साम्राज्यसत्ता नष्ट होत चालली. तेव्हां बंगाल्यांतील सर्व सभासदांनीं गोपाल या सरदारास आपला राजा केलें. हा फार शूर, मुत्सद्दी, व ज्ञानदानाबद्दल आस्था बाळगणारा होता.[६] या गोपाळ राजानेंच उदन्तपुरीची

६. महाराष्ट्रीय ज्ञानकोश, वि. १७, पान १०६.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्थापना केली, असें म्हणतात.[७] ह्या पाल घराण्यांत ११।१२ राजे झाले व हें घराणें आठव्या शतकापासून अकराव्या शतकापर्यंत फारच जोरांत होतें. याच कालांत उदन्तपुरीची भरभराट झाली. याचा परिणाम असा झाला कीं, उदन्तपुरी विहार हा नुसता विहारच न राहतां तो आतां महाविहार बनला.

उदन्तपुरी हा गांव नवद्वीप गांवाहून फार दूर नव्हता. नवद्वीप संस्कृत ज्ञानाकरितां फार प्रसिद्ध होतें व तेथें वैदिक धर्म प्रचलित होता; पण उदन्तपुरी हें पालीज्ञानाकरितां प्रसिद्ध असून तेथें बौद्ध धर्माची दीक्षा देण्यांत येई. बौद्ध धर्माच्या हीनयान पंथाचा या ठिकाणीं जोरानें प्रचार होई. हा कालच असा होता कीं जिकडे तिकडे बौद्ध धर्माची चलती होती व वैदिक धर्माची उपेक्षा केली जात होती. याचमुळें नवद्वीप, काशी वगैरे वैदिक धर्माचीं ठिकाणें या काळांत प्रामुख्यानें चमकूं शकलीं नाहींत. बौद्ध विहारांतील आचार्यांप्रमाणें अत्यंत देदीप्यमान हिरेहि वैदिक विद्यापीठाच्या ठिकाणीं चमकले नाहींत.

उदन्तपुरी विहार वास्तविक नालंदा, विक्रमशिला या विद्यापीठांच्या मानानें फारच ल्हान. पण येथेंसुद्धां हजार हजार विद्यार्थी[८] शिकावयास असत. हे विद्यार्थी येथें शिक्षण घेत, शिक्षण देत. ते लोकसेवा करीत. येथील आचार्यांना आपल्या विद्वत्तेमुळें व चारित्र्यामुळें धर्माचा प्रसार करणें सोपें जाई. हे भिक्षु आचार्य लोकांना औषधपाणी देऊन, त्यांची विचारपूस करून, त्रस्त लोकांना शांत करून त्या सर्वांना आपलेसें करून घेत व बौद्ध धर्माबद्दल लोकांच्या मनांत आदर उत्पन्न करीत.

महीपाल राजा राज्य करीत असतांना (इ. स. ९७६–१०२६) उदन्तपुरीची भरभराट कळसास पोहोचली होती. या वेळीं विद्वान् भिक्षूंचा फारच मोठा जमाव या ठिकणीं होता. एकंदर भिक्षूंची संख्या यावेळीं ६००० वर गेली होती.[९] हे सर्व भिक्षु फारच कार्यक्षम, धाडसी व सद्धर्म पाळणारे होते.

---

७. Dr. Sankalia : The University of Nalanda, p. 189;
S. K. Das : The Educational system of the Ancient Hindus, (1930) p. 381.

८. Phanindranath Bose : Indian Teachers of Buddhist Universities, p. 157.

९. Mazumder : The Hindu History, (B.C. 3000–1200 A.D), p. 831.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उदन्तपुरी महाविहारांतील थोर आचार्य

उदन्तपुरी महाविहारांत फार थोर थोर आचार्य होऊन गेले. येथेंच शान्तरक्षित या प्रसिद्ध बौद्ध आचार्यानें अतीश याला १९ व्या वर्षी दीक्षा दिली. हाच अतीश पुढें अद्वितीय पुरुष म्हणून प्रसिद्धीस आला व त्यानें तिबेटांत बौद्ध धर्माची विस्कटलेली घडी पुनः नीट बसविली. या अतीशाबद्दल माहिती विक्रमशिला प्रकरणांत दिली आहे. येथूनच नवव्या शतकांत रत्नाकरशान्ति हे दुसरे प्रसिद्ध बौद्ध आचार्य सिंहलद्वीपाच्या राजाच्या विनंतीवरून सिंहलद्वीपास गेले. प्रभाकर हे येथील फारच प्रसिद्ध पंडित होऊन गेले.[१०] अभयकरगुप्त हे येथील एकदां विहाराधिपति होते व त्यांची कीर्ति फार दूरवर पसरली होती.

उदन्तपुरीचा ग्रंथसंग्रह

नालंदा व विक्रमशिला यांच्याप्रमाणें येथेंहि फारच मोठा ग्रंथसंग्रह होता. प्राचीन कालीं जेव्हां आजच्यासारखे छापखाने नव्हते, ग्रंथावर ग्रंथ प्रकाशले जात नव्हते, ग्रंथ विकत घेणें सामान्य जनतेच्या आवाक्याबाहेर होतें, अशा वेळीं ग्रंथाला जी किंमत असे, जें महत्त्व असे, तें आजच्या ग्रंथांना नाहीं. ग्रंथ ही धूळ खात पडणारी वस्तू त्यावेळीं नव्हती; किंवा त्यांचा उपयोग लहान मुलांना चित्रें दाखविण्याकडे, दोन घटका मनरंजन करण्याकडे किंवा रद्दीवाल्याला देऊन टाकण्याकडे केला जात नव्हता. ग्रंथ हा 'ग्रंथराज' असे व देवाप्रमाणें तो पूज्य मानला जाऊन त्याचें स्थानहि देवाजवळच असे. त्याची योग्य निगा राखली जाई. त्याची पूजा करीत व त्याचें पठन करीत. शोभेकरितां कपाटांत ठेऊन देत नसत. ग्रंथ स्वतः लिहून त्याची नकल करावी लागे. नवीन ग्रंथ फारच काळजीपूर्वक भूर्जपत्रावर लिहिले जात, व त्यांचें जतन केलें जाई; म्हणूनच हजारों वर्षांपूर्वींचे ग्रंथ आजसुद्धां आपणांस वाचावयास मिळूं शकतात. पण अशा प्रकारचे लाखों ग्रंथ त्या काळीं ग्रंथसंग्रहालयांत असत. नालंदाच्या ग्रंथसंग्रहालयाच्या तीन इमारतींत (त्यांतील एक नऊ मजली व दुसऱ्या दोन सहासहा मजली) किती ग्रंथ रहात असतील याची कल्पना करा. पूर्वीच्या विद्यापीठांतून इतके ग्रंथ होते ही कल्पनाहि कित्येकांस पटणार नाहीं; व याबद्दल चिनी पंडितांनीं जर लिहून ठेवलें

१०. Dr. R. K. Mookerji : Ancient Indian Education, p. 596.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नसतें तर ही गोष्ट अशक्यच वाटली असती. उदन्तपुरी येथेंहि फारच मोठें ग्रंथ-संग्रहालय होतें; पण बख्त्यार खिलजीनें नालंदा व विक्रमशिला येथील ग्रंथभांडार ज्याप्रमाणें जाळून टाकले त्याचप्रमाणें उदन्तपुरी येथील ग्रंथसंग्रहालयहि त्यानें ११९९ मध्यें बेचिराख केलें.[११] त्यामुळें उदन्तपुरी विहारासंबंधानें जितकी माहिती आपणांस मिळावयास पाहिजे तितकी मिळूं शकत नाहीं.

बौद्ध धर्माच्या या सर्व विहारांतून एक कौतुकास्पद गोष्ट पहावयास मिळते; ती म्हणजे सहिष्णुता. कोणत्याहि धर्माबद्दल, कोणत्याहि पंथाबद्दल या विहारांत द्वेषभाव नसे. यामुळेंच बौद्धधर्मीय विहारांतून वैदिक ग्रंथ अभ्यासिले जात, त्याचप्रमाणें जैन ग्रंथहि अभ्यासिले जात. ग्रंथालयामध्येंहि सर्व धर्मांचें, सर्व पंथांचें वाङ्मय जतन करून ठेविलें जाई. हें प्रसिद्ध ग्रंथसंग्रहालय जाळून टाकण्यांत आलें नसतें तर प्राचीन भारताच्या इतिहासाचीं साधनें शोधून काढण्यास इतरत्र जावें लागलें नसतें.

उदन्तपुरी महाविहाराचा तट

नालंदा व विक्रमशिला विहारांप्रमाणें उदन्तपुरी विहाराच्या आजूबाजूला एक मोठा तट असे. या तटानें किती तरी गोष्टी साधल्या जात. एक तर नवीन भिक्षूंवर या तटामुळें नियंत्रण रहात असे, व रात्रीं अपरात्रीं ते विहारांतच असतात किंवा बाहेर भटकत राहतात याची जाणीव मुख्य आचार्याला होत असे. रेसिडेन्शियल युनिव्हर्सिटीला अशा प्रकारच्या तटाची अत्यंत आवश्यकता असते. विशेषतः चारित्र्यसंरक्षण हें जेथें एक महत्त्वाचें अंग असतें तेथें अशा प्रकारचा तट फार उपयोगीं पडतो. भिक्षूंचें आयुष्यच नियमानें बद्ध; तेव्हां एखादा तट विहारास असल्यास त्यांस तो जाचक वाटण्याचें कांहींहि कारण नसणार. पण गांव तेथें महारवाडा. सर्व चांगल्या फळांना एखादें नासकें फळ सहज बिघडवूं शकतें. गोड दुधांत मिठाचा एकादा खडा दूध नासविण्यास पुरेसा होतो. तेव्हां अशा भिक्षूंमध्यें एकादा जरी उच्छृंखल वृत्तीचा विद्यार्थी आला तर त्याचा परिणाम इतर भिक्षूंवर होणें अशक्य नाहीं. वाईटाकडे मनुष्याची प्रवृत्ती लवकर वळावते. अशा विद्यार्थ्यांस विहाराचा तट जाचक वाटण्याचा संभव.

---

११. Mazumder : The Hindu History (B. C. 3000–1200 A. D.) p. 831,

६

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या तटापासून दुसरा एक फायदा होत असावा. बाहेरून कोणीहि परका इसम विहारांत प्रवेश करूं शकत नसे. त्यामुळें विहाराच्या अंतर्गत व्यवस्थेंत कोणत्याहि प्रकारचा बिघाड होऊं शकत नसावा.

या तटांना एक प्रकारच्या किल्ल्याचेंच स्वरूप आल्यामुळें हा किल्लाच आहे असें समजून बख्त्यार खिलजीचे लोक फसले असें एका मुसलमान इतिहास-कारानें लिहून ठेविलें आहे.[१२]

उदन्तपुरीचा नाश

बौद्ध धर्माचें दुर्दैव म्हणूनच बख्त्यार खिलजीनें नालंदा व विक्रमशिला यांप्रमाणें उदन्तपुरीचाहि नाश केला. विद्वान् व आचारवान् भिक्षूंना जाळून टाकण्यांत आलें; ग्रंथसंग्रहालयहि जाळून टाकलें; उदन्तपुरीचा विध्वंस केला. या वेळीं ६००० भिक्षु येथें होते. अशा वेळीं ज्या भिक्षूंना पळून जाणें शक्य होतें, त्यांना पळण्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. निःशस्त्र पंडित कडव्या शस्त्रधारी रानटी लोकांपुढें काय करणार ? ज्या नामांकित आचार्यांचा जीव वाचला ते येथून हिंदुस्थानांतील निरनिराळ्या विहारांत गेले असावेत व त्यांनीं आपली दुःखद वार्ता तेथें सांगितली असावी. जास्त विचारवान् आचार्यांनीं सभा भरवून विचार केला असेल कीं आपल्या विहारांचा नाश कोणी केला ? त्यांनीं तो कां केला ? आणि त्यांच्या एकदम लक्षांत आलें असणार कीं, नाश करणारे लोक हिंदुस्थानाबाहेरचे आणि नाश करण्याचें कारण केवळ त्यांचा रानटीपणा, त्यांचें अज्ञान, त्यांची असहिष्णुता. लगेच त्यांनीं ठरविलें असेल, यापुढें अशा प्रकारचे अत्याचार थांबविण्यास एकच उपाय करावयास पाहिजे. तो म्हणजे या गोष्टीचा बदला घेणें; पण हा बदला हिंसेच्या मार्गानें न घेतां त्यांना ज्ञानी करून, सद्धर्म, सत्कर्म व सद्ज्ञान यांचे त्यांना पाठ देऊन; त्यांची एकंदर संस्कृतीच बदलून. त्यांचा रानटीपणा काढून टाकायला याशिवाय दुसरा मार्गच कोणता ? झालें. त्यांनीं ठरविलें असेल कीं या लोकांना रानटी अवस्थेंतून काढून त्यांच्यांत माणुसकी उत्पन्न करणें हेंच

१२. Tabakat–i-Nasiri (Raverty) I, p. 552.
S. K. Das : The Educational System of the Ancient Hindus, p. 382.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपलें या पुढचें काम. हें एकदां निश्चित झाल्यावर जेथें जेथें रानटी जात आहे तेथें प्रत्येक भिक्षूनें प्रत्यक्ष जाऊन बुद्धदेवाची शिकवण त्यांना द्यावयाची असें त्या सभेंत त्यांनीं ठरविलें असेल.[१३] असें नसतें तर सर्व नामांकित भिक्षु हिंदुस्थानांतच राहिले असते. पण ते सर्व गेले कोठें? तर कोणी मंगोलियांत, कोणी तिबेटांत, कोणी ब्रह्मदेशांत, व बाकीचे सिंहलद्वीपांत व प्रशांत महासागरांतील बेटांत. इतकें हें दिव्य करण्यास त्यांना दुसरें कांहीं कारण असावें असें वाटत नाहीं.

बौद्ध धर्माचा हिंदुस्थानाबाहेर जो इतका मोठा प्रसार झाला तो कसा झाला याबद्दल प्रत्येकाला प्रश्न पडणें साहजिक आहे. बौद्ध धर्माचा जन्म हिंदुस्थानांत. तेव्हां तो हिंदुस्थानांतच जास्त दिसावयास पाहिजे होता. असें असतांना तो चीन, जपान, प्रशांत महासागरांतील बेटें येथें जो पसरला त्याला कारण असेंच कांहीं तरी झालें असलें पाहिजे. आपण बोलतांना सहज बोलून जातों कीं हिंदु धर्माची जोरानें वाढ होऊं लागली म्हणून हिंदुस्थानांतून बौद्ध धर्म नाहींसा झाला. पण हें कारण मुळींच बरोबर दिसत नाहीं. हिंदुस्थानाबाहेर बौद्ध धर्माचा प्रसार व्हावयाला जीं कारणें झालीं त्यांत एक कारण म्हणजे विक्रमशिला, उदन्तपुरी वगैरे ठिकाणांहून बौद्ध भिक्षूंचें धर्मप्रसारार्थ निरनिराळ्या ठिकाणीं जाणें. उदन्तपुरीहून पळून गेलेल्या श्रेष्ठतम बौद्ध आचार्यांच्या विचारांचाच हा परिणाम होय असें खात्रीनें वाटतें. रानटी जातीला हिंसेपासून दूर करणें, त्यांच्यांत मानवता उत्पन्न करणें, त्यांना सेवाधर्म शिकविणें हा विचार करूनच या आचार्यांनीं त्यांच्या नेहमींच्या धाडसी वृत्तीनें या रानटी भागांत प्रवेश केला असेल व तेथें बौद्ध धर्माचा उपदेश केला असेल. त्याचेंच फळ आज बौद्ध धर्माला मिळत असलेला मान होय.

झालें. वाईटांतून चांगलें पुष्कळ वेळां निघतें तें उदन्तपुरी येथें घडलें. उदन्तपुरी मुसलमानांनीं नाहींशी केली, पण उदन्तपुरीनें विषांतून अमृत उत्पन्न

---

१३. पण मग सर्व महत्त्वाचे भिक्षु हिंदुस्थानाबाहेर गेले, तर हिंदुस्थानांतील विहार कोणी चालवावयाचे त्याचासुद्धां विचार त्यांनीं केला असणार. शक्य आहे तोंपर्यंत राहिलेल्या भिक्षूंनीं हे विहार चालवावे, नाहींतर बुद्धदेव पाहून घेईल. बुद्धदेवाच्या भूमींत रानटीपणा उत्पन्न होऊं शकणार नाहीं; तेव्हां या भूमीबद्दल काळजी नको.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केलें. फिनिक्स पक्ष्याप्रमाणें उदन्तपुरीनें अग्नींत स्वात्मार्पण केलें, पण जगांत इतरत्र ती अधिक तेजानें प्रगट झाली. हेंच उदन्तपुरीचें वैशिष्टय.

हिंदुस्थानबाहेर बौद्धधर्मप्रसार

मगध देशांत ज्या धर्माचा जन्म झाला व अखिल हिंदुस्थानांत ज्याचा प्रसार झाला त्या धर्माचा एकाएकीं हिंदुस्थानांतून व विशेषत: मगध देशांतून लोप कसा झाला, या प्रश्नाचें उत्तर अद्याप समाधानकारक देण्यांत आलेलें नाहीं. एच्. जी. वेल्स म्हणतात: "बौद्ध धर्माची भरभराट कांहीं काळ हिंदुस्थानांत झाली."[१४] पण 'कांहीं' हा शब्द अर्थशून्य जरी नसला तरी दुर्बोध आहे. कारण या धर्माचा प्रसार बुद्धदेवाच्या जन्मानंतर म्हणजे इ. स. पू. सहाव्या शतकापासून तों थेट तेराव्या शतकापर्यंत, अर्थात् १८०० वर्षें, सतत चालू होता व त्याची फारच जोराची भरभराट होत होती. आणि जगांतील दुसरा मोठा आणि महत्त्वाचा जो ख्रिस्ती धर्म त्याचा इतिहासकालांतील पहिला प्रवेश म्हणजे इ. स. ३२५ मध्यें.[१५] येथपासून ख्रिस्ती तत्त्वप्रसाराला खरी सुरवात झाली. पण या धर्माच्या भरभराटीचा काल म्हणजे इ. स. ६६० पासून अगदीं आजपावेतों म्हणजे अवघा १२०० वर्षांचा ! तिसरा महत्त्वाचा धर्म म्हणजे मुसलमानांचा इस्लाम धर्म. पण या धर्माच्या जनकाचा–महम्मदाचा–जन्मच इ. स. ५७० मधला. या धर्माची वाढ फार नंतरची. असें जर आहे तर वेल्ससाहेबांच्या 'कांहीं' शब्दाला काय अर्थ आहे ?

बौद्ध धर्माच्या ऱ्हासाचीं कारणें देतांना ते म्हणतात : "ब्राह्मणधर्मांतील देव-देवतांचे पूजाअर्चादि अनेक व अनंत प्रकार लोकांत फैलावूं लागले; त्यांचा जम जिकडे तिकडे बसूं लागला; चातुर्वर्ण्य नको म्हणणारा धर्म लोकांस आवडेनासा झाला व बौद्ध धर्माचें हिंदुस्थानांतून उच्चाटन झालें. अकराव्या शतकांत तर ओरिसाशिवाय बौद्ध धर्म हिंदुस्थानांत कोठेंहि दिसेनासा झाला."[१६] हें मत जें त्यांनीं दिलें आहे तें बरेंच रूढ दिसतें; व सकृद्दर्शनीं पटणारेंहि दिसतें. पण यावर

१४. H. G. Wells : The Outline of History, p. 409.

१५. Ibid, p. 548.

१६. Ibid, p. 409.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुनः एकदां पुष्कळ विचार करणें आवश्यक आहे. विचारान्तीं आपणांस असें दिसून येईल कीं, हें मत अत्यंत चुकीचें व ऐतिहासिक सत्याचा विपर्यास करणारें आहे.

अगोदर १२ व्या शतकापर्यंत नालंदा, विक्रमशिला, उदन्तपुरी वगैरे विद्यापीठें जोरानें आपलीं कामें करीत होतीं. येथून थोर थोर पंडित जगाच्या निरनिराळ्या भागांवर बुद्धदेवाची शिकवण देण्याकरितां जात होते व हा धर्म अत्यंत भरभराटीच्या स्थितींत होता. असें असतांना एकदम या धर्मप्रचाराचें काम कां थांबलें ? ब्राह्मण धर्मानें कांहीं जादू केल्याचा कोठें उल्लेख नाहीं. बरें, सावकाश सावकाश त्या धर्माचा नाश झाला असता तर गोष्ट निराळी. एका पंथाचा सावकाश सावकाश प्रसार व दुसऱ्या पंथाचा त्याच गतीनें नाश ही स्वाभाविक, निसर्गाला धरून गोष्ट आहे. बौद्ध धर्माचें तसें झालें नाहीं. बौद्ध धर्माचें हिरोशिमा झालें. एकदम ॲटम् बॉम्ब पडला व एकदम धर्म नाहींसा झाला. जवळजवळ त्याचें नांवहि राहिलें नाहीं म्हणाना !

हा ॲटम् बॉम्ब म्हणजे बख्त्यार खिलजीची स्वारी हें वर सांगितलेंच आहे. दुसरा एक प्रश्न उद्भवण्याचा संभव आहे. हा बॉम्ब मगध देशावर पडला. मग हिंदुस्थानाच्या बाकीच्या भागांतून हा धर्म नाहींसा होण्याचें कारण काय ? याचें उत्तरहि वर सुचविण्यांत आलें आहे. नालंदा, विक्रमशिला, उदन्तपुरी हे पंडित, धर्मप्रणेते उत्पन्न करण्याचे झरे. तेथूनच जगाच्या सर्व भागांवर धर्माचा प्रसार झाला. तेथूनच विद्वान् भिक्षु हिंदुस्थानांतील निरनिराळ्या भागांतच नव्हे तर जगाच्या इतर भागांत गेले व तेथें त्यांनीं हजारों विहार स्थापन केले. ख्रिस्ती धर्माचा इतिहासकालांत प्रवेश होण्याअगोदर ५०० वर्षें पूर्वीं हा धर्म सर्व हिंदुस्थानभर पसरला होता. हिंदुस्थानाबाहेरहि त्यानें प्रवेश केला होता. अशोक सम्राटाच्या राज्याचा जेथें जेथें विस्तार होता तेथें तेथें जर तो पसरला तर आश्चर्यच नाहीं; पण त्याच्याहि पलीकडे तो पसरला होता. इस्लाम धर्माच्या भरभराटीच्या कालींहि इस्लाम देशांतच या धर्माचे हजारों विहार हुएनत्संगास माहीत होते. पण हूण राजा मिहिरकुल, बंगालचा शशाङ्क राजा व बख्त्यार खिलजी यांनीं 'मूले कुठारः' या न्यायानें या विहाराच्या वर्मींच घाव घातला. झरेच वहावयाचे थांबले; मग जेथें जेथें हे झरे वाहत होते तेथें त्यांचें जीवन कसें मिळणार ? अर्थात् झरेच आटल्यामुळें धर्माची भरभराट थांबली; हजारों मुख्य आचार्यच ठार केले गेले तर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नवीन आचार्य उत्पन्न कोठून होणार ? व कोण करणार ? ग्रंथच (–अगदीं original documents च) नाहींसे झाले, मग धर्म शिकविणाऱ्या धर्मग्रंथांचा प्रसार कसा होणार ? बौद्ध धर्म हिंदुस्थानांतून एकदम अंतर्धान होण्यास हेंच कारण. ब्राह्मण धर्म जास्त बलवान् झाला हें कारण नव्हे. तो धर्म कदाचित् बलवान् झाला असेल; पण तें कार्य, परिणाम; कारण नव्हे. बौद्ध धर्म नाहींसा झाल्यामुळें तो बलवान् झाला. तो बलवान् झाल्यामुळें बौद्ध धर्म नाहींसा झाला नाहीं.

शिवाय या कालानंतर बौद्ध धर्माचा अंतर्भाव बहुतेक वैदिक धर्मांत झाला. बौद्ध धर्माला आत्मसात् करण्याचें कार्य कित्येक शतकें अगोदर चाललें होतें. तंत्रविद्येचा प्रसार हेंच तें कार्य. यापुढें तर 'बुद्ध' म्हणजे वैष्णव धर्मांतील एक अवतारी पुरुष, कृष्णानंतरचा अवतार, ही कल्पना रूढ होत चालली होती. वैदिक धर्म, वैष्णव पंथ, शैव पंथ, बौद्ध धर्म हे आतां बहुतेक एकरूप होऊं पहात होते. तेव्हां बौद्ध धर्माचा नाश व्हावयास जें कारण पुढें करण्यांत येतें तें सयुक्तिक नाहीं.

पण हा धर्म हिंदुस्थानाबाहेर मात्र जोरानें पसरला. त्याचेंहि कारण वर देण्यांत आलें आहे. मंगोलिया वगैरे भागांतील रानटी लोकच–हूण वगैरे–या धर्माचीं केंद्रें नाश करण्यास कारण. तेव्हां सर्व बौद्ध भिक्षूंनीं त्या देशांतच बौद्ध धर्माचा प्रसार करण्याचा विडा उचलला; व त्यांनीं तें साधलें.[१७] वेल्ससाहेब म्हणतात, "एक आर्य धर्म (बौद्ध धर्म) मंगोलियन लोकांचा एकमेव धर्म होऊन बसला आहे व हिंदुस्थानावर मात्र खिश्चन व इस्लाम धर्माचा पगडा बसला आहे हें एक आश्चर्यच नाहीं काय ?"[१८] "जगाच्या केवढ्यातरी अफाट विस्तारावर तो (बौद्ध धर्म) आज प्रचलित आहे"[१९] या त्यांच्या विधानांत या प्रकरणांत

१७. नालंदा, विक्रमशिला, उदन्तपुरी वगैरे विहारांचा नाश झाल्यावर राहिलेले कर्तृत्ववान् व धाडशी भिक्षु पुरेसे राहिले नाहींत; नाहींतर मंगोलियाप्रमाणें अफगाणिस्तानच्या बाजूला असणाऱ्या दुसऱ्या रानटी टोळ्यांचाहि त्यांनीं विचार केला असता, व मुसलमान लोकांचा कडवेपणा व रानटीपणा त्यांनीं नाहींसा केला असता; व हिंदुस्थानवर येणारी भावी आपत्ति त्यांनीं टाळली असती.

१८. H. G. Wells, p. 410. १९. H. G. Wells, p. 409.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सांगितलेलीं दोन सत्यें त्यांनीं प्रस्थापित केलीं आहेत. या धर्माचा प्रसार हिंदुस्थानाबाहेर जगांत इतरत्र फार मोठ्या प्रमाणांत झाला हें एक, व मंगोलियाचा तो एकमेव धर्म झाला आहे हें दुसरें. यावरून एकच गोष्ट निश्चित होते ती ही कीं बौद्ध भिक्षूंनीं आपलें लक्ष केवळ रानटी लोकांवरच केंद्रित केलें व आपली सर्व शक्ति त्यांना सद्धर्म शिकविण्यांत खर्च केली; व जगाच्या इतिहासांतून हूण वगैरे रानटी जातींचें नांव नाहींसें झालें. तेराव्या शतकाच्या आरंभीं नालंदादि विद्यापीठांचा नाश झाला व त्या सुमारास मंगोलियांतून चेंगिझखान यानें आपला रानटी अंमल सर्वत्र पसरविला तो शेवटचाच. यापुढें रानटी हल्ले येण्याचे बंद झाले, पण हे कां व कसे बंद झाले असावे यासंबंधानें आपणास कोठें समाधानकारक असें वाचावयास मिळत नाहीं. माझ्या मतें याला एकच कारण झालें; तें म्हणजे बौद्ध भिक्षूंनीं त्या रानटी जातीला बुद्धदेवाच्या शिष्यगणांत आणून सोडलें हें होय. उदन्तपुरीच्या नाशानंतर या रानटी जातीला सुसंस्कृत करण्याचा विडाच बौद्ध भिक्षूंनीं उचललेला होता. पण इतिहास या बाबतींत गप्प आहे.

पण बौद्ध भिक्षु केवळ मंगोलिया व त्याच्या आजूबाजूच्या भागांतच गेले नाहींत. ते हिंदुस्थानांतून हजारों मैल दूर गेले. सुमात्रा वगैरे भागांत तर त्यांचें जाणें येणें होतेंच; पण याहि पुढें ते जाऊं लागले. त्यांनीं जावा-सुमात्राच्या आजूबाजूचीं बेटें, त्याच्याहि पलीकडील मेलानेशियांतील बेटें, त्याच्याहि पलीकडील पॉलिनेशियांतील बेटें या सर्व भागांत केलेल्या बौद्ध धर्माच्या प्रचाराचे अवशेष सांपडतात; व बौद्ध धर्मातील बऱ्याच गोष्टींचें साम्य येथील लोकांच्या आचरणांत पहावयास मिळतें. हा बौद्ध धर्माचा प्रचार येथें कोणी केला व केव्हां केला हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. हीं बेटें म्हणजे हिंदुस्थानाहून ५।७ हजार मैलांपलीकडलीं ! येथें हे बौद्ध धर्माचे प्रचारक कसे आले ? पण मंगोलियाहि कांहीं हिंदुस्थानजवळचा प्रदेश नाहीं. जपानहि दूरच. येथें जे जाऊं शकतात त्यांना आणखी कांहीं हजार मैल जाणें कठीण कसें होणार ? तेव्हां जे बौद्ध भिक्षु मंगोलियांत गेले असतील त्यांच्याचसारखे इतर भिक्षु या दूरच्या भागांत गेले असणार. उदन्तपुरी वगैरे विद्यापीठांचा नाश झाल्यावर या भिक्षूंनीं जगांतील सर्व रानटी जातीला 'विनय' शिकविण्याचा पणच केला असला पाहिजे. नाहींतर या जंगली जातींत जाण्याचें धाडस कोणी करतें ना !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पण उदन्तपुरीच्या नाशानंतरच हे भिक्षू कशावरून गेले असावे ?

आपण विक्रमशिला विहारासंबंधानें पाहिलें कीं बौद्ध धर्म व वैदिक धर्म यांच्या संमिश्रणाची क्रिया नालंदा येथें चालू होती. तंत्रविद्या या नांवानें तिचा उल्लेख केला गेला आहे. लोकांचा देवता, मंत्र, तंत्र इत्यादिकांवर विश्वास बसूं लागला; व विक्रमशिला, उदन्तपुरी हीं तर तंत्रविद्येचीं केंद्रस्थानें बनलीं. येथून तंत्रविद्येंत निष्णात झालेले भिक्षु आचार्य हिंदुस्थानांत चोहोंकडे जाऊं लागले. येथें हजारों विद्वान् आचार्य तयार होऊं लागले. पण रानटी आक्रमकांचा त्यांच्यावर प्राणान्तिक हल्ला झाला व एकंदर कार्य थंड पडलें.

आतां प्रशांत महासागरांतील बेटांत–थेट फिजि बेटांपर्यंत–जे बौद्ध धर्माचे अवशेष सांपडतात त्यांत या तंत्रविद्येचाच प्रभाव जास्त पडलेला दिसतो, हें या प्रकरणांत निर्देशिलेल्या ग्रंथांवरून[२०] कळून येईल. तेव्हां या बेटांत या धर्माचा प्रसार तंत्रविद्येच्या उच्चीच्या कालांत झाला असला पाहिजे; व या विद्यापीठांचा नाश होण्याअगोदरचा काल तोच हा उच्चीचा काल हें निश्चित दिसतें.

केवढे उदारचरित हे भिक्षु कीं ज्यांनीं आपल्या जीवावर बेतलें असतांना-सुद्धां जराहि न डगमगतां रानटी लोकांना सद्धर्म, सदाचार व सद्ज्ञान यांचे पाठ देण्याचा विडा उचलला व त्यांनीं आपलें कार्य साधलें. धन्य ते भिक्षु !

---

२०. पान ७७ टीपा ३, ४, ५ पहा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५ : जागद्दल महाविहार

[सन ११०० ते १२००]

प्रास्ताविक

आज उपलब्ध असलेल्या तुटपुंज्या माहितीवरून प्राचीन विद्यापीठांची कल्पना आपणांस नीटशी करतां येणार नाहीं. पण ज्या नांवानें तीं विद्यापीठें ओळखलीं जात होतीं त्यावरून एका काळीं तीं किती मोठीं व प्रभावी असलीं पाहिजेत हें कळून येईल. उदाहरणार्थ, कदाचित् 'जागद्दल' हें नांवहि आपणांस नकाशांत सांपडणार नाहीं, किंवा एकाद्या ज्ञानकोशांतसुद्धां त्याच्याबद्दल एखादि ओळहि लिहिलेली दिसणार नाहीं; असें असूनसुद्धां जागद्दल हें एक फारच मोठें विद्यापीठ होतें व त्यानें एका वेळीं हिंदुस्थानच्या शिक्षणक्षेत्रांतच नव्हे तर हिंदुस्थानाबाहेरहि आपलें नांव चिरस्मरणीय केलें ही गोष्ट निर्विवाद आहे.

जागद्दल विद्यापीठाची अमुकच जागीं स्थापना झाली असें आज खात्रीपूर्वक सांगतां येणार नाहीं; अद्याप या विद्यापीठाची जागा निश्चित झाली नाहीं. या विद्यापीठाचा बाकीचा साग्र इतिहासहि काळाच्या पोटांत गडप झाला आहे. पण या प्रकरणांत ज्या तीन चार गोष्टी या विद्यपीठासंबंधानें सांगणार आहोंत त्या वाचून 'शितावरून भाताची परीक्षा' या न्यायानें या विद्यापीठाच्या थोरवीसंबंधानें आपणांस अंदाज बांधतां येईल.

याहि विद्यापीठाचा नाश मुसल्मानांनींच १३ व्या शतकाच्या आरंभीं केला. तेथील ग्रंथालयाची व भिक्षूंची वाट विक्रमशिला व उदंतपुरी यांच्याप्रमाणेंच लावण्यांत आली. उरलेले भिक्षू हिंदुस्थानाबाहेर बौद्ध धर्माचा प्रचार व प्रसार करण्यास निघून गेले. सर्वच गोष्टींची राखरांगोळी झाल्यानंतर आज, म्हणजे ७०० वर्षांनंतर, त्या संस्थेबद्दल जास्त माहिती मिळण्याची अपेक्षा आपण कशी करावी? जी माहिती नव्हे तर सबंध आशिया हलवून सोडला, कनिष्क विहारानें हिंदुस्थानचा पश्चिम भाग व चीनचा प्रदेश आपल्या संस्कृतीनें त्याचप्रमाणें उत्तम आचार्य व अर्हत् निर्माण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आज आपण जमवितों ती निरनिराळ्या ल्हानसहान गोष्टी जमा करून व त्यावरून अंदाज बांधून. तरी तिबेटांतील 'त्रिपटक' ग्रंथांत दिलेल्या माहितीवरून या विद्यापीठांत ख्यातनाम झालेल्या महापंडितांचीं नांवें आपणांस पहावयास मिळतात. विक्रमशिला, उदंतपुरी व जागद्दल या विद्यापीठांचा व तिबेटचा संबंध फारच घनिष्ठ. म्हणूनच या विद्यापीठांबद्दल कांहीं थोडीबहुत माहिती मिळते ती त्या देशांतूनच.

जागद्दल कोठें होतें ?

गंगेच्या कांठीं जीं कांहीं नामवंत विद्यापीठें स्थापन झालीं, त्यांपैकींच जागद्दल हेंहि एक होतें. अकराव्या शतकाच्या शेवटीं शेवटीं पाल राजांच्या रामावती[२] नांवाच्या राजधानीच्या ठिकाणीं तिची स्थापना झाली, असा समज आहे. गुप्त राजांप्रमाणें पाल राजेसुद्धां शिक्षणाचे फारच प्रेमी. म्हणूनच त्यांचा संबंध किती तरी विद्यापीठांशीं आला व त्यामुळें त्या त्या विद्यापीठांची भरभराट झाली. विक्रमशिला, उदन्तपुरी व जागद्दल हीं तीनहि विद्यापीठें केवळ पाल राजांच्या दातृत्वामुळेंच जन्मास आलीं व पोसलीं गेलीं.

जागद्दल 'विहार' नव्हे, 'महाविहार'

जागद्दल विद्यापीठ नुसतें 'विहार' नव्हतें, तर तें 'महाविहार' होतें. ज्या अर्थी 'महाविहार' या नांवानेंच तें ओळखलें गेलें आहे त्यावरूनच एका काळीं तें किती मोठें असलें पाहिजे याची कल्पना येईल. या जागद्दल महाविहाराची तुलना साध्यासुध्या विहारांशीं न करतां ती नालंदा, कनिष्क विहार व दीपदत्तम या अत्यंत जगप्रसिद्ध विहारांशीं करतात.[३] याचें कारण इतकेंच कीं मगध देशांत नालंदाचें जें स्थान, गांधारांत कनिष्क विहाराचें जें स्थान किंवा सिंहलद्वीपांत दीपदत्तम या विहाराचें जें स्थान तेंच स्थान बंगाल्यांत जागद्दल महाविहाराचें होतें. नालंदानें अखिल भारतच

१. S. K. Das: The Educational System of the Ancient Hindus, p. 383.

२. Phanindra Nath Bose: Indian Teachers of Buddhist Universities, p. 144.

३. A. K. Mazumder : The Hindu History (B. C. 3000–A. D. 1600), p. 831.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करून दिपवून टाकला व सिंहलद्वीपांत दीपदत्तम अद्वितीय ठरलें. जागद्दल विद्यापीठानें शंभर वर्षेंच कां होईना, बंगालचा सर्व प्रदेश व तिबेट गाजवून सोडला.

जागद्दल महाविहार व अॅलेक्झँड्रिया म्युझियम्

या दृष्टीनें पाहतां जागद्दल महाविहारांत व पाश्चात्य देशांतील गाजलेल्या अॅलेक्झँड्रिया म्युझियम् या विद्यापीठांत बरेंच साम्य दिसतें : (१) अॅलेक्झँड्रिया विद्यापीठाची स्थापना आफ्रिकेच्या प्रसिद्ध नाईल नदीवर झाली; जागद्दल विद्यापीठाचीहि स्थापना भारताच्या पवित्रतम गंगा नदीवर झाली. (२) अॅलेक्झँड्रिया शहराची स्थापना अलेक्झँडर राजानें केली; जागद्दल जेथें स्थापलें गेलें त्या रामावतीची स्थापनाहि पाल घराण्यांतील एका राजानें केली. (३) अॅलेक्झँड्रिया म्युझियम् म्हणजे विद्वान् व थोरथोर ग्रंथकार यांची एकत्र येण्याची जागा. येथें युक्लिड, एरॅटॉस्थेनेस, अपोलोनिअस्, हिप्पारकस् वगैरे अद्वितीय विचारवंतांनीं आपली कामगिरी दाखविली. जागद्दल येथेंहि फार फार थोर पंडित व महापंडित उत्पन्न झाल्यामुळें तिबेट व इतर भागांतील विद्यापिपासु येथें आले. विभूतिचंद्र, दानशील, मोक्षाकर गुप्तादि विचारवंतहि येथें होऊन गेले. (४) अॅलेक्झँड्रियांत शास्त्रीय विषयावर एकसारखें संशोधन चालू असे; तर जागद्दल येथें तंत्रविद्येचा कसून व बारकाईनें अभ्यास होत असे. (५) अॅलेक्झँड्रियाचें ग्रंथसंग्रहालय फारच प्रसिद्ध होतें; जागद्दलचें ग्रंथसंग्रहालयहि फारच मोठें व विक्रमशिला, उदन्तपुरी येथील विद्यापीठांतील ग्रंथालयांच्या तोडीचें होतें. (६) अलेक्झँड्रिया येथें ग्रंथांचीं हस्तलिखितें तयार करण्याचें एकसारखें काम चाले; जागद्दल येथेंहि हस्तलिखितें तयार करण्याचें काम एकसारखें चाले, व म्हणूनच जागद्दल येथें मोठा ग्रंथसंग्रह जमा झाला. (७) धार्मिक कल्पना प्रसृत करणारा कारखाना म्हणून अॅलेक्झँड्रियास संबोधितात; पण जागद्दल येथेंहि धर्मप्रसार करण्यास आवश्यक असें ज्ञानच दिलें जाई. (८) अथेन्सच्या उच्च उच्च कल्पनांची अवनति अलेक्झँड्रियांत झाली, तर नालंदाच्या थोर थोर बौद्ध धर्माच्या कल्पनांची अवनति जागद्दल येथें तांत्रिक ज्ञानाच्या अभ्यासांत झाली. (९) अॅलेक्झँड्रियाच्या शैक्षणिक कार्याचा प्रभाव १०० वर्षेंच पडला; जागद्दलच्या भरभराटीचा कालहि शंभर वर्षांचा. पण अॅलेक्झँड्रियाचा नाश व्हावयास कारण अंतर्गत सुव्यवस्थेचा व रचनात्मक कार्याचा अभाव. म्युझि-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यम् व लायब्रेरी यांचा उपयोग लोकांकडून जितका व्हावयास पाहिजे तितका झाला नाहीं व येथील ग्रंथसंग्रहालय केवळ काळ्या कंदिलांतील उजेड ठरलें; अर्थात् काळ्या कंदिलांतील दिव्याचा प्रकाश जास्त दूरवर जाऊं शकणार नाहीं त्याप्रमाणें ॲलेक्झँड्रिया लायब्ररीचें झालें.[४] पण जागद्दल विहारचा नाश रानटी हल्ल्यामुळें झाला. येथील भिक्षु ठार करण्यांत आले. ग्रंथसंग्रहालय जाळून टाकण्यांत आलें आणि म्हणूनच शंभर वर्षांवर हें विद्यापीठ टिकाव धरूं शकलें नाहीं.

जागद्दल महाविहार संस्कृत ग्रंथांकरितां प्रसिद्ध

जागद्दल महाविहार हें संस्कृत भाषा व वाङ्मय यांकरितां प्रसिद्ध होतें. नालंदा, विक्रमशिला, उदन्तपुरी वगैरे बौद्ध व जैन धर्मांच्या अभ्यासाचीं केंद्रें; तेव्हां येथें संस्कृत भाषेइतकेंच किंबहुना जास्त महत्त्व पाली भाषेस व अर्धमागधी भाषेस देण्यांत येई. वैदिक वाङ्मयाकरितां व इतर ज्ञानाकरितां प्रसिद्ध असणाऱ्या संस्थेंतून केवळ संस्कृत भाषाच मुख्य मानली जात असे. पण जेथें बौद्ध वाङ्मय व बौद्ध धर्म यांचा कसून अभ्यास होई तेथें पाली भाषा आणि जैन वाङ्मय व जैन धर्म अभ्यासिले जात तेथें अर्धमागधी भाषा रूढ असणें स्वाभाविकच आहे. शिवाय ख्रिस्तपूर्व ७ व्या शतकापासून उत्तर हिंदुस्थानांत चांगले सुधारलेले लोक ह्याच भाषा उपयोगांत आणीत. तरीपण त्यांतून बौद्ध धर्माच्या प्रसारामुळें पाली भाषेस सर्वत्र महत्त्व आलें होतें. आजहि ब्रह्मदेश, सयाम, सिलोन यांची वाङ्मयीन भाषा पालीच आहे.[५] एका वेळीं ती जागतिक दळणवळणाचीच माध्यम होऊन बसली होती.

असें असतांना बौद्ध धर्मप्रसाराचेंच एक आगर जो प्रसिद्ध जागद्दल महाविहार तेथें मात्र संस्कृत भाषा रूढ होती ही एक आश्चर्याची गोष्ट आहे. म्हणून जागद्दल महाविहाराचें हें एक वैशिष्ट्य मानण्यांत येतें.

तिबेटच्या एकंदर संस्कृतीवर या विद्यापीठानें जितका परिणाम केला तितका दुसऱ्या एकाद्या विद्यापीठानें क्वचितच केला असेल. या विद्यापीठाशिवाय इतर कांहीं विद्यापीठें—उदाहरणार्थ उदन्तपुरी, विक्रमशिला—यांनींहि बौद्ध धर्माच्या प्रसाराच्या कामीं तिबेटांत फारच मोठें कार्य केलें आहे. पण तें जागद्दल महाविहाराच्या

४. H. G. Wells : The Outline of History, pp. 375, 379, 380, 381, 517, 626.

५. महाराष्ट्रीय ज्ञानकोष वि. १७.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खालींच. तिबेटांत जें ग्रंथभांडार आहे त्यांतील संस्कृत भाषेंतून तिबेटी भाषेंत भाषांतरित ग्रंथ सर्व जागद्दल महाविहारांतील.[६]

या एका गोष्टीवरून कितीतरी अनुमानें काढण्याजोगीं आहेत. हा विहार अत्यंत प्रसिद्ध असल्याशिवाय नालंदा, विक्रमशिला, उदन्तपुरी टाकून तिबेटांतून विद्यार्थी किंवा विद्वान् भिक्षू येथें येणार नाहींत. त्यांतून येथें संस्कृत ग्रंथांचीं तिबेटी भाषेंत भाषांतरें झालीं, त्याअर्थीं ते ग्रंथ समजावून देणारे महापंडित येथें असले पाहिजेत व ते ग्रंथ समजावून घेणारे व त्या ग्रंथांचें भाषांतर करण्यास समर्थ असे तिबेटी पंडित तिबेटांतून येथें येऊन बराच काल रहात असावेत. अर्थात् बाहेरून विद्वान् पंडित येथें यावेत अशी कीर्ति या विद्यापीठाची हिंदुस्थानाबाहेर पसरली असली पाहिजे; व बाहेरून येणाऱ्या विद्यार्थ्यांना व पंडितांना राहण्याची सोय येथें होत असली पाहिजे. म्हणजे येथें रहाण्या-खाण्याची वगैरे सर्व प्रकारची व्यवस्था लावण्याइतका पैसा या विद्यापीठाच्या ताब्यांत असला पाहिजे, किंवा कांहीं गांवें या विद्यापीठाच्या खर्चाकरितां पाल राजांनीं तोडून दिलीं असलीं पाहिजेत. संस्कृत ग्रंथभांडार मोठें असल्याशिवाय त्यांतून ग्रंथांची निवड होणें अशक्य. नंतर भाषांतराचें कार्य. या सर्व गोष्टींचा विचार केल्यास जागद्दल महाविहाराच्या मोठे-पणाची कल्पना करतां येईल.

येथील विद्वान् पंडित व त्यांना देण्यांत येणारी 'महापंडित' पदवी

या शिवाय येथें एक गोष्ट पहावयास मिळते. त्यावरूनहि येथल्या विहाराच्या मोठेपणाची जाणीव होईल. या विद्यापीठांत शिक्षण घेऊन जे जे विद्वान् बाहेर जात त्यांना पदव्या अर्पण करण्यांत येत. 'महापंडित' ही एक महत्त्वाची पदवी समजण्यांत येई. तिबेटी भाषेचा जो पंडित विभूतिचंद्र त्याला ही पदवी देण्यांत आली होती.

या विद्यापीठांत थोर थोर पंडित होऊन गेले म्हणून या विद्यापीठाची ख्याति आहे. या विद्वद्रत्नांत विभूतिचंद्र महापंडित, महाभिक्षु दानशील, मोक्षाकरगुप्त इत्यादिकांची गणना होते. या सर्वांनीं कितीतरी मोठमोठाले ग्रंथ लिहून ठेविले

६. P. N. Bose: Indian Teachers of Buddhist Universities, pp. 148, 149, 151, 154, 155 etc.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहेत. मोक्षाकरगुप्त हे जागद्दल महाविहाराचे अध्यक्ष होते. महान् व प्रसिद्ध तार्किकी म्हणून त्यांची ख्याति होती व त्यांनीं कितीतरी ग्रंथ लिहिले आहेत.

जागद्दल येथील ग्रंथालय

येथील ग्रंथसंग्रहाल्यांत असंख्य हस्तलिखितें होतीं; व हस्तलिखितें म्हणजेच त्याकालीन ग्रंथालयांतील ग्रंथ. त्याकाळीं आजच्यासारखीं छापलेलीं पुस्तकें नव्हतीं. हीं जीं असंख्य हस्तलिखितें त्यांची कल्पना आपणांस एका पुराव्यावरून मिळण्याजोगी आहे. या हस्तलिखितांपैकीं कांहीं केंब्रिज युनिव्हर्सिटीच्या ग्रंथसंग्रहाल्यांत जपून ठेवण्यांत आलीं आहेत.[७] ही एक विशेष लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट आहे. कार्लाइलच्या मतें[८] 'ग्रंथभांडार म्हणजेच विद्यापीठ.' सर्व गोष्टी बाजूस ठेवल्या तरी या एका गोष्टीवरून या विहारास विद्यापीठत्वाचा मान मिळूं शकतो.

जागद्दलचा नाश

जन्म, स्थिति आणि लय हीं जरी निसर्गनियमानें होत असतात असें म्हटलें, तरी पण प्रत्येक गोष्टींत या अवस्था येण्याला कांहीं दृश्य कारणेंहि लागतात. या कारणांपैकीं कांहीं फारच प्रभावी असतात; तर कांहींचा अंमल संथ चालून त्यांचा परिणामहि बऱ्याच वेळानें दिसून येतो. त्यांतून शेवटची जी अवस्था ती उत्पन्न होण्याला दोन महत्त्वाचीं विशेष कारणें लागतात. एक पुष्कळ काळ चालत असलेलें व दुसरें ताबडतोब घडवून आणणारें. बंदुकीचा बार निघण्याला अशींच दोन कारणें नैय्यायिक लोक देतात. पहिलें कारण बंदुक तयार करण्याला लागणारी धातू पाहून काढून बंदूक उडवण्यास तिचा घोडा पाडीपर्यंत चालू असलेलें कार्य; व दुसरें, त्या घोड्याचा स्फोटक पदार्थाशीं संयोग. त्याचप्रमाणें संस्थेच्या बाबतींतहि आहे. कांहींतरी बाधक अशा गोष्टी संस्थेंत होत असतात व त्या जमत जमत एक असें कांहीं तात्कालिक कारण घडतें कीं ज्यामुळें संस्थेचा पूर्ण नायनाट होतो.

या नियमानें जागद्दल महाविहाराचा नाश होण्याला तात्कालिक कारण मुसलमानांची स्वारी होय. ही जर स्वारी झाली नसती तर जागद्दल विहारानें आणखी कांहीं वर्षें तरी खास टिकांव धरला असता. पण मुसल्मानांच्या ज्या हल्यानें

७. र. मो. त्रिवेदी : हिंदना विद्यापीठो : प्राचीन अने मध्यकालीन, भा. १.
८. Carlyle: Hero and Hero-Worship.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नालंदा, विक्रमशिला, उदन्तपुरीसारखीं विद्यापीठें बेचिराख झालीं, त्यांतच जागद्दलाचाहि अन्तर्भाव झाला.

पण जागद्दल व इतर तत्सम विद्यापीठांतून त्यांच्या अधोगतीला निराळ्या प्रकारें सुरवात झाली होती असेंहि आपणांस दिसून येतें. ही सुरवात म्हणजे बौद्ध धर्मांत होत असलेली क्रांति होय. ही क्रांति म्हणजे बौद्ध धर्मांतील विकृतीच. बौद्ध धर्मांत महायान व हीनयान हे दोन पंथ सुरू झाले. यांपैकीं हीनयान पंथामुळें बौद्ध धर्माला जरा अवकळा लागलेली दिसते. कारण हीनयानपंथी लोक तंत्रविद्येला जास्त महत्त्व देऊं लागले होते. या विद्येंतूनच पुढें पिशाचविद्या, नागविद्या, यक्षविद्या व निरनिराळीं साधनें उत्पन्न झालीं. धर्म राहिला बाजूला व भलत्याच गोष्टीला महत्त्व मिळूं लागलें.

प्रो. संकालिया म्हणतात, अत्यंत हीन दर्जाची तंत्रविद्या जागद्दल येथें अभ्यासिली जाऊं लागली व यांतच जागद्दल महाविहाराची अधोगति सुरू झाली.[१]

अशा प्रकारें भारतांतील एका अति महान् विद्यापीठांत विकृतीनें आपलें ठाणें दिलें म्हणून व मुसलमानांच्या आक्रमणामुळें तिचा नाश झाला. उपलब्ध असलेल्या अगदीं तुटपुंज्या माहितीच्या आधारें अशा प्रकारें जागद्दलचा हा इतिहास आपणांस पहावयास मिळतो. तरीपण या सर्व विद्यापीठांच्या बाबतींत एकसारखें संशोधन होणें आवश्यक आहे. आजच्या स्वतंत्र भारतांत या कामाला हात घातल्यास सर्व ठिकाणाहून संशोधकास मदत होईल याबद्दल संशय नको.

१. Dr. Sankalia: The University of Nalanda, p. 189.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६ : काशी विद्यापीठ

[काल अनिश्चित; कदाचित् इ. स. पू. १००० ते आजतागायत]

काशी–वाराणसी : स्थलनिर्णय व प्राचीन इतिहास

हिंदुस्थानच्या नकाशांतील संयुक्त प्रांताकडे नजर वळविल्यास आग्नेय भागांत बनारस जिल्हा दिसेल. याचें मुख्य ठिकाणहि बनारस किंवा काशी हें आहे. गंगेच्या कांठावर वसलेलें हें शहर फार पुरातन कालापासून प्रसिद्ध आहे. हिंदुस्थानांतील प्रत्येक हिंदु मनुष्यास गंगा व काशी हीं अत्यंत पवित्र स्थानें वाटत असतात.

काशी नांवाच्या लोकांवरून हें नांव पडलें. बनारस हें वाराणसीचें अपभ्रष्ट रूप आहे. वाराणसी हें वारुणा व असि या छोट्या नद्यांच्या संगमावर वसलेलें असावें, किंवा त्या दोन नद्यांमधील प्रदेशांत असावें. पण हा गांव आर्य लोक हिंदुस्थानांत येऊं लागण्यापूर्वीपासून प्रसिद्ध असावा; व येथील लोकांचा धर्म, त्यांची संस्कृति वगैरे आर्य लोकांच्या धर्माहून किंवा संस्कृतीहून भिन्न असाव्यात. गंगेचें सर्व खोरें, विशेषतः मगध व आसामकडील भाग, यांत जे लोक फार प्राचीन कालापासून रहात त्यांचा धर्म, भाषा, चालीरीती, इत्यादि आर्य लोकांच्या धर्मापेक्षां, भाषेपेक्षां व चालीरीतींपेक्षां इतक्या भिन्न असल्या पाहिजेत कीं, त्यांचें आर्यीकरण करणें आर्यांना फारच जड गेलें असलें पाहिजे. इतकेंच नव्हे तर आर्यांना स्वतःचा धर्महि बाजूला ठेवून या लोकांच्या धर्मांतील कांहीं भाग घेणें भाग पडलें असेल. यामुळें आर्य लोकांनीं येथील लोकांना फारच तुच्छतेनें लेखलें असलें पाहिजे. कारण काशी व मगध देशाबद्दल या अर्थाचीं वचनें संस्कृत ग्रंथांतून सांपडतात. वाजसनेयी संहिता (३०·५·२२), पञ्चविंश ब्राह्मण (१७·१६), श्रौतसूत्र (७·६·२८), ऐतरेय आरण्यक (२·१·१) या ग्रंथांतून हे उल्लेख विशेषें-करून आले आहेत. अथर्ववेदांत तर (५·२२·१४) 'काशी–मगध देशांतील लोकांना ताप येवो' अशा प्रकारचीं शापमूलक वचनें आहेत. या लोकांबद्दल अशा प्रकारची घृणा दाखविण्याचें कारण भिन्न संस्कृतीच असावी. दुसरें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कांहीं दिसत नाहीं. ही भिन्न संस्कृति कोणती व ती कोणत्या लोकांची हें अद्याप निश्चित झालें नाहीं. पण ज्याअर्थी शंकरपूजेचें हें आद्यतनस्थान व शंकर हें दैवत आर्य नसून द्राविड आहे असें आतां सर्वांचें मत झालें आहे त्याअर्थी द्रविड संस्कृतीचें हें प्रमुख स्थान असावें; व त्यामुळें आर्य संस्कृतीचा व या संस्कृतीचा संघर्ष होऊन त्यांत द्राविड संस्कृतीचें वर्चस्व स्थापन झालें असावें. आर्यांनीं काशींतील लोकांकडे तुच्छतेनें पाहण्याचें हेंहि एक कारण असावें. आर्य संस्कृति या भागांत रूढ झाल्यानंतरहि शंकरपूजा मात्र येथें कायमची टिकून राहिली हें मात्र निश्चित आहे.

काशी शहराला महत्त्व येण्याचें कारण :
काशी विद्यापीठाची पार्श्वभूमि

'अयोध्या, मथुरा, माया, काशी, काञ्ची, अवंतिका । पुरी द्वारावती चैव सप्तैते मोक्षदायकाः ॥' या श्लोकावरून काशी ही प्राचीन कालापासून धर्मस्थान म्हणून प्रसिद्ध आहे हें सिद्ध होत आहे. धर्मस्थानामुळें ती यात्रेचें ठिकाण बनली; व काशी म्हणजे मोक्ष देणारें क्षेत्र नक्की झालें. यामुळेंच येथें थोर थोर विद्वान् येऊं लागले असावेत व त्यांनीं आपलें कायमचें ठाणें येथें दिलें असावें. विद्यास्थान म्हणून मान्य होण्याला कारण ती धर्मस्थान होती हेंच होय. यामुळेंच काशीचा इतिहास म्हणजे हिंदु धर्माचा इतिहास म्हणण्यास हरकत नाहीं. आर्यांच्या संस्कृतीचें, विद्यांचें व तत्त्वज्ञानांचें माहेरघर म्हणूनच अद्यापिहि या शहराची ख्याति थोड्या-फार फरकानें तशीच कायम आहे. काशी शहराला महत्त्व येण्याला आणखी एक कारण आहे. तें म्हणजे काशी ही आर्य, द्रविड, बौद्ध, जैन सर्वच लोकांना पवित्र. शंकराचें स्थान म्हणून द्रविड व आर्य या दोघांनाहि तें स्थान पूज्य. आर्यांना तर या स्थानाचें महत्त्व वाटण्याला आणखी एक कारण आहे. येथेंच उपनिषदांवर उपनिषदें लिहिलीं गेलीं असावींत; तत्त्वज्ञानावर खोल चर्चा झाली असावी. कुरुपाञ्चालाप्रमाणें काशीचाहि उल्लेख उपनिषदांतून वारंवार सांपडतो. बौद्ध व जैन धर्मांचाहि प्रचार व प्रसार याच गांवाहून झाला. आपल्या धर्माचीं तत्त्वें लोकांना पटवून देण्याकरितां बुद्धानें या शहराजवळ असणाऱ्या मृगदान या बागेंत व सारनाथच्या जवळच वास्तव्य केलें व आपल्या पांच ब्राह्मणमित्रांना नवीन धर्माची व स्वतःस मिळालेल्या अनुभवाची माहिती त्यानें दिली. जैनांचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तेविसावा तीर्थंकर सुपार्श्वनाथ ह्याचा जन्म काशींत झाल्यानें हें स्थान जैनांनाहि पवित्र वाटत असल्यास आश्चर्य नाहीं. बौद्ध व जैन दोनहि धर्मांची भरभराट याच ठिकाणीं झाली. काशी-कोसल्चा राजा अजातशत्रु यानें गौतम बुद्धाला व महावीराला त्यांच्या धर्मकार्यांत फारच मदत केली. काशी हें वैदिक व स्मार्त धर्माचें तर नंतर केंद्रच बनलें.[1]

शिवाय धर्मांच्या दृष्टीनें या शहराचा संबंध हिंदुस्थानांतील प्रसिद्ध तत्त्वज्ञान्यांशीं व वैष्णव भक्तांशीं आला आहे. महावीर व गौतम बुद्धासंबंधानें वर सांगितलेंच; पण आद्य श्रीशंकराचार्यांनाहि आपला पंथ प्रस्थापित करण्यापूर्वी येथें आपलीं मतें मान्य करून घ्यावीं लागलीं. श्री गौरांग महाप्रभु श्री चैतन्य यांनींहि आपल्या वैष्णव पंथाची ध्वजा येथूनच फडकावली. वल्लभाचार्यांच्या कीर्तिगंगेचा उगम येथूनच झाला. तुलसीदासांनीं आपलें 'रामचरितमानस' येथेंच गाइलें. अशा प्रकारें हिंदुस्थानांतील श्रेष्ठ तत्त्वज्ञान्यांचा संबंध या शहराशीं आला. व यामुळेंच जातक ग्रंथांतून तर या शहरासंबंधानें वेळोवेळीं कांहींना कांहीं तरी सांगण्यांत आलें आहे. कोशीय जातकांत (नं. १३०) हें विद्येचें स्थान आहे म्हणून या शहराची कीर्ति गाइली आहे.

ही काशीच्या ज्ञानपीठाबद्दलची पार्श्वभूमि. या पार्श्वभूमीवरच काशी विद्यापीठाची स्थापना झाली आहे. यामुळें काशीचें उच्चस्थान आज हजारों वर्षें टिकून राहिलें आहे. तरीपण काशी हें पहिल्यानें धर्माचें माहेरघर व म्हणून विद्यांचें पीठ या गोष्टीकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. धर्मांच्या ज्या निरनिराळ्या शाखा त्यांचें अध्ययन येथें करून होऊं लागलें. यांतच निरनिराळ्या शास्त्रांच्या अध्य-

---

१. काशी राजांचा व काशीचा उल्लेख बॅबिलोनिअन् संस्कृतीच्या इतिहासांत वारंवार आढळतो. या राजांचा प्रभाव युरोपांतील अगदीं पश्चिमेकडे असणाऱ्या ब्रिटिश बेटांपर्यंत रोमन राज्याची स्थापना होण्यापूर्वी पसरला होता हें त्या बेटांत तत्कालीं प्रचलित असलेल्या 'कासी' (Cassi) नांवाच्या काशी नाण्यांवरून स्पष्ट दिसतें. युरोपांतील पुष्कळ गांवांच्या नांवाचा आरंभहि 'काशी (cassi) या शब्दानें प्राचीन कालीं झालेला आढळेल.

cf. Waddell : Phoenicians and Origin of Britain, p. 48.
Makers of Civilization, pp. 455, 466.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यनाचा समावेश होऊं लागला. एकाद्या नवीन धर्मप्रवर्तकाला आपलें तत्त्व प्रचलित करावयाची इच्छा झाल्यास त्यानें काशी येथें आलें पाहिजे व तेथील पंडितांची खात्री पटवून दिली पाहिजे हा येथें प्रघातच पडला, हें बुद्ध, शंकराचार्य, चैतन्य, वल्लभाचार्य वगैरेंच्या उदहरणांवरून दिसून येईल. या वैदिक धर्मामुळेंच काशी हें संस्कृत भाषेच्या अध्ययनाबद्दल प्रसिद्धीस आलें. विशेषतः उपनिषदांच्या तत्त्वज्ञानाचा या ठिकाणीं फारच परिपोष झाला. उपनिषदांतून महाक्षत्रिय विद्यागुरु काशीराज अजातशत्रू संबंधानें माहिती मिळते.[२]

काशी विद्यापीठ

हुएनत्संग हा जेव्हां सातव्या शतकांत हिंदुस्थानांत आला त्यावेळींसुद्धां काशीमध्यें ३० बुद्ध विहार व १०० हिंदूंचीं देवालयें होतीं.

या सर्व विहारांमध्यें, देवळांमध्यें व इतर ठिकाणीं आश्रम करून मोठमोठे पंडित व साधु रहात; व यांच्या जवळ विद्यार्थी ज्ञानलालसेनें येत. हे लोक निरनिराळ्या देशांतून व निरनिराळ्या दिशेंतून येत.[3] पण हे केवळ ब्राह्मण विद्यार्थी असत. तक्षशिला-नालंदादि विद्यापीठांत कोणत्याहि विद्यार्थ्यास, मग तो कोणत्याहि जातीचा असो, प्रवेश मिळे, तर काशीमध्यें वैदिक धर्माची शिकवण देणाऱ्या कांहीं जातिनिष्ठ संस्था होत्या. येथील बौद्ध व जैन विहारांत हा जातिभेद नव्हता; व तेथें वेद-वेदाङ्गाशिवाय निरनिराळ्या कलांचेंहि शिक्षण दिलें जाई. खुद्द गौतमबुद्धानें गायनाच्या सर्व शाखांचें अध्ययन या ठिकाणीं केलें म्हणून जातकांत उल्लेख आहे.[4]

पण काशी हें बौद्धिक चळवळीचें क्षेत्र नसून धार्मिक चळवळीचें क्षेत्र होतें हें एकदां सांगितलें म्हणजे येथील विद्यापीठांची तक्षशिला, नालंदा येथील विद्यापीठांशीं तुलना करणें चुकीचें होईल. तक्षशिला, नालंदा येथें ऐहिक जीवन सुखदायक करण्यासाठीं शिक्षण दिलें जाई, तर काशी येथें पुढील जन्म सुखाचा यावा याकरितां साहाय्यकारी धार्मिक शिक्षण देण्यांत येई. हा कांहीं लहानसहान फरक नव्हे.

यामुळें काशींतील विद्यापीठें सुसंघटित नव्हतीं. निरनिराळ्या शास्त्रांत पारंगत

---

२. बृह. आ. उप.

३. दीघ० I. p. 114. (नानादिशा–नानाजनपदा–माणवका: आगच्छन्ति।)

4. S. K. Das, pp. 385–386.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असे आचार्य व तें शास्त्र शिकण्याकरितां आलेले विद्यार्थी एका ठिकाणीं सांपडत नसत. तर विद्वान् लोकांच्या घरीं तुरळक विद्यार्थी असत. असे विद्वान् लोक सर्व काशीभर पसरलेले होते. व यामुळें सर्व काशी शहरालाच विद्यापीठ म्हणणें रास्त होईल. काशी व्यापारउदीमांत फार प्राचीन कालापासून प्रसिद्ध. व येथील व्यापारीवर्गहि समृद्ध व श्रीमान्. शिवाय येथील एकंदर जनतेची ओढ शिक्षणापेक्षां धार्मिक बाबींकडे जास्त. म्हणून येथील खुद्द राजे लोकसुद्धां आपल्या मुलांना पायपीट करीत शेंकडों मैल दूर असलेल्या तक्षशिलेला ऐहिक सुख मिळवून देणारें शिक्षण संपादण्याकरितां पाठवीत. या राजपुत्रांबरोबर श्रीमान् व्यापाऱ्यांचीं मुलें व त्यांना सोबत म्हणून कांहीं गरीब विद्यार्थीहि जात. अशाप्रकारें खुद्द काशींतील मुलें तक्षशिलेला पाठविण्याचा एक हेतु तेथें मिळणारें सर्व प्रकारचें शिक्षण हेंच होय. विशेषतः वैद्यकीय शिक्षण व शिल्पकलेचें शिक्षण हीं तर तक्षशिलेचींच वैशिष्ट्यें !

काशीचें इतर शहरांशीं दळणवळण

तक्षशिला विद्यापीठ कदाचित् काशीहूनहि प्राचीन असेल; कारण या शहराचा संबंध प्राक्-इतिहासकालांतील नाग लोकांशीं लावतात; व नागराजा तक्षक हा येथील राजा होता व येथेंच जनमेजय यानें एक रोमाञ्चकारी सर्पसत्र केलें म्हणून कथा आहे. अशा या तक्षशिलेवर निरनिराळ्या संस्कृतींचे आघात बसूनसुद्धां ती सहीसलामत बाहेर पडली. इतकेंच नाहीं तर अग्नितप्त सुवर्णाप्रमाणें ती जास्त तेजस्वीपणानें चमकूं लागली. तिचा हजार वर्षांवरचा इतिहास तर आपणांस माहीत आहे. उलट पक्षीं ज्यावेळीं सप्तसिंधूचा प्रदेश व कुरुपाञ्चालांचा प्रदेश आर्य संस्कृतीनें व शैक्षणिक चळवळींनीं गजबजलेला होता, त्यावेळीं विदेह, काशी, अंग, वंग या प्रदेशांकडे आर्य लोक तुच्छतेनें पहात. पण पुढें काशी, मगध वगैरे प्रदेश बौद्ध व जैन धर्मांमुळें शिक्षणांत व सुधारणेंत फारच पुढारले व येथील संस्कृतीची छाप नुसत्या तक्षशिलेवरच नव्हे तर अखिल मानवतेवर पडली व निरनिराळ्या ठिकाणचें दळणवळण वाढलें. त्या कालीं या भागांतील अत्यंत प्रसिद्ध अशीं शहरें चंपा, राजगृह, श्रावस्ती, साकेत, कौशाम्बी व वाराणसी हीं होतीं व काशीपासून या सर्व शहरांपर्यंत व तक्षशिलेपर्यंत मोठाले रस्ते होते.[५] त्यामुळें काशीहून तक्ष-

५. R. C. Majumdar : An Advanced History of India, pp. 77–81.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिलेपर्यंत राजपुत्रादि सर्व प्रकारचे विद्यार्थी जात व त्यांना दूरपर्यंत जाण्यास कोणत्याहि प्रकारची भीति वाटत नसे, किंवा कसलाहि त्रास होत नसे.

काशी येथील शिक्षण

आतां काशी येथें प्रत्यक्ष शिक्षणाची स्थिति कशी होती हें आपण पाहूं. विद्यापीठापेक्षां मोक्षदायी धर्मक्षेत्र म्हणूनच काशीची कीर्ति जास्त होती, हें वर सांगितलेंच आहे. तरी पण काशी येथें वेळोवेळीं फार प्रसिद्ध व विद्वान् आचार्य असत हें निरनिराळ्या जातकांवरून व इतर ग्रंथांत दिलेल्या उल्लेखांवरून कळून येतें. कोशीय जातकांत[६] व तित्तिरी जातकांत[७] येथील विद्वान् आचार्य तीन वेद व १८ शिल्पें शिकवीत असल्याचें म्हटलें आहे. तरी पण तक्षशिला येथील आचार्यांपुढें काशीचे आचार्य फिक्के पडत हें महाधम्मपाल जातकावरून[८] दिसून येतें. येथील शिक्षणकार्याला प्रसेनजित् (पसेनदि) व बिंबिसारसारख्या राजे लोकांनीं मदत केल्यामुळें शिक्षणाचें कार्य चांगलेंच चालू राहिलें ही गोष्टहि सत्य आहे. नुसत्या काशींतच नव्हे तर अंग, मगध, कोशलादि भागांतहि या राजांच्या मदतीमुळेंच शिक्षणाचें कार्य जोरानें सुरू झालें. यामुळेंच येथें नाना देशांतील लोक शिक्षण घेण्याकरितां येत असें दीघनिकाया (१, पान ११४) वरून कळून येतें. महागोविंदसुत्ताप्रमाणें महागोविंदाच्या वेळीं सात प्रमुख राज्यांत विद्यापीठें स्थापण्यांत आलीं होतीं व तेथें ब्राह्मण विद्यार्थ्यांना प्रवेश व शिक्षण मिळे.[९] अर्थात् अशा विद्यापीठांतून विद्यार्थ्यांची संख्या मोजकीच असे. येथें ४ वेद, ६ वेदांगें, इतिहासपुराण, लोकायतम् वगैरे शिकवण्यांत येत. यावेळीं अरण्यांतूनसुद्धां आश्रम असत व तेथें नामांकित ऋषि आपलें शिक्षण देण्याचें कार्य अव्याहत चालू ठेवीत असें तित्तिरी जातकावरून कळतें.[१०]

येथें शिक्षण घेतलेल्या विद्वान् ब्राह्मणांना योग्य तें बक्षीसहि मिळे. गहडवाल राजांनीं काशीच्या विद्वान् ब्राह्मणांना दिलेल्या दानाचे ताम्रपट शोधून काढण्यांत

६. जातक, नं. १३०. ७. जातक, नं. ४३८. ८. जातक, नं. ४४७.

९. B. C. Law : India as Described in Early Texts of Buddhism and Jainism, p. 282.

१०. जातक III, p. 536 f.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आले आहेत.[११] पण ही स्थिति अगदीं अलीकडली म्हणजे ११ व्या शतकांतली होय. यावेळीं काशी हें शैक्षणिक केंद्र होतें हें अलबेरुनी यानेंहि मान्य केलें आहे. हें थेट आजपर्यंत थोड्याफार प्रमाणांत चालूच आहे. १७ व्या शतकांतील काशीच्या शिक्षणकार्याबद्दल बर्निअर् म्हणतो :

"काशी म्हणजे एकप्रकारचें विद्यापीठच. एकप्रकारचें म्हणण्याचें कारण येथें कांहीं सुसज्ज व नियमित कार्य करणारीं महाविद्यालयें नाहींत; अभ्यासाचे नियमित वर्गहि घेतले जात नाहींत; तरी पण निरनिराळ्या भागांत विखुरलेले आचार्य अविरत शिक्षण देण्याचें कार्य करतांना दिसतात. प्रत्येकाजवळ दोन, चारपासून १२।१४-पर्यंत विद्यार्थी असतात."[१२]

काशी येथें संस्कृतिसंगम व सर्व धर्मांचें एकोप्याचें वातावरण

वैदिक धर्माच्या शाळा काशी येथें स्थापन होऊन त्यांची भरभराट होण्याअगोदर तेथें एक आश्चर्यकारक दृश्य पहावयास मिळे. तें म्हणजे सर्व धर्मांचें किंवा निरनिराळ्या पंथांचें खेळीमेळीचें वातावरण होय. लोक सहिष्णु वृत्तीचे असत. धर्महि अंधानुकरणाची किंवा हट्टवादी स्वरूपाची बाब नव्हती. लोक वैदिक धर्म पाळणारे असोत किंवा स्मार्त धर्म पाळणारे असोत, बौद्ध असोत किंवा जैन असोत, ब्राह्मण असोत किंवा क्षत्रिय असोत, सर्व प्रकारचे व सर्व वृत्तींचे लोक एकोप्यानें रहात. एकमेकांबद्दल त्यांच्या मनांत कोणत्याहि प्रकारचा द्वेष, तिरस्कार वगैरे नसत. गार्ग्य बालाकीसारखे विद्वान् ब्राह्मणसुद्धां क्षत्रिय राजांचे शिष्य बनत व त्यांच्या चरणाशीं तत्त्वज्ञान शिकावयास जात. सुवया नांवाच्या जोगिणी सर्व धर्मांच्या व पंथांच्या लोकांकडून भिक्षा मागत व ती त्यांना मिळे; कोणीहि ती नाकारीत नसत. ही भिक्षा देणारे लोक गरीब, मध्यम वर्गांतले किंवा श्रीमंत असत. या जोगिणीहि सामान्य बाया नसून अति विद्वान् असत असें दिसतें; कारण सोमा नांवाची एक जोगीण जैन धर्माच्या

---

११. Dr. Altekar, p. 112 (1944).
'An Advanced History of India' by Dr. R. C. Majumdar &c., p. 184 (1948).

१२. Bernier's Travels in India, p. 341 (as quoted by Dr. Altekar, p. 113).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

११ अंगांत पारंगत होती.[१३] काशी येथें सर्व धर्मांचीं देवालयें, मंदिरें, विहार असत; पण कोणत्याहि प्रकारें त्यांच्यांत भाडणें व मारामाऱ्या झाल्याचा उल्लेख नाहीं.

काशीच्या संपन्न स्थितीमुळें विद्वान् पोसले जात

काशी येथें धर्मप्रसार व विद्याप्रसार होण्याला एक कारण येथील लोकांची सुस्थिति होय. येथील लोक व्यापारांत पुढारलेले होते. व्यापारास सोईस्कर असे मोठाले रस्ते एका गांवापासून दुसऱ्या गांवापर्यंत असत. असाच एक रस्ता काशीहून राजगृहापर्यंत[१४] व दुसरा श्रावस्तीपर्यंत गेलेला होता.[१५] बनारसी रेशमी कापड, विशेषतः शालू, प्रसिद्ध असत व सुगंधी पदार्थ तर फार प्राचीन कालापासून प्रसिद्ध होते, हें 'काशीविलेपन,' 'काशी चंदन' या प्रयोगांवरून कळून येतें.[१६] काशीच्या व श्रावस्तीच्या तसेंच तक्षशिलेच्या व्यापारविषयक दळणवळणाच्या गोष्टी पुष्कळ जातकांतून व इतर बौद्ध ग्रंथांतून देण्यांत आल्या आहेत.[१७]

काशी हा जंबुद्वीपाचा एक भाग असल्यानें व येथील राजे अतिशय महत्त्वाकांक्षी असल्यानें सर्व जंबुद्वीपावर आपली सत्ता असावी अशी त्यांची उत्कट इच्छा असे. निरनिराळ्या घराण्यांतील राजांनीं काशी येथें राज्य केलें. भरत राजे जाऊन ब्रह्मदत्त राजे आले. जातक कथांतून या ब्रह्मदत्त राजांचा उल्लेख वारंवार येतो. महाभारतामध्येंहि १०० ब्रह्मदत्त राजांचा उल्लेख आहे.[१८] यांच्या कारकीर्दीत काशी हें वैभवाच्या शिखराला पोहोंचलें होतें असें दिसतें.[१९] जैन व बौद्धधर्मीय व्यापारी वर्गांतील लोकहि येथें फार. स्वतः तीर्थंकर पार्श्व हा काशीचा राजपुत्र.[२०]

---

१३ Dr. D. C. Das Gupta, Jain System of Education, p. 47. निर्यावलियाओ ed. by A. S. Gopani, pp. 118–120; 153–156.

१४. विनय i. p. 212.

१५. विनय ii p. 10

१६. जातक vi p. 151; i. p. 355; अंगुत्तर iii. p. 391.

१७. धम्मपद अट्ठकथा i, p. 123; iii. p. 429. B. C. Law, p. 41–43.

१८. म. भा. ii. 8–23.

१९. भद्दसालाजातक No. 465; धोनसाख जातक No. 353; विनय महावग्ग १०.२-३;

२०. An Advanced History of India, by Dr. R. C. Majumdar, p. 86.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तेव्हां जैन व्यापारी व बौद्ध व्यापारी यांनीं काशीस समृद्ध केलें असल्यास नवल नाहीं. डॉ. भांडारकरांच्या मतें पुष्कळ जातकांत वर्णिलेल्या काशीच्या राजांचीं नांवें पुराणांतून आलीं आहेत.[२१]

अशा प्रकारें समृद्ध नगरींतील श्रीमंत व संपन्न व्यापारी वर्गाचें लक्ष विद्यादानासारख्या पवित्र गोष्टीकडे वळल्यास आश्चर्य नाहीं. कोणी ना कोणी श्रेष्ठी एक-दोन विद्वानांना पोसत असल्यास किती तरी विद्वानांची सोय होणार. शिवाय अशा प्रकारें निरनिराळे दाते भेटल्यामुळें विद्वानांनीं चालविलेलें एकच विद्यापीठ येथें होऊं शकलें नाहीं, व प्रत्येक विद्वान् स्वतःचाच विषय विद्यार्थ्यांना शिकवूं लागला व स्वतःची परंपरा वाढवूं लागला. म्हणूनच अलबेरुनी म्हणतो त्याप्रमाणें येथें सुसज्ज व नियमित कार्य करणारीं महाविद्यालयें निघालीं नाहींत.

तरी पण वैयक्तिक रीत्या कां होईना, ही प्राचीन परंपरा ब्रिटिश अमदानीपर्यंत चालू होती; व इंग्रजी शिक्षणाला प्रारंभ झाल्यापासून काशीचें नांव विद्यादानाच्या व पंडित वर्गाच्या बाबतींत नाहींसें झाल्यासारखेंच होतें. पण तें पूर्वीइतकेंच आजहि उज्ज्वल करण्याचें श्रेय ख्रि. वा. डॉ. ॲनी बेझंटबाई व कै. वा. महामना पंडित मालवीयजी यांना आहे. कारण डॉ. बेझंटबाईच्या कॉलेजचें रूपान्तरच पंडित मालवीयजींनीं आजच्या प्रथितयश 'बनारस हिंदु युनिव्हर्सिटीं'त केलें. या युनिव्हर्सिटीनें हिंदुस्थानांतील प्रत्येक विद्वान् व्यक्तीचें मन आपणाकडे आकर्षून घेतलें आहे. कांहीं दिवसांपूर्वी एका ख्यातनाम अमेरिकन प्राध्यापकानें या विद्यापीठाची जी मुक्तकंठानें स्तुति केली, त्यावरून पाश्चात्य देशांतील पंडितहि त्या विद्यापीठाच्या कार्याकडे कुतूहलानें पाहतात ही गोष्ट स्पष्ट दिसत आहे. जगांतील कोणत्याहि चांगल्या विद्यापीठाला भूषणभूत होणारा अध्यापकवर्ग या विद्यापीठांत आहे; व या विद्यापीठाकडेहि हिंदुस्थानांतील निरनिराळ्या भागांतून विद्यार्थीवर्ग आकर्षिला जात आहे. प्राचीन शहरांपैकीं या एकाच शहरानें विद्यापीठाची परंपरा आजतागायत राखली आहे ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. अशाच प्रकारचीं निरनिराळीं प्रतितक्षशिला व प्रतिनालंदा विद्यापीठें आपल्या प्रिय भारतांत निघोत.

---

२१. Carmickel Lectures, 1918, p. 57.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७ : अयोध्या विद्यापीठ

(काल : अनिश्चित, इ. स. पूर्व ६००)

अयोध्या विद्यापीठाच्या माहितीचें मूळ

प्रसिद्ध जैन साधु हेमचंद्र सूरि यांच्या 'त्रिषष्टिशलाकापुरुषचरित'[1] या ग्रंथावरून आपणांस अयोध्या विद्यापीठासंबंधानें बरीच माहिती मिळते. डॉ. दास गुप्त यांनीं आपल्या 'जैन शिक्षणसंप्रदाय'[2] या ग्रंथांत ही माहिती थोडक्यांत दिली आहे.

अयोध्येचे राजे 'अर्हत्' ऋषभ हे स्वतः अत्यंत विद्वान् सत्पुरुष होते हें त्यांना लावलेल्या 'अर्हत्' या अत्यंत मानाच्या उपपदावरून कळून येईल. 'अर्हत्' हें उपपद जैन लोकांतील अत्यंत श्रेष्ठ कोटींतील सत्पुरुषांनाच लावण्यांत येत असे. राजे ऋषभ यांनीं आपल्या ज्ञानाचा उपयोग केवळ स्वतःच्या कल्याणाकरितां न करितां त्यांनीं तो प्रजेच्या हिताकरितांहि केला. त्यांनीं आपल्या प्रजेचें कल्याण व्हावें म्हणून आपणांस येत असलेल्या ७२ विद्या तिला मनोभावें शिकविल्या. जें शिक्षण त्यांनीं दिलें त्याचा आरंभ लेखनकलेनें झाला व शेवट आकाशांतील ताऱ्यांचें ज्ञान देऊन त्यांनीं केला. राजे ऋषभ यांच्या काळीं पुरुषवर्गाकरितां या ७२ विद्या व स्त्रियांकरितां निरनिराळ्या ६४ विद्या असत. यांची स्वतंत्र माहिती 'गुण-शीला' विद्यापीठांत देण्यांत येणार आहे. पुष्कळ ठिकाणीं स्त्री-पुरुषांचें शिक्षण एकत्र देण्याची पद्धत असल्यानें स्त्री-पुरुषांच्या शिक्षणांत बऱ्याच बाबतींत सारखेपणा असणें संभवनीय आहे.

स्त्रीपुरुषांचें सह-शिक्षण

जैन विद्यासंप्रदायाचें एक वैशिष्ट्य म्हणजे स्त्रियाचें व पुरुषांचें सहशिक्षण होय. जेथें जेथें जैन विहार होते तेथें तेथें स्त्री व पुरुष हा भेद न ठेवतां त्यांना एकत्र

---

१. त्रिषष्टिशलाकापुरुषचरित, पान ६८–७०.

२. Dr. Das Gupta : Jain System of Education, pp. 71–73.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिक्षण दिलें जाई. अर्थात् कांहीं बाबतींत स्त्रियांचा व पुरुषांचा निराळा अभ्यासक्रम असणें साहजिक आहे. उदाहरणार्थ, ज्यावेळीं पुरुषांना युद्धाचें विशिष्ट शिक्षण द्यावयाचें असेल त्यावेळीं स्त्रियांनाहि विशिष्ट प्रकारचें पण निराळें लष्करी शिक्षण देण्यांत येत असेल किंवा त्यांना लष्करी शिक्षणाऐवजीं ललितकला शिकविली जात असेल. भुवया व बिम्बिसार राजाची राणी नंदा या दोघींनीं गुणशीला विद्यापीठांत मुलांच्याबरोबरच शिक्षण घेतलें.[3] पण तत्पूर्वीहि कण्व ऋषीच्या आश्रमांत शकुंतलेचें व वाल्मीकि, अगस्त्य ऋषींच्या आश्रमांत तापसींचें शिक्षण मुलांबरोबरच होत असावें असें 'शाकुन्तल' व 'उत्तररामचरित' या नाटकांवरून दिसून येतें. प्राचीन कालीं मुलांमुलींना एकत्र शिक्षण दिल्यानें कांहीं अनर्थ ओढवतील अशी भीति चालकांना व पालकांना वाटत नसली पाहिजे; किंवा विद्यार्थ्यांच्या वागणुकीवर स्वतंत्र देखरेख ठेवण्याची व्यवस्था केली जात असेल.

सगर राजपुत्र व त्याचा अफाट शिक्षणक्रम

अर्हत् ऋषभ या राजानें आपला मुलगा राजपुत्र सगर याचें शिक्षण अयोध्या विद्यापीठांत करवून घेतलें. त्याला तेथें जें शिक्षण देण्यांत आलें त्यावरून या विद्यापीठांत काम करणारे आचार्य किती ज्ञानी व कार्यक्षम असले पाहिजेत याची कल्पना येते. राजपुत्र सगर याचें शिक्षण ज्या ज्या विषयांत झालें त्या त्या विषयांत व द्वारकाविद्यापीठांत गोयम राजपुत्रानें व राजगृह येथील गुणशीला विद्यापीठांत राजपुत्र मेघानें शिक्षण घेतलेल्या विषयांत बराच फरक पहावयास मिळतो.

'त्रिषष्टिशलाकापुरुषचरितम्' या ग्रंथांत दिलेला सगर राजपुत्राचा शिक्षणक्रम इतका अफाट आहे कीं, हा राजपुत्र इतके विषय शिकला कसा याचें आश्चर्य वाटतें. पण प्राचीन शिक्षणक्रमासंबंधानें जेथें जेथें आपण वाचतों—मग तें जैन ग्रंथांतून असो, बौद्ध वाङ्मयांतून असो किंवा पुराणादि काव्यांतून असो—तेथें तेथें हा शिक्षणक्रम आज शाळा-कॉलेजांतून देण्यांत येणाऱ्या शिक्षणापेक्षां किती तरी पटीनें जास्त होता हें कळून येईल. आजचा आहे तो शिक्षणक्रमहि जास्त वाटण्याचें कारण आजची दूषित शिक्षणपद्धति होय. आजच्या शिक्षणपद्धतींत अपव्यय फारच होत आहे. मुलांच्या अंगीं असणाऱ्या कार्यशक्तीला योग्य मार्गदर्शन नसतें

३. Dr. D. C. Das Gupta : Jain System of Education, pp. 59, 110.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व तिचा योग्य व भरपूर उपयोग करून घेण्यांत येत नाहीं. प्रत्यक्ष शिक्षणांत मुलांचा वेळ फारच थोडा खर्च होतो. त्यांतून मुलांच्या बुद्धीच्या निरनिराळ्या पातळ्यां-प्रमाणें त्यांना योग्य मदत मिळूं शकत नाहीं. शिकविणाऱ्या शिक्षकाचें ज्ञानहि बेताचेंच असतें. या सर्व कारणांमुळें आजच्या एकंदर शिक्षणांत किती अपव्यय होत असला पाहिजे याची जाणीव फारच थोड्या विचारी लोकांना होत असेल. प्राचीन कालच्या शिक्षणपद्धतींत विद्यार्थी २४ तास गुरुगृहीं आचार्यांच्या सान्नि-ध्यांत त्याच्या सतत देखरेखीखालीं रहात असल्यानें त्यास सगर राजपुत्राप्रमाणें अफाट शिक्षण घेणें कठीण वाटत नसे. त्यावेळचें शिक्षणसंस्थेंतील वातावरणहि आजच्या वातावरणापेक्षां निराळें असे. त्यावेळचे शिक्षक ज्ञानी असत. त्यांना पुस्तकें वाचून शिकवावें लागत नसे. त्यामुळें शिकवतांना रस उत्पन्न करणें ही गोष्ट त्यांना साध्य होई. त्यांतून विद्यार्थी गुरुगृहीं रहात असल्यानें त्याचें खाणेंपिणें सात्त्विक असे. दूध, तूप, दहीं त्याला भरपूर मिळत व त्याची शरीरप्रकृति उत्तम व निरोगी राहूं शके. याचाहि परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर फारच होत असला पाहिजे. A sound mind in a sound body–शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्–हें शिक्षणाचें पहिलें ध्येय असलें पाहिजे. अगदीं थेट उपनिषद्-कालापासून या तत्त्वाचा परिपोष करण्यांत आला आहे. 'नायमात्मा बलहीनेन लभ्यः' हें उपनिषद्वचन असून त्यांत बलाची जोपासना करण्याचा आदेश आहे. सतेज शरीर व तैलबुद्धि यांची जोड किती शोभून दिसेल याचा प्रत्येकानें विचार करावा.

या सर्व गोष्टींमुळें प्राचीन कालीं गुरुगृहीं शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांस कितीहि विषय जरी शिकविले तरी ते शिकणें त्यांना अवघड वाटत नसे.

राजपुत्र सगर याचें शिक्षण

राजपुत्र सगराच्या शिक्षणासंबंधानें खालील माहिती देण्यांत आली आहे[४]:
राजाच्या आज्ञेवरून एक शुभ दिवस पाहून काढण्यांत आला व राजपुत्राला गुरुगृहीं पाठविण्यांत आलें. ज्या दिवशीं त्याला गुरुकुलांत पाठविण्याचें ठरलें तो दिवस एक सण म्हणून साजरा करण्यांत आला. गुरुगृहीं गेल्यावर थोड्याच

४. Dr. D. C. Das Gupta : Jain System of Education, pp. 71-73.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिवसांनीं सगर राजपुत्रानें निरनिराळे विषय आत्मसात् केले. ज्याप्रमाणें समुद्रामध्यें असंख्य नद्या प्रवेश करतात त्याप्रमाणेंच व्याकरणादि विषयांनीं त्या राजपुत्राचे ठिकाणीं प्रवेश केला. एका दिव्यापासून दुसरा दिवा प्रकाश घेतो त्याप्रमाणें अलंकारशास्त्राचा प्रकाश त्याचें ठायीं आला. झोप येण्यापूर्वी त्यानें काव्य वाचावें; संतांचीं स्तोत्रें गावींत, अलंकारशास्त्रांतील श्रेष्ठ श्रेष्ठ अलंकार वाचावेत; यामुळें त्याला झोपहि स्वस्थ लागे. आपण नेहमीं नेहमीं ठेवत असलेली ठेव दिवसानुदिवस वाढत जाते व शेवटीं ती फारच वाढल्यावर आपण मोठ्या आनंदानें परत घेतों त्याप्रमाणें धर्माचीं महान् तत्त्वें त्यानें स्वीकारलीं व आत्मसात् केलीं. सगरानें 'स्याद्वादा' संबंधानें प्रश्नोपप्रश्न करून आपल्या सहाध्यायांस जेरीस आणावें. अर्थशास्त्र व नीतिशास्त्र म्हणजे महान् सागर; त्यांच्यांत उडी घेतल्यानंतर सहीसलामत बाहेर पडणें किती मुष्कील ! सहा नीति, चार राजसत्ता वगैरे भयंकर जलचर त्या समुद्रांत असतांना त्याला पार करणें कठीण; पण त्यांतूनहि सगर सहीसलामत बाहेर पडला. नंतर आयुर्वेदाचीं अष्टांगें त्यानें आपलीशीं करून घेतलीं. त्यानें सर्व वनस्पतींचें ज्ञान मिळविलें; कोणत्या वनस्पतींमध्यें कोणता गुण आहे, कोणता दोष आहे हें त्यानें यथार्थ जाणलें. ज्यायोगें संगीत, नृत्यकला, वाद्याचे चार प्रकार, नाट्याचे चार प्रकार वगैरेची संपूर्ण माहिती मिळूं शकेल असें ज्ञान त्याला देण्यांत आलें. याशिवाय रतीचेहि चार प्रकार त्याला शिकवून चार प्रकारानें आनंद कसा मिळवितां येईल हें तो शिकला. हस्तिविद्येचें ज्ञान तर त्याला न शिकवितां आलें; कोणता हत्ती चांगला, कोणता वाईट, हत्तीची परीक्षा कशी करावी, हत्तीला मदस्राव केव्हां होतो, तो केव्हां ओसरतो, त्यावर उपाय कोणता करांवा वगैरेचें समग्र ज्ञान त्याला झालें. वाहनाकरितां उपयोगांत येणारे प्राणी व विशेषतः अश्व यांची परीक्षा कशी करावी याचेंहि ज्ञान त्याला संपूर्ण झालें.

नंतर त्यानें लष्करी शिक्षण घेण्याचा निश्चय केला. पहिल्यानें धनुर्वेदासंबंधानें सर्व माहिती त्यानें घेतली. नंतर इतर शस्त्रांचीहि माहिती त्या त्या शस्त्रावरील ग्रंथांच्या सहाय्यानें त्यानें मिळविली. त्यानें ते सर्व ग्रंथ पाठ केले. नंतर तीं सर्व शस्त्रें त्यानें अशीं हाताळलीं कीं, कोणत्याहि शस्त्राचें नांव त्याला विचारल्याबरोबर तो तें शस्त्र दाखवी. इतकेंच नव्हे तर त्याचा उपयोगहि सप्रयोग करून दाखवूं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शके. यानंतर तो युद्धकला शिकला. त्यानें हाताळलेल्या कांहीं शस्त्रांचीं नांवें येणेंप्रमाणें आहेत : धनुष्यबाण, तरवार व तरवारीचे सर्व प्रकार, ढाल व ढालीचे सर्व प्रकार, बरची, जंबिये, कुऱ्हाडी, परशु, भाले, गदा, कंपन, लाठी, हल, काठीचे प्रकार, पट्टिश, दुष्फोट, भूसंधि, फेंकून मारण्याचे दगड, त्रिशूल वगैरे. अशा प्रकारें एक ना दोन, किती तरी शस्त्रें त्यानें हाताळलीं व त्यांची माहिती त्यानें करून घेतली. चंद्राची एक एक कला वाढूं लागतां लागतां सर्व कलांनीं पूर्ण असा पौर्णिमेचा चंद्र जसा शोभून दिसतो तसा हा राजपुत्रहि एक एक विद्या शिकून पूर्ण झाल्यावर अत्यंत तेजस्वी दिसूं लागला.

वर दिलेले विषय व ते शिकण्याची पद्धत यांचा आपण विचार केला व आजच्या शिक्षणाशीं त्यांची तुलना केली म्हणजे दोन शिक्षणक्रम व पद्धति यांमधील फरक लगेच आपल्या नजरेस येईल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८ : गुणशीला विद्यापीठ

[कालः इ. स. पू. ६ वें शतक]

गुणशीला विद्यापीठांतील शिक्षणक्रम

गुणशीला विद्यापीठ राजगृह[1] नगरींत होतें. या विद्यापीठांत सर्व प्रकारचें शिक्षण देण्याची सोय होती. येथें वाङ्मयविषयक अभ्यास इतर ठिकाणांप्रमाणें शिकविला जाई; त्याचप्रमाणें निरनिराळीं शास्त्रेंहि शिकविलीं जात. येथें विद्यार्थी युद्धकलेंत निष्णात होत. शिक्षण दोन प्रकारें दिलें जाई : ग्रंथावरून पाठ करवून घेणें व त्यावर प्रश्नोपप्रश्न होऊन वादविवाद करणें. एकमेकांबरोबर चर्चा करून विद्यार्थी आपले विषय चांगले तयार करीत. पण युद्धकलेसारखे कांहीं विषय असे होते कीं त्यांचें प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना द्यावें लागे; व विद्यार्थ्यांकडून त्याची तालीम करून घेण्यांत येई. श्रेणिक बिंबिसाराचा[2] मुलगा राजपुत्र मेहा किंवा मेघा (मेघवर्ण इ. स. पू. ५२७ च्या सुमारास) याचें शिक्षण गुणशीला विद्यापीठांत झालें. सातव्या वर्षी त्याला या विद्यापीठांत दाखल करण्यांत आलें व तो १९।२० वर्षांचा होईपर्यंत या विद्यापीठांत होता. राजपुत्राच्या बाबतींत विद्यापीठांत दाखल करून घेण्याचें वय शिथिल केलेलें दिसतें; किंवा कदाचित् गुणशीला विद्यापीठ बिंबिसारानें आपल्या मुलाकरितांच काढलें असण्याचा संभव आहे. नाहींतर साधारणतः सर्व विद्यापीठांतून दाखल करून घेण्याचें वय १६ असलेलें दिसेल. राजपुत्र मेघा या विद्यापीठांत १२ वर्षें राहिला. त्या अवधींत तो ७२ विद्या शिकला[3] ज्या ज्या विषयांचें ज्ञान मुलांना असणें अवश्य आहे असे सर्व विषय या ७२ विद्यांमध्यें आले होते. म्हणूनच अशा प्रकारचें शिक्षण घेतल्यावर मुलाला अमकी एक गोष्ट येत नाहीं असें होणारच

---

१. ही नगरी बिंबिसारानें वसविली असें म्हणतात. बिम्बिसार इ. स. पू. ५४५. Cf. 'An Advanced History of India' by Dr. R. C. Majumdar, p. 58.

२. Ibid. p. 59.

३. Banarsi Das Jain : Ardha Magadhi Reader, p. 101.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहीं. पूर्वीच्या जैन आणि बौद्ध आचार्यांनीं लौकिक शिक्षणाचा प्रश्न किती कुशलतेनें सोडवला होता हें हे ७२ विषय चाळले म्हणजे लक्षांत येईल. यांत कोणताहि विषय गाळलेला दिसणार नाहीं किंवा कोणत्याहि विषयाकडे दुर्लक्ष केलेलें दिसणार नाहीं. या ७२ विषयांची यादी पुढें 'वलभी विद्यापीठा 'च्या प्रकरणांत देण्यांत येणार आहे.

गुणशीला विद्यापीठांत मुलांमुलींचें सहशिक्षण

इतर जैन विद्यापीठांप्रमाणें गुणशीला विद्यापीठांतहि मुलांमुलींचें शिक्षण एकत्र होत असलें पाहिजे हें तेथें दाखल झालेल्या दोन स्त्रियांच्या नांवाच्या उल्लेखांवरून कळून येईल. यापैकीं एक भुवया. हिनें आपला पुढला सर्व अभ्यासक्रम येथेंच संपविला; व तो तिनें इतर मुलांबरोबरच केला.[४] दुसरी स्त्री म्हणजे बिम्बिसाराची बायको राणी नंदा. महावीरानें तिला याच विद्यापीठांत प्रवेश देवविला.[५]

आतां ज्या अर्थीं मुलींना व प्रौढ स्त्रियांनासुद्धां या विद्यापीठांत दाखल करून घेण्यांत येत होतें त्या अर्थीं येथें स्त्री शिक्षकहि असावयास पाहिजेत यांत शंका नाहीं; व निरनिराळ्या विद्यापीठांतून प्रसिद्ध शिक्षिका होत्या हें आपणांस निरनिराळ्या ग्रंथांवरून कळून येतें. या कालांत किती तरी स्त्रियांनीं बौद्ध किंवा जैन धर्म स्वीकारून निरनिराळ्या विहारांत प्रवेश मिळविला होता. या स्त्रियांत बिम्बिसाराच्या मित्राची मुलगी थेरीसामा, बिम्बिसार राजाच्या दोन बायका खेमा व नंदा, धम्मदिन्ना, अनुपमा, सुजाता यांचा प्रामुख्यानें उल्लेख केला पाहिजे.[६]

---

४. Dr. D. C. Das Gupta : Jain System of Education, pp. 59, 60, 70, 110.

५. "Under Bimbisar Magadha became a flourishing kingdom which attracted the most enlightened men of the age. Both Vardhamana Mahaveera, the last apostle of the Jainas and Gautam Buddha, the great master of the Buddhists, preached their doctrines during the reign of Bimbisara."
cf An Advanced History of India, by Majumdar.

६. S. V. Venkateswara : Indian Culture Through Ages, Vol. I, pp., 111-112.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अशा प्रकारें विहारांतून व इतर ठिकाणांहून शिक्षण पूर्णत्वानें घेऊन अगदीं नवव्या शतकांपर्यंतहि स्त्रियांनीं उत्तम उत्तम पुरुष लेखकांना सुद्धां मागें टाकल्याचीं उदाहरणें आहेत. नवव्या शतकांतीलच राजशेखर कवीनें आपल्या काव्यमीमांसा[७] ग्रंथांत कांहीं विदुषी स्त्रियांचीं नांवें दिलीं आहेत. त्यांत अवन्तीसुंदरी, शीलभट्टारिका, विकटनितम्बा, विजयाङ्का, प्रभुदेवी, विजिङ्का या हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांतील विदुषींनीं प्रसिद्ध लेखक वामन, बाण, दंडिन् यांच्या लिखाणावरहि ताण केल्याचें लिहिलें आहे.

मिहिर भोजाच्या शिलालेखांत[८] तर युद्धकलेंत प्राविण्य मिळविलेल्या किती तरी स्त्रियांचीं नांवें दिलीं आहेत. चालुक्य घराण्यांतील सहाव्या विक्रमादित्यानें तर आपल्या राण्यांना निरनिराळ्या प्रांतावर राजप्रतिनिधि (Viceroy) नेमल्याचीं उदाहरणें आहेत.[९]

यावरून प्राचीन काळच्या स्त्रियांचें शिक्षण पुरुषांच्या शिक्षणाइतकेंच प्रभावी असलें पाहिजे हें वरील विधानांवरून लक्षांत येईल. त्यांना ज्या ६४ कला शिकवण्यांत येत होत्या त्यांत ' स्त्री ' ही उत्तम व कार्यक्षम कशी बनवितां येईल इकडे जास्त लक्ष होतें हें दिसतें.

स्त्रियांना शिकविण्यांत येणाऱ्या ६४ कला

भारतीय संस्कृति अत्युन्नत शिखरावर असतांना स्त्री व पुरुष यांना चारित्र्यवान् व कार्यक्षम करतां यावें म्हणून शिक्षणाचा प्रश्न हातीं घेणाऱ्या आचार्यांनीं हा प्रश्न इतका सुंदर रीतीनें सोडवला कीं त्याचीं दृश्यें फलें आपणाला निरनिराळ्या क्षेत्रांत पहावयास मिळालीं. एकंदर शिक्षणाचे पुरुषांकरितां ७२ भाग व स्त्रियांकरितां ६४ भाग करण्यांत आले. या दोनहि भागांत सारखेपणा असणें संभवनीय व स्वाभाविक आहे; पण कांहीं विषय केवळ पुरुषांना व कांहीं विषय केवळ स्त्रियांना शिकविण्याजोगे असल्यानें त्या त्या बाबतींत फरक पडला.

७. काव्यमीमांसा अ. १०; S. K. Das : The Educational System of the Ancient Hindus p. 249.

८. Ep. India, Vol. XVIII, No. 13.

९. S. V. Venkateshwara : Indian Culture Through Ages, Vol. I, p. 294.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्त्रियांना शिकविण्यांत येणाऱ्या ६४ भागांत खालील विषयांचा किंवा कलांचा समावेश होतो :[१०]

१ गीत, २ वाद्य, ३ नृत्य, ४ नाट्य, ५ आलेख्य किंवा चित्रकला, ६ विशेषकच्छेद्य (विलासिनी स्त्रिया सौंदर्यप्रसाधनासाठीं मुखावर जी रंगरंगोटी करतात ती कला), ७ तण्डुल-कुसुम-बलि विकार (तांदुळाचें विविध प्रकारचें अन्न तयार करणें, फुलांच्या माळा, गजरे, गुच्छ वगैरे बनविणें, जेवणाचे वेळेस ताटा-पाटाची व वाढपाची मनोहर मांडणी करणें), ८ पुष्पास्तरण (शयनोचित पुष्पांच्या माळा व पुष्पांचा बिछाना तयार करणें), ९ दशनवसनाङ्गराग (दांतांना रंग लावणें, वस्त्रें रंगविणें, शरीराचे कांहीं भाग चित्रित करणें), १० मणि-भूमिका-कर्म (घरांतील जमीन चांगली दिसावी म्हणून तीमध्यें खोदून निरनिराळीं रत्नें, मणि बसविणें), ११ शयनरचना (शयनाची विशिष्ट प्रकारची मांडणी), १२ उदकवाद्य (जलतरंग), १३ उदकघाट (निरनिराळ्या तऱ्हेच्या कारंज्यांची रचना करून उपवनाची शोभा वाढविणें), १४ माल्यग्रथनविकल्प (फुलांच्या माळा तयार करणें), १५ शेखरापीडयोजन (मस्तकावर निरनिराळ्या तऱ्हेच्या फुलांचीं, रत्नांचीं, सुवर्णाचीं भूषणें घालण्याची कला), १६ नेपथ्यप्रयोग (रंगभूमीसाठीं पोषाख व अलंकार यांची यथातथ्य रचना करणें), १७ कर्णपत्रभङ्ग (कानाजवळील गालाचे भाग रंगविणें), १८ गन्धयुक्ति (सुगंधि द्रव्यें तयार करणें), १९ भूषणयोजम् (शरीराच्या निरनिराळ्या भागांवर उचित अलंकाराची योजना करणें), २० ऐन्द्रजाल (गारुड्यांची विद्या), २१ कुचमारयोग (स्त्रियांचा छातीचा भाग टवटवीत ठेवण्याची कला), २२ हस्तलाघव (हात पाहून भविष्य पाहण्याची कला), २३ विचित्रशाकपूपभक्षविकारक्रिया (स्वयंपाकाची कला), २४ पाणकरसरागासवयोजन (निरनिराळीं आसवें तयार करण्याची कृति), ३५ सूचिवायकर्म (शिवणविणकाम), २६ सूत्रक्रीडा (दोऱ्यांच्या सहाय्यानें बाहुल्यांच्या हालचालीचे खेळ करणें), २७ वीणाडमरूकवाद्य (तंतुवाद्यें वाजविण्याची कला), २८ प्रहेलिका (कोडीं घालणें व सोडविणें),

---

१०. बा. मा. दाभाडे, एम्. ए. : 'विद्यामंदिरांत', पान ८६–९३; वात्स्यायनकृत 'कामसूत्र', कादंबरी, शुक्रनीतिसार इ. इ. Radha Kumud Mookerji : Ancient Indian Education, pp. 354–360; N. N. Mazumder : pp. 116–120.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२९ प्रतिमाला (विशिष्ट अक्षर देऊन त्यानें काव्याची सुरवात करणें), ३० दुर्वाचक योग (निरनिराळ्या प्राण्यांच्या व इतर आवाजांचें अनुकरण करणें), ३१ पुस्तकवाचन, ३२ नाटकाख्यायिकादर्शन (मूकाभिनय), ३३ काव्यसमस्या-पूरण (काव्याचा एक चरण दिला असतांना बाकीचे चरण तयार करणें), ३४ पट्टिकावेत्रवान-विकल्प (धनुष्य, बाण, वेताच्या इतर वस्तु तयार करण्याची कला), ३५ तर्कुकर्म (सूत कांतण्याची कला), ३६ तक्षण (सुतारकाम, कोरीव काम वगैरे), ३७ वास्तुविद्या (पक्ष्याच्या घरट्यापासून राजवाडा बांधण्यापर्यंतचें ज्ञान देणारी कला), ३८ सुवर्णरौप्यरत्नपरीक्षा (सोन्या-रुप्या-रत्नाची परीक्षा), ३९ धातुवाद (अशुद्ध धातु शुद्ध करण्याची कला), ४० मणिरागज्ञान (रत्नांना रंग देण्याची कला), ४१ आकरज्ञान (खाण पाहून काढण्याचें ज्ञान), ४२ वृक्षायुर्वेदयोग (वृक्षांच्या संवर्धनाचें ज्ञान), ४३ मेषकुक्कुटलावकयुद्धविधि (निरनिराळ्या प्राण्यांच्या झुंजी लढविण्याचें ज्ञान), ४४ शुकसारिकालापन (पक्ष्यांना बोलावयास, निरोप देण्यास शिकविणें), ४५ उत्सादन (अङ्गमर्दन), ४६ केशमार्जन-कौशल (केशभूषेचे प्रकार) [अजिंठ्याचीं लेणीं पहा], ४७ अक्षरमुष्टिकाकथन (मनांतील अक्षर ओळखणें, मुठींतील वस्तु ओळखणें), ४८ म्लेच्छितविकल्प (गुप्त लिपी किंवा भाषेचा प्रयोग), ४९ देशभाषाविज्ञान (निरनिराळ्या देशांतील भाषांचें ज्ञान), ५० निमित्तज्ञान (शकुन सांगणें), ५१ यंत्रमातृका (ठसे—ब्लॉक्स तयार करणें), ५२ धारणमातृका (आपल्या मनांतील अर्थ गुप्त रीतीनें व्यक्त करणारें काव्य), ५३ संपाठ्य (गाण्यासाठीं नोटेशन पद्धति), ५४ मानसीकाव्यक्रिया (आयत्या वेळीं विषय देऊन काव्य तयार करणें), ५५ अभिधानकोश (एकाच अर्थाचे भिन्न शब्द एकत्रित बांधण्याची कला), ५६ छन्दोज्ञान (छंदःशास्त्र किंवा स्वभावपरीक्षाज्ञान), ५७ क्रियाविकल्प, ५८ छलितकयोग (हातचलाखीचे खेळ), ५९ वस्त्रगोपन (वस्त्राच्या साध्या धाग्याला रेशमाची चमक देणें), ६० अक्षक्रीडा (फासे घेऊन खेळणें), ६१ बालक्रीडनक (मुलांकरितां खेळणीं तयार करणें), ६२ वैनायिकीज्ञान, ६३ वैजयिकीज्ञान (धनुर्वेदाचें ज्ञान), ६४ व्यायामिकीज्ञान (मृगयादि).

हे सर्व विषय वाचल्यानंतर आजच्या वाचकाचें व विशेषतः विद्यार्थ्यांचें डोकें दुखूं लागेल किंवा सुन्न तरी खास होईल. पण प्रत्येक विद्यार्थी-विद्यार्थिनीला वरील

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विषय शिकविले जात असले पाहिजेत हें रामायण (१-९-५), भागवत (१०-४५-३६), महाभाष्य (१-१-५७), दशकुमारचरित (२-२१), कादम्बरी वगैरे शेंकडों ग्रंथांत केलेल्या उल्लेखांवरून कळून येतें.

मराठी पहिलीपासून बी. ए. होईपर्यंत १५ वर्षांत मुलांना आज जें शिक्षण मिळतें त्याची व १२ वर्षांत मिळणाऱ्या वरील प्रकारच्या शिक्षणाची तुलना केली असतांना आजच्या शिक्षणक्रमांत काय फरक करावयास पाहिजे याची बरोबर कल्पना येईल.

गुणशीला विद्यापीठांत स्त्रियांना वरील सर्व प्रकारचें शिक्षण देण्याची सोय, त्याचप्रमाणें पुरुषांना योग्य असें इतर शिक्षण देण्याचीहि सोय करण्यांत आली होती, हें मेधा राजपुत्रास मिळालेल्या शिक्षणावरून लक्षांत येईल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

९ : कुण्डिनपुर विद्यापीठ

[काल : अदमासें इ. स. पू. ६ वें शतक]

वैशालीजवळील कुण्डिनपुर : प्राक्कालीन वैशालीचें महत्त्व

'कल्पसूत्र' व 'नवतत्त्व' या जैन ग्रंथांवरून[1] कुण्डिनपुर विद्यापीठासंबंधानें माहिती आपणांस मिळूं शकते. कुण्डिनपुर विद्यापीठांत वैदिक धर्माचें व तदनुषंगानें इतर शिक्षण दिलें जाई. अगोदर हें विद्यापीठ वैशालीच्या परिसरांत स्थापन झाल्यामुळें वैशालीचें प्राचीन कालीं किती महत्त्व होतें हें आपण पाहूं. या वैशाली शहराचा व कांहीं प्राचीन थोर वैदिक ऋषि व राजे यांचा संबंध फारच निकटचा आहे. मार्कण्डेय पुराणांत तृणबिंदु ऋषीसंबंधानें माहिती दिली आहे; त्यावरून आपणांस कळतें कीं या तृणबिंदु ऋषीचा अलम्बुसा या अप्सरेशीं संबंध आला व त्याला विशाल या नांवाचा पुत्र झाला. यानेंच वैशाली नगरीची स्थापना केली.[2] हें शहर गंगेच्या उत्तरेकडील तीरावर खालच्या अंगास होतें म्हणून रामायणांत सांगितलें आहे. वैशाली नगरींत कांहीं प्रसिद्ध राजे होऊन गेले, त्यांत कामप्री अविक्षित् याचा मुलगा मरुत्त हा थोर राजा होऊन गेला. यज्ञयागाबद्दल या राजाची फारच ख्याति होती व त्याचें वर्णन निरनिराळ्या प्राचीन ग्रंथांतून आलें आहे.[3] 'ओम् यज्ञेन यज्ञम् अयजन्त देवाः' या प्रसिद्ध मंत्रपुष्पांजलिमध्यें या मरुत्त राजाचा प्रामुख्यानें उल्लेख करण्यांत आला आहे. इतक्या थोर कीर्तीचा हा राजा वैशाली नगरींत होऊन गेला.

---

१. Dr. Das Gupta : Jain System of Education, p. 71.

२. V. S. Dalal, B. A. : A History of India From The Earliest Times, Vol. i, p. 102.

३. म. भा. आश्वमेधिक पर्व, अ. १०; पद्मपुराण, उ. खं. अ. १२; विष्णुपुराण, ४; ऐ. ब्रा. ८.१२.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कुण्डग्राम ऊर्फ कुण्डिनपुर विद्यापीठांतील अभ्यासक्रम

अशा या वैशालीच्या परिसरांत 'कुण्डग्राम' किंवा 'कुण्डिनपुर' म्हणून गांव होता. तेथें जें विद्यापीठ स्थापन झालें तेंच कुण्डिनपुर विद्यापीठ. या कुण्डिनपुर विद्यापीठांत वैदिक वाङ्मयाच्या अभ्यासाला जास्त महत्त्व देत; इतर अभ्यासक्रम कमी दर्जाचा मानण्यांत येई. प्रारंभिक सर्व अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर, म्हणजे वयाच्या १६ व्या वर्षानंतर, या विद्यापीठांत प्रवेश मिळे. येथें शिकविल्या जाणाऱ्या विषयांत वेद, वेदाङ्ग, इतिहास, आख्यान, तत्त्वज्ञान, गणित, व्याकरण, काव्य, ज्योतिष व सर्व धार्मिक ग्रंथ यांचा समावेश होई. महावीराला या विद्यापीठांत दाखल करण्यापूर्वी त्याला कोणत्या प्रकारचें शिक्षण द्यावें याबद्दल त्याच्या आईच्या मनांत नेहमीं विचार चालत. तिला वाटे : "बालपण संपल्यानंतर जें सामान्य ज्ञान म्हणून समजलें जातें तें ज्ञान पूर्णपणें माझ्या मुलाला मिळालें पाहिजे. तरुणपणीं तो ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद हे चारहि वेद शिकेल; तो ते अगदीं मुखोद्गत करील; त्यांतील तत्त्वें कोणी खोडून काढूं लागला तर त्याचें तो खंडन करील व वैदिक ज्ञानाची महत्ता वाढवील. तो इतिहास शिकेल, व निघंटुशास्त्रांत प्राविण्य मिळवील. शब्दांचा गूढ अर्थ काय आहे हें तो पाहून काढील. वेदांगाचा व षड्दर्शनाचा तो परिचय करून घेईल. सांख्यशास्त्र, गणित, यज्ञविधि, व्याकरण, काव्यशास्त्र इत्यादिकांत तो पारंगत होईल."[४]

वैदिक परंपरेनें चालत आलेल्या विद्यापीठांतील अभ्यासक्रमांत आणि जैन व बौद्ध परंपरांनीं सुरू झालेलीं विद्यापीठें यांतील अभ्यासक्रमांत कसा व किती फरक होता हें वरील माहितीवरून स्पष्ट होईल. बौद्ध व जैन विद्यापीठांत अभ्यासाचे विषय वाढत गेले व ते ७२ विद्यांवर केंद्रित झाले. याशिवाय स्त्रियांकरितां ६४ कला ठेवण्यांत आल्या होत्या हें निराळेंच !

कुण्डिनपुर विद्यापीठांतील विशेष : व्यायामशास्त्राचें शिक्षण

तरी पण प्रत्येक विद्यापीठाप्रमाणें येथील विद्यापीठांतहि कांहीं बाबतींत वैशिष्ट्य पहावयास मिळतें. तें म्हणजे व्यायामशास्त्राचें यथासांग शिक्षण होय. कुण्डिनपुर

---

४. कल्पसूत्र व नवतत्त्व, पान २७; Dr. Das Gupta : Jain System of Education, p. 71.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विद्यापीठांत ज्या ठिकाणीं महावीराचे वडील सिद्धार्थ व्यायाम करीत तेथें व्यायामशास्त्राचा यथासांग अभ्यास कसा होई हें पुढील उताऱ्यावरून दिसून येईल :[५]

" सिद्धार्थ सकाळीं उठल्यावर व्यायामशाळेंत जात. या ठिकाणीं व्यायामास आवश्यक अशा सर्व तऱ्हेच्या उपकरणांचा संग्रह करून ठेवण्यांत आला होता. निरनिराळ्या प्रकारच्या उपकरणांच्या सहाय्यानें भरपूर व्यायाम केल्यानंतर थकवा उत्पन्न होणें साहजिक आहे. तो घालविण्याकरितां निरनिराळ्या प्रकारचीं उटणीं व तेलें त्याला लावण्यांत येत. हीं तेलें व हीं उटणीं तयार करण्याकरितां निरनिराळीं सुवासिक द्रव्यें वापरण्यांत येत. हीं द्रव्यें शरीरास पोषक, कान्ति देणारीं, थकवा नाहींसा करणारीं, उत्साह वाढविणारीं व सर्व इंद्रियांना सतेज करणारीं अशीं असत. हीं सर्व तेलें सिद्धार्थाच्या शरीराला लावण्यांत येत. यानंतर मालीश करण्यांत पारंगत असे लोक येत; व त्याच्या शरीराला मालीश करीत. मालीश करण्याचेंहि एक शास्त्रच आहे, व या शास्त्रांत पारंगत झाल्यामुळेंच त्यांना उत्तम प्रकारची मालीश करतां येई. मालीश करून हाताच्या व पायाच्या तळव्याला ते अगदीं लोण्यासारखा मऊपणा आणीत. शरीराचा प्रत्येक भाग मोकळा न् मोकळा होई. शरीराला मालीशहि ते इतक्या सफाईनें करीत कीं मालीश होत आहे हें लक्षांतहि येत नसे; उलटपक्षीं शरीर फुलासारखें हलकें होई. सर्व शरीराला मालीश झाल्यामुळें हाडांना जोर येई, मांसल भाग तरतरीत होत, कातडी सुटसुटीत वाटे, केसांना तकवा येई व अंगांत श्रमाचें चिन्हहि रहात नसे. अशा प्रकारें व्यायाम झाल्यानंतर तो स्नानगृहांत जाई."

अशा प्रकारच्या व्यायामशालेचें व स्नानगृहाचें वर्णन बाणभट्टानें 'कादंबरी'-मध्यें केलें आहे तें पुष्कळांनीं वाचलें असेलच.[६] ग्रंथकार इतकें अचूक वर्णन काल्पनिक गोष्टींचें करूं शकणार नाहीं. व्यायामगृहें, स्नानगृहें इत्यादि प्राचीन कालीं सुसज्ज ठेवलीं जात हें वरील वर्णनावरून कळून येईल. आजच्या व्यायामशाला, शाळा-कॉलेजांतील व्यायामगृहें व व्यायामशास्त्र शिकविणारे मास्तर आणि प्राचीन कालचीं व्यायाम मंदिरें व व्यायामशास्त्राचें ज्ञान देणारे आचार्य यांची तुलनाच

---

५. कल्पसूत्र, भाग ४; Ibid. p. 78.

६. कादंबरी (पूर्व भाग), पॅरिग्राफ, १३.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करतां येणार नाहीं. बडोद्यांतील प्रसिद्ध व्यायामशास्त्राचार्य महर्षि माणिकराव यांची 'जुम्मादादा व्यायाममंदिर' यासारखीं कांहीं मंदिरें व कांदिवलीसारख्या संस्था वगळल्यास शास्त्रीय पद्धतीनें व्यायामशास्त्राची वाढ करणाऱ्या किती शाळा आज सांपडतील? व्यायामाच्या प्रत्येक अंगासंबंधानें खोल खोल संशोधन आज किती जणांनीं केलें आहे? व्यायामशाळेंत शस्त्रागाराचें प्रदर्शन व प्रत्येक शस्त्राबद्दलचा इतिहास किती व्यायामशाळेंतून पहावयास मिळेल? ज्यांनीं संशोधनाच्या दृष्टीनें व लोककल्याणाच्या दृष्टीनें खरोखर तपश्चर्या केली आहे असे किती आचार्य सांपडतील?[७] या निरनिराळ्या विद्यापीठांची माहिती वाचून आजच्या शिक्षणांत ज्या ज्या उणीवा असतील त्या त्या भरून काढण्याचा प्रयत्न जोरानें व्हावयास पाहिजे; व म्हणूनच प्रत्येक विद्यापीठाचें निरनिराळें वैशिष्ट्य चितारण्याचा प्रयत्न केला आहे. पूर्वीच्या विद्यापीठांतून मानसिक व बौद्धिक शिक्षण देण्याचा जितका शिस्तवार प्रयत्न होई तितकाच प्रयत्न शरीरसामर्थ्य वाढविण्याकडे होई. इतर शास्त्रांप्रमाणें याहि शास्त्रांत एकसारखें संशोधन होई. अर्थात् या शास्त्राच्या संशोधनास वाहून घेतलेले महान् आचार्यहि असणारच. ज्या भारतांत व्यायामशास्त्राची इतर शास्त्राप्रमाणेंच इतकी वाढ झाली त्याच भारतवासीयांस व्यायामशास्त्र म्हणजे काय हें अगदीं अलीकडे अलीकडे म्हणजे ३०।३५ वर्षांपूर्वींपर्यंत माहीत नव्हतें ही किती विचित्र घटना आहे! हें शास्त्रच जवळ जवळ विसरलें गेलें होतें. नुसती दंडेली करणें हें व्यायामशाळाचालकांचें, आखाडेबाजांचें काम होतें व म्हणून समाजांत त्यांना व या शास्त्राला किंमत राहिली नव्हती. अत्यंत अवजड शरीर, तरतरीतपणाचा अभाव, उच्च शिक्षणाच्या नांवानें शून्य, अर्थात् संशोधनाचें नांवच नको, फक्त पूर्वींच्या वैभवाची जी पुसट कल्पना तिच्या

---

७. व्यायाममंदिर कशा प्रकारचें असावें याबद्दल थोडक्यांत अनुभव घेण्याची ज्या कोणाची इच्छा असेल व प्राचीन कालचीं व्यायाम मंदिरें कशा प्रकारचीं असतील हें ज्यांना पहावयाचें असेल त्यांनीं महर्षि माणिकरावांच्या जुम्मादादा व्यायाम मंदिरास अवश्य भेट द्यावी, व्यायामशालेची रचना पहावी, तेथील शांत, गंभीर, वातावरणाचा आस्वाद घ्यावा, तेथें असलेलीं उपकरणें पहावींत व तीं हाताळावीं, तेथील ग्रंथालय पहावें, तेथील महर्षि रात्रंदिवस लोककल्याणार्थ नेहमीं एका पायावर कसे तयार असतात इकडे लक्ष द्यावें, अशी नम्र विनंति मी वाचकांस करतों.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संपत्तीवर सर्व आखाड्यांची उभारणी ! व्यायामशास्त्राचें विकृत स्वरूप म्हणजेच तीन तपांपूर्वीचे आखाडे !

पण ७५ वर्षांपूर्वी बडोद्यांत एक वृद्ध तपस्वी व्यायामशास्त्राच्या बाबतींत तपश्चर्या करीत होते. शंभर वर्षांच्या घरांत होते ते. हे तपस्वी म्हणजे 'जुम्मामिया' होत. यांचे हिंदु-मुसलमान असंख्य शिष्य होते. पण प्राचीन पद्धतीप्रमाणें अर्थात् उद्दालक वगैरे शिष्यगणांप्रमाणें केवळ गुरुमाऊलीला खूष करून विद्या मिळविण्याच्या उद्देशानें एक महाराष्ट्रीय विद्यार्थी या शिष्यगणांत दाखल झाला. गुरुभक्ति, शुद्धाचरण व शिक्षण घेण्याची आस्था पाहून या शिष्यावर गुरुजींचें प्रेम बसलें. तरी पण या गुरूजवळून एक एक विद्या हस्तगत करण्यांत या शिष्यवरानें जे हाल सोसले ते आजचा कोणीहि विद्यार्थी सहन करूं शकणार नाहीं. त्या हालांचें वर्णन ऐकलें कीं इतके हाल या विद्यार्थ्यानें कसे सहन केले असतील म्हणून आश्चर्य वाटतें ! पण हा शिष्यवर स्वतःस विसरून केवळ गुरुमय बनला, गुरुसेवेंत तन्मय झाला, व आश्चर्य म्हणजे नकळत गुरूची सर्व शक्ति व त्याचें तेज या विद्यार्थ्यांत उतरलें. गुरुसेवेच्या कसोटीला हा विद्यार्थी पात्र ठरला; व गुरु पैगंबरवासी होतांना त्यांनीं सर्व शिष्यांना जवळ बोलावून आपल्या कार्याची सर्व जबाबदारी या शिष्योत्तमावर टाकली. हा शिष्योत्तम म्हणजेच महर्षि माणिकराव व या कामगिरीचें दृश्य फल म्हणजेच आजची भारतांतील व्यायामविषयक चळवळ.

प्रो. माणिकरावांच्या गेल्या पन्नास वर्षांच्या तपाचें फळ आज सर्वच ठिकाणीं पहावयास मिळत आहे. प्रो. माणिकराव यांच्या यशाचें बीज त्यांच्या चारित्र्यांत आहे हें ज्यांना ज्यांना त्यांची माहिती आहे ते सांगूं शकतील. 'येथें चारित्र्य फळासि आलें' असेंच त्यांच्या बाबतींत म्हणतां येईल. सात्त्विकता, तेज, शौर्य, शांति, मूर्तिमंत कार्य, वगैरे गोष्टी येथें पाहिल्यानंतर महर्षि भीष्माशिवाय दुसरी कोणाची मूर्ति डोळ्यासमोर येणार ?

प्रो. माणिकराव यांच्या कामगिरीची तुलना प्राक्कालीन वैदिक ऋषींच्या किंवा आचार्यांच्या कामगिरीशीं करतां येईल. विशेषतः स्वतःच्या कामाचें अवडंबर न माजविणें, प्रचार (प्रोपोगॅन्डा) पद्धतीचा अवलंब न करणें, शेंकडों ठिकाणीं यांचे शिष्यवर गेले असतांना त्यांचीं त्यांचीं कामें स्वतंत्र चालू ठेवूं देणें व मूळ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संस्थेशीं संबंध न ठेवल्यास त्याकडे दुर्लक्ष करणें, याबाबतींत त्यांच्या कार्यावर प्राचीन विद्यापीठांच्या कल्पनांची छाप अधिक दिसून येईल. पण त्यांच्या कार्यानें केलेल्या एकंदर विचारांचा परिणाम सर्वत्र दिसून येतो.

कुण्डिनपुरांतील व्यायामशाळेची माहिती वाचून आपण बडोद्यांतील व्यायाममंदिरांत तर नाहीं ना. असेंच मला क्षणभर वाटलें. म्हणूनच तत्सम एका संस्थेबद्दल तुलनात्मक दृष्टीनें माहिती दिली.

आज मात्र कांदिवलीसारख्या व्यायामशिक्षणाचें कार्य करणाऱ्या संस्था अद्ययावत् होण्याचा प्रयत्न करीत आहेत ही आनंदाची गोष्ट आहे. महाराष्ट्रांत इतरत्रहि किती तरी संस्थांनीं व्यायामप्रसाराचे, नवीन नवीन विचार आत्मसात् करण्याचे आणि संशोधन करण्याचे प्रयत्न आज सुरू केले आहेत व याबाबतींत परिषदा भरवून व्यायामविषयक गोष्टींच्या विचाराला चालना दिली आहे, ही फारच स्तुत्य गोष्ट आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१० : मिथिला विद्यापीठ

[काल अदमासें इ. स. ११०० ते इ. स. १५००].

मिथिला व विदेह

भरतखंडांत ज्ञानाकरितां प्रसिद्ध असणाऱ्या प्राचीन ठिकाणांपैकीं मिथिला नगरी ही एक होती. मिथिला विदेह राज्याची राजधानी. विदेहाचा संबंध व जनक-याज्ञवल्क्यांचा संबंध हजारों वर्षांपूर्वीचा. वैवस्वत मनूचा ज्येष्ठ पुत्र इक्ष्वाकु याच्या शतपुत्रांतील द्वितीय पुत्र जो निमि राजा त्यास वसिष्ठशापामुळें मृत्यु आला असतां ब्राह्मणांनीं त्याच्या देहाचें मंथन केलें व त्यांतून एक पुरुष निर्माण केला. त्याचें नांव मिथि नामा जनक. तेथून मग तेंच नांव प्रत्येक पुरुषास चालू झालें. निमि राजानें पुनः देह स्वीकारला नाहीं म्हणून या जनकास 'विदेह' व त्याच्या राज्यासहि 'विदेह' नांव रूढ झालें. विदेह राज्य म्हणजे अर्वाचीन तिरहुत किंवा उत्तर विहार प्रांत असावा.[1] यांत हल्लींचे दरभंगा, चंपारण्य आणि उत्तर मुजाफरपूर जिल्हा यांचा समावेश होतो.[2] शतपथब्राह्मणांत मिथिलेचा उल्लेख आहे. इ. स. पूर्व १००० वर्षांपूर्वी प्रसिद्ध राजा जनक येथें राज्य करीत असे. या राज्याचा पूर्वेतिहास अद्याप उपलब्ध नाहीं.

जनक राजा सीतेचा पिता. या जनक राजाला सीता शेतांत सांपडली म्हणून आख्यायिका आहे. अर्थात् जनक राजा व कृषिकर्म यांचा फारच निकटचा संबंध असावा हें यावरून दिसतें. जनक राजा शेत नांगरीत आहे असा रामायणामध्येंहि उल्लेख आहे. जनकाला 'सीरध्वज' म्हणजे नांगराचा ध्वज असलेला असें म्हणतात. यावरून वरील गोष्टीला पुष्टीच मिळते.

पण हाच जनक राजा वैदिक वाङ्मयांत अत्यंत विद्वान्, पूर्ण ब्रह्मज्ञानी, वाद-विवाद करून मोटमोठ्या विद्वानांनासुद्धां योग्य तें ज्ञान देणारा म्हणून प्रसिद्ध

---

१. महाराष्ट्रीय ज्ञानकोश, वि. २०, पान २२७.

२. नेपाळांतील खाटमंडूच्या जरा खालीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे. या ब्रह्मज्ञानी जनक राजाचा उल्लेख शतपथब्राह्मण, बृहदारण्यकोपनिषद्, जैमिनीय उपनिषद् व कौषितकी उपनिषद् या ग्रंथांतून प्रामुख्यानें आला आहे. जनक वैदेहानें एक अश्वमेध यज्ञ केला व कुरु व पांचाल येथील ब्राह्मणांना आमंत्रण दिलें. श्रेष्ठ व विद्वत्तम ब्राह्मण कोण हें त्यास जाणण्याची इच्छा होती.[३] हा जनक राजा याज्ञवल्क्य व श्वेतकेतु यांचा समकालीन. तैत्तिरीयब्राह्मणांत तर याला पुराणकालीन महापुरुषाचें महत्त्व आलें आहे असें दिसतें. याज्ञवल्क्य हा जनक राजाच्या दरबारीं होता असें शतपथब्राह्मणांत दिलें आहे.[४] याज्ञवल्क्य व जनक यांच्यामध्यें ब्रह्मज्ञानावर नेहमीं वादविवाद होत. या याज्ञवल्क्याला कात्यायनी व मैत्रेयी अशा दोन बायका होत्या; त्यांत मैत्रेयी हीसुद्धां ब्रह्मवादिनी होती.

ज्या ठिकाणीं जनकाला इतकें ब्रह्मज्ञान प्राप्त झालें, जेथें याज्ञवल्क्यादि थोर ब्रह्मज्ञानी होऊन गेले व ज्यांच्याशीं वादविवाद करून आनंद मिळविणारे अश्वल, आर्तभाग, उषस्त, चाक्रायण, उद्दालक आरुणि, विदग्धशाकल्य हे पुरुषच केवळ नव्हे तर खुद्द याज्ञवल्क्यास जेरीस आणणाऱ्या गार्गी व वाचक्नवी सारख्या थोर विदुषी ब्रह्मवादिनी स्त्रियाहि[५] झाल्या, त्या विदेहांत ज्ञानसत्रें असल्यास आश्चर्य नाहीं. मिथिला तर त्या देशाची राजधानी; मग तेथेंहि फार फार प्राचीन कालीं विद्यापीठें असल्यास नवल तें काय ?

पण या प्राचीन विद्यापीठासंबंधानें याहून विशेष माहिती मिळूं शकत नाहीं. जनकाच्या उदाहरणावरून अत्यंत ज्ञानी पण शेतीसारखीं महेनतीचीं कामें करणारा अत्यंत साधा राजा ज्या देशांत होऊन गेला तेथलीं विद्यापीठेंसुद्धां अवडंबर न माजविणारींच झालीं असावींत. मिथिलेच्या विद्वत्सभेबद्दल महाभारतांतील वनपर्वांत उल्लेख आहे. हें एक महान् ज्ञानसत्रच होतें.

मिथिलेंतील आधुनिक कालांतील विद्यापीठ

इतिहासकालांतील अगदीं अलीकडल्या भागांत म्हणजे इ. स. च्या १२ ते १५ व्या शतकाच्या दरम्यान मिथिलेंतील ज्ञानसत्राला पुनः जोर आला.[६] मिथिलेंत नवीन

३. बृहद् आ०उप० ३.१.१.

४. शतपथ ब्रा. काण्ड १ ते ४.

५. बृहद् आ० उप० ३.२.९.

६. Satish Chandra Vidya Bhushan : History of Indian Logic.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुवर्णयुगच प्राप्त झालें म्हणाना. कारण या सुमारास मिथिलेनें बंगालला पुष्कळच विद्वद्रत्नें अर्पण केलीं. फार मोठमोठे आचार्य या ठिकाणीं जन्मास आले. त्यांनीं मोठमोटाले ग्रंथ लिहिले व स्वतःची व स्वतःच्या देशाची कीर्ति वाढविली. या विद्वद्रत्नांपैकीं कांहींचाच आम्ही नामनिर्देश करतों. त्यावरून मिथिला विद्यापीठाच्या थोरवीची कल्पना येईल. गंगेश उपाध्याय या न्यायशास्त्रांत अत्यंत विद्वान् पंडित म्हणून मान्यतेस पावलेल्या आचार्यांचा जन्म मिथिलेस झाला. त्यांनीं न्यायशास्त्रावर 'तत्त्वचिंतामणि' या नांवाचा एक उत्कृष्ट ग्रंथ लिहिला. तो आजतागायत अद्वितीय मानला गेला आहे. हे साधारणतः इ. स. च्या अकराव्या शतकांत होऊन गेले असावे असें मानण्यांत येतें.

चंद्रेश्वर ठक्कुर यांनीं 'स्मृतिरत्नाकर' हा ग्रंथ लिहिला. पद्मनाभ दत्त यांनीं व्याकरणविषयावर ग्रंथ लिहिले. भानुदत्त मिश्र यांनीं अलंकारशास्त्रावर ग्रंथ लिहिले. या मिश्र मंडळींनीं तर न्याय, वैशेषिक, स्मृति आदि विषयांवर कितीतरी ग्रंथ लिहिले, व आपलें नांव अजरामर करून ठेविलें. संस्कृत वाचकांस जगद्धराचें नांव तर फारच परिचित आहे; कारण त्यानें भगवद्गीता, देवीमहात्म्य, मेघदूत, गीतगोविन्द वगैरे ग्रंथांवर टीका लिहिल्या आहेत. अशा प्रकारें एक ना दोन, किती तरी विद्वद्रत्नांचीं नांवें घेतां येतील.

मिथिलेची कीर्ति वाढविण्यास या सर्वांनीं मेहनत घेतली. मिथिलेच्या प्राचीनतम विद्यापीठांतून केवल तत्त्वज्ञानविषय शिकविला जाई असें जनक-याज्ञवल्क्य यांच्या चरित्रावरून दिसतें. 'आत्मा वा अरे अध्येतव्यः निदिध्यासितव्यः' म्हणून केवळ उपनिषदांची आत्मज्ञानादि शिकवण चाले व त्यांतूनच ते सत्याकडे जात. अंधारांतून उजेडाकडे, मृत्यूकडून अमृताकडे जाण्याची त्यांची धडपड असे. व यामुळेंच गार्ग्यबालाकिसारखे जाडे विद्वान्सुद्धां ज्ञान मिळविण्याच्या उद्देशानें अजातशत्रुसारख्या क्षत्रियाकडे जात. पण नंतरच्या काळांत येथें तत्त्वज्ञानाशिवाय इतरहि पुष्कळ विषयांचा, म्हणजे व्याकरण, न्याय, अलंकार वगैरे विषयांचा, अभ्यास कसोशीनें होऊं लागला.

मिथिलेची पिछेहाट

पण सोळाव्या शतकापासून मिथिलेच्या कीर्तिचंद्राला ग्रहण लागूं लागलें. याला कारण येथें शिरलेला स्वार्थ होय. येथें स्वार्थी पंडित उत्पन्न होऊं लागले. या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पंडितांचा ज्ञानाचा झरा आटूं लागला असावा. म्हणूनच येथील पक्षधर मिश्रादि विद्वानांना वाटलें असेल कीं येथील ग्रंथांच्या नकला बाहेर जाऊं देतां कामा नये. काय सांगावें, जर कोणी विद्यार्थी त्या बाहेर नेतील तर मिथिलेला विद्यार्थी येण्याचें कारणच राहणार नाहीं असें त्यांस वाटलें असावें. अर्थात् हा त्यांचा समज चुकीचा होता. पक्षधर मिश्राकडे वासुदेव व रघुनाथ हे अत्यंत बुद्धिमान् विद्यार्थी शिकावयास आले.[७] त्यांनीं कांहीं ग्रंथांच्या नकला करण्याचें ठरविलें; पण पक्षधर मिश्रानें त्यांना तसें करूं दिलें नाहीं. तेव्हां वासुदेवानें गंगेशाचा 'तत्त्वचिन्तामणि' व उदयनाचार्यांचा 'न्यायकुसुमाञ्जलि' हे ग्रंथ पाठ केले व मिथिलेला त्यानें कायमचा रामराम ठोकला. त्याच्याबरोबरच मिथिलेची कीर्तीहि तेथून गेली; मिथिलेला ती कांहीं पुनः परत मिळवितां आली नाहीं. अशा प्रकारें मिथिलेचें पुढें नांवहि ऐकूं येईनासें झालें. याच वासुदेवानें नवद्वीप विद्यापीठाची स्थापना केली. नालंदामुळें विक्रमशिला जन्मास आली व मिथिलेमुळें नवद्वीप जन्मास आलें. दोनहि अपत्यें अत्यंत तेजस्वी निघाल्यामुळें नालंदा व मिथिला हीं विद्यापीठें मागें पडलीं.

---

७. Keay : Indian Education in Ancient and Later times, p. 144.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

११ : नवद्वीप (नदीया) विद्यापीठ

[काल सुमारें इ. स. १४५० ते इ. स. १८००]

' नदीया ' ऊर्फ ' नवद्वीप ' : स्थलनिर्देश

' नदीया ' उर्फ ' नवद्वीप ' विद्यापीठ हें अगदीं अलीकडलें म्हणजे १५ व्या शतकांतील होय. नदीया हा बंगाल इलाख्यांतील एक जिल्हा असून तो उ. अ. २२°३' ते २४°११' वर व पू. रे. ८८°९' ते ८९°२२' वर कोणत्याहि नकाशांत पहावयास मिळेल. कलकत्ता शहराच्या उत्तरेस १०° वर नजर फिरविल्यास नदीया जिल्हा दिसेल. या जिल्ह्याच्या पूर्वेस जेसोर व फरिदपूर जिल्हे, पश्चिमेस बरद्वान व बिरभूम जिल्हे, दक्षिणेस चोवीस परगणे व उत्तरेस मुर्शिदाबाद, राजशाही व पबना हे जिल्हे आहेत.

या सर्व प्रदेशांत नद्यांचें जणूं काय जाळेंच पसरलें आहे; परंतु भागीरथी, जलंगी व मातागंगा या तिन्ही नद्यांनीं व्यापलेल्या प्रदेशाला आज नदीया असें नांव आहे. नदीया किंवा नवद्वीप हें फार जुनें नांव आहे. कदाचित् नद्यांच्या जाळ्यांत सांपडलेल्या नऊ बेटांना हें नांव देण्यांत आलें असावें. नदीया अर्थात् ' नद्यांनीं संपन्न असा देश ' हें नांव त्या भागाला जें मिळालें आहे तें सार्थच आहे. हा भाग अत्यंत सुपीक असा आहे.

नदीया जिल्ह्याचें मुख्य शहरहि नदीया किंवा नवद्वीप हा गांव. हा गांव कलकत्त्याच्या उत्तरेस ६० मैलांवर भागीरथीच्या कांठीं वसला असून पुरातन कालापासून प्रसिद्ध आहे. मात्र त्यासंबंधानें प्राचीन ऐतिहासिक माहिती जितकी उपलब्ध व्हावयास पाहिजे तितकी अद्याप उपलब्ध झाली नाहीं.

१२ व्या शतकांत सेन राजांनीं आपली राजधानी गौरहून येथें आणली. पण इ. सं. १२०३ मध्यें महमद बख्त्यार खिलजीनें लक्ष्मणसेनाचा पराभव केला व ही राजधानी सर केली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सम्राट् चंद्रगुप्त, सम्राट् अशोक, सम्राट् समुद्रगुप्त, सम्राट् दुसरा चंद्रगुप्त किंवा विक्रमादित्य, कनोजचा सम्राट् हर्षवर्धन यांच्या कारकीर्दीत आजहि ज्यांच्या नांवाचा निर्देश आपण मोठ्या अभिमानानें करतों असे अद्वितीय ग्रंथकार निर्माण झाले व याला कारण या सर्व सम्राटांनीं विद्येला दिलेलें उत्तेजन होय. त्याचप्रमाणें पाल राजांनीं व सेन राजांनींहि विद्येला उत्तेजन दिलें व त्यांच्याहि कारकीर्दींत श्रेष्ठ श्रेष्ठ ग्रंथकार निर्माण झाले. लक्ष्मणसेन बंगालचे राजे असतांना किती तरी विद्वद्रत्नें चमकून गेलीं. ज्या जयदेव कवीच्या 'गीतगोविंदा'नें सर्व बंगालच नव्हे तर अखिल हिंदुस्थान हाल्वून सोडला तो जयदेव कवि याच राजाच्या कारकीर्दींतला. ज्यांना नितांतमधुर ललित काव्य गीतगोविंद वाचावयास मिळालें नसेल किंवा ज्यांना त्याच्यांतील अवीट गोडी लुटतां येत नसेल ते खरोखर अभागी ! नुसत्या गीतगोविंदाच्या टीकाकारामुळें–जगद्धरामुळें–मिथिला विद्यापीठाच्या कीर्तींत भर पडली ! या जयदेवाशिवाय हलायुधासारखे किती तरी पहिल्या प्रतीचे ग्रंथकार या राज्यांत उत्पन्न झाले.

नदीया हें पंडितजनांचें आगर; व त्यामुळेंच या भागाची संस्कृत भाषेकरितां पूर्वीपासून प्रसिद्धी आहे.

नदीया–गंगेचा प्रदेश : गंगामाहात्म्य

हा गांव भागीरथी नदीच्या कांठावर वसला आहे म्हणून सांगितलें. त्याचप्रमाणें नदीया जिल्ह्यांत नद्यांचें जाळेंच जाळें पसरलें आहे म्हणूनहि वर सांगण्यांत आलें आहे. पण ज्या नद्या ह्या भागांतून वाहतात त्या सर्व गंगेच्याच उपनद्या असल्यानें नदीया भागास 'गंगेचाच प्रदेश' म्हणण्यास हरकत नाहीं.

वास्तविक गंगा नदीनें हिंदुस्थानच्या ऐतिहासिक जीवनांत फारच मोठें कार्य केलेलें पहावयास मिळतें. ज्या नद्यांनीं भारतांतील प्राणिमात्रांना जीवन देऊन या देशाला विभूषित केलें त्या म्हणजे सिंधु (व तिच्या उपनद्या), गंगा-यमुना (व त्यांच्या उपनद्या), नर्मदा, तापी, महानदी, गोदावरी, कृष्णा, कावेरी वगैरे होत. पण या सर्व नद्यांची राणी म्हणजेच गंगा होय.

हिमाल्यांत जन्मास येऊन तिनें १३०० फूट खालीं असणाऱ्या आपल्या पतीला अर्थात् सागराला भेटण्याकरितां जवळ जवळ १५०० मैलांवर प्रवास केला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सोबतील यमुना, गोमती इत्यादि सख्याहि घेतल्या. जेथून जेथून तिनें प्रवास केला तेथील जमीन अत्यंत सुपीक बनविली. वियद्गंगा, भागीरथी, सप्तसिंधु, जाह्नवी, वरनदी, देवभूति, मंदाकिनी वगैरे किती तरी नांवें घेत घेत तिनें आपला प्रवास संपविला; व जेथें जेथें तिला सख्या भेटावयास आल्या व तत्स्वरूप झाल्या तेथें तेथें संगमाच्या ठिकाणीं तिनें तीर्थयात्रेचें ठिकाण बनविलें.

प्राचीन काळापासून गंगेची प्रसिद्धी आहे. हिंदु धर्मात तर तिला अलौकिक महत्त्व प्राप्त झालें आहे हें सर्वांना माहीत आहे. गंगा ही पापनाशिनी म्हणून सर्वांची भावना आहे. यामुळेंच प्रत्यहीं लाखों लोक तिच्या पाण्यांत स्नानें करतात. 'जन्माला यावें व एकदां तरी गंगेंत स्नान करावें' अशी म्हणच पडून गेली आहे. मृतांच्या अस्थि गंगेंत टाकल्यानें मृतात्म्याला स्वर्ग मिळतो ही कल्पना व श्रद्धा अद्ययावत् हिंदु लोकांत रूढ आहे. आजसुद्धां गंगेच्या निरनिराळ्या भागांत शेंकडों गोसावी, साधू, मुमुक्षू वगैरे स्वर्गप्राप्तीसाठीं तपश्चर्या करतांना आढळून येतील.

गंगेच्या या महत्त्वामुळें तिच्यासंबंधानें निरनिराळ्या दंतकथा प्रचलित आहेत. भगीरथ व जह्नुराजा यांचा व गंगेचा संबंध या दंतकथेंतूनच उत्पन्न झाल्यामुळें गंगेला 'भागीरथी' व 'जाह्नवी' हीं नांवें प्राप्त झालीं. भगीरथाला मात्र तिला स्वर्गांतून आणण्यास फारच श्रम करावे लागले व म्हणूनच 'भगीरथ प्रयत्न' हा शब्दप्रयोग रूढ झाला. काय सांगावें, गंगेचा प्रवाह आहे त्या बाजूला न वाहतां तो दुसरीकडेच वाहात असावा. त्याच लत्त्यांत उत्पन्न झालेल्या सिंधु-ब्रह्मपुत्रा नद्यांचा प्रवाह भलतीकडेच व भिन्न भिन्न दिशेला नाहीं का वाहून गेला? तसेंच गंगेचें होत असावें; व भगीरथानें एक 'इंजिनिअरिंग फीट' (स्थापत्य-कलेंतील कौशल्य) दाखविलें असावें, आणि गंगा नदीचा प्रवाह हिंदुस्थानच्या बाजूला वळविला असावा. याचाच फायदा आज हिंदुस्थानास मिळत आहे. मात्र या कामास सुरवात भगीरथाच्याहि अगोदर झाली असावी; पण त्यांत अप-यश आलें व ६०,००० सगरपुत्र खर्ची पडले ही गोष्ट प्राचीन इतिहासांत नमूद आहे. अशा प्रकारचीच एक 'इंजिनिअरिंग फीट' करून नदीचा प्रवाह बदल-विल्याची एक अद्भुतरम्य गोष्ट 'राजतरंगिणी' काव्यांत देण्यांत आली आहे.

गंगेचा उपयोग जीवनदायी झाला म्हणूनच तिची योग्यता एवढी थोर मान-ण्यांत येते. तिला देवतास्वरूप प्राप्त आलें आहे व तिच्या मूर्तीहि निरनिराळ्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ठिकाणीं कोरण्यांत आल्या आहेत. दक्षिण हिंदुस्थानांत[1] तिची एक मूर्ति असून त्या मूर्तीचा वरचा भाग स्त्रीचा व खालचा भाग माशाच्या आकृतीचा आहे. बंगालमध्यें तिची मूर्ति शुभ्रवस्त्रावृता नारीची असून ती मकरावर बसलेली आहे. अशी एक मूर्ति रामनगर येथें आहे.

विष्णुपुराण व महाभारत या ग्रंथांत तिच्यासंबंधानें व तिच्या थोरवीसंबंधानें भरपूर माहिती देण्यांत आली आहे. श्रीशंकराचार्यांनींहि तिचीं स्तोत्रें गाईलीं आहेत; व अगदीं शेवटचा संस्कृत महापंडित म्हणजे जगन्नाथपंडित यानें तर 'गंगालहरी' हें नितान्त मधुर काव्य लिहून स्वतःच्या कीर्तींत भर टाकली आहे. फार फार प्राचीन कालापासून पाश्चात्य देशांतहि गंगेची कीर्ति मेगॅस्थेनीस आदींनीं पसरविली आहे.

गंगा ही विद्यापीठांची समृद्ध भूमि

पण नदीया विद्यापीठासंबंधानें लिहीत असतांना गंगेची इतकी थोरवी गाण्याचें व तिचा इतिहास लिहिण्याचें कारण काय, असा प्रश्न उत्पन्न होण्याचा संभव आहे. पण याचें एक कारण वर देण्यांत आलेंच आहे. तें म्हणजे नवद्वीप हा प्रदेश म्हणजे 'गंगेचाच प्रदेश'. 'गंगेचा प्रदेश' ही संज्ञा, नदीया व त्याच्या दक्षिणेकडील भागाशिवाय इतरत्र क्वचितच लावतां येईल. अर्थात् नदीया-संबंधानें बोलतांना या गंगेच्या प्रदेशासंबंधानें सांगितल्यास अनाठायीं किंवा असंबद्ध होणार नाहीं.

पण गंगेचें महत्त्व गाण्याचें दुसरें एक कारण आहे. तें हें: गंगेनें जसें हिंदुस्थानाला व विशेषतः संयुक्त प्रांत, बिहार व बंगाल या भागांना 'जीवन' देऊन संपन्न केलें तसेंच तिनें आपल्या कांठीं महान् विद्यापीठें वसवून दिलीं; व त्यामुळें अखिल भारताचें नांव विद्वत्तेच्या व ज्ञानाच्या बाबतींत सर्व जगांत गाजलें. नालंदा विक्रमशिला, उदन्तपुरी, जागद्दल, नवद्वीप, कनोज, काशी वगैरे ठिकाणचीं जगत्प्रसिद्ध विद्यापीठें गंगेच्या कांहीं टापूंतच स्थापन झालीं व समृद्ध झालीं. हेंच गंगेचें वैशिष्ट्य. तिचें महत्त्व गाण्याचें हेंच कारण. तिची कीर्ति अनादिकालापासून आसेतुहिमाचल आजपावेतों शुभ्र आहे व तिच्या पाण्याचा वर्णहि तिच्या कीर्तिवर्णाला साजेसा आहे.

१. महाराष्ट्र ज्ञानकोश, भा. १२.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अशा प्रकारें हिंदुस्थानच्या ज्ञानांत भर घालणाऱ्या गंगेचें स्मरण केल्यावाचून तिच्याचमुळें उत्पन्न झालेल्या नवद्वीपाचें किंवा तेथील विद्यापीठाचें स्मरण कसें होणार ?

नवद्वीप किंवा नदीया येथें ऐतिहासिक कालांत जें विद्यापीठ स्थापन झालें तें वासुदेव सार्वभौम यांच्यामुळें. या विद्यापीठाची स्थापना कशी झाली हा एक शैक्षणिक इतिहासांत नमुनेदार व मनोरंजक दाखला आहे.

नवद्वीपाचे संस्थापक : वासुदेव सार्वभौम

वासुदेव सार्वभौम यांचा जन्म नवद्वीप गांवींच झाला. वयाच्या २५ व्या वर्षीं ते मिथिलेस गेले व पक्षधर मिश्रांचें शिष्यत्व त्यांनीं पत्करलें. पक्षधर मिश्र हे मिथिलेचे नामांकित आचार्य व नैयायिक होते. त्यांची कीर्ति मिथिला विद्यापीठांत फारच पसरली होती. एकदां तर एका वादविवादांत ते एक पंधरवडा (–पक्ष–) सतत विजयी झाले; म्हणून त्यांना पक्षधर हें नांव मिळालें.

वास्तविक मिथिला हें स्थान विद्येकरितां प्राचीन कालापासून फार प्रसिद्ध. बाहेरून मोटमोठे पंडित येथें यायचे व वादविवाद करायचे. त्यांत मिथिलेचे पंडित त्यांना वादविवादांत गप्प करीत; इतकें येथील पंडितांचें ज्ञान. परंतु ज्यावेळीं वासुदेव तेथें शिकावयास गेला त्यावेळीं तेथील आचार्यवर्गात एकप्रकारची भीति, स्वार्थांधता वगैरे गोष्टी भरलेल्या होत्या. मिथिलेच्या अधोगतीला सुरवात झाली होती. ही अधोगति शेंकडों वर्षें चालत आली असली पाहिजे व वासुदेवाच्या काळीं या बाबतींत तिनें उच्चांक गांठला असावा.

स्वतः वासुदेव हा अत्यंत बुद्धिमान् होता हें एका गोष्टीवरूनसुद्धां कळून येण्याजोगें आहे. हा जेव्हां पहिल्यानें पक्षधर मिश्रांकडे विद्यार्थी म्हणून आला, तेव्हां त्याला एक भूर्जपत्र देण्यांत आलें व 'हें सर्व वाचून त्याचा अर्थ सांग' म्हणून त्यास सांगण्यांत आलें. वासुदेवानें तें पत्र हातांत घेतलें व जणूं काय तो नेहमींचा तयार केलेला पाठच असावा असें त्यानें तें वाचून दाखविलें. इतक्यानेंच तो थांबला नाहीं, तर त्यानें तेथें असलेलीं इतर १०० भूर्जपत्रें अस्खलितपणें वाचून दाखविलीं. गुरुजी तर थंडच झाले. याहून अधिक हुशार विद्यार्थी कोणत्या गुरूला मिळणार? यामुळें खूष होऊन गुरूनें त्यांना 'सार्वभौम' ही पदवी दिली. वासुदेव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्या गुरूजवळ राहिला व त्यानें मन लावून अभ्यास सुरू केला. पण त्यावेळच्या मिथिलेच्या आचार्यांच्या संकुचित वृत्तीमुळें त्यांना वासुदेवाचा व मिथिलेचा संबंध कायम ठेवतां आला नाहीं.

येथील आचार्यांजवळ न्याय विषयावर कांहीं उत्कृष्ट ग्रंथ होते. त्यांच्या नकला ते कोणाहि विद्यार्थ्यास करूं देत नसत. त्यांना कदाचित् अशी भीति वाटत असावी कीं एकदां या ग्रंथांच्या नकला बाहेर गेल्या कीं मिथिलेजवळ विद्यार्थ्यांस द्यावयास कांहीं रहावयाचें नाहीं व मिथिलेचें वैभवच नाहींसें होईल व बाहेरून कोणीहि विद्यार्थी मिथिलेस शिकण्यास येणार नाहीं! पण ही त्यांची भीति अनाठायीं होती. कारण नालंदा किंवा विक्रमशिला येथून शेंकडों ग्रंथांच्या प्रती किंवा भाषांतरें बाहेर जाऊनसुद्धां या विद्यापीठांची कीर्ति कमी झाली नाहीं; उलट ती वाढतच गेली. एकट्या इत्सिंगनेंच ४०० वर ग्रंथांचें भाषांतर चिनी भाषेंत करून नेलें.

वासुदेवाला मिथिलेंतील कांहीं ग्रंथांच्या—विशेषतः 'तत्त्वचिंतामणि' व 'न्यायकुसुमाञ्जलि' या ग्रंथांच्या—नकला करण्याची इच्छा झाली. पण याबाबतींत त्याला हरकत घेण्यांत आली. वासुदेवाला अर्थात् फार वाईट वाटलें. त्याला आचार्यांचा राग आला. त्यांच्या या भित्र्या वृत्तीची त्याला चीड आली. पण या ग्रंथाच्या नकला तर त्याला पाहिजे होत्या. त्यावर तो विचार करूं लागला; व शेवटीं त्याला उपायहि सुचला. त्यानें दोनहि ग्रंथ मुखोद्गत करण्याचें ठरविलें. मुखान्तर्गत विद्या नेण्यास कोण हरकत करणार? ही विद्या आत्मसात् करून मिथिलेला कायमचा रामराम ठोकण्याचा विचार त्याच्या डोक्यांत चमकून गेल्यास त्यास कोण दोष देईल? झालें. स्वारी उद्योगास लागली. त्यानें दोनहि ग्रंथ मुखोद्गत केले व मिथिलेला कायमचा रामराम ठोकला. सबंध ग्रंथचा ग्रंथ पाठ करणें ही कांहीं सोपी गोष्ट नाहीं. पण वासुदेवासारख्या बुद्धिमान् विद्यार्थ्याला कठीण काय आहे? त्याच्या अंगांत निष्ठा होती, कळकळ होती, चिकाटी होती, आणि बुद्धीहि होती.

वासुदेवाला मिथिलेला शिकण्याजोग्या अद्याप पुष्कळ गोष्टी होत्या. पण त्या मिथिलेला शिकण्याऐवजीं इतर ठिकाणीं शिकण्याचें वासुदेवानें ठरविलें. तेथून तो वेदान्त शिकण्याकरितां काशीला निघून गेला. तेथें वेदान्तविषयांत पारंगत झाल्यावर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वासुदेव आपल्या मातृभूमीला म्हणजे नवद्वीपाला परतला व नवद्वीप विद्यापीठाची त्यानें स्थापना केली.

नवद्वीप विद्यापीठाची वाढ कशी झाली ?

नवद्वीप विद्यापीठाची स्थापना झाल्यावर तेथें अर्थात् मोठाच विद्यार्थीवृंद आकर्षिला गेला असला पाहिजे. जेथें फुलांचा सुंदर वास तेथें भृंगांना आमंत्रण द्यावें लागत नाहीं. रंगीबेरंगी आकर्षक फुलांकडे फुलपांखरांची धांव असणारच. त्याप्रमाणें नामांकित शिक्षक आल्याबरोबर विद्यार्थीवर्ग आकर्षिला जाणारच व विद्यार्थ्यांची संख्या वाढल्यावर संस्था लहानाची मोठी होऊन एकाहून अधिक विषय साकल्यानें शिकविले जाणार. विद्वान् शिक्षकांचा भरणा, प्रौढ विद्यार्थी, निरनिराळ्या विषयांचा सांगोपांग अभ्यास हींच 'विद्यापीठा'स अवश्य लागणारीं साधनें. नवद्वीपास या सर्व गोष्टी लाभल्या. शिवाय येथून विद्यार्थी बाहेर पडल्यानंतर त्यांस लोकांत मान्यताहि मिळूं लागली. विद्यापीठांतून बाहेर पडल्यानंतर जी पदवी देण्यांत येते त्यानें हीच गोष्ट साधली जाते. अशाप्रकारें वासुदेव सार्वभौमानें स्थापलेल्या नवद्वीप संस्थेस विद्यापीठाची योग्यता लवकरच प्राप्त झाली.

नवद्वीप येथील विद्वान् पंडित

अशा या विद्यापीठांतून शेंकडों नामांकित पंडित बाहेर पडले व नवद्वीपाची कीर्ति वाढत गेली. या पंडितांपैकीं दोघांचौघांचीं नांवें घेतल्यास नवद्वीपाच्या कीर्तीची कल्पना येईल.

रघुनाथ शिरोमणि यांचा जन्म इ. स. १४७७[२]त नवद्वीपांत झाला. रघुनाथ हे वासुदेव व पक्षधर मिश्र यांचे शिष्य. शिवाय त्यांनीं महाराष्ट्रांत येऊन रामेश्वर गुरूजवळ अध्ययन केलें. रघुनाथ शिरोमणि हे न्यायशास्त्रांत निष्णात असल्यानें त्यांनीं नवद्वीपांत न्यायाची नवप्रणालिका स्थापन केली. याशिवाय येथें नव्य-स्मृति, तंत्रविद्या आणि ज्योतिषशास्त्र हे विषय विशेषेंकरून शिकविले जात. त्यांत नामांकित विद्वान् पंडित झाले. रघुनाथ पंडितामुळें नवद्वीपाची कीर्ति फारच वाढली. त्यांनीं 'दीधिति' नांवाचा प्रसिद्ध ग्रंथ लिहिला. रघुनंदन स्मार्त भट्टाचार्य हे दुसरे प्रसिद्ध आचार्य येथें होऊन गेले. हे फारच मोठे कायदे-

२. Satish Chandra Vidya Bhushana : History of Indian Logic, I. A. S. of Bengal, Vol. XIV, 1918, p. 281.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पंडित होते. त्यांनीं घालून दिलेले नियम व कायदे आजतागायत बंगालमध्यें प्रमाण मानले जातात[3] यावरून त्यांच्या मोठेपणाची कल्पना करतां येईल.

अशा प्रकारें एक ना दोन किती तरी नामांकित आचार्यांची यादी देतां येईल. पण नवद्वीप विद्यापीठाचें नांव पवित्रतम करण्यास आणखी एक व्यक्ति कारणीभूत झाली. ही म्हणजे श्रीगौरांग महाप्रभु ऊर्फ चैतन्य प्रभु होत. अखिल बंगाल्यांत श्रीगौरांगप्रभूची जी योग्यता आहे तिच्या तोडीची महाराष्ट्रांत ज्ञानोबा-तुकारामाची किंवा गुजरातेंत नरसिंह मेथ्याची होय. श्रीगौरांगप्रभु म्हणजे वैष्णवपंथी बंगालचें अध्यात्मजीवन. यांनीं वैष्णव धर्माचा प्रसार केला. चैतन्यपंथ म्हणून यांच्या नावानें एक स्वतंत्र पंथच आहे. हे वासुदेव सार्वभौमाचेच श्रेष्ठतम शिष्य होत.

नवद्वीपासंबंधानें इतर सामान्य माहिती

नवद्वीपाच्या थोरवीची कल्पना वरील माहितीवरून येऊं शकेल. बाकी नवद्वीप विद्यापीठाची अन्तर्गत व्यवस्था कशी होती, तेथें प्रत्यहीं किती विद्यार्थी रहात, त्यांची तेथील स्थिति कशी होती, त्यावर देखरेख कशाप्रकारें ठेवण्यांत येई, अभ्यासक्रम कोणता होता, तो संपविण्यास किती काळ लागत असे, प्रत्येक विद्यार्थ्या-मागें संस्थेला खर्च किती येई, हा खर्च पार पाडण्यास काय योजना होती, राहण्याची व्यवस्था कशी काय होती वगैरे वगैरे गोष्टी—ज्यांना आज आपण विशेष महत्त्व देतों—त्यांची माहिती नालंदा, तक्षशिला सोडून इतर विद्यापीठांच्या बाबतींत मिळूं शकत नाहीं. कारण ती माहिती लिहून ठेवणें किंवा अशा गोष्टींना विशेष महत्त्व देणें हें प्राचीन काळच्या भारतीय विद्वानांना मान्य नव्हतें. नालंदा, तक्ष-शिला विद्यापीठासंबंधानें जी माहिती आज उपलब्ध आहे ती केवळ बाहेरच्या पंडितांनीं लिहून ठेवली म्हणूनच !

आपल्याकडील प्राचीन विद्यापीठें व आजचीं विद्यापीठें यांत एक मोठा व महत्त्वाचा फरक दिसून येतो तो हा कीं आपल्या प्राचीन विद्यापीठांचें ध्येय उत्तम विद्वान् विद्यार्थी तयार करणें, त्यांचें शील उत्तम प्रकारचें बनविणें, त्यांना स्वतःच्या पायावर उभें राहण्यास शिकवणें हें होतें. बाकी इतर सर्व गोष्टींकडे ते दुर्लक्ष करीत. दिनचर्या लिहिणें किंवा होणाऱ्या गोष्टींबद्दल माहिती लिहून ठेवणें म्हणजे उगाच कालक्षेप करणें असें त्यांस वाटत असावें. अगोदर आयुष्य थोडें;

३. Keay : Indian Education in Ancient and Later Times, p. १४५.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांतून सत्कार्यी व्यय करण्यास त्यांतला किती तरी थोडा भाग हातीं येणार ! त्या थोड्या वेळेचा उपयोग अशा भाकड गोष्टी लिहून वेळ फुकट दवडणें त्यांना श्रेयस्कर वाटत नसावें !

याच्या उलट आधुनिक विद्यापीठें. प्रत्येक लहान सहान गोष्टींत लक्ष घालून त्यासंबंधानें मिळेल ती माहिती जमा करणें व ती लिहून ठेवणें, जें थोडें आयुष्य असेल तें उदंड मानून त्यांत शरीराला सुख देणाऱ्या गोष्टींची विशेष काळजी घेणें, आयुष्य थोडें आहे ही कल्पनाच मनांत आणूं न देणें, व निराशावादी न बनणें, भावी कालांत विशेषतः पुढील जन्मांत सुख मिळावें म्हणून प्रयत्न करण्यापेक्षां आज जेणेंकरून सुख मिळेल असा प्रयत्न करणें—या गोष्टी आधुनिक जगांत श्रेयस्कर मानल्या जात आहेत.

तरी पण नवद्वीपासंबंधानें जी माहिती मिळूं शकते त्यावरून तेथें हजारोंनीं विद्यार्थी येत हें खरें आहे. शिवाय त्यावेळचें शिक्षण विनामूल्य दिलें जात असल्यानें विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यास कोणत्याहि प्रकारचा मज्जाव केला जात नसे. वैदिक विद्यापीठांतून फक्त शूद्रांस वगळण्यांत येई; इतर जातींच्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळे व ते मन लावून शिकत. शिक्षणाशिवाय खाण्यापिण्याचा सर्व खर्चहि विद्यापीठांतूनच होई. हा खर्च करण्याचें सामर्थ्य विद्यापीठांना येण्यास त्यांच्याबद्दल असणारा लौकिक आदरच कारणीभूत होई. यामुळें कित्येक विद्यार्थ्यांची जेवण्याची सोयसुद्धां कांहीं लोकांकडे होत असे व श्रीमान् व्यापारीवर्ग व राजे लोक यांच्या पैशांचा झरा या विद्यापीठांकडे सतत वहात असे. नवद्वीप विद्यापीठाला सेन राजांची पहिल्यापासून मदत असे. गुप्त राजांनीं नालंदाला मदत केली, पाल राजांनीं विक्रमशिला व उदन्तपुरी विद्यापीठें चालविलीं, व सेन राजांनीं नवद्वीपाचा खर्च भागविला.

शिक्षणाची पद्धत

बहुतेक विद्यापीठांतून शिकवण्याची पद्धत सारखीच दिसते. सकाळीं विद्यार्थ्यांना लवकर उठवून स्नानसंध्यादि करवून घेण्यांत येई. नंतर विद्यार्थ्यांना शिकविण्याचें काम सुरू होई. प्रौढ विद्यार्थी नवीन विद्यार्थ्यांना शिकवीत किंवा त्यांच्याकडून अभ्यास करवून घेत. यामुळें या प्रौढ विद्यार्थ्यांचे विषय चांगले तयार होत. व शिक्षकांचें कामहि सुकर होई. यामुळें एकेका शिक्षकाजवळ कितीतरी विद्यार्थी शिका-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वयास असत. एका शिक्षकाला जितके विषय येत तितके तो विद्यार्थ्यांस शिकवी. इतर विषय शिकण्यास विद्यार्थी दुसऱ्या शिक्षकांजवळ जात. ही पद्धत सर्वच विद्यापीठांतून सारखीच चालू असे. वासुदेव सार्वभौमानेंहि न्यायशास्त्राचा अभ्यास पक्षधर मिश्रांजवळ केल्यानंतर वेदान्त शिकण्यास ते काशीस गेले.

शिक्षक विषय शिकवीत असतांना तो पुस्तकरूपानें असल्यास पाठ करवून घेत. आरंभीं व्याकरण, पंचकाव्यें, कोश वगैरे पाठ करवून घेतले जात. नंतर विद्यार्थ्यांची चिकित्साबुद्धि, समज, ज्ञान वाढूं लागल्यावर एकमेकांत प्रश्नरूपानें चर्चा होई, वादविवाद चालत व विद्यार्थ्यांचे विषय तयार होत. अशा प्रकारें विद्यार्थी निरनिराळ्या विषयांत पारंगत होत. वादविवादांत निष्णात झाल्यावर विद्यार्थी विद्यापीठांतून बाहेर पडत. बाहेर पडल्यानंतर विद्वानांच्या सभेंत किंवा राजसभेंत वादविवाद जिंकणें हीच त्यांची अंतिम परीक्षा. नालंदास हुएनत्संगानें कितीतरी 'मी मी' म्हणविणाऱ्या पंडितांना जिंकलें. नवद्वीपांतसुद्धां रघुनाथ शिरोमणी या पंडितानें किती तरी विद्वानांस जिंकलें. 'सभा व्हावी वश समस्त' व 'जगांत कीर्ति व्हावी, साधु साधु म्हणोनियां' हेंच यांच्या शिक्षणाचें ध्येय.

नवद्वीप विद्यापीठासंबंधानें एका युरोपियनाचें मत

नवद्वीप विद्यापीठ अगदीं १९ व्या शतकापर्यंत अस्तित्वांत होतें. प्रो. कॉवेल हे १८६७ सालीं नदीयास गेले असतां त्यांना तेथें काय दिसलें त्याबद्दल ते लिहितात[४] :

"या ठिकाणीं आल्यावर जेथें पिढ्यान् पिढ्या विद्वान् आचार्य जिज्ञासु विद्यार्थ्यांना व्याख्यानांच्या रूपानें ज्ञानामृताचे घोंट पाजीत त्या शाला पाहण्याचा मोह मला आवरेना. पांडित्य दाखविणें हा आचार्यांचा हेतु दिसत नव्हता, तर शंकांचें निरसन कसें करावें याकडे त्यांचें लक्ष होतें. समोर मोठा श्रोतृसमुदाय जमिनीवर बसला आहे व आचार्यांचे शब्द ऐकण्यास आतुर आहे; व आचार्यहि न्यायशास्त्रांतील एकाद्या 'किचकट भागाचा कीस काढीत आहेत. माझ्यासारख्या युरोपिअनाचें तर डोकें हें ऐकत असतां सुन्न होतें. पण हा श्रोतृवृंद मात्र मोठ्या आनंदानें तें ऐकत बसला आहे व त्यांतील आनंद लुटीत आहे. या विद्यार्थ्यांत मला वयस्कर व केस पिकलेले वृद्धहि दिसत आहेत"

यावरून तेथील शिक्षणाची पद्धत कशी असली पाहिजे हें दिसून येईल.

४. Keay : Indian Education in Ancient and Later Times, p. 145.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१२ : वलभी विद्यापीठ

[काल : इ. स. ४५० ते इ. स. ७७५]

प्राचीन विद्यापीठांची जागा

एक काल असा होता कीं त्यावेळीं हिंदुस्थानांतील कोणत्याहि भागांत गेलें असतां तेथें एखादें विद्यापीठ दृष्टीस पडल्याशिवाय रहात नसे. हीं विद्यापीठें मोठाल्या शहरींच होतीं असें नाहीं. तर तीं अरण्यांतूनसुद्धां निरनिराळ्या ठिकाणीं विखुरलेलीं दृष्टीस पडत. अत्रि, अगस्त्य, कण्व वगैरे ऋषींचे आश्रम, त्याचप्रमाणें बौद्ध व जैन विहार जंगलांत स्थापन केलेले होते. 'उत्तररामचरितां'त अशाच एका आश्रमांतून दुसऱ्या आश्रमांत एक तापसी आल्याचें वर्णन आहे[१].

या सर्व आश्रमांचा किंवा विहारांचा इतिहास आज आपणांस मिळूं शकत नाहीं. प्राचीन ग्रंथांतून त्यांचा उल्लेख मात्र येतो. किंवा त्यांच्याबद्दल फारच तुटपुंजी माहिती देण्यांत आलेली असते. ही सर्व माहिती संकलित करून त्यांचा इतिहास लिहिणें हें भारताच्या शैक्षणिक चळवळीच्या इतिहासाच्या दृष्टीनें श्रेयस्कर ठरेल. हिंदु धर्मांत सात मोक्षदायक शहरांची यादी देण्यांत येते. हीं सात शहरें म्हणजे धर्माचें आगर. जेथें धर्म तेथें ज्ञान असलें पाहिजे; जेथें ज्ञान तेथें आचार्य; व जेथें आचार्य तेथें शिक्षणसंस्था. या सात मोक्षदायी शहरांपैकीं काशी, काञ्ची, अयोध्या, अवंतिका व द्वारावती येथील शिक्षणसंस्थांची आपणांस कांहीं तरी माहिती मिळूं शकते. पण मथुरा व माया येथील शिक्षणसंस्थांबद्दल कांहींच माहिती मिळत नाहीं. पण या सात शहरांशिवाय अशीं किती तरी शहरें होतीं कीं जेथें एका वेळीं मोठमोठ्या शिक्षणसंस्था नांवारूपास आल्या होत्या. प्राचीन काळीं ज्या ज्या ठिकाणीं मोठा व्यापार चाले तेथें विशेषेंकरून जैन व बौद्ध धर्मांचा विशेष प्रचार झालेला आपणांस दिसून येईल. हें प्रचाराचें काम सुरळित व्हावें म्हणून त्यांनीं निरनिराळ्या ठिकाणीं, विशेषतः अशा व्यापारांच्या

१. उत्तररामचरितम्.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पेढीच्या ठिकाणीं, विहार स्थापले; व या विहारांत बुद्धिवान्, चारित्र्यवान् व ज्ञानी भिक्षु ठेवण्यांत आले. याच भिक्षूंनीं चारित्र्यवान् माणसें तयार करण्याकरितां शिक्षणाचें कार्य हातीं घेतलें.

वलभी विद्यापीठ : स्थलनिर्देश

काठेवाडांतील म्हणजे सौराष्ट्रांतील वलभी विद्यापीठाची स्थापना अशाच प्रकारें झाली. वलभी हें प्राचीन काळीं फारच भरभराटीस आलेलें व्यापाराचें ठिकाण होतें. समुद्रापासून अवघ्या १५।२० मैलांवर असल्यामुळें हें एक नाणावलेलें बंदरहि होतें. शिवाय समुद्राच्या (खंबायतच्या आखाताच्या) दुसऱ्या किनाऱ्यावर आणखी २५ मैलावर भरुकच्छाचेंहि (भडोचचें) प्रसिद्ध बंदर होतें. जैन साधूंनीं अशीं मोक्याचीं ठिकाणें आपल्या धर्मप्रसाराकरितां पहिल्यानें पसंत केलीं. सौराष्ट्रांत जैन धर्मांचा प्रसार फारच जोरानें झाला व मगधानंतर सौराष्ट्रच जैनधर्मप्रसाराचें केंद्र बनलें. सौराष्ट्रांतील किती तरी शहरें या कामीं गाजलीं.

गौतमबुद्ध व जैनतीर्थंकर यांच्या मृत्यूनंतर दोनहि धर्मांचा प्रचार व प्रसार सर्व हिंदुस्थानभर जोरानें सुरू झाला. नामांकित आचार्य निरनिराळ्या ठिकाणीं पाठविण्यांत आले. विहार, संघाराम स्थापले गेले. ज्ञान, वैराग्य, तपश्चर्या व विनय हे सद्गुण ज्या आचार्यांजवळ आहेत ते आचार्य कोठेंहि गेले तरी त्यांच्याभोंवतीं शिष्यगणांचा समूह जमतो; व शिक्षणसंस्था स्थापन होते. प्राचीन शिक्षणसंस्था अशाच रीतीनें स्थापन झाल्या. तेथील आचार्यांच्या कीर्तीमुळें या शिक्षणसंस्थांकडे धनिकवर्गाचें व राजे लोकांचें लक्ष वेधलें गेलें. त्यांच्याकडून अशा शिक्षणसंस्थांना द्रव्याची मदत होत गेली व संस्था वाढत गेल्या. संस्थेची कीर्ति पसरल्यावर बाहेरून विद्यार्थी येऊं लागले. निरनिराळे विद्यार्थी निरनिराळ्या विषयांची अपेक्षा करणार तेव्हां विद्यार्थ्यांबरोबर शिकविण्याचे विषयहि वाढूं लागले. विद्यार्थ्यांच्या रहाण्याखाण्याची सोय होऊं लागली व स्थापन झालेल्या शिक्षणसंस्थांचें रूपांतर विद्यापीठांत होऊं लागलें. नालंदा, विक्रमशिला, उदंतपुरी विद्यापीठांप्रमाणें वलभी विद्यापीठहि एका वेळीं फार गाजलें. दूरदूरहून—थेट गंगायमुनेच्या किनाऱ्यावरून—विद्यार्थी येऊं लागले.[२] जवळच नालंदासारख्या प्रथितयश संस्था असतांना विद्यार्थी इतक्या दूरवर

२. कथासरित्सागर ३२, ४२–४३.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

येण्याला तशींच कांहीं कारणें असावींत. एक तर नालंदाप्रमाणें वलभीची कीर्तीहि सर्व भरत खंडभर पसरली होती. दुसरें, ज्या विद्यार्थ्यांना नालंदा, विक्रमशिला येथें प्रवेश मिळूं शकत नव्हता त्यांना या ठिकाणीं प्रवेश मिळूंहि शकत असेल; कारण नालंदाप्रमाणें या ठिकाणीं द्वारपंडितांची कडक परीक्षा असलेली दिसत नाहीं. तिसरें कारण येथें नालंदापेक्षां कांहीं निराळे विषय शिकविण्याची सोय असेल. येथील विद्यापीठांत शिकविल्या जाणाऱ्या विषयांची संख्या ७२ पर्यंत गेली होती. शेवटचें कारण 'दूरतः पर्वताः रम्याः'–'दुरून डोंगर साजरे'–हें असावें. जवळच्यापेक्षां दूरची वस्तु जास्त आकर्षक वाटते व वलभीहि आकर्षक वाटत असावी. शिवाय या सुमारास जैन धर्मानें मगध देशांतील पाटलीपुत्राहून आपलें प्रस्थान वलभी येथें त्रसविलें होतें.

वलभीला विशेष महत्त्व येण्यास कारण

वलभी हें विद्वान् लोकांचें स्थान म्हणून किती प्रसिद्ध असलें पाहिजे हें एका गोष्टीवरून सिद्ध होण्याजोगें आहे. वैदिक धर्मग्रंथांप्रमाणें जैन लोकांचे धर्मग्रंथहि लिहिलेले नसत. वेदांप्रमाणें तेहि तोंडींच शिकविले जात. महावीराच्या वेळेपर्यंत हे ग्रंथ लिहिलेले नव्हते.[3] म्हणून हा धर्म स्वीकारणाऱ्या लोकांना 'निर्ग्रंथी' म्हणत.[4] हे जे निर्ग्रंथी असत त्यांची स्मरणशक्ति इतकी तीव्र असे कीं सर्व धर्मतत्त्वें त्यांच्या तोंडीं असत. परंतु कांहीं काळानें हा धर्म खालावूं लागला. इ. स. पू. ४ थ्या शतकांत तर या धर्माचीं दोन शकलें झालीं; एकाला 'श्वेतांबर' (शुभ्र वस्त्र धारण करणारे) म्हणूं लागले व दुसऱ्याला 'दिगंबर' (दिग्वसन धारण करणारे अर्थात् नग्न) म्हणूं लागले. अशा प्रकारें जैन सिद्धान्त खालावत जाऊं लागल्यास जैन धर्म लवकरच नाहींसा होईल अशी भीति जैन धर्माच्या कांहीं विचारवंतांना वाटूं लागली व त्यांनीं जैन सिद्धान्त लिहून काढण्याचें ठरविलें. हें काम जवळ जवळ ४ शतकें चालू होतें. या गोष्टीला सुरवात मगध देशांतील

३. J. Jaini, M. A. : Outlines of Jainism, p. XXXVII.

४. कांहीं विद्वानांच्या मतें 'निर्ग्रन्थी' म्हणजे 'कोणताहि पाश नसलेले.' पहा : An Advanced History of India (1948), By Majumdar, Raychaudhuri & Datta, p. 85.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाटलीपुत्र नगरांत झाली; पण पूर्ण मान्यता मात्र वलभी येथील सभेनें दिली.[५] ही एकच गोष्ट वलभीचें महत्त्व किती होतें हें पटवून देण्यास पुरेशी आहे. या वेळीं वलभी येथील मुख्य आचार्य देवर्द्धिज्ञानी हे होते. ही गोष्ट इ. स. ४५४ मध्यें घडली. वलभी येथील सभेनें जैन धर्मांचे ८४ ग्रंथ मान्य केले; यांत ४१ सूत्रें, ३० प्रकीर्ण (पइन्ज), १२ निर्युक्ति व १ महाभाष्य यांचा समावेश होतो.[६]

दिगंबर मताप्रमाणें इ. स. च्या पहिल्या शतकांत जैनधर्मपारंगत असे फारच थोडे लोक शिल्लक होते. या सर्व सूरींची सभा भरून त्यांनीं हे सर्व ग्रंथ लिहून काढले. पण या सर्व ग्रंथांना मान्यता मात्र वलभी येथेंच मिळाल्याचें सर्व कबूल करतात.

जैन लोकांत अशी एक दंतकथा आहे कीं हे सर्व ग्रंथ लिहून झाल्यानंतर ४०० वर्षांनीं शंकराचार्यांनें ते समुद्रांत बुडवून टाकले, व पुनः एकदां नेपाळ व म्हैसूर येथून जे ग्रंथ सिळण्याजोगे होते ते मिळवून लिहून काढण्यांत आले. या कामीं निरनिराळ्या राजे लोकांनीं फारच मदत केली.

वलभी व नालंदा विद्यापीठांतील साम्य

वलभी विद्यापीठ व नालंदा विद्यापीठ यांत आपणांस बऱ्याच बाबतींत साम्य दिसून येईल. दोनहि विद्यापीठांची भरभराट होण्याला तेथील राजे कारणीभूत झाले. गुप्त राजांनीं नालंदाचें वैभव वाढविलें तर मैत्रक राजांनीं वलभीला पुढें आणली.[७] येथील राजा जो पहिला ध्रुवसेन त्याला एक बहिण होती. तिची मुलगी जी दुड्डा हिनें वलभी विद्यापीठाची पहिली इमारत बांधली असें म्हणतात.[८] नंतर होऊन गेलेल्या इतर राजांनींहि निरनिराळ्या प्रकारें मदत केली व वलभी विद्यापीठ एक महत्त्वाचें विद्यास्थान बनलें. कित्येक राजांनीं या विद्यापीठाच्या तैनातीला खेड्यांचें उत्पन्न दिलें, कित्येकांनीं विद्यार्थ्यांकरितां इमारती बांधून दिल्या, पुस्तकें घेण्याकरितां व लिहिण्याकरितांहि कित्येकांनीं स्वतंत्र व्यवस्था केली.[९] पहिल्या गुहसेनाच्या

---

५. Mrs. Sinclair Stevenson, M. A., Sc. D., "The Heart of Jainism, p. 13.

६. J. Jain : Outlines of Jainism, p. XXXVIII.

७. Dr. A. S. Altekar, Education in Ancient India (1944), p. 125.

८. A Grant of King Guhasena of Valabhi, I. A. IV, p. 174.

९. I. A. VII, p. 67 ff; J. R. A. S. 1895, p. 383.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ताम्रपटांतील दानलेखांत तर 'सद्धर्मस्य पुस्तकोपचयार्थम्' असा स्पष्ट निर्देश आहे. अशा प्रकारें निरनिराळ्या बाबतींत द्रव्यसहाय्य व राजाश्रय मिळूं लागल्यानंतर कोणत्या विद्यापीठाची भरभराट होणार नाहीं ? हुएनत्संगाच्या वेळीं या विद्यापीठांत १०० संघाराम (म्हणजे आजचीं कॉलेजें) होते, व ६,००० भिक्षु शिकत होते.[१०] दूरदूरचे विद्यार्थी जे येथें शिक्षण घेण्याकरितां येत त्यांत सर्व जातींचे व सर्व पंथांचे लोक असत. गरीब तसे श्रीमंत असत. श्रेष्ठीपुत्र व राजपुत्र असत. वाकाटक गुप्तांच्या वेळीं तर श्वेतांबर जैनांचें तें आगरच.[११] तेव्हां जैन विद्यार्थी येथें शिकावयास आल्यास आश्चर्य नाहीं. नालंदा येथील बौद्धधर्मीय प्रसिद्ध पंडित गुणमति व स्थिरमति हे येथें असल्यानें बौद्ध भिक्षूंना हें स्थान फारच पूज्य वाटे.[१२] या दोनहि भिक्षु पंडितांचा विहार गांवाबाहेर होता व त्याचें नांव 'बप्पपाद विहार' असें होतें,[१३] व हा विहार फारच प्रसिद्ध होता.

वलभीसंबंधानें चिनी प्रवाशांचीं मतें

वलभी विद्यापीठाची योग्यता किती होती हें तेथें शिकून गेलेल्या विद्यार्थ्यांपेक्षां किंवा तेथें निर्माण झालेल्या नामांकित पंडितांपेक्षां, किंवा तेथें भरलेल्या जैनसूरींच्या निर्णायक परिषदेपेक्षां आणखी एका निराळ्या मार्गानें समजण्याला साधन आहे; तें म्हणजे प्रसिद्ध चिनी पंडितांनीं येथील विहारासंबंधानें केलेला उल्लेख होय. या चिनी पंडितांनीं लिहून ठेविलेल्या माहितीनें आपणांस अज्ञात अशा कितीतरी गोष्टींवर उजेड पाडला आहे. नालंदादि विद्यापीठांसंबंधानें माहिती या प्रवाशांनीं लिहून ठेविली नसती तर भारतांतील या प्राचीन ख्यातनाम विद्यापीठांबद्दल आपणांस कांहींहि कळलें नसतें व आपण अज्ञानांत राहिलों असतों.

हुएनत्संग व इत्सिंग या दोघांहि प्रवाशांच्या मतें वलभी हें शहर फारच भरभराटीस आलेलें व समृद्ध असें होतें. हुएनत्संग लिहितो कीं हें एक अतिशय प्रसिद्ध बंदर होतें व येथून माल बाहेर पाठविला जाई व बाहेरून माल येथें

१०. Hieuen Tsang, II, p. 266.
११. New History of Indian People, By Majumdar & Dr. Altekar, p. 391.
१२. U. Ball : Ancient India, p. 192.
१३. A Grant of King Guhasena of Valabhi, I. A. VI, p. 9.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आणण्यांत येई. सातव्या शतकांत इतकें प्रसिद्ध दुसरें बंदर जगाच्या पाठीवर नव्हतें. अत्यंत दुर्मिळ व किंमती वस्तू येथून निर्यात होत.[१४] या विधानावरून सौराष्ट्रांतील या प्रसिद्ध शहराच्या समृद्धीची कल्पना येते. एखाद्या शहराचें दुसऱ्या देशांतील प्रसिद्ध शहरांशीं दळणवळण असल्यानंतर तेथील एकंदर राहणीवर, विचारावर व एकंदर संस्कृतीवर परिणाम होणें अपरिहार्य असतें. शिक्षणावरील परिणामालाहि या गोष्टी तितक्याच कारणीभूत होतात. वलभी विद्यापीठाची जी इतकी ख्याति झाली आहे त्याच्या मुळाशीं हा संस्कृतिसंगम असला पाहिजे. येथील स्वतंत्र वातावरणांत शिक्षणसंस्था वृद्धिंगत होत गेली.

इत्सिंग हा नालंदा विद्यापीठांत बरींच वर्षें राहिला. तेथें त्यानें ४०० संस्कृत ग्रंथांचें चिनी भाषेंत भाषांतर केलें. नालंदा विद्यापीठासंबंधानें त्यानें विशिष्ट प्रकारचा अभिमान व्यक्त केला आहे. असें असतांना त्यानें वलभी विद्यापीठाची जी स्तुति केली आहे तीवरून त्यास वलभीसुद्धां नालंदाइतकीच कार्यक्षम वाटत होती हें सिद्ध होत आहे. तो म्हणतो, "संस्कृति, शिक्षण व आचार्यांबद्दल नालंदा जितकी मान्यता पावली तितकीच मान्यता वलभीनेंसुद्धां मिळविली. वलभी येथेंसुद्धां नालंदाइतकेंच श्रेष्ठ प्रतीचें शिक्षण दिलें जाई." वलभींत कोणाहि विद्यार्थ्याला प्रवेश मिळण्याअगोदर त्याच्याकडून कांहीं ठराविक प्राथमिक ज्ञानाची अपेक्षा असे; व हें ज्ञान आजच्या मॅट्रिक परीक्षेस लागणाऱ्या ज्ञानापेक्षां कितीतरी पटीनें अधिक असे असें दिसतें. अशा विद्यापीठांत प्रवेश मिळणें विद्यार्थ्यांस कठीण जाई. असें असूनहि हजारों विद्यार्थी या विद्यापीठांत शिक्षण घेत होते ही गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे.

इत्सिंगनें वलभी विद्यापीठाची तुलना फक्त नालंदाशींच केली नाहीं तर स्वतःच्या देशांतील चिम्मा, शिच्चु, लुगमेन्, च्युलि वगैरे प्रसिद्ध विद्यापीठांशीं केलेली आहे; व या विद्यापीठांइतकीच वलभीसुद्धां श्रेष्ठ आहे असें त्यानें म्हटलें आहे.[१५] नालंदा व वलभी हीं दोनहि विद्यापीठें म्हणजे ज्ञान व विद्या यांचा अथांग सागर. नालंदा भारताच्या पूर्वभागांत तर वलभी पश्चिम भागांत इतकाच फरक. वलभी

१४. Dr. A. S. Altekar : Education in Ancient India (1944), p. 124.

१५. I–tsing, p. 177.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विद्यापीठाला नालंदा विद्यापीठाचें प्रतिस्पर्धी म्हणतां येईल. वलभी येथें बौद्ध धर्माच्या हीनयान पंथाला प्राधान्य दिलें जाई. श्वेतांबर जैन धर्माचें तर हें या भागांतील महत्त्वाचें ठिकाण; तेव्हां जैन धर्मांतील सर्व ग्रंथांचें या ठिकाणीं अध्ययन होई.

वलभी येथें पंडितांच्या ज्ञानाची कसोटी

वलभी विद्यापीठाच्या थोरवीची कल्पना येण्याजोग्या ज्या कांहीं गोष्टी उपलब्ध झाल्या आहेत त्यांत आणखी एक गोष्ट महत्त्वाची आहे. ती म्हणजे हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांतून एखाद्या वादग्रस्त मुद्यावर चर्चा करण्यास व त्यावर अखेरचा निर्णय घेण्यास प्रसिद्ध पंडित वलभीपुरास येत ही होय. येथील विद्वान् पंडितांशीं चर्चा करून त्या गोष्टींचा निर्णय लागल्यानंतरच ते परत जात. जैन लोकांच्या धर्मांतील महत्त्वाच्या गोष्टींची चर्चा येथें झाली व त्यावर निर्णयहि येथील खास बोलावलेल्या सभेंत घेण्यांत आले व हे निर्णय हिंदुस्थानांतील सर्व भागांत मान्य करण्यांत आले. यावरून वलभीला किती महत्व प्राप्त झालें होतें हें दिसून येईल. या बाबतींत तिची तुलना फक्त काशीशीं करतां येईल. कारण वैदिक धर्माबाबत जे जे मुद्दे उपस्थित झाले त्यांचा निर्णय काशी येथें लावण्यांत आला. खुद्द शंकराचार्यांनाहि आपलीं मतें येथील विद्वत्परिषदेपुढें तावूनसुलाखून घ्यावीं लागलीं.

वलभी म्हणजे आजचें ऑक्स्फोर्ड–केंब्रिज

नालंदा व विक्रमशिलाप्रमाणें वलभीच्या बाबतींत आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे. तीवरून त्या कालीं वलभी विद्यापीठासंबंधानें लोकांच्या मनांत किती आदर होता हें कळून येतें. ज्याप्रमाणें आज ऑक्सफोर्ड किंवा केंब्रिज येथें शिकून आल्यानंतर सरकारदरबारीं कोणाहि विद्यार्थ्यास मोठी नोकरी एकदम मिळते व त्यास मोठमोठ्या मानाच्या जागा मिळतात, त्याप्रमाणें पूर्वीं एकाद्या विद्यार्थ्यानें वलभी येथें शिक्षण घेतलें आहे असें कळलें कीं, त्यास ताबडतोब राजदरबारीं बोलावणें येई व मोठी मानसन्मानाची नोकरी देण्यांत येई. नुसतें वलभीला जाऊन आलेला आहे (Valabhi–returned) हें कळलें तरी त्यास इंग्लंडला जाऊन आलेल्या (England–returned) माणसाप्रमाणें त्यावेळीं मान मिळे. वलभी विद्यापीठाला हें महत्त्व प्राप्त होण्याला येथील आचार्यांनीं केवढे श्रम घेतले असतील याची कल्पना करणेंच बरें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वलभी विद्यापीठांत शिकविण्यांत येणारे विषय

वलभी विद्यापीठावर जैन धर्मसंप्रदायाचा विशेष अंमल असल्यामुळें येथें शिकविण्यांत येणारे विषय व इतर जैनसंप्रदायी विद्यापीठांत शिकविण्यांत येणारे विषय यांत फारसा फरक असणें संभवनीय नाहीं. उलटपक्षीं जैन संप्रदायाचीं जीं जीं विद्यापीठें होतीं त्या सर्वांत एक प्रकारचें व फार व्यापक स्वरूपाचें शिक्षण देण्याची सोय होती. या विद्यापीठांतून एकंदर ७२ विषय शिकविण्यांत येत व यांत क्वचितच एकादा विषय शिकवण्याजोगा असून वगळण्यांत येई. यामुळें या विद्यापीठांत सर्व प्रकारचे विद्यार्थी दूरदूरहून येत. द्वारका विद्यापीठांत राजपुत्र गोयम यालाहि हे ७२ विषय शिकविण्यांत आले होते[१६] व अयोध्येचे राजे अर्हत् ऋषभ यांनीं आपल्या प्रजेलाहि ७२ विषयच शिकविल्याचें सांगण्यांत आलें आहे.[१७] सूरि सिद्धसेन यांनीं पाञ्चाल देशांतील बप्पभट्टिला व कान्यकुब्जाचा राजपुत्र आम याला जे ७२ विषय शिकविले त्यांची यादी राजशेखर सूरीनें आपल्या 'प्रबंधकोशां'त दिली आहे.[१८] हे ७२ विषय फक्त पुरुषांकरितां असत. याशिवाय स्त्रियांकरितां ६४ विद्या किंवा कला असत. त्यांची यादी 'गुणशीला विद्यापीठ' प्रकरणांत देण्यांत आली आहे. पुरुष विद्यार्थ्यांना साधारणतः जे ७२ विषय शिकवण्यांत येत ते खालीलप्रमाणें :

१ लिखितम् (लेखनकला), २ गणितम्, ३ गीतम् (गायन), ४ नृत्यम् (नृत्य), ५ पठितम् (वाचन), ६ वाद्यम् (वादन), ७ व्याकरणम्, ८ छन्दस् (वृत्तांचें ज्ञान), ९ ज्योतिषम्, (नक्षत्रांचें ज्ञान), १० शिक्षा (ध्वनिशास्त्र), ११ निरुक्तम् (व्युत्पत्तिशास्त्र), १२ कात्यायनम् (संस्कारशास्त्र) [धार्मिक विधी कशा प्रकारें करावे याचें ज्ञान], १३ निघण्टु (शब्दशास्त्र), १४ पत्रच्छेद्यम् (पानें कापणें वगैरे), १५ नखच्छेद्यम् (सौंदर्य वाढेल अशाप्रकारें नखें वगैरे कापण्याची कला), १६ रत्नपरीक्षा, १७ आयुधाभ्यास (शस्त्रांचें ज्ञान), १८ गजारोहणम्, १९ तुरगारोहणम्, २० तयोः शिक्षा (धनुर्विद्या), २१ मंत्रवाद (मंत्रांचें ज्ञान), २२ यंत्रवाद, २३ रसवाद (किमयाज्ञान), २४ खन्यवाद (खाणींचें शास्त्र),

१६. 'अन्तगडदसाओ' व 'अणुत्तरववाइय दसाओ', पा. ३०–३१.
१७. Dr. Das Gupta : Jain System of Education, p. 72.
१८. राजशेखर सूरि 'प्रबन्धकोश,' भाग १, पा. २७–२८.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२५ रसायनम् (Chemistry), २६ विज्ञानम् (शास्त्र), २७ तर्कवाद (तर्कशास्त्र), २८ सिद्धांत, २९ विषवाद (विष उतरविण्याचें ज्ञान), ३० गारुडम् (सर्पाचें विष उतरविण्याचें ज्ञान), ३१ शाकुन्तम् (पक्षांच्या उडण्यावरून किंवा आवाजावरून शकून सांगणें), ३२ वैद्यकम्, ३३ आचार्यविद्या (शिक्षणकलेचें ज्ञान), ३४ आगम, ३५ प्रासाद-लक्षणम् (घरें वगैरे बांधण्याचें शास्त्र), ३६ सामुद्रिकम् (हस्तरेखाज्ञान), ३७ स्मृति (कायदे कानू), ३८ पुराणम्, ३९ इतिहास, ४० वेद, ४१ विधि, ४२ विद्यानुवाद, ४३ दर्शन-संस्कार (तत्त्वज्ञान), ४४ खेचरीकला (योग), ४५ अमरी-कला (अघोरी विद्या), ४६ इन्द्रजालम् (जादू), ४७ पातालसिद्धि (गूढज्ञान), ४८ धूर्तशम्बलम् (फसवेगिरीची कला), ४९ गंधवाद (अत्तर, सुगंधि द्रव्यें तयार करण्याची कला), ५० वृक्षचिकित्सा (वृक्षाचे रोग बरे करणें), ५१ कृत्रिम मणिकर्म (नकली हिरे-जड-जवाहिर तयार करणें), ५२ सर्वकरणी (मामुली इतर कला), ५३ वश्यकर्म (वशीकरणविद्या), ५४ पणकर्म (व्यापारविद्या), ५५ चित्रकर्म (चित्रकला), ५६ काष्ठघटनम् (सुतारविद्या), ५७ पाषाणकर्म (पाथरवटाची कला), ५८ लेपकर्म (उटणीं वगैरे लेप तयार करण्याची विद्या), ५९ चर्मकर्म (चामड्याचीं कामें), ६० यंत्रक रसवती (यंत्रें तयार करणें), ६१ काव्यम्, ६२ अलंकार, ६३ हसितम् (हास्यरस उत्पन्न करणारीं नाटकें, प्रहसनें वगैरे), ६४ संस्कृतम्, ६५ प्राकृतम्, ६६ पैशाचिकम्, ६७ अपभ्रंशम्, ६८ कपट, ६९ देशभाषा, ७० धातुकर्म (निरनिराळ्या धातूंचें काम), ७१ प्रयोगोपाय (एका ठराविक पद्धतीनें पाठ केलेलें म्हणून दाखविणें), ७२ केवलीविधि (केवलिन् साधूंचे नियम).

आजच्या कॉलेजांतील शिक्षण व प्राचीन कालच्या ७२ विद्या

आजच्या आपल्या नामवंत विद्यापीठांतर्फे वाङ्मय, इतिहास, गणित, तत्त्वज्ञान, विज्ञानशास्त्र वगैरे वगैरे विषय शिकविण्याची सोय निरनिराळ्या प्रकारच्या आर्ट्स, सायन्स वगैरे कॉलेजांतून करण्यांत आलेली असते. वरतीं जे ७२ विषय सांगितले त्यांत वरील सर्व प्रकारच्या कॉलेजांतून, त्याशिवाय कलाभवन वगैरे संस्थांतून, शिकविण्यांत येणाऱ्या विषयांचा समावेश करण्यांत आला आहे; पण त्यांत असे कितीतरी विषय आहेत कीं जे आपल्या शाळाकॉलेजांतून शिकविण्यांत येत नाहींत किंवा ते लवकर शिकविले जातीलच याची खात्रीहि देतां येत नाहीं. पण प्राचीन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कालीं हे विषय शिकविले जात होते हें निरनिराळ्या ठिकाणीं आलेल्या उल्लेखांवरून सहज समजण्याजोगें आहे. इतके विषय शिकवण्यास तज्ज्ञ शिक्षक कोठून पैदा करीत ? आज नुसतें प्राथमिक शिक्षण आवश्यक करावयाचें म्हटलें तरी आपणांस नुसते ते शिक्षक मिळण्याची मारामार ! माध्यमिक शिक्षण देण्यास प्रत्येक शाळांतून किती तज्ज्ञ शिक्षक आहेत ? मग वरील लांबलचक यादी वाचल्यावर ते ते विषय शिकविणारे तज्ज्ञ शिक्षक आजच्या काळांत मिळणें अशक्य आहे असेंच म्हणावें लागेल.

वरील बहात्तर विद्या कोणास शिकवण्यांत येत ?

आतां 'एक विद्यार्थी इतके विषय शिकणें कसें शक्य आहे ?' असा प्रश्न उपस्थित होणें साहजिक आहे. त्याला उत्तर इतकेंच कीं वरील ७२ विषय ऐच्छिक विषयांत मोडत असत. व सर्व विषय सक्तीनें शिकविले जात नसत. विद्यार्थ्यांना ज्या ज्या विषयांत गोडी वाटे ते ते विषय विद्यार्थी पसंत करीत. म्हणूनच कित्येक विद्यार्थी नुसतें लष्करी शिक्षण घेण्याकरितां येत, तर कित्येक नुसतें वैद्यकीय विषय शिकत; कित्येक स्थापत्यकला-पारंगत होत, तर कांहीं ब्राह्मण विद्यार्थी नुसती जादूची विद्या शिकण्याकरितां येत. पण ज्यांना राज्यांतील महत्त्वाच्या राज्यकारभाराचा व्यवहार हातीं घ्यावयाचा आहे अशा राजपुत्रांना, प्रधानपुत्रांना किंवा श्रेष्ठीपुत्रांना वरील सर्व विषयांची सामान्य माहिती देण्यांत येत असली पाहिजे. तारापीडानें आपला मुलगा चंद्रापीड व प्रधानपुत्र वैशंपायन यांना ज्या ज्या विषयांची माहिती देण्याची व्यवस्था केली म्हणून 'कादंबरीं'त वर्णन आहे तें वाचलें म्हणजे त्या कालीं या सर्व विषयांचें ज्ञान राजपुत्रांना बुद्ध्या देत ही गोष्ट लक्षांत आल्यावाचून रहात नाहीं. अशाच प्रकारची माहिती देऊन 'मूर्ख' राजपुत्रांना 'शहाणा' करण्याचा विडा विष्णुशर्मा नांवाच्या आचार्यानें उचलल्याचा उल्लेख पंचतंत्रांत आरंभींच दिला आहे. इतके विषय शिकवण्याचा उद्देश त्यांना त्या त्या विषयांत पारंगत करणें हा नसून त्यांचें सामान्य ज्ञान त्यांना करवून द्यावयाचें इतकाच होता. राज्यकारभार करीत असतांना राजा-प्रधानादि लोकांचा संबंध राज्यांतील सर्व प्रकारच्या निरनिराळ्या लोकाशीं येणार. तेव्हां त्यांच्याशीं व्यवहार करतांना किंवा त्यांना न्याय देतांना त्यांच्या त्यांच्या धंद्याची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माहिती असल्यास कोणत्याहि प्रकारें त्रास पडणार नाहीं; तेव्हां सर्वप्रकारच्या धंद्यांची माहिती त्यांना करून देणें हा हें व्यापक शिक्षण देण्याचा उद्देश दिसतो.

कांहीं राजांनीं या सर्व विषयांत पूर्ण प्राविण्य मिळविल्याचेहि दाखले आहेत. अयोध्येचे राजे अर्हत् ऋषभ हे नुसते या विषयांत पारंगतच नव्हते, तर आपल्या प्रजेचें कल्याण व्हावें म्हणून त्यांनीं ते विषय आपल्या प्रजेला शिकविलेसुद्धां.

सौराष्ट्रांतील दुसऱ्या एका विद्यापीठांतील म्हणजे द्वारका विद्याठांतील राजपुत्र गोयम यास वरील ७२ विषय शिकविल्याचें ' अंतगडदसाओ' व ' अणुत्तरोववाईय दसाओ ' या ग्रंथांत सांगितलें आहे. त्याला हे विषय कसे शिकवण्यांत आले याचें सुंदर वर्णन त्यांत दिलें आहे :

" त्या आचार्यानें गोयम राजपुत्राला सर्व ७२ विषयांचें ज्ञान दिलें. पहिल्यानें त्यास लिहावयास शिकविलें. नंतर महत्त्वाचा म्हणून गणित विषय त्यास शिकविला. शेवटीं ' पक्ष्यांच्या आवाजाचें ज्ञान ' त्यास देण्यांत आलें. हे विषय पहिल्यानें त्याच्याकडून पाठ करून घेतले. नंतर त्याला त्यांचा अर्थ समाजावून दिला. नृत्यसंगीतादि विषय मात्र पहिल्यापासून सप्रयोग शिकविण्यांत आले. या विषयांत उत्तम प्रकारची तयारी त्याच्याकडून करवून घेण्यांत आली. नंतर त्याला जुगार, द्यूत, पेयांचे आठ प्रकार, घर उत्तम प्रकारें कसें शृंगारावें वगैरेबद्दल माहिती दिली. रिकामा वेळ आनंदांत कसा घालवितां येईल याबद्दलचें ज्ञान, विशेषतः कूट प्रश्न घालणें इत्यादि, त्याला देण्यांत आलें. त्यानें लेखनकलेंत प्रावीण्य मिळविलें. त्यानें सोन्याचांदीचे दागिने तयार करण्यासंबंधानें माहिती मिळविली. त्याला सुवासिक द्रव्यें, सुलेपनादि द्रव्यें तयार करतां येऊं लागलीं. स्त्रियांना निरनिराळे पोषाख कसे घालावे हें तो शिकला. त्याला स्त्रियांची परीक्षा करतां येऊं लागली. शकुनज्ञान, त्याचप्रमाणें हस्तिविद्या व अश्वपरीक्षा तो शिकला. गाई, कोंबड्या यांच्याहि परीक्षा त्याला करतां येऊं लागल्या. छत्र, काठी, तरवार वगैरे कशीं तयार करावींत, रत्नें विशेषतः ' काजनी ' रत्नें कशीं पारखावींत हें तो शिकला. घरें कशीं बांधावींत, शहरांचें व कॅंप्सचें माप कसें घ्यावें हेंहि त्याला कळूं लागलें. युद्धाचेहि निरनिराळे प्रकार तो शिकला. त्याला मुष्टियुद्ध, बाहुयुद्ध, शाखायुद्ध, धनुर्वेद वगैरे चांगल्या प्रकारें येऊं लागले. तरवार व धनुष्य त्याला पेलतां येऊं लागलें. तयार व अशुद्ध सोनें मुशींत ओतण्याची कला त्याला अवगत झाली. तो सर्व प्रकारचे खेळ शिकला. पानांवर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याला नक्षीकाम कातरतां येऊं लागलें. पक्ष्यांचे आवाजहि त्याला काढतां येऊं लागले. जीवदान देणें त्याचप्रमाणें जीव घेणें याहि कलेंत तो निष्णात झाला. ”

गोयम राजपुत्राला अशा प्रकारचें शिक्षण दिल्यानंतर त्याला त्याच्या वडिलांच्या स्वाधीन केल्याचें वर्णन आहे. वरील उताऱ्यावरून राजपुत्रालसुद्धां किती तऱ्हेचें शिक्षण दिलें जात होतें याबद्दल चांगली माहिती मिळते. या शिक्षणामध्यें दोर किंवा कमळाच्या दांड्यांनीं खेळण्यापासून स्त्रियांना पोषाख चढविण्यापर्यंत व शेवटीं युद्धकलेचे सर्व प्रकार यांचें शिक्षण साकल्यानें दिल्याचें वर्णन आहे.

अशा प्रकारचें व्यापक शिक्षण वलभीसारख्या जैन विद्यापीठांतून किंवा तक्षशिला-नालंदासारख्या बौद्ध विद्यापीठांतून देण्याची सोय करण्यांत आली होती. हें शिक्षण वैदिक पंथाच्या कोणत्याहि विद्यापीटांत दिलें जात नव्हतें; व म्हणूनच गंगायमुनेच्या भागांतील १६ वर्षं वयाचे ब्राह्मणपुत्र शिक्षण घेण्याला वलभीला जात म्हणून कथासरित्सागरांत (३२. ४२–४३) वर्णन आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१३ : काञ्ची विद्यापीठ†

[काल : इ. स. पू. २ रें शतक ते इ. स. १३ वें शतक]

प्राचीन विद्यापीठांत संस्कृतिसंगम

भारतांतील असंख्य विद्यापीठांपैकीं ज्यांचा फारच प्रामुख्यानें उल्लेख करतां येईल अशा गंगा-यमुनेच्या आसपासच्या भागांतील, त्याचप्रमाणें वायव्य सरहद्दी-वरील व सौराष्ट्रांतील कांहीं विद्यापीठांसंबंधानें जी माहिती आज आपणांस उपलब्ध आहे ती थोडक्यांत देण्याचा आतांपर्यंत प्रयत्न केला. आतां आपण दक्षिणेकडील कांहीं विद्यापीठांचा विचार करणार आहोंत.

भारताच्या इतिहासांत एक काळ असा होता कीं ज्यावेळीं सर्व देशभर सर्व-सामान्यतः एकच संस्कृति नांदत होती; एकच भाषा बोलली जात होती; एकच विचार केले जात होते. प्रत्येक प्रांतांत कदाचित् तद्देशीय भाषा बोलल्या जात असतील, पण त्यांना सर्वसामान्य रूढ असलेली भाषा समजत होती. त्याचप्रमाणें निरनिराळ्या ठिकाणीं निराळे धार्मिक पंथहि असतील; पण सर्वसामान्य संस्कृतीचा व या पंथांचा संबंध होता. ज्याप्रमाणें आज महंमदी धर्म व वैदिक धर्म, त्याच-प्रमाणें इस्लाम संस्कृति व हिंदु संस्कृति अगदीं भिन्न आहेत, त्याप्रमाणें त्या काळीं भिन्न संस्कृति असतील असें वाटत नाहीं. याला बव्हंशीं कारण निरनिराळ्या धर्मां-तील व पंथांतील साधु, भिक्षु, आचार्य यांचें हिंदुस्थानांतील निरनिराळ्या भागां-तील परिभ्रमण असावें. परिव्राजक व परिव्राजिका, तापस आणि तापसी, जोगी आणि जोगिणी एका ठिकाणाहून दूरदूरच्या दुसऱ्या ठिकाणीं धर्मप्रचारार्थ जात. व्यापाराच्या मिषानें व्यापारी व शिक्षणाकरितां विद्यार्थी शेंकडों मैल प्रवास करीत.

† Dr. R. C. Majumdar & Dr. A. S. Altekar : New History of Indian People, Vol. VI (1946).

R. Sathiana Thaier, M. A., L. T. : Studies in The Ancient History of Tondamandalam (1944).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ही एक संस्कृति व एक भाषा घडवून आणण्याचें श्रेय आर्य धर्माच्या प्रचारकांना व सर्वांत जास्त म्हणजे जैन व बौद्ध भिक्षूंना दिलें पाहिजे. बौद्ध भिक्षु तर भयंकर धाडशी, सच्छील, स्वार्थत्यागी व विद्वान्. ते नुसते हिंदुस्थानांतच बौद्ध धर्माचा प्रचार करून थांबले नाहींत, तर हजारों मैल दूर असलेल्या अत्यंत रानटी जातींतहि धर्मप्रसारार्थ जाण्यास ते कचरले नाहींत. पश्चिमेस अफगानीस्थान, इराण व उत्तरेस चीन व विशेषतः मंगोलियाचा सर्व भाग, पूर्वेस जपान व हजारों मैल दूर असलेलीं फिजि वगैरे बेटें, व दक्षिणेस जावा-सुमात्रा व सिलोनपर्यंतचे प्रदेश त्यांनीं तुडविले व बौद्ध धर्म स्थापन केला.

आज आपण वैदिक, जैन व बौद्ध धर्म अगदीं भिन्न मानतों; पण इ. स. च्या अगदीं १२ व्या शतकापर्यंत हे तीन धर्म अगदीं निराळे दाखविले जात नव्हते हें तक्षशिला, नालंदा, वलभी येथील विद्यापीठांबद्दल दिलेल्या माहितीवरून कळून येईल. अगदीं शेवटच्या विद्यापीठाचेंच उदाहरण घ्या ना. वलभी विद्यापीठ बौद्धधर्मीय कीं जैनधर्मीय? वलभी येथें जरी जैन धर्माचाच पगडा जास्त असला तरी बौद्ध धर्माचा पगडा कमी नव्हता. शिवाय प्रत्येक विद्यापीठांत वैदिक, जैन व बौद्ध वाङ्मयांचा अभ्यास होई. शिकविणाऱ्या आचार्यांमध्यें दुसऱ्या धर्माबद्दल कोणत्याहि प्रकारचा द्वेषभाव किंवा पूर्वग्रह दिसत नव्हता. त्यांना 'धर्म' ही संज्ञा १२ व्या शतकानंतर मिळाली असावी असें दिसतें. तत्पूर्वी वैदिक धर्माचे हे निरनिराळे विचारप्रवाह म्हणूनच सुरू झाले असावे. जिन महावीरानें किंवा गौतम बुद्धानें वैदिक विचारांत जी विकृति शिरली होती त्याविरुद्ध बंडच उभारलें व आपले विचार लोकांपुढें मांडले. लोकांना ते आवडले; व जिनाचे अनुयायी जैन झाले व बुद्धाचे अनुयायी बौद्ध झाले. त्यांनीं कांहीं निराळा धर्म स्थापला नाहीं.

पण १२ व्या शतकाच्या शेवटीं नालंदादि विद्यापीठांचा भिन्न अशा इस्लामी संस्कृतीच्या खिलजी घराण्यांतील लोकांनीं नायनाट केला व या विचारप्रवाहांचे झरेच नाहींसे केले. त्यानंतर एकदम मोठें थोरलें खिंडार (vacuum) पडलें. यानंतर या जैन व बौद्ध विचारांच्या विरोधकांनीं त्यांना धर्माचें नांव दिलें असावें किंवा अगदीं अलीकडे ब्रिटिश अमदानींत पाश्चात्य पंडितांनीं त्यांना धर्माचें स्वरूप दिलें असावें. निराळा धर्म म्हटला कीं निराळी संस्कृति आली. जैन व बौद्ध संप्रदायांमध्यें निराळी संस्कृति दिसत नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आणि जरी आपण त्यांस निराळ्या संस्कृति असें मानलें तरीहि त्यांची १२ व्या शतकाअगोदर एकसूत्रता दिसत होती. त्याला कारण निरनिराळ्या विचारांच्या किंवा धर्मांच्या लोकांचें हिंदुस्थानांतील निरनिराळ्या भागांतील परिभ्रमण हें वर सांगितलेंच आहे. तक्षशिलेचे आचार्य अयोध्येला जात व काञ्चीचे आचार्य नालंदा किंवा सिंहलद्वीपाला जात[1]. हें निरनिराळ्या आचार्यांचें दळणवळण सतत चालू असल्यानें प्रत्येक विद्यापीठांतील हजारों विद्यार्थ्यांचा संबंध या निरनिराळ्या संस्कृतींशीं, विशेषत: बौद्ध किंवा वैदिक संस्कृतीशीं, येऊं लागला. असे आचार्य लहान लहान गांवांतूनसुद्धां जात असल्यानें सर्व ठिकाणीं एक संस्कृति दिसूं लागली.

भारतीय संस्कृतीचें सूत्रचालकत्व

हा एकसूत्रीपणा साधण्याला आणखी एक कारण झालें. अखिल भारताच्या संस्कृतीचीं सूत्रें भारताच्या चारहि दिशांना असणाऱ्या तक्षशिला, वलभी, काञ्ची व नालंदा या विद्यापीठांच्या हातीं असल्यानें व या विद्यापीठांचा व अंतर्गत हजारों इतर विद्यापीठांचा एकसारखा संबंध येत असल्यानें, येथील आचार्यांच्या शिकवणीचा परिणाम भारताच्या एकंदर रहिवाशांवर होणें साहजिक व अपरिहार्य होतें. या विद्यापीठांपैकीं तक्षशिला, नालंदा व वलभी यांच्यासंबंधानें माहिती अगाऊ देण्यांत आली आहे. या प्रकरणांत दक्षिणेकडचें अत्यंत प्रभावी विद्यापीठ जें काञ्ची त्यासंबंधानें जी माहिती आपणांस आज उपलब्ध होऊं शकते ती देण्याचा विचार आहे.

काञ्ची विद्यापीठाचा स्थलनिर्णय

'काञ्ची' आज 'काञ्जीवरम्' या नांवानें ओळखली जाते, व 'काञ्जीवरम्' हें 'काञ्चीपुरम्' चें अपभ्रष्ट रूप आहे. हिंदुस्थानांत प्राचीन कालापासून जीं सात शहरें मोक्षदायक म्हणून प्रसिद्ध आहेत त्यांत काञ्ची हें एक होतें. धर्माप्रमाणें विद्येकरितांहि काञ्ची दोन हजार वर्षांपूर्वीपासून प्रसिद्ध आहे. उत्तरेला काशी त्याप्रमाणें दक्षिणेला काञ्ची.

---

१. Dr. R. C. Majumdar and Dr. A. S. Altekar : New History of Indian People, Vol. VI, p. 5.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हें शहर मद्रास इलाख्यांत 'साऊथ इंडियन् रेल्वे'च्या चिंगलपट-आर्कोनम् फांट्यावर असून मद्रास शहराच्या कांहींशा खालच्या अंगाला उ. अ. १२४°.५ व पू. रे. ७९°.४५ च्या जवळपास दिसेल.

या शहराचें प्राचीन काळचें महत्त्व

या शहराचा उल्लेख फार प्राचीन कालापासून निरनिराळ्या प्रसंगानें आल्यानें त्याचें प्राचीन कालापासून केवढें महत्त्व होतें हें दिसून येतें. ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकांत पतञ्जलीच्या महाभाष्यांत काञ्चीचा उल्लेख येतो. महावंशांत काञ्चीपर्यंत अशोकाचे धर्मोपदेशक असल्याचें नमूद केलें आहे. तामीळ महाकाव्य 'मणिमेख-लाई' यांतहि काञ्चीचा उल्लेख येतो[२]. समुद्रगुप्ताच्या चौथ्या शतकांतील अलाहाबाद येथील स्तंभलेखांत काञ्चीचा उल्लेख आहे व हुएनत्संग व फा–हायेन या चिनी प्रवाशांनीं काञ्चीचा उल्लेख गौरवपूर्ण केला आहे. काकुत्स्थवर्म्याच्या तालगुण्ड स्तंभ-लेखांत काञ्चीला 'पल्लवेन्द्रपुरी' म्हटलें आहे[३]. जवळ जवळ दीडहजार वर्षांपर्यंत म्हणजे इ. स. पूर्व १ ल्या शतकापासून १३ व्या शतकापर्यंत बौद्ध व जैन संस्कृति पसरविण्याचें दक्षिणेकडील केंद्रस्थान काञ्ची होतें.

बौद्ध व जैन धर्म व संस्कृतीचा अखिल हिंदुस्थानांत प्रचार

या कालांत जैन व बौद्ध संस्कृतीचा व धर्माचा फैलाव सर्व भरतखंडभर झालेला दृष्टीस पडतो. 'संस्कृति' म्हणण्याचा उद्देश वैदिक विचार व आचार आणि जैन किंवा बौद्ध विचार व आचार यांच्या बाबतींत कांहीं कांहीं दृष्टीनें स्पष्ट फरक दिसून येतो हें नजरेस आणणें हा आहे. या कालांत आपण कोठल्याहि ठिकाणीं गेलों असतां आपणास विहार, स्तूप, चैत्य वगैरे पहावयास मिळत; बुद्धाच्या मूर्ति दिसत; बुद्धाच्या आयुष्यांतील प्रसंग चितारलेले किंवा कोरलेले दिसत; निरनिराळ्या ठिकाणीं जैनसूरि, श्रमणक किंवा बौद्ध भिक्षु आढळत. या बौद्ध पंडितांची तर कीर्ति त्यांच्या गांवापुरती न राहतां दूर असणाऱ्या परप्रांतीं पसरलेली दिसे

२. म. ज्ञा. को. वि.–१०.

३. E. I. VIII, p. 32; also R. Sathiana Thaier : Studies in the History of Ancient Tondamandalam, p. 48.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व कोणालाहि मिळाला नाहीं इतका मान त्यांना मिळे. वायव्य सरहद्दीवरील तक्षशिला व तिच्याहि पलीकडे, पूर्व देशांत आसाम व त्याच्याहि पलीकडे, उत्तरेस थेट चीनपर्यंत व दक्षिणेस सिलोन, जावा-सुमात्रा या बेटापर्यंत व पश्चिमेस द्वारकेपर्यंत या दोनहि धर्मांनीं आपली छाप लोकांवर पाडलेली होती. कनोज, काशी, मिथिला, राजगृह, कपिलवस्तु, श्रावस्ती, कौशाम्बी, उज्जैन, सर्व मध्य हिंदुस्थान, महाराष्ट्रांतील विशेषतः भाजा, कुडा, भेडसा, जुन्नर, कान्हेरी, कऱ्हाड, अजंठा, वेरूळ, नागार्जुनकुण्ड, काञ्ची, मदुरा वगैरे सर्वच ठिकाणीं विहारच विहार, स्तूपच स्तूप दृष्टीस पडत. शिवाय अशोक, समुद्रगुप्त, मैत्रक वगैरे राजश्रेष्ठांनीं, अनाथपिण्डकासारख्या श्रेष्ठीपुत्रांनीं, त्याचप्रमाणें सुतार, लोहार, माळी वगैरे ज्ञानाच्या बाबतींत अगदीं खालच्या थरावर असलेल्या लोकांनीं या धर्मप्रसाराला जी मदत केली ती अपूर्वच म्हटली पाहिजे. अशा प्रकारें हा धर्मप्रचार होत असतांना पूर्वीपासून प्रसिद्ध अशीं काञ्चीसारखीं शहरें या नवीन व भिन्न संस्कृतीपासून दूर कशीं राहूं शकतील ?

वैदिक धर्म मागें कां पडला ?

बौद्ध धर्माचा प्रसार होण्यापूर्वी येथें वैदिक धर्माची परंपरा रूढ असण्याचा संभव आहे. बौद्ध धर्माचा जास्त व जोराचा प्रसार वाकाटक-गुप्त युगाच्या मध्यास झाला असें मानण्यांत येतें.[४] या अगोदर येथें वैदिक धर्माच्याच पाठशाला, आश्रम किंवा मठ असण्याचा संभव आहे. बौद्ध व जैन धर्मपद्धति किंवा शिक्षणपद्धति आणि वैदिक धर्मपद्धति किंवा शिक्षणपद्धति यांत एक फारच मोठा व महत्त्वाचा फरक दिसून येतो. तो म्हणजे वैदिक पद्धतींत प्रत्येक आचार्याचा निराळा मठ किंवा आश्रम असे, व तेथें मुख्य आचार्य आपल्या शिष्यांना शिकवीत असत. प्रत्येक आश्रमांत किंवा मठांत विद्यार्थ्यांची संख्याहि ठराविकच असे; व प्रत्येक आश्रमाचा संबंध स्वतः-पुरता केंद्रित झालेला असे. याच्या उलट बौद्ध-जैन धर्मसंस्कृतीची पद्धत. यांच्या विहारांत निरनिराळ्या विषयांत पारंगत असे निरनिराळे आचार्य एकत्र रहात व त्यांच्यांत एकसूत्रीपणा असे. विद्यार्थ्यांची संख्याहि ठराविक नसून हजारोंनीं असे. तक्षशिला-नालंदासारख्या ठिकाणीं दहा-दहा हजार विद्यार्थी एका वेळीं असत.

४. Dr. R. C. Majumadar and Dr. A. S. Altekar : New History of Indian People, Vol. VI, p. 389.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या सर्वांची व्यवस्थाहि एकसूत्रीपणानें बद्ध असल्यानें तक्षशिलेसारखीं विद्यापीठें एक हजार वर्षांवर व नालंदासारखीं विद्यापीठें आठशें वर्षांवर बिनबोभाट चाललीं. वैदिक विचारांच्या एकाहि विद्यापीठाचें असें उदाहरण दाखवितां येणार नाहीं. शिवाय वैदिक विचारांचीं विद्यापीठें संकुचित विचारांचीं असत. वेदादि विषयां-पलीकडे शिक्षणाचे विषयहि नसत. वैदिक वृत्तीचे लोक वाढविण्यापेक्षां कमी करण्याकडेच त्यांचा कल. याच्या उलट गोष्ट बौद्ध व जैन विचारांच्या विद्यापीठांची. येथें कोणत्याहि विचारप्रवृत्तीचे विद्यार्थी येवोत, त्यांना प्रवेश मिळे; मग ते वेदादि विषय शिकण्यास येवोत किंवा जादूटोणा शिकण्यास येवोत; ते ब्राह्मण जातीचे असोत किंवा शूद्र असोत. त्यांना नुसता प्रवेशच मिळत असे असें नसून त्यांच्याशीं सर्व विद्यार्थ्यांचें वागणेंहि सारखें असे. शिकविण्याचे विषयहि कितीतरी निराळे! येथें बौद्ध, जैन व वेदविषयक ग्रंथ अभ्यासिले जात, त्याचप्रमाणें ऐहिक जीवनाला उपयोगी असे इतर विषयहि शिकविले जात. बौद्ध विद्यापीठांतून एकंदर १८ कला व जैन विद्यापीठांतून ७२ विद्या शिकविल्या जात. याशिवाय स्त्रियांकरितां ६४ कला असत हें निराळेंच. इतके विषय शिकविण्याची व्यवस्था कोणत्याहि वैदिक विद्यापीठांत असल्याचा उल्लेख नाहीं.

काञ्ची येथील 'घटिका' विद्यापीठें

दक्षिणेंत जैन व बौद्ध धर्मप्रसार होण्यापूर्वी वैदिक धर्मपरंपरेच्या शाळा असाव्यात. काञ्ची येथील विद्यापीठांना 'मठ' किंवा 'आश्रम' न म्हणतां 'घटिका' म्हणत. या घटिकेमध्यें एकादा विद्वान् गुरु शिक्षणाचें कार्य सुरू करी. अशा घटिकांना राजांकडून जमिनी मिळत व त्यांवर कोणत्याहि प्रकारचा कर आकारला जात नसे. अशाच प्रकारच्या वैदिक परंपरेच्या शाळा सर्व हिंदुस्थानभर पसरलेल्या होत्या व त्या वैदिक धर्मप्रचाराचें कार्य करीत होत्या. पण बौद्ध व जैन धर्मांच्या आचार्यांनीं आपापल्या धर्माचा प्रसार करण्याचा जो प्रयत्न केला त्यामुळें वैदिक धर्मपरंपरा सोडून बहुजनसमाज बौद्ध धर्माकडे व जैन धर्माकडे झुकूं लागला.

घटिकासंबंधानें अगदीं प्राचीन उल्लेख आपणांस काकुत्स्थवर्म्याच्या ताल-गुण्ड स्तंभावरील लेखांत आढळून येतो. कदंबकुळाच्या भरभराटीस कारणीभूत असणारा मौर्यशर्मा (मयूरशर्मा) काञ्ची येथील घटिकेंत वेदादि विषय शिकण्या-करितां गेला असें त्यांत म्हटलें आहे. येथील घटिका फार प्राचीन कालापासून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रसिद्ध असून पश्चिमेकडील क्षत्रपांचें तिला आर्थिक सहाय्य होतें. या घटिकांमधून अत्यंत उच्च प्रकारचें शिक्षण देण्यांत येई. येथें विद्वान् आचार्य व शिष्य यांच्यांत वाद चालत व तत्त्वबोध होई. येथें शिक्षणाचा दर्जा इतका उच्च प्रकारचा होता कीं पूर्ण ज्ञानी असे पंडितसुद्धां येथें आल्यावर विनम्रपणें वागत व येथें मिळणाऱ्या ज्ञानकणांचा अधाशीपणानें स्वीकार करीत. अशा प्रकारच्या घटिकांसंबंधानें उल्लेख निरनिराळ्या लेखांतून आढळून येतात[५].

दक्षिणेंत बौद्ध व जैन धर्मांचा प्रसार

बौद्ध व जैन धर्मांचा प्रवेश व फैलाव आंध्र देशांत होण्यास फारसा त्रास झाला नसला पाहिजे. कारण धर्मप्रसाराला जीं जीं कारणें लागतात तीं येथें सज्ज होतीं. धर्मप्रसार करणाऱ्या आचार्यांची विद्वत्ता, त्याचें शील, त्याचा त्याग व त्यांतूनहि दुसऱ्याचें बरें करण्याची इच्छा धर्मगुरूमध्यें असली तर धर्मप्रचाराचें कार्य सुकर होतें. पण विशेषतः धर्माचा प्रसार करण्याला जर कोणी जास्त कारणीभूत होत असेल तर ते व्यापारी. त्यांचा पैसा निरनिराळ्या मार्गांनीं आलेला असल्यामुळें त्यांच्या मनाला पूर्ण स्वास्थ्य नसतें. धर्माच्या नांवाखालीं त्यांना कित्येक गोष्टी झांकतां येतात. या व्यापाऱ्यांप्रमाणेंच राजे लोक व त्यांचे अधिकारीहि त्या धर्मगुरूंच्या मागें लागतात व धर्माचा स्वीकार करतात. बौद्ध धर्म व जैन धर्म हे व्यापारीवर्गामुळें व राजे लोकांच्या मदतीमुळेंच जास्त प्रसार पावले हें त्या त्या धर्माचा इतिहास वाचून आपणांस कळतें. पण हे धर्म अगदीं खालच्या थराच्या लोकांपर्यंत गेले, त्याला कारण या धर्मांमध्यें विषमता नव्हती, भेदभाव नव्हता, धर्माचीं द्वारें कोणालाहि खुलीं होतीं हें होय. शिक्षण कोणालाहि नाकारण्यांत येत नव्हतें. या धर्मांत सद्गुणांचा परिपोष करणाऱ्या गोष्टी होत्या. 'पुराणांतलीं वांगीं पुराणांत' व घरचें वैयक्तिक आचरण व बाहेरचें सामाजिक आचरण भिन्न असणारे आचार्य नव्हते. शुद्ध आचरणाचें व धर्माचें शिक्षण देणारे गुरु, भिक्षु शुद्धाचरणी होते. ते अत्यंत विद्वान् होते. सर्व प्रकारच्या लोकांवर छाप पाडतां येण्याजोगा एकच गुण आहे; व तो म्हणजे

५. S. V. Venkateswar : Indian Culture Through The Ages, Vol. I, p. 243.

६. South Indian Inscriptions, II, pp. 349-356. "Kashakudi Plate of Nandivarma Pallava Malla."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सच्छील आचरण. बौद्ध व जैन आचार्य सच्छील होते; व जोंपर्यंत ते सच्छील होते तोंपर्यंत त्या धर्मांचा प्रभाव पडला. त्यांच्यांत विकृति सुरू झाली व हे धर्म मागें पडले. शिवाय 'गुणी गुणं वेत्ति' या न्यायानें काञ्चीचे लोक मूळचेच सद्गुणी, धाडसी, विश्वासू व पाहुणचारी असल्यानें या लोकांत काम करणें बौद्ध व जैन धर्मीयांना फारच सोपें गेलें असल्यास नवल नाहीं. यामुळें या धर्मांचा प्रसार या सर्व भागांत फारच जोरानें झाला.

काञ्ची शहराचें वैशिष्ट्य

काञ्ची शहर व्यापाराच्या दृष्टीनें फारच पुढारलेलें व त्यामुळें फारच समृद्ध. 'संगम' युगांत तर काञ्ची, मदुरा, उरेइयूर, वञ्जी वगैरे शहरें सर्व बाबतींत पुढें गेलेलीं. या शहरांच्या आजूबाजूला एक खंदक असे. नंतर उंच तट; रुंद रस्ते; बाजारपेठ गजबजलेली; मोठमोठे उंचवटे करून त्यावर बांधलेले मोठमोठे भव्य प्रासाद. अर्थात् कलाकुसरींना जर कोठें वाव असेल तर तो याच ठिकाणीं. येथेंच निरनिराळ्या संस्कृतींचा संगम व्हावयाचा व निरनिराळ्या तऱ्हा पहावयास मिळावयाच्या. या शहरांतून जिकडे तिकडे निरनिराळ्या रंगांचे व निरनिराळीं प्रतीकें दाखविणारे ध्वज फडकत असलेले दिसावयाचे. कित्येक ध्वज धर्मक्षेत्राचे प्रतीक, तर कित्येक मोटमोठ्या श्रेष्ठींच्या धनसंपत्तीचे प्रतीक. ख्यातनाम व विद्वान् आचार्यांचे प्रतीक म्हणूनहि कांहीं ध्वज फडकत. प्रत्येक ध्वज निरनिराळ्या रंगाचा व त्यावर कांहींतरी वैशिष्ट्य चितारलेलें[७].

काञ्चीचे विद्वान् आचार्य

तामीळ देशानें व विशेषतः काञ्चीनें जगाला मोठमोठाले आचार्य दिले आहेत, हें या नगरीचें एक दाखविण्याजोगें वैशिष्ट्य आहे. नागार्जुन, वात्स्यायन, बुद्धघोष, दिङ्नाग, धर्मपाल हीं नांवें भरतखण्डांत कोणाला माहीत नाहींत? यांचे ग्रंथ कदाचित् नाहींसे झाले असतील, पण यांची कीर्ति नाहींशी होणार नाहीं.

सुप्रसिद्ध बौद्धधर्माचार्य नागार्जुन हे कनिष्काचे समकालीन; म्हणजे हे इ. स. पूर्व दुसऱ्या शतकांत होऊन गेले. चिनी तिपिटकांत यांनीं २४ ग्रंथ लिहिले म्हणून

७. Dr. R. C. Majumdar and Dr. A. S. Altekar : New History of Indian People, Vol. VI.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सांगितलें आहे. यांच्या बहुतेक ग्रंथांचीं चिनी भाषेंत भाषांतरें झालीं आहेत. यांनीं महायान पंथाचा पुरस्कार केला असून यांना बौद्ध ग्रंथांचें ज्ञान नागराजाकडून पाताळांत मिळालें अशी दंतकथा आहे. भारतीय रसायनशास्त्रांतील सुद्धां हे एक मोठे शोधक होते. बुद्धाइतका यांना मान मिळे. हिंदुस्थानचा ॲरिस्टॉटल म्हणून यांना संबोधण्यांत येतें. नागार्जुन काञ्ची येथें राहिले व त्यांनीं तामीळ देशांत धर्माचा प्रचार केला. नंतर हे नालंदा येथें गेले.

प्रसिद्ध बौद्ध पंडित बुद्धघोष यांचा तामीळ देशाशीं फारच संबंध आला. हे काञ्ची येथें राहिल्याचा त्यांनीं उल्लेख केला आहे. हेच बुद्धघोष सिंहलद्वीपांत गेले व त्यांनीं तेथें धर्मप्रसार करून क्रांति घडवून आणली. त्यांनीं बौद्ध धर्मशास्त्रावर भाष्य लिहिलें आहे. अनुराधपुरांत ज्या ठिकाणीं पवित्र महिंदवृक्ष आहे त्या ठिकाणीं त्यांनीं 'विसुद्धिमग्ग' नांवाचा ग्रंथ लिहिला. हे इ. सनाच्या पांचव्या शतकांत होऊन गेले.

वात्स्यायन हे काञ्चींतील प्रसिद्ध पंडित. यांनीं ४ थ्या शतकाच्या उत्तरार्धांत 'न्यायभाष्य' नांवाची अत्यंत प्रख्यात अशी टीका लिहिली. त्या तोडीची आजतागायत एकहि टीका झाली नाहीं. याच 'न्यायभाष्या'वर पुढें सातव्या शतकाच्या सुमारास उद्योतकरानें टीका लिहिली.

वसुबंधूनें बौद्ध विचाराचा न्यायग्रंथ दुसऱ्या शतकानंतर लिहिला व तेव्हांपासून न्यायशास्त्राचा विशिष्ट पद्धतीनें अभ्यास होऊं लागला. हा वसुबंधु तक्षशिलेचा. हा पुढें मगध देशांत गेला व तेथें त्यानें धर्मप्रचार केला. नालंदा येथील हा प्रसिद्ध पंडित होता. या वसुबंधूच्या न्यायशास्त्राची वाढ काञ्ची विद्यापीठांतील दिङ्नागानें केली. दिङ्नाग चौथ्या शतकाच्या शेवटीं शेवटीं काञ्चींत प्रसिद्धीस आला. दिङ्नागानें हिंदु न्यायपद्धतीवर जोराची टीका केल्यानें उद्योतकर, कुमारिल वगैरेनीं नंतरच्या कालांत दिङ्नागावर सडकून टीका केली. यामुळें न्यायशास्त्रावरील मतांचे दोन भिन्न व विरुद्ध प्रवाह वाहूं लागले. तरी पण दिङ्नाग हा विचारी तार्किकांत श्रेष्ठ होता याबद्दल वादच नाहीं. त्यानें 'प्रमाणसमुच्चय' वगैरे बरेच ग्रंथ लिहिले; पण त्यांपैकीं आज एकहि ग्रंथ आपल्या देशांत उपलब्ध नाहीं ही किती आश्चर्याची व दुःखाची गोष्ट आहे! 'न्यायमुख' नांवाचा त्याचा एकच ग्रंथ आज मिळाला आहे व तोहि चिनी व तिबेटी भाषेंतून भाषांतरित झालेला!

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मेघदूतांत याच दिङ्नागाचा उल्लेख कालिदासानें जरा तुच्छतेनें केला आहे असा समज आहे.

नालंदाच्या कीर्तीत भर घालणारा प्रसिद्ध बौद्ध पंडित धर्मपाल हाहि काञ्चीचाच. हुएनत्संगानें नालंदाच्या भाग्यनिर्मात्या पंडितांची एक यादी दिली आहे. त्यांत धर्मपालाचें पहिलें नांव आहे. हा एका वेळीं नालंदाचा अध्यक्ष होता; व नालंदाची सर्व सूत्रें त्याच्यावांचून हालत नसत. काञ्चीचे विद्वान् पुरुष बाहेरसुद्धां श्रेष्ठ म्हणून समजले जात हीच काञ्चीची प्रतिष्ठा; यांतच काञ्चीचें वैभव.

नागार्जुन इ. स. पूर्व दुसऱ्या शतकांत, वात्स्यायन इ. स. च्या ४ थ्या शतकांत, बुद्धघोष व दिङ्नाग ५ व्या शतकांत व धर्मपाल ६ व्या शतकांत होऊन गेले. यावरून एकच गोष्ट दिसते ती ही कीं प्रत्येक शतकांत कोणी ना कोणी प्रसिद्ध असा विद्वान् व कार्यक्षम पुरुष काञ्चीनें पुरविला. एकाद्या संस्थेची, शहराची किंवा राज्याची सतत शेंकडों वर्षें एकसारखी भरभराट होणें ही क्वचितच दृष्टीस पडणारी गोष्ट आहे. पण काञ्ची येथें ही गोष्ट घडली, हीच काञ्चीपुरच्या 'मोक्षदायकत्वा'ची साक्ष आहे.

काञ्ची महायान पंथीय

बौद्ध धर्माचा प्रचार बरींच शतकें सुरू असतांना त्यांत दोन पंथ निर्माण झाले. एक महायान व दुसरा हीनयान. प्रत्येक पंथाचे निरनिराळे विहार निघूं लागले. विक्रमशिला हीनयान पंथाची शिकवण देणारें एक प्रसिद्ध विद्यापीठ झालें. काञ्ची येथें महायान पंथाची शिकवण दिली जाई. हीनयान पंथांत तंत्रविद्या जास्त जास्त विकृत स्वरूप धारण करूं लागली व बौद्ध धर्माला उतरती कळा लागली.

काञ्ची व स्थापत्यकला

काञ्ची विद्यापीठ व सर्व तामीळ भाग हा फार प्राचीन कालापासून स्थापत्यकलेकरितां प्रसिद्ध आहे. बौद्ध, जैन, हिंदु व द्रविड या चारहि प्रकारची भव्य व नाजूक शिल्पकला येथें पहावयास मिळते. या भागांत स्थापत्यकलेचे व विशेषतः शिल्पकलेचे जे उत्कृष्ट नमुने आहेत ते पाहून आजचे पाश्चात्य स्थापत्यकलाविशारद तोंडांत बोटें घालून थक्क होतात. हें कसें साधलें असेल, राक्षसांनाच योग्य असें अवाढव्य कांम व त्यावर अत्यंत नाजुकांतलें नाजुक असें कलाकुसरीचें काम कसें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केलें असेल, म्हणून त्यांना कोडें पडणें साहजिक आहे. शहरांच्या रेखीव बांधणी-संबंधानें वर उल्लेख आलाच आहे. पण अमरावती, नागार्जुनकुण्ड, गणेशरथ, कैलासनाथ, मामल्लपुरम्, मुक्तेश्वर, कामाक्षी वगैरे देवळें पाहिलीं म्हणजे स्थापत्य-कलेनें केवढें वरचें शिखर गांठलें होतें हें दिसून येईल. काञ्ची येथील एकांबरेश्वराचें देऊळ इतकें मोठें आहे कीं त्याच्या तोडीचें दुसरें देऊळ साऱ्या हिंदुस्थानांत कोठें नाहीं.

पण हिंदुस्थानांत स्थापत्यकलेची वाढ फारच प्राचीन कालापासून झाली असून निरनिराळ्या काळीं तिच्यांत वैशिष्ट्य प्राप्त झालें व कलेमध्यें आणखी प्रगति होत गेली. इतिहासास माहीत असलेला हा काल म्हणजे मोहेंजो-दडो व हरप्पाचा काल मानण्यांत येतो. याला सुरवात इ. स. पूर्वी २७,०० वर्षांपासून साधारणतः मोजली जाते.[८] वरील दोनहि भागांतील स्थापत्यकला आजसुद्धां वाखाणण्याजोगी आहे. पण मौर्य कालाची स्थापत्यकला, गांधार शिल्पकला, गुप्त कालची शिल्पकला, अमरा-वतीची शिल्पकला, पल्लवाच्या वेळची दक्षिण हिंदुस्थानांतील शिल्पकला हे या कलेचे स्पष्टपणें दाखविण्याजोगे टप्पे आहेत; व प्रत्येकांत कांहीं कांहीं विशिष्ट गोष्टी साधल्या आहेत. एक दगडी उंच स्तंभ व त्यावरील कलाकुसरीचें काम मौर्य कालचें वैशिष्ट्य आहे. स्थापत्यकलेचें उत्तम व परिपूर्ण ज्ञान असल्याशिवाय इतकें उत्कृष्ट काम होऊंच शकणार नाहीं. स्तंभ तयार करण्याचें काम अप्रतिम; पण त्यावर कोरलेलीं चित्रें पाहिलीं म्हणजे स्तंभाचें काम यापुढें अगदीं फिकें पडतें. सारनाथचा स्तंभ या कलेचा उत्कृष्ट नमुना आहे.

तक्षशिलेच्या अवशेषांत गांधार शिल्पकला पहावयास मिळते. यांत बुद्धाचें चरित्र कोरलेलें दिसेल. या कलेंतील वैशिष्ट्य म्हणजे शरीराची विशिष्ट ठेवण. शरीर सुंदर, नैसर्गिक व आकर्षक जितकें दाखवितां येईल तितकें दाखविण्याचा प्रयत्न या कलेंत केला गेला आहे. या कलेचा उगम ग्रीक संस्कृतींत झालेला असावा. या कलेंत ग्रीक कला व हिंदी संस्कृति यांचें मिश्रण आहे; पण या कलेंत ग्रीक संस्कृतीचें ठाणें कायमचें बसूं शकलें नाहीं ही लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट आहे.

---

८. Dr. R. C. Majumdar, Dr. H. C. Raychaudhari, Dr. Kalikinkar Datta : An Advanced History of India, p. 228.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गुप्त कालची शिल्पकला इ. स. च्या सहाव्या शतकापर्यंतच्या कालांतील उत्तर व मध्य हिंदुस्थानांतील कला होय. बारहूतचें शिल्पकाम, मथुरा व गांधार शिल्पकाम, सांचीचे स्तूप हे या कलेचे उत्कृष्ट नमुने देतां येतील. नुसतें बारहूत, सांची, अमरावती व नागार्जुन कुण्ड येथील अवशेष म्हणून सांपडलेले नुसत्या कटड्यांचे नमुने पाहिले तरी मन थक्क होऊन जातें; मग ते पूर्ण तयार व अभंग स्थितींत ज्यांना पहावयास मिळाले असतील त्यांना तें पाहून काय वाटलें असेल? मथुरेचे कोरीव पुतळेहि याच नमुन्याचे आहेत.

कृष्णा नदीच्या मुखाजवळ अमरावती, जगय्यापेट, नागार्जुन कुण्ड येथील अवशेष विशिष्ट प्रकारची शिल्पकला दाखवितात. येथील कटड्यांचे अवशेष शिल्पकलेचे उत्कृष्ट नमुने म्हणून लंडन येथील ब्रिटिश म्युझियममध्यें ठेवण्यांत आले आहेत. सडपातळ शरीर, आनंदी मुद्रा, अनुकरण करण्यास अत्यंत कठीण अशी उभें रहाण्याची ढब, वगैरेमुळें कोरलेल्या आकृति अत्यंत प्रेक्षणीय वाटतात. शिल्पकलेची केवढी मजल याकाळीं विद्वान् कारागिरांनीं गांठली असेल याचा विचारच करतां येत नाहीं. वेली, पानें, कमळें यांतसुद्धां कला रेलचेल भरली आहे. इ. स. पू. २०० ते इ. स. ४०० पर्यंतच्या कालांत एका खडकांतून निरनिराळीं लेणीं कोरलीं गेलीं. कार्ल्याचीं लेणीं यांचा उत्कृष्ट नमुना आहे.

पण काञ्ची येथील कला सर्वांत प्राचीन असावी. आज अत्यंत प्राचीन अवशेष सांपडणार नाहींत. कदाचित् तें काम लांकडावर झालें असेल. पण आज जें कोरींव व इतर काम पहावयास मिळतें त्याच्यामागें हजारों वर्षांची नाहीं तरी शेंकडों वर्षांची तपश्चर्या असलीच पाहिजे.

काञ्चीची आजची शिल्पकला म्हणजे पल्लवांच्या वेळची दक्षिण हिंदुस्थानांतील शिल्पकला. या कलेचा प्रभाव सर्व दक्षिण हिंदुस्थान व जावा वगैरे दूरदूरच्या बेटांत पसरलेला दिसून येईल. या कलेला द्रविड शिल्पकला म्हणून म्हणतात. काञ्चीचीं देवळें, मामल्लपुरम् येथील रथ, किंवा बौद्ध देवळें या कलेचे नमुने. हीं देवळें एका दगडांतून किंवा खडकांतून कोरलेलीं आहेत. निरनिराळे दगड सांधलेले सांपडणार नाहींत. नुसतें तंजावरचें प्रसिद्ध देऊळ घेतलें तरी या देवळाच्या शिखरालाच १४ मजले सांपडतील. त्याची उंची १९० फूट असून सर्वांच्या वरतीं टोकाला एक अखंड दगडाचा मोठा घुमट बसविला आहे. हा घुमट इतक्या उंच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कसा चढविला असेल हें आधुनिक इंजिनिअरांना पडणारें एक मोठें कोडें आहे. शिवाय अगदीं पायथ्यापासून वरच्या टोंकापर्यंत उत्कृष्ट प्रकारचें कोरींव काम चितारलेलें. हीं सर्व द्रविड शिल्पकलेचीं कामें राक्षसांच्या शक्तीनें तयार केलेलीं असून अत्यंत नाजुक व हलक्या हाताच्या कलेनें कोरलेलीं आहेत. ठराविक प्रकारचीं शिखरें हें यांचें वैशिष्ट्य आहे.

इतकें उत्तम कलाकुसरीचें काम येथें कां होऊं शकलें ? याला एक महत्त्वाचें कारण वर दिलेंच आहे. तें म्हणजे पल्लव राजांच्या वेळीं व तत्पूर्वीहि हें शहर व्यापाराच्या दृष्टीनें फारच भरभराटीस आलें होतें. कलाकुसरीला श्रीमंत लोकांकडूनच आश्रय मिळतो. हा आश्रय जसजसा जास्त मिळूं लागतो तसतशीं चांगलीं चांगलीं कलाकुसरीचीं कामें दृष्टीस पडूं लागतात. कितीहि अवघड व भयंकर काम हातीं घेतलें तरी त्याचें चीज होईल याची खात्री असते. ती कला शिकविणारे आचार्यहि उत्पन्न होतात. अशाप्रकारचे आचार्य काञ्चीपुरम् विद्यापीठांत व या भागांतील इतर विद्यापीठांत होऊन गेले असणार. स्थापत्यकला ही या भागांत विशेषेंकरून शिकविली जात असावी. विशेषतः घरें, देवळें, विहार, चैत्य वगैरे कसे बांधावेत, त्यांत कोणकोणत्या कलेचा समावेश करावा, त्यावरील कोणत्या गोष्टी साधल्यानें त्यांचें अखंडित्व कायम राहील हें शिकविलें जात असावें. त्या वेळचीं कामें आजसुद्धां कौतुकास्पद वाटतात; व आजहि आपण तीं कशीं साधलीं असतील याचा विचार मनांत आल्यावर आश्चर्यानें दिङ्मूढ होतों व मुक्तकंठानें त्यांची स्तुति करतों.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१४ : मदुरा विद्यापीठ*

[काल : इ. स. पूर्व ५ वें शतक]

मदुरा–प्राचीन संस्कृतीचें केंद्र

रानटी मनुष्य किंवा कोपलेला निसर्ग या दोहोंच्या कचाट्यांतून बहुंशीं सहीसलामत निसटलेलीं व प्राचीन वैभवाच्या खाणाखुणा पटवून देणारीं जीं अगदीं थोडीं ठिकाणें हिंदुस्थानांत शिल्लक आहेत त्यांत दक्षिणेंतील मदुरेइतकें प्रसिद्धि पावलेलें दुसरें ठिकाण सांपडणार नाहीं. अडीच हजार वर्षांपूर्वी व्यापार व शिक्षण यांकरितां नुसत्या हिंदुस्थानांतच नव्हे तर युरोपखंडातसुद्धां प्रसिद्ध असलेलें तामीळ देशांतील हें प्राचीन शहर उ. अ. १०° व पू. रे. ७८° च्या जवळच नकाशांत पहावयास मिळेल. वाईगाई नदीच्या अतिसंपन्न खोऱ्यांत हें शहर वसलें असूनसुद्धां मुसलमान आक्रमकांनीं या नगरीचा विध्वंस केला नाहीं ही एक आश्चर्याची गोष्ट आहे. अडीच हजार वर्षांपूर्वी हें स्थान द्रविड संस्कृतीचें आगर होतें. नाग लोक व द्रविड संस्कृति यांचा अगदीं निकटचा संबंध दाखविण्यांत येतो. या नागपूजेचा अवशेष आजसुद्धां मदुरेंत पहावयास मिळेल. द्रविडांचा मुख्य देव श्रीशंकर याचीं तर सुंदर देवालयें येथें प्राचीन कालापासून प्रसिद्ध आहेत. या नगरीच्या इतिहासरूपी नदींतून आजपासून अडीच हजार वर्षें मागें आतां आपणांस जावयाचें आहे.

मदुरेसंबंधानें प्राचीन उल्लेख

फार फार प्राचीन काळीं येथें पाण्ड्य राजे राज्य करीत होते. इ. स. पूर्व पांचव्या शतकांत मदुरेच्या पाण्ड्य राजाचा जांवई विजय हा सिंहलद्वीपाचा पहिला राजा झाला, म्हणून महावंशांत उल्लेख सांपडतो. मदुरेसंबंधानें हा सर्वांत प्राचीनतम उल्लेख होय. मदुरेच्या प्राचीन वैभवासंबंधींचा हाच पहिला ऐतिहासिक पुरावा. इ. स. पूर्व

* J. P. Las Rado Shenoy : Madura–The Temple City (1937).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कसा चढविला असेल हें आधुनिक इंजिनिअरांना पडणारें एक मोठें कोडें आहे. शिवाय अगदीं पायथ्यापासून वरच्या टोंकापर्यंत उत्कृष्ट प्रकारचें कोरींव काम चितारलेलें. हीं सर्व द्रविड शिल्पकलेचीं कामें राक्षसांच्या शक्तीनें तयार केलेलीं असून अत्यंत नाजुक व हलक्या हाताच्या कलेनें कोरलेलीं आहेत. ठराविक प्रकारचीं शिखरें हें यांचें वैशिष्ट्य आहे.

इतकें उत्तम कलाकुसरीचें काम येथें कां होऊं शकलें ? याला एक महत्वाचें कारण वर दिलेंच आहे. तें म्हणजे पल्लव राजांच्या वेळीं व तत्पूर्वींहि हें शहर व्यापाराच्या दृष्टीनें फारच भरभराटीस आलें होतें. कलाकुसरीला श्रीमंत लोकांकडूनच आश्रय मिळतो. हा आश्रय जसजसा जास्त मिळूं लागतो तसतशीं चांगलीं चांगलीं कलाकुसरीचीं कामें दृष्टीस पडूं लागतात. कितीहि अवघड व भयंकर काम हातीं घेतलें तरी त्याचें चीज होईल याची खात्री असते. ती कला शिकविणारे आचार्यहि उत्पन्न होतात. अशाप्रकारचे आचार्य काञ्चीपुरम् विद्यापीठांत व या भागांतील इतर विद्यापीठांत होऊन गेले असणार. स्थापत्यकला ही या भागांत विशेषेंकरून शिकविली जात असावी. विशेषतः घरें, देवळें, विहार, चैत्य वगैरे कसे बांधावेत, त्यांत कोणकोणत्या कलेचा समावेश करावा, त्यावरील कोणत्या गोष्टी साधल्यानें त्यांचें अखंडित्व कायम राहील हें शिकविलें जात असावें. त्या वेळचीं कामें आजसुद्धां कौतुकास्पद वाटतात; व आजहि आपण तीं कशीं साधलीं असतील याचा विचार मनांत आल्यावर आश्चर्यानें दिङ्मूढ होतों व मुक्तकंठानें त्यांची स्तुति करतों.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१४ : मदुरा विद्यापीठ*

[काल : इ. स. पूर्व ५ वें शतक]

मदुरा–प्राचीन संस्कृतीचें केंद्र

रानटी मनुष्य किंवा कोपलेला निसर्ग या दोहोंच्या कचाट्यांतून बहुंशीं सही-सलामत निसटलेलीं व प्राचीन वैभवाच्या खाणाखुणा पटवून देणारीं जीं अगदीं थोडीं ठिकाणें हिंदुस्थानांत शिल्लक आहेत त्यांत दक्षिणेंतील मदुरेइतकें प्रसिद्धि पावलेलें दुसरें ठिकाण सांपडणार नाहीं. अडीच हजार वर्षांपूर्वीं व्यापार व शिक्षण यांकरितां नुसत्या हिंदुस्थानांतच नव्हे तर युरोपखंडातसुद्धां प्रसिद्ध असलेलें तामीळ देशांतील हें प्राचीन शहर उ. अ. १०° व पू. रे. ७८° च्या जवळच नकाशांत पहावयास मिळेल. वाईगाई नदीच्या अतिसंपन्न खोऱ्यांत हें शहर वसलें असूनसुद्धां मुसलमान आक्रमकांनीं या नगरीचा विध्वंस केला नाहीं ही एक आश्चर्याची गोष्ट आहे. अडीच हजार वर्षांपूर्वीं हें स्थान द्रविड संस्कृतीचें आगर होतें. नाग लोक व द्रविड संस्कृति यांचा अगदीं निकटचा संबंध दाखविण्यांत येतो. या नागपूजेचा अवशेष आजसुद्धां मदुरेंत पहावयास मिळेल. द्रविडांचा मुख्य देव श्रीशंकर याचीं तर सुंदर देवालयें येथें प्राचीन कालापासून प्रसिद्ध आहेत. या नगरीच्या इतिहासरूपी नदींतून आजपासून अडीच हजार वर्षें मागें आतां आपणांस जावयाचें आहे.

मदुरेसंबंधानें प्राचीन उल्लेख

फार फार प्राचीन काळीं येथें पाण्ड्य राजे राज्य करीत होते. इ. स. पूर्व पांचव्या शतकांत मदुरेच्या पाण्ड्य राजाचा जांवई विजय हा सिंहलद्वीपाचा पहिला राजा झाला, म्हणून महावंशांत उल्लेख सांपडतो. मदुरेसंबंधानें हा सर्वांत प्राचीनतम उल्लेख होय. मदुरेच्या प्राचीन वैभवासंबंधींचा हाच पहिला ऐतिहासिक पुरावा. इ. स. पूर्व

---

* J. P. Las Rado Shenoy : Madura–The Temple City (1937).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चौथ्या शतकांत चंद्रगुप्ताच्या दरबारीं असलेल्या मेगॅस्थेनीस या ग्रीक वकिलानें मदुरेचा उल्लेख केला आहे. यावेळींहि पाण्ड्य राजे होते असें तो म्हणतो. ग्रीस व रोम या दोनहि ठिकाणीं त्या काळीं मदुरेची प्रसिद्धि होती व म्हणून युरोपांतील तत्कालीन नामवंत लेखकांनीं आपापल्या ग्रंथांतून मदुरेचा उल्लेख केला आहे. मदुरेचें प्राचीनतम महत्त्व व वैभव असल्याशिवाय तिच्यासंबंधानें असे उल्लेख अडीच हजार वर्षांपूर्वीं येणें शक्य नाहीं. भूमध्य समुद्र व हिंदुस्थान यांमधील व्यापाराचें मुख्य केंद्र म्हणून टोलेमी (Ptolemy) मदुरेचा उल्लेख करतो. मदुरेच्या जवळच 'ऑगस्टस'च्या वेळचीं (इ. स. पू. १ लें शतक) कांहीं रोमन नाणीं सांपडलीं आहेत, तीं वरील सर्व गोष्टींची साक्ष पटवीत आहेत.

मदुरा व तामीळसंगम

संगमयुगांतील जें वाङ्मय त्यांत तर मदुरेचा उल्लेख एकसारखा आला आहे. 'तामीळसंगम' म्हणजे या भागांतील शिक्षणाचें केंद्र. त्या तामीळसंगमाचा काळ दोन हजार वर्षांपूर्वींचा. त्यांचा आद्यकवि थिरुवल्लुवर. मदुरा हें थिरुवल्लु-वराचेंच म्हणून ओळखलें जातें. मदुरेच्या या विद्वत्सभेची किती ख्याति होती हें एका उदाहरणावरून समजण्याजोगें आहे. तामीळसंगम ही मूळची ४८ विद्वान् लोकांची विद्वत्सभा. या ४८ विद्वान् लोकांबद्दल निरनिराळ्या दंतकथा प्रचलित आहेत. जेव्हां एकाद्या व्यक्तीची व स्थलाची कीर्ति ठराविक सीमेचें उल्लंघन करते तेव्हांच तिच्याबद्दल दंतकथा पसरतात. यावरून या ४८ पंडितांची कीर्ति नेहमींच्या मर्यादा ओलांडून गेली होती हें निश्चित आहे. असें म्हणतात कीं ब्रह्मदेवानें सरस्वतीस एकदां शाप दिला व तिला मर्त्य लोकांत जन्म घ्यावा लागला. तेव्हां तिनें या ४८ पंडितांत आपला अंश घातला व ४८ रूपांत ती प्रकट झाली.

मदुरा व महाकवि थिरुवल्लुवर

दुसरी एक दंतकथा प्रचलित आहे. एकदां एका सोन्याच्या फळीवर कांहीं साधु बसले होते. तेथें थिरुवल्लुवर आला व त्यानें बसण्यास जागा द्यावी म्हणून साधूंना विनंति केली. त्याच्याजवळ त्याच्या काव्यग्रंथांचें मोठें ओझें होतें. ते साधू त्याला बसण्यास जागा देईनात. पण त्याच्या ग्रंथांचें ओझें मात्र त्यांनीं तेथें ठेवूं दिलें. परंतु ते ग्रंथ तेथें ठेवल्याबरोबर एकसारखे वाढूं लागले. शेवटीं परिणाम असा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाला कीं, त्या साधूंना ती फळी सोडावी लागली. अशा प्रकारें थिरुवल्लुवर याच्या काव्यग्रंथांनीं त्याला जागा मिळवून दिली.

या दोनहि दंतकथांवरून एकच गोष्ट सिद्ध होते व ती ही कीं विद्वत्तेच्या मानानें या ४८ पंडितांच्या तोडीचे त्या काळीं कोणीहि नव्हते, व त्यांनीं भरपूर ग्रंथसंपत्ति तयार करून ठेवली होती. सोन्याच्या फळीवरून साधूंनासुद्धां दूर करण्याची शक्ति या ग्रंथांत होती म्हणजे ते ग्रंथ सामान्य कवींच्या कृतींसारखे सामान्य नव्हते. साधूंना बाजूला सारून पंडितांना त्यांची जागा मिळवून देण्याचें सामर्थ्य त्यांच्या काव्यांतून होतें.

या तामीळसंगमाची जागा सुंदरेश्वर या प्रसिद्ध देवालयाच्या वायव्य दिशेस होती असें सांगण्यांत येतें. या तामीळसंगमानें एका वेळीं सर्व दक्षिण हिंदुस्थानांत शिक्षणाचें केवढें मोठें कार्य केलें असलें पाहिजे हें मदुरेच्या शैक्षणिक कीर्तीवरून व या ४८ पंडितांबद्दल प्रचलित असलेल्या दंतकथांवरून लक्षांत येण्याजोगें आहे. अशा पंडितांना पाण्ड्य राजांकडून मदत झाल्यास नवल नाहीं.

या तामीळसंगमाची कीर्ति इतकी पसरली होती कीं, आपल्या काव्याला या संगमानें मान्यता द्यावी असें प्रत्येक तामीळ कवीला वाटे. या संगमाची मान्यता म्हणजेच कवींच्या कवितेचें साफल्य अशी सर्वांची समजूत होती. म्हणून दक्षिणेंतील सर्व विद्वानांचा संबंध या संगमाशीं होता.

मदुरा व पाण्ड्य राजे

शिक्षणाकरितां मदत देण्याच्याच बाबतींत नव्हे तर प्रत्यक्ष शिक्षण घेण्याच्या बाबतींतहि हे पाण्ड्य राजे किती उत्साही असत हें कांहीं पाण्ड्य राजांच्या उदाहरणांवरून दाखवून देतां येईल. या संबंधांतसुद्धां दंतकथेचा भाग असल्यानें शिक्षणाच्या बाबतींत पाण्ड्य राजांची ख्याति होती हीच गोष्ट सिद्ध होते. स्थलपुराणांत राजशेखर पाण्ड्यासंबंधानें माहिती आहे. हा राजशेखर ६३ विद्येंत पारंगत होता म्हणून त्यांत म्हटलें आहे. पण याचा प्रतिस्पर्धी चोल घराण्यांतील कारिकाल चोल हा असून त्याला नृत्यकला ही चौसष्टावी विद्यासुद्धां अवगत होती. झालें. राजशेखरानें ही चौसष्टावी विद्या साध्य करण्याचें ठरविलें व तो नटराज जो शंकर त्याच्या मूर्तीसमोर नृत्याची कसरत करूं लागला. त्याचें नृत्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इतक्या तल्लीनतेनें चालू होतें कीं आपणाबरोबर शंकरसुद्धां एकसारखा नृत्य करीत आहे व त्याचा पायसुद्धां बदलला जात नाहीं ही गोष्ट त्याच्या लक्षांत आली नाहीं. शंकराचें नृत्य एकसारखें एका पायावर चालू होतें. पण शेवटीं जेव्हां ही गोष्ट त्याच्या नजरेस आली तेव्हां त्यानें सुंदरेश्वराची प्रार्थना केली व पाय बदलण्याची त्याला विनंति केली. सुंदरेश्वरानें तेव्हां कोठें आपला पाय बदलला. आजसुद्धां सुंदरेश्वराच्या मंदिरांत नटराजाच्या रूपांत शंकराची सुंदर मूर्ति पहावयास मिळते.

मदुरा व नृत्यकला

वरील दंतकथेवरून एकच गोष्ट नक्की होते व ती म्हणजे फार फार प्राचीन कालीं नृत्यकला ही दक्षिणेंत फारच प्रिय होती व राजेसुद्धां ती कला मन लावून आत्मसात् करण्याचा प्रयत्न करीत. नृत्य, संगीत व चित्रकला या शिक्षणांतील आवश्यक गोष्टी होत्या; व प्रत्यक्ष ईश्वरहि त्या कलेंत निपुण आहे असें दाखवून त्या कलेला उच्च स्थान प्राप्त करून दिलें होतें. पुढें हिंदुस्थानांतील बहुतेक भागांत ही कला मागें पडली व तिचा संबंध फक्त कलावंतिणींशीं लावण्यांत आला. पण मदुरेसारख्या ठिकाणीं या कलेची जोपासना फारच आस्थेनें होत होती. या नृत्यकलेवर प्राचीन काळीं किती तरी ग्रंथ होते व त्यांत अभिनयाचें सांगोपांग शास्त्र दिलेलें होतें.

स्थापत्य आणि शिल्पकला

दक्षिणेकडील विद्यापीठांतून व विशेषतः तामीळ विद्यापीठांतून आपणांस शिक्षणांतील दोन वैशिष्ट्यें पहावयास मिळतात. एक नृत्यकला व दुसरें शिल्पकला व स्थापत्यकला यांतील कलाकुसरीचीं अप्रतिम कामें. कलाकुसरीच्या कामाबद्दल उल्लेख काञ्ची विद्यापीठ या प्रकरणांत दिला आहेच. मदुरा येथील मीनाक्षी मंदिर व सुंदरेश्वर मंदिर हीं ज्यांनीं पाहिलीं आहेत त्यांना स्थापत्यकलेंतील कौशल्य म्हणजे काय याची कल्पना येईल. या स्थापत्यकलेबद्दल एका काळीं सर्व दक्षिण देश प्रसिद्ध होता. या संबंधानेंसुद्धां एक दंतकथा आहे. ही दंतकथा मदुरा शहराच्या नांवासंबंधानें आहे. असें म्हणतात कीं या शहराची उत्कृष्ट बांधणी व येथील सुंदर सुंदर इमारती पाहून शंकर प्रसन्न झाले व त्यांनीं या शहरावर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'मधु' म्हणजे 'अमृत' शिंपडलें व त्या वेळेपासून या शहराचें नांव 'मधुरा'—'मदुरा' असें पडलें. वरील दंतकथेवरून येथील उत्कृष्ट स्थापत्यकलेबद्दल कल्पना येते.

मदुरेंतील मीनाक्षी किंवा सुंदरेश्वर हीं मंदिरें द्रविड परंपरेवर बांधलेलीं आहेत. हीं देवळें पाहिल्यावर द्रविड स्थापत्यकला म्हणजे काय हें कळून येईल. ही स्थापत्यकला फार प्राचीन काळापासून सर्व हिंदुस्थानभर पसरलेली होती. असुर 'मय' हा या कलेचा आदर्श शिल्पकार समजण्यांत येतो. या मयाच्या कृती-संबंधानें माहिती महाभारतांत निरनिराळ्या प्रसंगानें आली आहे. या कलेंत भावना, कल्पना, जीवंतपणा वगैरे ओथंबलेले दिसतील. या कलेंत जीव असे, आत्मा असे. मयासुरानें तयार केलेल्या दरबारांत दुर्योधनाला ज्या ठिकाणीं जमीन होती त्या ठिकाणीं पाणी दिसलें व ज्या ठिकाणीं खरोखर पाणी होतें त्या ठिकाणीं दुर्योधन पाय ठेवण्यास गेला तेव्हां त्याचे कपडे ओले झाले असें महाभारतांत वर्णन आहे. मीनाक्षीचा प्रत्येक अवयव जीवंत दाखविला आहे. शरीराच्या प्रत्येक भागांत भावना, कल्पना ओतप्रोत भरलेल्या दिसतील. शरीराच्या प्रत्येक भागांत कला दिसून येते. प्रत्येक ठिकाणीं हें कलेचें नावीन्य दिसत असल्यानें तें पाहणाऱ्याला प्रत्येक वेळीं कांहीं तरी नवीन असेंच वाटतें. प्रत्येक क्षणाला जें नवीन नवीन भासतें तेथेंच सौंदर्य पहावयास मिळतें. भारतीय कला सूचक आहे, अनुकरणीय नाहीं; व म्हणूनच सुंदर आहे.

मुसल्मानांचा हात जरी सर्व मदुरा शहरावर फिरला नसला तरी तो मीनाक्षी देवळावरून फिरला. इ. स. १३१० सालीं मलिक कफुर यानें मूळचें देऊळ धुळीस मिळविलें. आज दिसणारें देऊळ हें नवीन बांधण्यांत आलें आहे; व तें पूर्वी-इतकेंच सुंदर करण्याचा प्रयत्न करण्यांत आला आहे. येथील सर्वांत दक्षिणेकडचा मनोरा १५२ फूट उंच आहे. या मीनाक्षीच्या देवळांत १,००० खांब असलेला एक विस्तीर्ण मंडप आहे व जवळच एक सुंदर तळें आहे.

मदुरा व नागपूजा

पुराणांत मदुरा हें कदंबक्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. त्याचें कारण येथील देवळाभंवतीं कदंब वृक्ष भरपूर पाहण्यांत येतात हें होय. या कदंब वृक्षांभोंवतीं नागांच्या मूर्ति आहेत. भाविक बायका आजसुद्धां या नागांची दररोज पूजा करतांना दिसतील.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मदुरा व जैनधर्मप्रसार

या भागांत जैन धर्मांचा प्रचार व प्रसार करण्याचा फार जोराचा प्रयत्न झालेला दिसतो. पण त्यांत त्यांना यश आलेलें दिसत नाहीं. याबद्दलहि एक मजेदार दंत-कथा आहे व त्यावरून जैन लोकांचे धर्मप्रसाराचे प्रयत्न कसे फसले हें दिसून येईल.

असें म्हणतात कीं आपल्या धर्मांची छाप लोकांवर जास्त पडावी व त्यांनीं जैन-धर्मीय व्हावें म्हणून जैन धर्मगुरु कांहीं सिद्धीचा उपयोग करूं लागले. या सिद्धीच्या योगें त्यांनीं एक हत्ती, एक नाग, व एक गाय उत्पन्न केली. या चमत्कारानें लोक जैनधर्मीय होतात किंवा काय हें त्यांना पहावयाचें होतें. पण झालें काय कीं शंकराला त्या गुरूंचा राग आला व त्यानें त्या उत्पन्न केलेल्या तीनहि प्राण्यांना ठार करून त्यांचीं प्रेतें जवळच तीन बाजूंना टाकून दिलीं. तीं फुगून त्या ठिकाणीं तीन डोंगर झाले. हे डोंगर आजहि आपणांस पहावयास मिळतील. यापैकीं एका डोंगराला आज 'अन्नमलाई' (हत्तीची टेकडी), दुसऱ्याला 'नागमलाई' (सर्पाची टेकडी) व तिसऱ्याला 'पशुमलाई' (गाईची टेकडी) असें म्हणतात.

या दंतकथेचा अर्थ असा दिसतो कीं बुद्ध धर्माचें प्रतीक हत्ती, द्रविड धर्माचें प्रतीक नाग व वैदिक धर्माचें प्रतीक गाय या तीनहि धर्मांतल्या प्रतीकांना उत्पन्न करण्याची शक्ति जैन साधूंमध्यें होती असें त्यांना दाखवायचें असेल. परंतु त्या तीनहि प्रतीकांचा नाश करून जैन साधूंची शक्ति शंकरानें नाहींशी केली व मूळचा द्रविड धर्मच जास्त श्रेष्ठ असें जैन लोकांच्या प्रत्ययास आणून दिलें.

मदुरा वस्त्रांकरितां प्राचीन कालापासून प्रसिद्ध

मदुरेसंबंधानें बुद्धघोषानें जो उल्लेख केला आहे तो 'सुत्तपट्टण' म्हणून[१]. 'सुत्तपट्टण' म्हणजे 'कापसाच्या धाग्याकरितां नांवाजलेलें शहर.' यावरून प्राचीन कालीं उत्तम प्रकारच्या सुताची व वस्त्रांची निर्यात या ठिकाणाहून होत होती हें निश्चित आहे. आजसुद्धां उत्तम प्रकारच्या वस्त्रांकरितां मदुरा प्रसिद्ध आहे. इतर विद्येप्रमाणें सूत काढण्याचें व कापड तयार करण्याचें शिक्षण या ठिकाणीं देण्यांत येत होतें असें अनुमान काढायास कांहीं हरकत नाहीं.

१. Dr. B. C. Law: India as described in Early Texts of Buddhism and Jainism (1941), p. 115.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१५ : सालोटगी मंदिर‡

[काल : दहावें व अकरावें शतक]

सालोटगी हें विजापुर जिल्ह्यांतील गांव. या गांवाचें मूळचें नांव 'पाविट्टगे' असें होतें; पण पुढें 'शाळा' व 'पाविट्टगे' हे दोन शब्द एकत्र येऊन 'शाळा–पाविट्टगे' किंवा 'सालोटगी' या नांवानेंच या गांवाची प्रसिद्धि झाली. विद्यापीठाकरितां हा गांव १० व्या शतकांत प्रसिद्ध होता. या विद्यापीठांत संस्कृत अभ्यासच शिकविला जाई. शिक्षणाचें केंद्र म्हणून हा गांव फार कालपर्यंत प्रसिद्ध असावा. वैदिक शिक्षण देणाऱ्या ज्या ज्या संस्था होऊन गेल्या, त्यांत संस्कृतशिवाय इतर भाषा किंवा ग्रंथ शिकविले जात नसावे; व म्हणूनच त्यांचा उल्लेख संस्कृत पाठशाला म्हणून केलेला असावा. राष्ट्रकूट घराण्यांतील जो तिसरा कृष्ण त्याच्या नारायण नांवाच्या मंत्र्यानें या गांवीं त्रयीपुरुषाचें मंदिर बांधलें. त्याला जोडून एक मोठा प्रशस्त मंडप होता व तेथें विद्यार्थ्यांच्या अभ्यासाची सोय करण्यांत आली होती. या विद्यापीठाची कीर्ति गांवोगांव पसरलेली होती हें त्यासंबंधानें एपिग्राफिक इंडियामध्यें केलेल्या उल्लेखावरून कळून येतें. 'अत्र विद्यार्थिनः सन्ति नानाजन-पदोद्भवाः' असें त्याचें वर्णन करण्यांत आलें आहे. तेव्हां दूरदूरच्या देशांतून वेदादि विषय शिकण्याकरितां येथें विद्यार्थी येत होते ही गोष्ट निश्चित आहे. इतकी कीर्ति पसरण्याचें कारण येथील प्रसिद्ध आचार्यच असावेत; पण दुर्दैवानें त्यापैकीं एकाचेंहि नांव आज आपणांस माहीत नाहीं.

येथें विद्यार्थ्यांना राहण्याकरितां २७ निरनिराळ्या जागांची सोय करण्यांत आली होती. यावरून विद्यार्थ्यांची संख्याहि फार मोठी होती हें दिसतें. दुसऱ्या एका गोष्टीवरून येथील विद्यार्थ्यांची संख्या जास्त असावी याला पुरावा मिळतो. ती

‡ E. I. Vol. IV., p. 60.
Dr. A. S. Altekar : 'Education in Ancient India' (1944), p. 130.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणजे विद्यार्थ्यांकरितां जो दिवाबत्तीचा खर्च येई त्याकरितां ६० एकर जमिनीचें उत्पन्न या संस्थेला लावून देण्यांत आलें होतें! विद्यापीठाच्या एकंदर खर्चाकरितांहि २५०० एकर जमीन होती. नुसत्या मुख्याध्यापकाच्या पगाराकरितांच २५० एकर जमीन लावून देण्यांत आली होती. विद्यापीठाच्या खर्चाकरितां शिवाय गांवांतून व श्रेष्ठ धनिकांकडून त्याचप्रमाणें राजेरजवाड्यांकडून इतर मदत होत असेल ती निराळीच. यावरून विद्यार्थ्यांची संख्या २०० हून खास जास्त असावी. त्याचप्रमाणें शिक्षकांच्या व विद्यार्थ्यांच्या जेवणाखाणाचा खर्च विद्यापीठांतूनच होत असला पाहिजे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१६ : तिरुमुक्कुडल मंदिर विद्यापीठ*

[काल : ११ वें शतक]

वेङ्कटेश पेरुमल् मंदिरांत या विद्यापीठाचा समावेश करण्यांत आला होता. तिरुमुक्कुडल गांवसुद्धां चिंगलपट परगण्यांतील. तिरुमुक्कुडल विद्यापीठ फारच लहान होतें. त्यांत अवघ्या ६० विद्यार्थ्यांची सोय करण्यांत आली होती. याला दोन कारणें दिसतात. एक तर या विद्यापीठाजवळ योग्य शिक्षकांचा भरणा नव्हता. दुसरें या विद्यापीठाजवळ विद्यापीठ चालविण्याला भरपूर साधनें नसावींत. या विद्यापीठाच्या तैनातीला कांहीं खेडीं लावून दिलेलीं नव्हतीं किंवा पुरेशी शेतीवाडी नव्हती. विद्यार्थी जास्त घ्यावयाचे तर त्यांच्या रहाण्याखाण्याची, कपड्यालत्त्यांची, औषध-पाण्याची पूर्ण सोय लावण्याची व्यवस्था व्हावयास पाहिजे. ती सोय लावण्याची येथें शक्यता नसल्यानें जास्त विद्यार्थी घेतले जात नसावेत. तक्षशिला, नालंदा येथें दहा दहा हजार विद्यार्थी एका वेळीं रहात व त्यांची सर्व प्रकारें सोय लावण्यांत येई. पण तिरुमुक्कुडल येथें १०० विद्यार्थ्यांना राहण्याचीहि सोय दिसत नाहीं.

विद्यार्थी कमी असण्याला आणखी एक कारण दिसतें. तें म्हणजे चिंगलपट परगण्यांत जवळ जवळ अशीं बरींच मंदिर विद्यापीठें होतीं. त्यांतून काञ्चीसारखीं समृद्ध शहरें विद्यापीठांनीं गजबजलेलीं असत. तेव्हां तुरुमुक्कुडल मंदिरांत येणारे विद्यार्थी जवळपासचेच असणार. त्यांतून विद्यार्थ्यांना आकर्षित करून घेणाऱ्या गोष्टी येथें कोणत्या होत्या ? हें कांहीं व्यापाराचें प्रसिद्ध केंद्र नव्हतें किंवा एकाद्या राजधानीचें शहर नव्हतें. एकाद्या तीर्थाचें ठिकाणहि तें नव्हतें. येथें नामवंत शिक्षक असते तर कदाचित् जास्त विद्यार्थी येऊं शकले असते. शिक्षकांमुळें विद्यापीठाची सांपत्तिक स्थितिहि सुधारली असती. पण येथें येणारे कांहीं शिक्षकसुद्धां बाहेरून ठराविक विषय शिकविण्यास येत असावे व त्यांना शिधा देण्यांत येत असावा.

पण जे विद्यार्थी येथें असत त्यांच्याकडून कोणत्याहि प्रकारें फी घेण्यांत येत

* Dr. A. S. Altekar, p. 135.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नव्हती. उलटपक्षीं त्यांना जेवणखाण व जीवनाला लागणाऱ्या आवश्यक गोष्टीहि पुरविल्या जात. मुलांना अंगाला चोपडण्याला तेलसुद्धां प्रत्येक शनिवारीं देण्यांत येई. आजारी विद्यार्थ्यांच्या शुश्रूषेचीहि सोय करण्यांत येत होती.

येथें येणारे जे थोडे विद्यार्थी असत तेहि ठराविक विषयाला ठराविक विद्यार्थी या नियमानें घेण्यांत येत हें या विद्यापीठाचें वैशिष्ट्य आहे. उदाहरणार्थ, ऋग्वेद विषय शिकण्याकरितां १० विद्यार्थी घेत तर व्याकरण विषयाकरितां २० विद्यार्थी घेत.

इतर विद्यापीठें व या विद्यापीठांत आणखी एक फरक पहावयास मिळतो. तो म्हणजे येथील सर्वच शिक्षक विद्यापीठांत रहात नसत. कांहीं शिक्षक बाहेरून ठराविक विषय शिकविण्याकरितां येत. ते कदाचित् गांवांतच राहून शेती वगैरे इतर व्यवसाय करीत असावेत, किंवा जवळपासच्या दुसऱ्या विद्यापीठांतून ठराविक दिवशीं ठराविक विषय शिकविण्याकरितां येत असावेत. याला कारण विषय शिकविण्याइतके योग्य स्वतंत्र शिक्षक मिळत नसावेत किंवा विद्यापीठाची सांपत्तिक स्थिति वाईट असल्यानें त्यांना योग्य तो मोबदला देण्याची ऐपत विद्यापीठाला नसावी. येथील इतर शिक्षकांनाहि फारच कमी पगार देण्यांत येई.

चांगल्या सांपत्तिक स्थितीच्या अभावीं हें विद्यापीठ भरभराटीस येऊं शकलें नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१७ : एण्णायिरम् मंदिर*

[काल : अकरावें शतक]

एण्णायिरम् हें दक्षिण अर्काट प्रांतांत आहे. येथील संस्कृत विद्यापीठ प्राचीन कालीं फारच प्रसिद्ध होतें. या विद्यापीठाचा भरभराटीचा काल अकराव्या शतका-अगोदरचा असावा[१]. येथें ३४० विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय करण्यांत आली होती. यावरून या भागांतील इतर विद्यापीठांच्या मानानें हें विद्यापीठ मोठें दिसतें. या विद्यापीठाचें काम सुरळीत चालावें व तेथील खर्च भागावा म्हणून येथील खेड्यांतील लोकांनीं या विद्यापीठाला ३०० एकर जमीन दिली होती.

या विद्यापीठांत निरनिराळ्या विषयांकरितां ठराविक विद्यार्थीच घेतले जात; त्याहून ज्यास्त विद्यार्थी त्या विषयाकरितां घेण्यांत येत नसत; यावरून प्रत्येक शिक्षकाच्या हवालीं ठराविक विद्यार्थीच करण्याची प्रथा येथें असावी. सर्वांत जास्त महत्त्व वेदाला देण्यांत येई; कारण येथें ऋग्वेद व कृष्णयजुर्वेद शिकण्याकरितां प्रत्येकीं ७५ मुलांची सोय करण्यांत आली होती. पण वेदान्ताकरितां फक्त १० च विद्यार्थी घेत. कदाचित् या भागांत वेदान्तापेक्षां वेदविद्यापारंगतच आचार्य जास्त असावेत. शिवाय शुक्लयजुर्वेदाकरितां २०, सामवेदाकरितां ४० व अथर्ववेदाकरितां १० विद्यार्थ्यांना प्रवेश मिळे. बौद्धायन धर्मसूत्रसुद्धां शिकविण्यांत येई व त्या-करितां १० विद्यार्थी घेत. पण व्याकरणाकरितां २५, प्रभाकरमीमांसेकरितां ३५ व रूपावताराकरितां ४० विद्यार्थी घेण्यांत येत.

---

* Santosh Kumar Das : The Educational System of the Ancient Hindus, (Calcutta, 1930), pp. 327–328.

Dr. A. S. Altekar : Education in Ancient India (1944), pp. 285–288.

१. S. I. E. R. (1918), p. 145; Inscription No. 333 of 1917, Dr. A. S. Altekar, (1944), p. 132.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निरनिराळ्या विषयांकरितां वाटून दिलेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येवरून कोणत्या विषयाला या विद्यापीठांत विशेष महत्त्व दिलें जात होतें हें कळून येईल. कदाचित् इतर विषयांकरितां तज्ज्ञ आचार्य पुरेसे न मिळाल्यानें विद्यार्थी कमी घेतले जात असावे. तरी पण या विद्यापीठांत वेदान्त, व्याकरण व मीमांसा शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना विशेष मान असे. येथें शिकविण्यांत येणाऱ्या विषयांची यादी पाहतां व त्यांची तुलना वलभी व इतर जैन विद्यापीठांत शिकवण्यांत येणाऱ्या विषयांशीं करतां वैदिक परंपरेचीं दक्षिणेकडील विद्यापीठेंसुद्धां कर्मठ व संकुचित वृत्तीचीं दिसतात. येथील विद्यापीठांत ब्राह्मणवर्गाशिवाय इतर वर्गांच्या शिक्षणाची सोय करण्यांत आली नाहीं हें स्पष्ट दिसतें. म्हणून या विद्यापीठांना सार्वजनिक संस्था म्हणतां येणार नाहीं. 'सार्वजनिक' हा शब्द बौद्ध व जैन विद्यापीठांनाच लावणें योग्य होईल.

येथील विद्यापीठांतील प्रत्येक शिक्षक आपापल्या विषयांत पारंगत असे व तो आपापल्या विद्यार्थ्यांची पूर्ण काळजी घेई.

येथेंहि विद्यादान विनामूल्य दिलें जात असून विद्यार्थ्यांचा राहण्याखाण्याचा सर्व खर्च संस्था करी. विद्यार्थ्यांकरितां भरपूर खर्च होई असें दिसतें. शिक्षकाला साधारणतः विद्यार्थ्यांच्या खर्चाच्या सोळा पट पगार मिळे; त्यामुळें त्याला घरांत १६ माणसांना लागणारा खर्च सहज करतां येई. यावरून येथील शिक्षकांची सांपत्तिक स्थिति फारच चांगली होती हें कळून येईल. वेदान्त विषय किचकट असल्यानें त्या विषयाच्या शिक्षकाला अधिक पगार देण्यांत येत असे. कदाचित् त्या विषयांत पारंगत असे आचार्य मिळत नसल्यानें त्यांना जास्त पगार देण्यांत येत असावा. व्याकरणाचार्याला तर रोख वेतन मिळे. अष्टाध्यायीचा एक अध्याय शिकविला कीं त्याला ४/१० तोळें सोनें मिळे. म्हणजे साधारण सोन्याचा भाव ४० रु. धरल्यास त्याला १६ रुपये व आजचा भाव धरल्यास त्याला ४० रुपयांवर देण्यांत येत असत. ही शिक्षणसंस्था आजच्या शिक्षणसंस्थांप्रमाणें सुसज्ज व सुव्यवस्थित अशी होती.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१८ : मलकापुरम् विद्यापीठ‡

[काल : ११ वें व १२ वें शतक]

दक्षिणेंतील प्राचीन विद्यापीठें

दक्षिण हिंदुस्थानांत निरनिराळ्या ठिकाणीं वैदिक परंपरेचीं विद्यापीठें असल्याचें ताम्रपट किंवा शिलालेख यांवरून आपणांस कळून येतें. शिवाय चिनी प्रवाशांनीं-सुद्धां त्याबद्दल लिहून ठेविलें आहे. हीं विद्यापीठें महाराष्ट्रापासून खालीं थेट सिंहलद्वीपापर्यंत पसरलेलीं होतीं. संगमयुगांत तर तामीळ प्रांत हा वैदिक शिक्षणाचें केंद्र म्हणून प्रसिद्ध होता.

ह्या वैदिक परंपरेच्या विद्यापीठासंबंधानें म्हणजे घटिका, अग्रहार, भट्टवृत्ति, मठ, वगैरेबद्दल माहिती निरनिराळ्या लेखांवरून मिळूं शकते. यांपैकीं घटिका व संगम या संस्थांची कीर्ति आपापल्या प्रांतांपुरतीच केंद्रित न राहतां त्यांना देशाच्या इतर भागांतूनहि मान्यता होती व त्यांना आन्तरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झालें होतें. अग्रहार व भट्टवृत्ति यांचा उपयोग विद्यार्थी व शिक्षक याच्या पोटापाण्याची सोय व्हावी म्हणून केला जात असे. अग्रहारांत एकाद्या देवळाला किंवा ब्राह्मण आचार्याला जमीन देण्यांत येत असे, तर भट्टवृत्तीमध्यें जमीन देऊन किंवा अन्य तऱ्हेनें आचार्यांचें काम सुरळीत चालावें म्हणून सोय करण्यांत येत असे.

विद्यापीठांकरितां दानपत्रें किंवा निरनिराळ्या वृत्ति

नृपतुङ्गवर्मा पल्लव (इ. स. ८४९ ते ८७५) याच्या वेळच्या बाहूर ताम्र-पटांत वागूर येथील 'विद्यास्थानत्तारा'करितां विद्याभोग आणि ब्रह्मदेय म्हणून तीन खेडीं दिल्याचा उल्लेख आहे.[१] नवव्या शतकांत घटिकासुद्धां पूर्णपणें विद्यास्थान किंवा विद्यापीठ म्हणून मान्यतेस पावलेल्या होत्या. या बाहूर ताम्र-पटांवरूनच, एण्णायिरम्, पांडेचरीजवळील त्रिभुवनी, व तिरुमुक्कुडल येथील

‡ Dr. A. S. Altekar : Education in Ancient India.

१. E. I. XVIII, pp. 5–15.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विद्यापीठांची वाढ झाली होती असें स्पष्ट दिसतें.[२] या ठिकाणीं निरनिराळे विषय शिकविले जात व त्यांत वेद, वेदान्त, मीमांसा, व्याकरण, आगम व तंत्र यांचा समावेश होत असे. विद्यार्थ्यांची संख्याहि ४० पासून ३५० पर्यंत असे. या ठिकाणीं वसतिगृहांची व कांहीं कांहीं ठिकाणीं दवाखान्याची व रुग्णालयाची (इस्पितळाची) सोय करण्यांत येत असे. कांहीं ठिकाणीं तर व्याकरणासारख्या एका विषयाकरितां स्वतंत्र संस्था असल्याचा उल्लेख आहे. चोळमंडळांतील एका गांवीं वैद्यक विषयाकरितां स्वतंत्र संस्था असल्याचा उल्लेख ११२१ च्या लेखांत आहे. या चोळ राजांच्या काळीं शिक्षणाकरितां दिलेलीं एकंदर १४ दानपत्रें आहेत.[३] त्यांत चिंगलपट प्रांताकरितां ८, त्रिभुवनीकरितां १, एण्णायिरम्‌करितां १, उक्कल्करितां १, अशीं ११ दानपत्रें तोंडमण्डलम्‌करितां व ३ तंजावर प्रांतांतील कुम्भकोणम्, तिरुवाडुतुराई व तिरुविडैक्कळिकरितां दिलेलीं आहेत. हीं दानपत्रें देण्याचें विशेष कारण म्हणजे खेड्यांचें उत्पन्न या शिक्षणसंस्थांना पुरत नसल्यानें विशेष प्रकारच्या दानपत्रांची आवश्यकता भासत असावी. या दानलेखांशिवाय निरनिराळ्या प्रकारें मदत या संस्थांना होत होती हें भट्टवृत्ति, व्याख्यावृत्ति, भाष्यवृत्ति वगैरे स्वतंत्र वृत्ति किंवा निर्वाहाचें साधन देण्यांत येत होतें यावरून दिसून येईल. निरनिराळ्या शास्त्रांचा स्वतंत्र अभ्यास व्हावा व त्याला उत्तेजन मिळावें हा वृत्ति देण्याचा हेतु दिसतो. आजसुद्धां निरनिराळ्या विद्यापीठांतून कांहीं विषयांकरितां एका ठराविक रकमेच्या व्याजांतून व्याख्यानें (lectures) देण्याची सोय करून ठेवण्यांत आलेली असते हें आपणांस माहीत आहे. या प्रकारच्या वृत्तींना आपण आज ' चेअर ' (Chair) म्हणतों. प्राचीन कालींहि अशाप्रकारें स्वतंत्र वृत्ति ठेवण्याची प्रथा असे.

वैदिक विद्यापीठांवर जैन व बौद्ध विद्यापीठांचा परिणाम

बौद्ध व जैन परंपरांचीं विद्यापीठें सुरू झाल्यानंतर त्यांच्यांतील एकसूत्रीपणाचा परिणाम वैदिक परंपरेच्या शिक्षणसंस्थेवर झालेला स्पष्ट दिसून येतो. साधारणतः आज

२. Chola Inscriptions, A. R. E., Madras, 1918, pp. 145–147; 1919, pp. 96–97; E. I. XXI, pp. 220–250.

३. R. Sathiana Thaier : Studies in Ancient History of Tondamandalam (1944), p. 52.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपण बौद्ध, जैन व वैदिक परंपरा अगदीं भिन्न अशा मानतों व एकमेकांचा परस्परांशीं कोणत्याहि प्रकारचा संबंध नाहीं, उलट विरोधच आहे, असें समजतों. पण अशा प्रकारची कल्पना प्राचीन कालीं नव्हती. कोणतेंहि बौद्ध परंपरेचें किंवा जैन परंपरेचें विद्यापीठ पहा. त्यांत सर्व संप्रदायांचें शिक्षण कोणत्याहि प्रकारचा फरक न करितां दिलें जात असे. यामुळेंच ब्राह्मण विद्यार्थीसुद्धां थेट काशीहून गांधारांतील तक्षशिलेला किंवा सौराष्ट्रांतील वलभीला शिकावयास जात व बौद्धधर्मीयांचें किंवा जैनधर्मीयांचें शिक्षण घेत. अशा प्रकारें तोण्डमण्डलम् किंवा तामीळ भागांतील विद्यापीठांनींसुद्धां बौद्ध व जैन विद्यापीठांतील पुष्कळच चांगल्या चांगल्या गोष्टी उचलल्या असल्या पाहिजेत हें त्या त्या विद्यापीठांच्या व्यवस्थातंत्रावरून व प्राचीन कालच्या वैदिक परंपरेच्या शिक्षणसंस्थांच्या व्यवस्था-तंत्रावरून फरक पहातां कळून येईल. गुरुकुलांत तर बौद्ध व जैन विद्यापीठांतील बहुतेक पद्धतींचा अवलंब केलेला दिसतो. बाकी आजप्रमाणें किंवा बौद्ध-जैन विद्यापीठांप्रमाणें एकसूत्रीपणाच्या सांच्यानें चालणाऱ्या शिक्षणसंस्था प्राचीन कालीं नव्हत्या. प्राचीन कालच्या शिक्षणसंस्था क्षत्रिय व ब्राह्मण यांनीं वैयक्तिक रीत्या चाल-विलेल्या होत्या हें जनक, याज्ञवल्क्य, अत्रि, वाल्मीकि, कण्व वगैरेंच्या उदाहरणां-वरून दिसून येईल. त्या शिक्षणसंस्था कशा प्रकारच्या होत्या याबद्दल अद्याप आपणांस पुरेशी माहिती नाहीं. पण त्याबद्दल जें तुटपुंजें वर्णन आपल्या पाहण्यांत येतें त्यावरून त्यांच्या शिक्षणसंस्था भरभराटीस आलेल्या होत्या, त्या राजमान्य झाल्या होत्या, त्यांना आंतरराष्ट्रीय कीर्ति प्राप्त झाली होती व तेथें विद्यार्थी दूरदूरहून येत या गोष्टी आपणांस स्पष्टपणें कळून येतात.[४]

देवळांचा विद्यापीठांकरितां उपयोग

देवळांचा व विद्यापीठांचा संबंध निरनिराळ्या कालीं सर्व हिंदुस्थानभर आला असावा हें त्या त्या देवळांच्या प्रसिद्धीवरून कळून येतें. नुसत्या मूर्तीमुळें देवळें प्रसिद्धीस आलीं नसावीं. त्यामागें परंपरा असली पाहिजे; व ही परंपरा उत्पन्न करणारे आचार्य व त्यांचे अनुयायी हे लोकांत मान्यता पावलेले असल्याशिवाय देवळांचा व शिक्षणाचा संबंध आला नसता. या देवळांतून धर्मोपदेश करणारे व तदनुषंगानें इतर ज्ञान देणारे महान् आचार्य उत्पन्न झाल्यामुळेंच 'देवळें म्हणजे

४. बौधायन ध० सू० २–१–४४; बृह० आ. उ. ६–२–१.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धर्मस्थानें' हें समीकरण बसूं शकलें. यामुळेंच कालिदासासारख्या जगन्मान्य पंडितालासुद्धां विद्या प्राप्त करून घेण्याकरितां देवळाचा आश्रय घ्यावा लागला म्हणून दंतकथा प्रचलित झाल्या. या दंतकथांवरून देवळांचा व शिक्षणाचा संबंध किती निकटचा होता हें कळून येईल. तरी पण अशा प्रकारच्या देऊळ किंवा मंदिर शिक्षणसंस्था दक्षिण हिंदुस्थानांत वाढीस लागल्या व त्यांचें रूपांतर विद्यास्थानांत किंवा विद्यापीठांत झालें ही गोष्ट तोण्डमण्डलांतील मंदिर विद्यापीठांवरून कळून येण्याजोगी आहे. महाराष्ट्रांत व इतरत्र स्वतंत्र मठ, आश्रम किंवा गुरुकुलें निर्माण झालीं व मंदिर शिक्षणसंस्था मागें पडल्या.

मलकापुरम् मंदिर विद्यापीठ

दक्षिण हिंदुस्थानांतील ह्या मंदिर विद्यापीठासंबंधानें माहिती आपणांस शिलालेखांवरून व दानपत्रांवरून मिळूं शकते. मलकापुरम् किंवा गन्तुर परगण्यांतील मर्कापुरम् (उ. अ. १६°, पू. रे. ७९° च्या जवळपास) संबंधानें खालील माहिती उपलब्ध आहे. ही माहिती देणारा लेख इ. स. १२६८ सालचा गंतुर परगण्यांतल्या मल्कापुरम्चाच आहे.[५]

येथें एक मंदिर असून त्यांत एका विद्यापीठाचा समावेश करण्यांत आला होता. विद्यार्थ्यांच्या राहण्याची सोयहि तेथेंच करण्यांत आली होती. येथें राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आजारांत शुश्रूषा करणें सोपें जावें म्हणून मंदिराला लागूनच एका स्वतंत्र इस्पितळाची सोय करण्यांत आली होती. मल्कापुरम्प्रमाणें इतर मंदिर विद्यापीठांतूनहि अशा प्रकारच्या इस्पितळांची सोय करण्यांत येत असे. या इस्पितळांची व्यवस्था एका स्वतंत्र वैद्याकडे असे.[६]

मल्कापुरम् मंदिर विद्यापीठांत ८ शिक्षक असून ते वेद, वाङ्मय, व्याकरण, न्याय, आगम हे विषय शिकवीत. प्रत्येक शिक्षकाकडे साधारणतः २० विद्यार्थी सोंपविलेले असत. अशा प्रकारें या विद्यापीठांत १५० विद्यार्थ्यांची सोय करण्यांत आली होती. या विद्यार्थ्यांपासून कोणत्याहि प्रकारचें विद्यावेतन किंवा फी घेण्यांत येत नव्हती. उलटपक्षीं जेवणखाण, कपडालत्ता, शिक्षण, औषधें वगैरेंचा खर्च

५. Dr. Altekar, p. 135; Keay, pp. 146–147; S. K. Das, pp. 325 ff.
६. S. I. E. R. for 1917, pp. 122–124.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विद्यापीठाकडूनच होई. येथें जे शिक्षक असत त्यांचाहि योगक्षेम चांगल्या प्रकारें व्हावा म्हणून त्यांना पुरेसा पगार देण्यांत येत असे. शिवाय त्या काळीं शिक्षकांचा दर्जा त्यांच्या विद्वत्तेवर व चारित्र्यावर अवलंबून असल्यामुळें त्यांचा योग्यप्रकारें मानसन्मान गांवांतील लोकांकडून निरनिराळ्या प्रकारें होई. मुख्याध्यापकाचा पगार १०० निकष असे. शिक्षणाचें कार्य सुरळीतपणें पार पाडण्याची सर्व जबाबदारी मुख्याध्यापकावर असल्यानें व मुख्याध्यापक विद्वत्ता व चारित्र्य ह्या दोनहि बाबतींत श्रेष्ठ असल्यानें त्याचा पगार सुवर्णनाण्यांतच मोजण्यांत येई.

२७१७
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१९ : तिरुवोरियुर मंदिर विद्यापीठ†

[काल : १३ वें शतक]

तिरुवोरियुर मंदिर व्याकरणाच्या अभ्यासाकरितां प्रसिद्ध

हें मंदिर विद्यापीठ मद्रास इलाख्यांतील चिंगलपट विभागांत तिरुवोरियुर गांवीं असल्यानें या विद्यापीठाला 'तिरुवोरियुर मंदिर विद्यापीठ' असें संबोधिलें जातें. या विद्यापीठाबद्दलची थोडक्यांत माहिती १९१२ सालच्या एपिग्रॅफिक रिपोर्टांत आली आहे[१]. या विद्यापीठाची स्थापना एका शिवमंदिरांत करण्यांत आली होती. विद्यार्थ्यांची राहण्याची सोय खुद्द मंदिरांतील निरनिराळ्या भागांत व जवळच असणाऱ्या एका मोठ्या हॉलमध्यें करण्यांत आली होती. ज्याप्रमाणें वैदिक परंपरेच्या इतर विद्यापीठांतून वेदादि विषयांनाच प्राधान्य असे, किंवा नवद्वीप-मिथिला वगैरे विद्यापीठांतून विशेषतः न्याय वगैरे विषय विशेषेंकरून शिकविले जात त्याप्रमाणें तिरुवोरियुर विद्यापीठांत व्याकरण शिकविण्याची खास सोय करण्यांत आली होती. व्याकरण शिकविण्याकरितां एक स्वतंत्र विद्यालयच होतें. अर्थात् इतर विषयांना गौणत्व प्राप्त झाल्यास नवल नाहीं.

या विद्यापीठांत व्याकरण विषयाला कां महत्त्व देण्यांत आलें याबद्दल एक दंतकथा प्रचलित आहे. असें म्हणतात कीं प्रसिद्ध वैय्याकरणी पाणिनि विद्यार्थी म्हणून येथें शिकावयास आला. त्याची व्याकरण शिकण्याची आस्था पाहून प्रत्यक्ष भगवान् शंकर त्याला व्याकरण शिकवूं लागले. यामुळेंच येथें व्याकरणाकरितां स्वतंत्र विद्यालय स्थापण्यांत आलें. तिरुवोरियुर व्याकरण विद्यालय फारच प्रसिद्धीस आलें होतें.

तिरुवोरियुर मंदिर विद्यापीठ इतर मंदिर विद्यापीठांच्या मानानें मोठें असावें.

---

† Dr. Altekar : Education in Ancient India (1944), p. 135.

१. S. I. E. R. (Annual Report of Epigraphy of South India) for the year 1912, Nos. 110, 201.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या विद्यापीठाच्या खर्चाकरितां दिलेल्या जमिनीवरून पाहतां येथें ४५० वर विद्यार्थी रहात असावे. त्यांच्या राहण्याची, जेवणाखाण्याची, कपडालत्त्यांची व औषधोपचाराची सोयहि चांगल्या प्रकारें करून देण्यांत येत असे.

हें विद्यापीठ जवळ जवळ १०० वर्षें टिकलें. पण या विद्यापीठाची स्थापना कोणी व केव्हां केली, येथें नामांकित शिक्षक कोण होते, त्यांनीं कांहीं ग्रंथसंपत्ति तयार करून ठेविली आहे किंवा कसें, संस्था एक व्यक्ति चालवी कीं तेथें एकादें मंडळ होतें वगैरेबद्दलची माहिती उपलब्ध नसल्यानें या वैदिक विद्यापीठासंबंधींची पूर्ण कल्पना आपणांस येऊं शकत नाहीं. तरी पण शंभर वर्षें चालणारें विद्यापीठ सुव्यवस्थित असलेंच पाहिजे व तीन चार पिढ्यांतील शिक्षक नामवंत असले पाहिजेत याबद्दल संशय नाहीं.

इतर कांहीं विद्यापीठें

याशिवाय तंजावर तालुक्यांत ' पुन्नवयिल ' गांवीं एक व्याकरणाकरितां पाठशाळा असून तेथेंहि ५०० विद्यार्थ्यांच्या जेवणखाण व राहणें यांची सोय केलेली होती. शिकारपुर जिल्ह्यांतील ताळगुण्ड शहरांतील प्राणेश्वर मंदिरांत वेद, वेदान्त, मीमांसा वगैरेचें शिक्षण दिलें जाई. धारवाड जिल्ह्यांतील हेब्बळ गांवींहि मंदिर विद्यापीठ होतें. अशीं एक ना दोन किती तरी विद्यापीठें दक्षिणेकडे विखुरलेलीं दिसतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परिशिष्ट : १

प्राचीन व मध्ययुगीन युरोपीय विद्यापीठें

तमोयुगपूर्व यूरोप

प्राचीन भारतीय विद्यापीठांबद्दल माहिती वाचल्यानंतर ज्या पाश्चात्य विद्यापीठांचा प्रभाव आज जगांत सर्वत्र दृष्टीस पडत आहे त्या पाश्चात्यांच्या प्राचीन विद्यापीठांबद्दल जिज्ञासा उत्पन्न होणें साहजिक आहे. शिवाय तुलनात्मक दृष्टीनेंहि त्यांच्याबद्दलची माहिती उद्बोधक ठरेल हा विचार करून या परिशिष्टांत युरोपांतील प्राचीन व मध्ययुगीन विद्यापीठांबद्दल साधारण कल्पना येईल इतकी त्रोटक महिती देण्याचा विचार केला आहे. मध्ययुगीन विद्यापीठांबद्दल माहिती देणारीं पत्रकें व ग्रंथ इंग्रजी भाषेंत व युरोपांतील इतर भाषेंतहि भरपूर आहेत. भारतीय विद्यापीठांबद्दल माहिती मिळविण्याला जो त्रास होतो, जितके श्रम करावे लागतात तितका त्रास युरोपांतील विद्यापीठांबद्दल माहिती मिळवितांना होत नाहीं व तितके श्रमहि करावे लागत नाहींत ही एक लक्षांत ठेवण्यजोगी गोष्ट आहे. या विद्यापीठांबद्दल जास्त माहिती मिळविण्याची उत्सुकता ज्यांना असेल त्यांनीं या परिशिष्टाच्या शेवटीं दिलेले ग्रंथ अवश्य चाळावेत.

प्राचीन भारतीय संस्कृतीचा विकास इ. स. पू. ३०००-४००० वर्षांपूर्वीचा, पण विद्यापीठांचा इतिहासकाल मात्र इ. स. पू. ८०० पासूनच दाखवितां येतो. तेथपासून इ. स. च्या १३ व्या शतकापर्यंत भारतवासीयांनीं भारतांत व भारताबाहेर शेंकडों विद्यापीठें स्थापलीं. या कालांत व तत्पूर्वी शेंकडों वर्षें गंगा नदीच्या प्रदेशापासून पश्चिमेस थेट भूमध्य समुद्रापर्यंत एक फारच उच्च प्रकारची संस्कृति नांदत होती व या संस्कृतीच्या टप्प्यांत मगध, सिंध, पंजाब, गांधार, इराण, इराक, टर्की, क्रीट बेट व इजिप्त येत होते. पण त्या कालांत सर्व युरोपभर कोणती संस्कृति नांदत होती ? युरोपांतील संस्कृतीचा विचार करतां अगदीं जास्त मागें म्हणजे इ. स. पू. एक हजार वर्षांपर्यंत जेमतेम जातां येतें. तत्पूर्वीच्या तेथील संस्कृतीबद्दल फारशी माहिती मिळत नाहीं. त्या सुमारास म्हणजे तीन हजार वर्षांपूर्वी ग्रीसमध्यें संस्कृतीच्या विशेष ठशाची हालचाल दिसते असें इतिहासकारांचें म्हणणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे. पण हे ग्रीक लोक तरी आर्यच व मूळचे युरोपांतील नव्हत हेंहि त्यांचेंच मत आहे. तेव्हां ही जी संस्कृतीची लाट ग्रीसपासून पश्चिमेस युरोपांत पसरली ती युरोपच्या बाहेरील लोकांकडूनच, हीहि एक महत्त्वाची गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. या संस्कृतीमुळें ग्रीस, इटली वगैरे भागांत थोर थोर विचारवंत उत्पन्न झाले व त्यांनीं आपले विचार लोकांपुढें मांडले. त्यामुळें महान् ग्रंथ लिहिले गेले. तत्कालीन होमर, सॉक्रेटिस, ॲरिस्टॉटल् वगैरे लेखकांच्या विचारांचा पगडा आजहि युरोपवर दिसत आहे.

ग्रीस

पण एकंदरींत ग्रीस येथील विचारवंतांनीं उत्पन्न केलेली संस्कृति शिस्तबद्ध, नियमबद्ध असल्याचें दिसून येत नाहीं. कारण त्यांनीं आपल्या संस्कृतिप्रसारार्थ विशेष कांहीं केलेलें दिसत नाहीं; विद्यापीठें स्थापून आपली संस्कृति इतर ठिकाणीं पसरविण्याचाहि त्यांनीं फारसा प्रयत्न केला नाहीं. तरी पण हें विचारप्रवर्तक व क्रियात्मक कार्य जें ग्रीसनें सुरू केलें त्याचा प्रभाव इ. स. च्या तिसऱ्या शतकापर्यंत चांगलाच राहिला. वास्तविक ग्रीस म्हणजे युरोपांतील एक लहानांतलें लहान राष्ट्र; जगाच्या इतिहासांत एकाद्या प्रमुख स्थानाची त्यानें अपेक्षाहि करूं नये; असें असतांनासुद्धां त्यानें युरोपच्याच नव्हे तर जगाच्या इतिहासांत अत्यंत स्पृहणीय अशी मानाची जागा प्राप्त करून घेतली. त्याला कारण तेथील क्रियाप्रवण विचारवंतच होत. या कालांत होमर, हेसिअड् आणि पिंडार यांच्यासारखे कवि, एश्चिलस्, सोफोक्लस् व युरीपीडीज् सारखे नाटककार, हिरोडोटस्, थुसिडाइड्स व झेनोफेनिससारखे इतिहासलेखक, सॉक्रेटिस, प्लेटो व ॲरिस्टॉटल्सारखे गाढ विचारवंत होऊन गेले. पण या कोणीहि विद्यापीठ स्थापल्याचें इतिहास सांगत नाहीं. इतकें मात्र खरें कीं यांच्या विचाराचा परिणाम युरोपवर फार काल टिकला; व आजहि त्या सर्वांची थोर थोर विचारवंतांत गणना होते.

ग्रीस देशाला विचार करायला लावणाऱ्या लोकांपैकीं तेथील सोफिस्ट लोक* होते. त्यांनीं लोकजागृतीचें काम पुष्कळ केलें. विशेषतः लोकांना उत्तम प्रकारें बोलण्यास व भाषण करण्यास शिकवणें, आपले मुद्दे लोकांना समजा-

* सोफोस्–शहाणा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वून देण्याची कला त्यांना प्राप्त करून देणें, हें यांचें काम असे. याकरितां ते पैसा घेत. पण यांच्या या शिक्षणाचा परिणाम जनतेवर चांगला न होतां लोक केवळ वितंडवाद करावयास शिकले; व या त्यांच्या शिक्षणाचा हा असा परिणाम झाल्यामुळें 'सोफिस्ट' हा शब्द पुढें तुच्छतेनें वापरला जाऊं लागला. सॉक्रेटिस हा विचार पसरविणाऱ्यांमध्यें अग्रगण्य होता. आपल्या शिक्षणाच्या कामाबद्दल पैसे घेण्याच्या तो विरुद्ध होता; व यामुळें त्याचें व 'सोफिस्ट' लोकांचें बिनसलें. सॉक्रेटिस यानें कांहीं लिहिलें नाहीं. रस्त्यानें फिरत फिरत वादविवाद करून लोकांना आपले विचार सांगावे व पटवून द्यावे हा त्याचा उद्योग. हीच सॉक्रेटिसची शाळा. पण सॉक्रेटिस याला शत्रू उत्पन्न झाले व अथेन्सच्या तरुणांना हा बिघडवितो असा त्याचेवर आरोप ठेवण्यांत येऊन त्यास विषाचा पेला देण्यांत आला. त्यानें तो निर्विकार मनानें घेतला व आपला प्राण सोडला (इ. स. पू. ३९९).

पण पुढें पुढें ग्रीक लोकांची स्वतःच्या देशाबद्दल संकुचित वृत्ति बनल्यामुळें आपापसांत भांडणें माजून राहिलीं व स्पार्टा व अथेन्स यांच्या शत्रुत्वांत व भयंकर युद्धांत ग्रीक लोकांची क्रियात्मक शक्ति नाहींशी झाली.

रोम व कार्थेज

युरोपला सांस्कृतिक वारसा ग्रीसनंतर इटली देशाकडून मिळाला. इटलीहि ग्रीसच्याच विचारांवर पोसलेली. येथील लोकहि आर्यच. ग्रीसमध्यें जे आर्य पूर्वी आले त्यांतीलच कांहीं वर इटलीकडे सरकत गेले व ग्रीसमध्यें आर्यांच्या नवीन नवीन टोळ्या आल्या. इटलीकडे सरकत गेलेल्या आर्यांनीं इटली हें मोठें राष्ट्र करण्याचा प्रयत्न केला. येथें रोम शहरालाच प्राधान्य मिळालें व इटली हें देशाचें नांव मागें पडून 'रोम', 'रोमन' हीं शहरवाचक नांवेंच चमकूं लागलीं. या राष्ट्राचा प्रभाव सर्व युरोपवर फारच जोराचा पडला; पण तो अवघीं ४०० वर्षेंच राहिला. याच काळांत रोमप्रमाणें आफ्रिकेच्या वरच्या किनाऱ्यावर कार्थेज शहर प्रसिद्धीस आलेलें होतें; व येथील पुढारीहि फारच वरच्या दर्जाचे होते. पण रोम व कार्थेज यांच्यामध्यें विनाशक युद्धें झालीं व दोन महान् राष्ट्रांचा नाश झाला. रोमचें साम्राज्य म्हणजे इतिहासकालांत घडलेली एक अचानक घटना म्हणून कांहीं इतिहासकारांना वाटतें. रोमनें या कालांत जगाला व्हर्जिल्, ओव्हिड् व होरेस्सारखे कवि, पोलिबिअस् व प्लुटार्कसारखे इतिहासकार, लुशिअन् व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लुक्रेशियसुसारखे विचारवंत लेखक दिले. अर्थात् यांनींहि कोठें शाळा काढल्या होत्या किंवा त्यांचीं कोठें विद्यापीठें होतीं याबद्दलहि उल्लेख नाहींत.

इतकें मात्र खरें कीं रोमन् साम्राज्यांतील राजे लोकांनीं व नागरिकांनीं ग्रीस येथील तत्त्वज्ञान आपल्या लोकांना शिकविलें जावें म्हणून प्रयत्न केले. व्याकरण-शास्त्र व अलंकारयुक्त वक्तृत्वशास्त्र यांवर विशेष जोर देण्यांत येई. ज्युलिअस् सीझरनें बाहेरील शिक्षकांना रोमन नागरिकाचे अधिकार बहाल केले. नंतरच्या सम्राटांनींसुद्धां शक्य त्या सवलती शिक्षकांना दिल्या व विद्येला उत्तेजन दिलें. मार्कस् ऑरेलिअस्नें तर अथेन्स शहरीं अकॅडेमिक, पेरिपॅटेटिक्, स्टॉइक् व एपिक्युरिअन् तत्त्वज्ञान शिकविण्याकरितां खास दोन दोन प्राध्यापकांची सोय केली होती. रोमन लेखकांपैकीं क्विन्टिलिअन् हा एक प्रसिद्ध शिक्षक असूनसुद्धां त्यानें केवळ प्राथमिक शिक्षणाबद्दलच लिहून ठेविलें आहे. उच्च प्रकारच्या शिक्षणा-बद्दल विशेषतः विद्यापीठांबद्दल त्यानें लिहून ठेवलें नाहीं. तरी पण सर्वप्रकारें विचार करतां रोमन लोकांची संस्कृति मात्र अधिक व्यवहार्य व योजनाबद्ध ठरली. कारण रोमन लोकांच्या शिक्षणाच्या प्रयत्नामुळें हस्तलिखितें लिहिलीं जाऊं लागलीं व त्यांची संख्याहि वाढूं लागली. लोकोपयोगी कायदेकानू तयार होऊं लागले व ते कायमचे टिकाऊ ठरतील असें वाटूं लागलें.

ग्रीक व रोमन संस्कृतींवर आघात

अशाप्रकारें सर्व युरोपवर शिक्षण व संस्कृति यांचा प्रसार झाला. रोमन साम्राज्य सर्व युरोपवर पसरल्यामुळें व त्यांनीं आपली संस्कृति सर्वच ठिकाणीं कायमची टिकावी असा प्रयत्न केल्यामुळें युरोपवर कांहीं निराळेंच संकट येणार आहे व या संस्कृतीचा लोप व्हावयाचा आहे याची कोणाला शंकाहि येणें शक्य नव्हतें. निसर्गाच्या एकंदर कार्याचा विचार करतां कोठें काय शिजत आहे व त्याचा कोठें स्फोट व्हावयाचा आहे हें कोणासहि कळणें शक्य नाहीं. या कालांत युरोपमध्यें तसेंच झालें. बाल्टिक समुद्राच्या खालच्या अंगाला राहणाऱ्या गॉथ लोकांनीं फ्रान्स व इटलीवर स्वारी करून ते देश जिंकून घेतले. तेथें त्यांनीं आपलें राज्य स्थापलें आणि आपली संस्कृति लादण्याचा प्रयत्न केला. हें इसवी सनाच्या तिसऱ्या शतकांत झालें. रोमन् साम्राज्याला व त्यानें केलेल्या शिक्षण व संस्कृति यांच्या प्रसाराच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कार्याला जोराचा धक्का बसला. तोंच इ. स. च्या ४ थ्या व ५ व्या शतकांत मंगोलियांतील हूण नांवाच्या रानटी जातीनें आपली दृष्टि युरोपवर फिरविली. ह्या जातीनें भारतीय संस्कृतीची उत्तरेस कशी धुळधाण केली हें पूर्वीं निरनिराळ्या वेळीं सांगितलेंच आहे. हूण ही जात अत्यंत राकट, क्रूर व ठेंगू. यांची एकदां टोळधाड आली कीं झालेंच सर्व वाटोळें. या हूण लोकांनीं ॲट्टिलाच्या नेतृत्वाखालीं युरोप पादाक्रांत करून गॉथ लोकांना रेटीत रेटीत थेट डॅन्यूब पार केली. जी कांहीं ग्रीक व रोमन संस्कृति शिल्लक होती ती पार नाहींशी झाली. इतक्यानेंच थांबलें नाहीं. याच सुमारास जर्मनीच्या ईशान्य भागांतून वंदल नांवाच्या एका भयंकर जातीनें फ्रान्स, स्पेन, आफ्रिकेचा उत्तर किनारा व रोमन साम्राज्य यांच्यावर स्वाऱ्या करून जिकडे तिकडे रक्तपात व नाश यांचें सत्र सुरू केलें. शिल्लक राहिलेल्या वाङ्मयाचा नाश केला; संस्कृति नाहींशी केली.

पण युरोपची दुर्दशा इतक्यानेंच संपली नाहीं. इ. स. च्या ५ व्या व ६ व्या शतकांत फ्रँक्स् व सॅक्सन्स् या उत्तर जर्मनींतील लोकांनींहि थेट इंग्लंडपर्यंतचा प्रदेश काबीज केला. झालें, युरोपच्या उघड्या संपत्तीवर व संस्कृतीवर हल्ले झाले व संपत्तीची मोकळ्या हातानें लूट झाली. आकाशच कोसळल्यावर त्याचा कोण कसा प्रतिकार करणार ? यामुळें ६ व्या शतकानंतर यूरोप बेचिराख झालेल्या स्थितींत पहावयास मिळाल्यास आश्चर्य नाहीं. संपत्ति तर लुटली गेलीच, पण युरोपांतील संस्कृतीहि नाहींशी झाली. लोकांना स्वतःच्या जीविताचीसुद्धां शाश्वती राहिली नाहीं. फार काळपर्यंत टिकणारें तमोयुग (Dark Ages) सुरू झालें व तें इ. स. च्या १३ व्या शतकापर्यंत टिकलें.

म्हणजे इ. स. च्या १३ व्या शतकापर्यंत युरोपांत ख्यातनाम तर नाहींच पण इतिहासांत निर्देश केलेलेंहि एकसुद्धां विद्यापीठ असणें शक्यच नव्हतें. नाहीं म्हणावयास ‘ अथेन्स विद्यापीठा ’चा उल्लेख निरनिराळ्या वेळीं केलेला आढळतो. पण विद्यापीठाची आपली जी कल्पना आहे त्या अर्थानें अथेन्स हें विद्यापीठ खास नव्हतें. पहा काय विचित्र योगायोग ! ज्या काळांत भारतांतील शेंकडों ख्यातनाम विद्यापीठांचा अंत झाला व ज्या काळापासून भारतावर अज्ञानरूपी काळोखाची छाया पसरूं लागली त्याच सुमारास म्हणजे १३ व्या शतकांत युरोपांतील काळरात्र संपल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं व तेथें शेंकडों विद्यापीठें निघालीं !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ख्रिस्ती धर्मांचा प्रसार

तमोयुग संपून विद्याप्रसाराला १३ व्या शतकानंतर ज्या गोष्टी कारणीभूत झाल्या त्यांत ख्रिस्ती धर्मांचा प्रसार ही एक महत्त्वाची गोष्ट आहे. आशिया खंडाच्या पश्चिमेकडील एका टोंकाला असलेल्या देशांत ख्रिस्ताचा जन्म होऊन ७००–८०० वर्षें झालीं होतीं. ज्या ठिकाणीं ख्रिस्ताचा जन्म झाला तो व त्याच्या आजूबाजूचा भाग असा होता कीं जेथें वर निर्दिष्ट केलेल्या रानटी हल्ल्यांची झळ फारशी पोहोचूं शकली नाहीं. या धर्मांच्या प्रसाराचें काम ख्रिस्ताचे शिष्य व नंतरच्या काळांत पॉलसारखे त्याचे भक्त व अनुयायी करीत होते. तरी या धर्मांचा चांगला प्रसार व्हावयाला जवळजवळ १,००० वर्षें लागलीं. या अवधींत म्हणजे इ. स. च्या सहाव्या शतकांत बेनेडिक्ट या ख्रिस्तभक्तानें 'मठा' (monastery) ची कल्पना प्रसृत केली व ती सर्वत्र मान्य झाली. पूर्वी या मठांतून त्याचप्रमाणें गुहेंतून साधू रहात, पण ख्रिस्ती धर्मांचा योजनाबद्ध व सुव्यवस्थेशीर प्रसार करणें हें काम त्यांच्यापुढें नव्हतें. मिशनरी काम सुरू करण्याचें कार्य आतां सुरू झालें व बेनेडिक्टच्या योजना अंमलांत येऊं लागल्या. या कार्याला कॉन्स्टन्टाइन् द ग्रेट व थिओडोसिअस्सारख्या राजे लोकांनीं मदत केली. ख्रिस्ताचे विचार पसरविणें व शांततेचे व सुखाचें राज्य स्थापण्याचा प्रयत्न करणें व ख्रिस्ती नसणाऱ्या लोकांना ख्रिस्ती करून घेणें हें ध्येय मिशनरी लोकांनीं आपल्या डोळ्यापुढें ठेविलें. अज्ञानी जनांना ते सज्ञान करूं लागले. व यामुळेंच तमोयुगाच्या नंतरच्या कालांत शिक्षणाबद्दल लोकांना आवड उत्पन्न झाली. मठाधिपति व प्रचारक तयार करण्याकरितां शाळा निघूं लागल्या.

मठांतून धर्मप्रचारकांना शिक्षण देण्याचें कार्य चालू असतां ९ व्या शतकांत शार्लमन्सारखे विद्याप्रेमी सम्राट् जन्मास आले. त्यांनीं आपल्या दरबारांत थोरथोर विद्वानांना आश्रय दिला. त्यामुळें थेट इंग्लंडांतून आल्सुइन् (Alcuin) सारखे विद्वान् शार्लमनच्या दरबारांत आले. पाद्र्यांकरितां शाळा उघडण्यांत आल्या व जनतेला अज्ञानगर्तेतून ओढून काढण्याचा प्रयत्न सुरू झाला. लॅटिन् भाषेच्या व ग्रंथांच्या अभ्यासास चालना मिळाली. जे ग्रंथ व जीं हस्तलिखितें शिल्लक होतीं तीं वाचलीं जाऊं लागलीं, व पुनः एकदां क्षितिजावर ज्ञानसूर्याचीं किरणें दिसूं लागलीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पण १० व्या शतकांत पुनः एकदां रक्तपात व अराजक सुरू झालीं. मागील शतकांनाहि मागें टाकण्यांत आलें. अरबस्तान, हंगेरिया व उत्तरेकडील प्रदेशांतून पुनः एकदां रानटी हल्ले सुरू झाले. मठांत जें कांहीं ज्ञान होतें त्याचा पुनः एकदां लोप होऊं लागला. मठ जाळण्यांत आले किंवा उध्वस्त केले गेले. मठांतील लोकांनीं आपल्या खांद्यावर जितक्या वस्तू नेतां येतील तितक्या नेल्या व वाट फुटेल तिकडे ते जाऊं लागले. पुनः एकदां अंधार पसरला.

ज्ञानरवीचा अरुणोदय

११ व्या शतकांत युरोपवर पुनः एकदां शांततेचें वातावरण पसरलेलें दिसूं लागलें. लॅन् फ्रॅन्क्, सेन्ट् अ‍ॅन्सेल्म, गरबर्ट, बुलबर्ट् यांसारख्या शिक्षकांनीं पुनः एकदां लोकशिक्षणाला चालना दिली व मध्ययुगाला सुरवात झाली. १२ वें शतक उजाडलें. काळरात्र संपल्याचीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं. ज्ञानरवीचा अरुणोदय झाला. झपाट्यानें तो वर येऊं लागला. लोकांना, मठाधिकाऱ्यांना, सरदारांना, राजे लोकांना ज्ञान मिळविण्याबद्दल इच्छा उत्पन्न झाली. आठव्या शतकापासून या कालापर्यंत ख्रिस्ती प्रचारक तयार करण्याचें व त्यांना ख्रिस्ती धर्माच्या प्रसाराकरितां निरनिराळ्या ठिकाणीं पाठविण्याचें कामहि चालूच होतें. या ख्रिस्ती प्रचारकांनीं हें शिक्षणाचें काम उचलून धरलें. एका शतकाच्या आंत म्हणजे १३ व्या शतकाच्या आरंभीं तर नुसत्या शाळाच नव्हे तर मोठमोठाल्या शहरीं, विशेषतः बोलोना, पॅरिस, सालेर्नो, ऑक्सफर्ड, नेपल्स, व्हिसेन्झा, अ‍ॅरेझो, पदुआ, किती तरी ठिकाणीं विद्यापीठें निघालीं. दोन शतकें—म्हणजे १५ व्या शतकापर्यंत—तर हें काम फारच जोरानें सुरू झालें. पुष्कळ उपटसुंभ विद्यापीठेंहि निघालीं. पण एकंदरींत या कालांत मोठमोठीं विद्यापीठें स्थापन झालीं, व त्यांचा परिणाम सर्व युरोपवर पुढील शतकांतून दिसूं लागला.

युरोपीय विद्यापीठें कोणत्या कारणांमुळें निघालीं ?

या शेंकडों निरनिराळ्या विद्यापीठांचा साद्यन्त इतिहास येथें देण्याचा विचार नाहीं. पण हीं जीं विद्यापीठें स्थापन झालीं त्यांचें वैशिष्ट्य काय, त्यांतील शिक्षक व विद्यार्थी कसे होते व त्यांचें स्थान या विद्यापीठांत काय होतें, या विद्यापीठांतून कोणकोणते विषय शिकविले जात, या विद्यापीठांचा कारभार कोण कसा करी,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राजे लोकांनीं व धर्मप्रचारकांनीं या बाबतींत कोणती कामगिरी केली, या विद्यापीठांचा खर्च कसा भागविण्यांत येई, तेथें ग्रंथसंपत्ति किती होती, निरनिराळ्या विद्यापीठांतून ऐक्यभाव कसा असे वगैरे बाबींसंबंधानें त्रोटक माहिती दिल्यास प्राचीन भारतीय विद्यापीठें व प्राचीन युरोपीय विद्यापीठें यांच्या कामगिरीची तुलना करतां येईल.

तमोयुगाची छाया युरोपवर पडण्याअगोदर म्हणजे इ. स. पू. ७ व्या शतकापासून इ. स. च्या ३ ऱ्या शतकापर्यंत अर्थात् जवळ जवळ १००० वर्षें युरोपमध्यें विचारप्रवर्तक व क्रियात्मक कार्य सुरू झालें. या कार्याचा आरंभ युरोपच्या आग्नेय भागांतील एका अगदीं लहानशा भागांत झाला व तेथून तें कार्य वर वर सरकत गेलें म्हणून वर सांगितलें. युरोपांत पसरणाऱ्या ज्ञानोदधीच्या लाटेचा आरंभ ग्रीस देशापासून झाला; ती लाट इटलीमध्यें गेली; तेथूनच ती युरोपच्या सर्व दिशांतून पसरली.

आतां तमोयुग संपल्यानंतर जीं भरमसाट विद्यापीठें युरोपच्या सर्व भागांत निघालीं तीं कोणत्या कारणांमुळें स्थापन झालीं व तीं एकदम कशीं निघूं शकलीं हें पहावयाचें आहे.

(१) ख्रिस्ताच्या जन्मानंतर तीनशें वर्षांनीं ख्रिस्ती धर्माची चळवळ दिसूं लागते. इ. स. च्या आठव्या शतकांत तर या धर्मानें बरीच प्रगति केली होती हें आपण मागें पाहिलेंच आहे. बेनेडिक्टच्या मठाच्या कल्पनेला जोराची चालना मिळून या मठांतून मिशनरी लोकांकरितां शाळा सुरू झाल्या व ब्रह्मविद्येचें शिक्षण देण्यांत येऊं लागलें. बाराव्या शतकापर्यंत धर्माचा प्रसार करण्याचें हें काम चर्चसंस्थेनें फारच उत्साहानें केलें. यामुळें बाराव्या शतकानंतर जीं जीं विद्यापीठें निघालीं तीं बऱ्याच अंशानें या धार्मिक भावनेनें निघालीं. अर्थात् याच गोष्टीमुळें या विद्यापीठांवर पोपचें वर्चस्व पूर्णपणें दिसतें. मध्ययुगांतील हीं विद्यापीठें पोपनें दिलेल्या आज्ञापत्रका(Bull)शिवाय निघूं शकलीं नाहींत ही गोष्ट महत्त्वाची आहे. पोपच्या मान्यतेवाचून निघालेल्या विद्यापीठांना व त्यांनीं दिलेल्या पदव्यांना बाजारांत जराहि मोल नव्हतें.

(२) पण युरोपमध्यें, विशेषतः इटली व फ्रान्समध्यें, जीं विद्यापीठें भरमसाट निघालीं त्याला कारण विद्यार्थी व शिक्षक. ॲरेझो विद्यापीठ तर केवळ शिक्षकांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फुटीर वृत्तीमुळें निघालें (इ. स. १२१५). शिक्षक व विशेषतः विद्यार्थी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जात व विद्यापीठ काढीत.

(३) कांहीं विद्यापीठें राजे लोकांच्या किंवा जहागिरदारांच्या शिक्षणप्रेमामुळें व त्यांच्या उत्साहामुळें निघालीं. कॅस्टाइलचा राजा ८ वा अल्फॉन्झोनें इ. स. १२०८ सालीं पॅलेन्शिया (स्पेन) विद्यापीठ स्थापलें; तर लिऑनच्या ९ व्या अलफॉन्झोनें सॅलामान्का विद्यापीठाची इ. स. १२२७ सालीं स्थापना केली. नेपल्ससारखीं विद्यापीठें तर राजा व पोप यांच्या लेखणीच्या एका फटकाऱ्यानें निघालीं.

(४) कांहीं विद्यापीठें गांवकरी व स्थानिक संस्था यांच्या उत्साहामुळें स्थापन झालीं. विद्वान् लोक आपल्या गांवीं आले तर आपल्या गांवाची कीर्ति वाढेल या महत्त्वाकांक्षेनें कित्येक लोकांनीं बाहेरून विद्यार्थी व शिक्षक यांना बोलाविलें व विद्यापीठें स्थापन केलीं. व्हर्सेलि (इटली) (१२२८), सिएना (१२४६), व्हॅलेन्शिया (स्पेन) (१३७४) हीं विद्यापीठें या कारणामुळेंच अस्तित्वांत आलीं.

(५) अंतर्गत भांडणामुळें कांहीं विद्यापीठें बंद पडत किंवा कांहीं काळ त्यांचें काम स्थगित होई. अशा वेळीं तीं विद्यापीठें तेथून हलवून दुसरीकडे नेत; मूळच्या विद्यापीठांत सुस्थिति झाल्यावर तीं पुनः सुरू होत व नवीन निघालेलीं विद्यापीठें बंद पडत. लिस्बन्चें विद्यापीठ बंद होऊन अशाच कारणामुळें कोइंब्राला नेण्यांत आलें (१२९०). प्रेग विद्यापीठांतील भांडणामुळें लाइप्झिग् (१४०९) व रॉस्टॉक् (१४१९) विद्यापीठें निघालीं. पण रॉस्टॉक् येथें एक लोकक्रांति झाली; राजास घालवून लावण्यांत आलें; तेव्हां पोपनें त्या शहरास वाळींत टाकलें; व तेथील विद्यापीठानें शहरांतील लोकांशीं कोणत्याहि प्रकारें संबंध ठेवूं नये म्हणून त्यांस बजावण्यांत आलें. तेव्हां तेथें कोणास राहतां येणें शक्य नसल्यानें विद्यापीठ ग्राइफ्स्वॉल्ड्ला हलविण्यांत आलें (१४५६); पण रॉस्टॉक् येथें पुनः शांतता झाल्यावर ग्राइफ्सवॉल्ड्चें विद्यापीठ बंद झालें.

अशाप्रकारें निरनिराळया कारणांमुळें युरोपमध्यें विद्यापीठें स्थापन झालीं. प्राचीन भारतीय विद्यापीठें मात्र केवळ चारित्र्यवान् व ज्ञानी शिक्षकांमुळेंच निघालीं. जेथें जेथें अशा प्रकारचे शिक्षक जात तेथें तेथें त्यांच्या सभोंवतीं विद्यार्थ्यांची परंपरा उत्पन्न होई व नंतर त्या स्थानाचें विद्यापीठांत रूपांतर होई. शिक्षणा-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सारखी दुसरी पवित्र गोष्ट नसल्यामुळें राजे लोक, व्यापारीवर्ग व इतर लोक यांजकडून या विद्यापीठांना निरनिराळ्या प्रकारें मदत होई. केवळ विद्यार्थी व शिक्षक यांच्या भांडणामुळें निघालेल्या एकाहि विद्यापीठाचा उल्लेख भारतीय प्राचीन ग्रंथांत नाहीं.

धर्मप्रचारकांचें कार्य

पाश्चात्य विद्यापीठांच्या बाबतींत धर्मप्रचारकांनीं जी कामगिरी केली त्यांत व भारतीय प्राचीन विद्यापीठांतील धर्मप्रचारकांच्या कामगिरींत बरेंच साम्य दिसतें. आपल्याकडे जीं विद्यापीठें निघालीं त्यांत जैन, बौद्ध व वैदिक या तीनहि पंथांतील लोकांची, विशेषतः जैन व बौद्ध धर्मप्रचारकांची, कामगिरी विशेष प्रशंसनीय आहे. जैन प्रचारकांनीं प्रामुख्यानें वणिग्वर्गाचा व बौद्ध प्रचारकांनीं खालच्या थरावरील लोकांचा आश्रय घेतला. दोनहि प्रकारच्या प्रचारकांनीं प्रचारक तयार करण्याकरितां विहार काढले व भारतांत त्याचप्रमाणें भारताबाहेर शेंकडों विद्यापीठें स्थापन केलीं. ख्रिस्ती मिशनऱ्यांनींसुद्धां सर्व शिक्षणाचीं सूत्रें आपल्या हातांत ठेवून सर्व युरोपभर विद्यापीठांना चालना दिली. बिशपची संमति व आशीर्वाद यांवाचून व पोपचें आज्ञापत्र (Bull) मिळाल्यावाचून एकहि विद्यापीठ निघूं शकलें नाहीं; व यामुळें प्रत्येक विद्यापीठाच्या कारभारांत धर्माधिकाऱ्यांचा शिरकाव होऊं लागला. तरी पण आपल्याकडील प्रचारक व युरोपांतील प्रचारक यांत एक महत्त्वाचा फरक पहावयास मिळतो; तो म्हणजे आपल्या इकडील प्रचारकांनीं शाळा व विहार स्थापन केले व शिक्षणाची सर्व जबाबदारी स्वतःवर घेतली, तशी पाश्चात्य मिशनऱ्यांनीं युरोपमध्यें घेतली नाहीं. त्यांनीं फक्त सत्ता आपणांकडे ठेवली. बाकी विद्यापीठाचा कारभार विद्यार्थी, शिक्षक, गांवांतील लोक व राजे यांच्याकडेच राहिला. त्यामुळें या विद्यापीठांवर एक प्रकारचा अनिष्ट परिणाम घडूं लागला. विद्यापीठांतील विद्यार्थी व शिक्षक आणि गांवकरी यांच्यांत नेहमीं सत्तेकरितां भांडणें होऊं लागलीं. शिक्षक व विद्यार्थी यांच्यांतहि भांडणें होत व धर्माधिकारी विद्यार्थ्यांची बाजू उचलून धरीत. बोलोना विद्यापीठांतील भांडणांत ही गोष्ट स्पष्ट दिसते.

पाश्चात्य विद्यापीठांच्या बाबतींत कांहीं ठिकाणीं राजे लोक व जहागिरदार यांनींहि मदत केल्याचें दिसून येईल. तरी पण आपल्याकडील गुप्त राजे, पाल राजे किंवा मैत्रक राजे यानीं ज्या प्रकारें विद्यापीठें सुस्थिर करण्याचे प्रयत्न केले

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तशा रीतीनें युरोपीय राजांनीं ठळकपणानें प्रयत्न केल्याचें पाश्चात्य विद्यापीठांतून दिसून येत नाहीं. नालंदा विद्यापीठाची उत्तम प्रकारें व्यवस्था व्हावी म्हणून त्याच्या खर्चाकरितां २०० खेडीं देण्यांत आलीं; विक्रमशिला विद्यापीठ चालविण्यांत अखंडितता रहावी म्हणून १०८ कायम शिक्षकांची सोय करण्यांत आली; वलभी विद्यापीठांत तर ग्रंथ विकत घेतां यावेत म्हणून राजे लोकांनीं सोय करून ठेविली. अशा प्रकारें एकाहि युरोपिअन राजानें केलेलें दिसत नाहीं. नाहीं म्हणावयास कांहीं कांहीं विषयांकरितां खास शिक्षकांची सोय कांहीं विद्यापीठांतून केलेली दिसते; पण राजे लोकांचा त्यांत फारसा हात असलेला दिसत नाहीं. त्याचप्रमाणें आपल्या पदरीं जगद्विख्यात विद्वान् लोक ठेवलेल्या राजांचीं नांवेंहि पाश्चात्यांच्या इतिहासांत फारशीं मिळत नाहींत.

मध्ययुगीन युरोपीय विद्यापीठांतील विद्यार्थी

कोणतेंहि विद्यापीठ म्हटलें कीं त्यांत विद्यार्थी व शिक्षक हेच प्रामुख्यानें येणार. या दोघांना त्यांतून वगळलें कीं विद्यापीठ शब्दाला अर्थच राहणार नाहीं. विद्यापीठ शब्दांत चार गोष्टींचा अन्तर्भाव स्पष्ट दिसतो : विद्या घेणारा वर्ग, विद्या देणारा वर्ग, विद्यांचे प्रकार व विद्या देण्याचें स्थान. बाकीच्या इतर सर्व गोष्टी यांवर अवलंबून. तेव्हां पाश्चात्य विद्यापीठांच्या बाबतींत विद्या घेणारा वर्ग कसा होता व त्या त्या पीठांतून त्याचें स्थान काय होतें याचा विचार या पुढील परिच्छेदांतून करावयाचा आहे.

मध्ययुगीन युरोपीय विद्यापीठांचा इतिहास वाचला म्हणजे आपणांस असें दिसून येईल कीं पाश्चात्यांच्या तत्कालीन विद्यापीठांत विद्यार्थ्यांना जें स्थान होतें तें इतरत्र कोठेंहि पहावयास मिळणार नाहीं. भारतीय विद्यापीठांतील सर्व सूत्रें शिक्षक हलवीत, तर युरोपीय विद्यापीठें केवळ विद्यार्थ्यांच्या आधीन. तमोयुग संपल्यानंतर शिक्षणाची चळवळ ज्या वेळीं जोरानें फोंफावूं लागली त्या वेळीं प्रत्येक ठिकाणच्या विद्यार्थ्यांना वाटूं लागलें कीं आपण शिक्षण घेण्यास एखाद्या शिक्षणसंस्थेंत जावें त्या वेळच्या शिक्षणसंस्थांना 'स्टडियम्' म्हणत. त्यांत एका विशिष्ट विषयाचें किंवा कांहीं विशिष्ट विषयांचें शिक्षण ठराविक मर्यादेपर्यंत देण्यांत येई. त्यांची पुढें वाढ होऊन विशिष्ट प्रकारचें—विशेषतः वैद्यकीय, कायदा, ब्रह्मविद्या व इतर कला यांचें—शिक्षण त्यांत देण्यांत येऊं लागलें. अशाप्रकारें 'स्टडियम्' चे दोन विशिष्ट प्रकार झाले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एक 'स्टडियम् पर्टिक्युलेर' व दुसरा 'स्टडियम् जनरेल्'. ज्यांना आपण आज 'युनिव्हर्सिटी,' 'विद्यापीठ' वगैरे शब्दांनीं संबोधितों त्यांचेंच कार्य 'स्टडिमूय जनरेल' करीत असत; व तींच मध्ययुगीन विद्यापीठें. सालेर्नो, बोलोना, पॅरिस व ऑक्सफर्ड हीं विद्यापीठें तेराव्या शतकाच्या आरंभीं आरंभीं स्थापन झालीं व तींच पुढें अत्यंत महत्त्वाचीं विद्यापीठें ठरलीं. जो तो विद्यार्थी या विद्यापीठांकडे धांव घेऊं लागला. अशा रीतीनें निरनिराळ्या राज्यांतून, निरनिराळ्या देशांतून विद्यार्थी या विद्यापीठांत येऊं लागले. पण त्या काळीं ज्या राज्यांत हीं विद्यापीठें असत तेथील नागरिकांना असणारे हक्क या बाहेरून आलेल्या विद्यार्थ्यांना मिळणें अर्थातच शक्य नव्हतें. तेव्हां हे विद्यार्थी गट करून राहूं लागले; त्यांचे निरनिराळे संघ बनले. अशा या गटांना किंवा संघांना 'नेशन' (Nation) म्हणत. अशा प्रकारें निरनिराळ्या देशांतील किंवा राज्यांतील विद्यार्थ्यांचीं निरनिराळीं नेशन्स असत. बोलोना व पॅरिस विद्यापीठांत महत्त्वाचीं अशीं चार नेशन्स होतीं. युरोपांतील विद्यापीठांचा कारभार बऱ्याच अंशीं या नेशन्सच्या ताब्यांत असे. हीं नेशन्स आपापले प्रतिनिधी (Proctor) निवडीत. या निरनिराळ्या संघांच्या सुरक्षिततेची सर्व जबाबदारी या प्रतिनिधींवर असे. विद्यापीठाचा जो सरसंघनायक (Rector) निवडून देण्यांत येई तोहि या प्रतिनिधींकडून. अशा प्रकारें विद्यापीठांत बरेचसे हक्क या विद्यार्थ्यांना मिळाल्यामुळें त्यांचें महत्त्व विद्यापीठांत वाढलें.

विद्यार्थी-विद्यापीठें

विद्यार्थ्यांचें महत्त्व वाढण्यास आणखी एक कारण झालें. ज्या वेळीं बोलोना, पॅरिस यांसारख्या ठिकाणीं हे विद्यार्थी जाऊं लागले व विद्यापीठें निघून नांवारूपास आलीं त्या वेळीं या विद्यार्थ्यांमुळें त्या गांवांची शोभा वाढली. गांवांतील व्यापारावरहि त्याचा परिणाम झाला. गांवांतील घरें विद्यार्थ्यांनीं भाड्यानें घेतल्यामुळें घरमालकांचें उत्पन्न वाढलें. विद्यार्थ्यांमुळें गांवांची वस्ती वाढली व व्यापारांतील इतर गोष्टींनाहि चालना मिळूं लागली. हे फायदे दिसल्यावर मुद्दाम सवलती देऊन इतर गांवचे लोक विद्यार्थ्यांना बोलावूं लागले. वर्सेलिच्या नागरिकांनीं विद्यार्थ्यांना उत्तम घरें देण्याचें कबूल केलें; विद्यार्थ्यांना व्याजानें पैसे देण्याचें कित्येक गांवांनीं ठरविलें; कित्येक गांवांनीं विद्यार्थ्यांना कराच्या बाबतींत सवलती देण्याचा इरादा दाखविला. हेतु हा कीं आपल्या गांवाला विद्यार्थी आले व विद्यापीठ निघालें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तर आपल्या गांवाची कीर्ति वाढेल व आपल्या गांवाला इतरहि व्यावहारिक फायदे होतील. अशा रीतीनें जेथें जेथें विद्यार्थी जाऊन विद्यापीठें निघालीं तेथें तेथें विद्यार्थ्यांनाच महत्त्व प्राप्त झालें; विद्यापीठांतील कारभारांत त्यांचे अधिकार वाढले व त्यांना स्वातंत्र्यहि भरपूर मिळालें. विद्यार्थ्यांमुळें निघालेल्या अशा विद्यापीठांना 'विद्यार्थी-विद्यापीठें' (Student–University) म्हणून संबोधण्यांत येतें.

विद्यार्थ्यांचे विद्यापीठांतील अधिकार

विद्यापीठाच्या अंतर्गत बाबतींत विद्यार्थ्यांना किती अधिकार होता हेंहि पाहणें आपणाला फारच मनोरंजक वाटेल. अध्यापकांची नेमणूक करण्याचीच गोष्ट घ्या ना. विद्यापीठांतील पगारी प्राध्यापक हे विद्यार्थीच नेमीत. या पगारी जागा ३ वर्षां-करितां असत. विद्यापीठांतील कारभारांतहि निरनिराळ्या विषयांच्या सर्व शाखांतील (faculty) विद्यार्थ्यांना मत देण्याचा अधिकार असे.

विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या कारभारांत असे निरनिराळे अधिकार मिळाल्या-मुळें मध्ययुगीन विद्यापीठांत विद्यार्थीवर्ग पुष्कळ वेळां बेताल झालेला दिसून येतो. त्यामुळें त्याचे व शिक्षकांचे पुष्कळ वेळां खटके उडत. त्याचप्रमाणें विद्यार्थी-गांवकरी व विद्यार्थी-चर्चचे अधिकारी यांचीं नेहमीं भांडणें होत. असें झालें म्हणजे विद्यार्थी एक फार प्रभावी अस्त्र उपयोगांत आणीत. तें म्हणजे तें विद्यापीठ बंद पाडणें. अशा प्रकारें एक विद्यापीठ बंद पडलें म्हणजे विद्यार्थ्यांना इतर गांवांहून आमंत्रणें येत व तेथें त्यांना सवलती मिळत. अशा प्रकारें सवलती मिळाल्यावर त्या गांवीं नवीन विद्यापीठ निघे. बोलोनाहून फुटून निघालेल्या विद्यार्थ्यांमुळें इटलींतील विसेन्झा, पदुआसारख्या विद्यापीठांचा जन्म झाला.

विद्यार्थ्यांची अधिकारलोलुपता

विद्यार्थ्यांचें महत्त्व वाढल्यामुळें त्याच्यांत अधिकारलोलुपता जागृत झाली व विद्यापीठ चालविण्याच्या कामांत ते अधिकार मिळवूं लागले. कित्येक प्राध्यापकाची तर ते निवड करीतच, पण मॉन्ट्पेलिअर विद्यापीठांतील विद्यार्थी तर एकादा प्राध्यापक कर्तव्यच्युत दिसून आल्यास किंवा तो विद्यार्थ्यांच्या हक्कांवर गदा आणीत आहे असें त्यांस आढळून आल्यास त्याची कानउघडणीहि करीत. बोलोना विद्यापीठांत प्राध्यापकांच्या वागणुकीवर देखरेख ठेवण्याकरितां एक मंडळ असे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व तें प्राध्यापकांचे दोष सरसंघनायकास (Rector) कळवीत. पिसा विद्यापीठांत प्राध्यापक वेळेवर येतात किंवा नाहीं व नियमितपणें शिकवितात किंवा नाहीं हें टिपून ठेवण्याचें काम कांहीं मंडळांकडे सोंपविलेलें असे.

विद्यापीठांतील कारभाराकडे विद्यार्थ्यांचें लक्ष किती होतें हें ॲंजर्स विद्यापीठांतील एका घटनेवरून पहावयास मिळतें. या विद्यापीठांत विद्यार्थी व प्राध्यापक यांच्यांत विद्यापीठांतील खर्चासंबंधानें भांडणें सुरू झालीं. शेवटीं विद्यापीठाच्या खर्चावर देखरेख ठेवण्याकरितां हिशेबतपासनीस (Auditor) नेमण्याचा अधिकार विद्यार्थ्यांना मिळाला.

विद्यार्थी व प्राध्यापक, विद्यार्थी व गांवकरी, आणि विद्यार्थी व धर्माधिकारी यांच्या भांडणांबद्दल आतांपर्यंत बरेच वेळां उल्लेख केला, तेव्हां या विद्यार्थ्यांची प्रवृत्तीच भांडखोर असेल असें वाटण्याचा संभव आहे; पण तें केवळ तसें नव्हतें. आगामी भीतीच्या कल्पनेनें मनुष्य स्वतःच्या बचावाची योजना आगाऊच करीत असतो. त्याप्रमाणें परदेशांत आपणांस सुरक्षिततेनें रहावयास मिळावें या हेतूनेंच विद्यार्थी आपल्या अधिकारांस जपूं लागले. पण प्रत्येक प्रवृत्तीचा ज्याप्रमाणें पुष्कळ वेळां अतिरेक होतो त्याप्रमाणें तो येथेंहि होत असावा व त्यामुळेंच हीं भांडणें उद्भवत असावींत. बरें, गांव सोडून जाण्याची धमकी दिल्याबरोबर त्या गांवाची नाचक्की होण्याचा संभव; आर्थिक दृष्टयाहि गांवाची हानि; शिवाय दुसऱ्या गांवचे लोक या विद्यार्थ्यांना बोलावण्याला आतुर ! या सर्व गोष्टींमुळेंच विद्यार्थ्यांची अधिकारलोलुपता वाढली; संघ (Nations) बलवान् होऊं लागले; आणि त्यांतून विद्यापीठाचा मुख्य अधिकारी—सरसंघनायक (Rector)—तोहि इ. स. १३९७ पर्यंत विद्यार्थ्यांतूनच निवडला जात होता.

शिक्षकांनीं कोणकोणतीं पुस्तकें शिकवावींत, त्यांचीं व्याख्यानें केव्हां व कशीं ठरवावींत याबावतींत चर्चा करण्याकरितांहि विद्यार्थी व शिक्षक यांच्या सभा होत व अमकाच विषय घ्या किंवा अमकेंच पुस्तक शिकवा हें सांगण्याचा अधिकार विद्यार्थ्यांना असे.

इतकेंच नाहीं, तर विद्यार्थ्यांच्या संमतीवांचून विद्यापीठाच्या कायदेकानूंत बदलहि करतां येत नसे. मॉन्टपेलिअर विद्यापीठांत मात्र शिक्षक व विद्यार्थी यांच्यांत बरेंच

१३

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सख्य दिसून येतें. ते एकमेकांशीं सहकार्य करीत व एकमेकांचा सल्ला घेत. म्हणजे यांतहि विद्यार्थ्यांचेंच वर्चस्व दिसून येतें.

विद्यार्थ्यांची नीतिमत्ता

विद्यार्थ्यांच्या नीतिमत्तेसंबंधीं एक दोन गोष्टी सांगून हें विद्यार्थी-प्रकरण आटोपतें घेऊं.

बोलोना विद्यापीठांतील एका विद्यार्थ्यानें आपल्या कांहीं मित्रांच्या साहाय्यानें एका वकिलाच्या मुलीला पळविण्याचा कट केला. या प्रकरणांत अर्थात् त्या विद्यार्थ्याला शिक्षा झाली व प्रकरण फारच रंगलें. विद्यार्थ्यांनीं आपलें प्रभावी अस्त्र उपसलें. बोलोना सोडून ते सिएनाला गेले (इ. स. १३२१) आणि विद्यार्थ्यांचा विजय झाला.

मॉन्ट्पेलिअर् विद्यापीठाच्या इतिहासांत विद्यार्थी व गांवांतील लोक यांच्या भांडणाबद्दल माहिती मिळते. त्यांच्या तेढीचें एक कारण बाहेरून गांवांत दारू आणण्यासंबंधीं होतें. गांवांतील लोकांनीं तयार केलेल्या दारूव्यतिरिक्त इतर दारू बाहेरून आणतां कामा नये असा त्या गांवचा कायदा होता. पण बाहेरून आलेल्या विद्यार्थ्यांचें म्हणणें 'बाहेरून दारू आणण्याचा आमचा हक्क आहे.' या व अशा इतर गोष्टींवरून विद्यार्थी व गांवकरी यांचीं नेहमीं भांडणें होत व विद्यापीठें बंद पडत. या गोष्टी विद्यार्थ्यांच्या जीवनावर चांगलाच प्रकाश पाडतात.

मध्ययुगीन युरोपीय विद्यापीठांतील शिक्षक

मध्ययुगीन युरोपीय विद्यापीठांचा विचार करतां तेथील विद्वान् प्राध्यापकांबद्दल मात्र फार वाईट वाटतें. वास्तविक विद्यापीठांतील पहिलें स्थान विद्वान् शिक्षकांचें. त्यांची कीर्ति म्हणजेच विद्यापीठांची कीर्ति. चारित्र्यवान् शिक्षक म्हणजे विद्यापीठांचें वैभव. असें असतांना या विद्यापीठांतील पंडितांसंबंधानें आपणास काय पहावयास मिळतें ? या पंडितांचें जीवन ब-याच अंशीं विद्यार्थ्यांवरच अवलंबून असलेलें दिसून येईल. अर्थात् त्यांच्या विद्वत्तेबद्दल कोणासहि शंका नव्हती, हें निरनिराळे प्रसंग पाहिले म्हणजे सहज दिसतें. कोणत्याहि विद्यापीठाची कीर्ति त्या विद्यापीठांत किती विद्वान् लोक आहेत यावर अवलंबून असते. या एकाच गोष्टीवरून विद्वानांच्या विद्वत्तेबद्दल लोकांत असलेल्या आदराची कल्पना येते; व यामुळेंच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पॅलेन्शियासारखीं विद्यापीठें जेव्हां स्थापन करण्याची इच्छा एकाद्या राजपुरुषाला होई तेव्हां तो पॅरिस किंवा बोलोनाहून नामांकित प्राध्यापकांना पगार देऊन बोलावी. प्राध्यापकांचें किती महत्त्वाचें स्थान विद्यापीठांत होतें हें या गोष्टीवरून सिद्ध होतें. कांहीं प्राध्यापक न्यायालयांत गेले असतांना न्यायाधीशसुद्धां उठून उभे रहात व त्यांना आपल्या शेजारीं बसवीत.

हें सर्व असतांनासुद्धां प्राध्यापकांच्या जीवनाबद्दल वाईट वाटण्याचें मुख्य कारण म्हणजे इकडील विद्यापीठांतील अत्यंत महत्त्वाची व्यक्ति विद्यार्थी होती, शिक्षक नव्हती हें होय. विद्यापीठांकडून, गांवकऱ्यांकडून, राजांकडून व पोप आणि बिशप यांच्याकडून सवलती विद्यार्थ्यांना; त्यांचें कोणी नुकसान केलें तर त्याची भरपाई करून देण्यांत येई. शिक्षकांच्या बाबतींत अशा प्रकारचें सवलतीचें वातावरण दिसत नाहीं.

विद्यापीठांत शिक्षकांचे तीन प्रकार दिसतात. एक अत्यंत विद्वान् प्राध्यापकांचा म्हणजे 'डॉक्टरां'चा, दुसरा तज्ज्ञ शिक्षकांचा म्हणजे 'मास्टरां' चा व तिसरा ज्या शिक्षकांना 'डॉक्टर'ची पदवी मिळवण्यासाठीं सार्वजनिक परीक्षा देण्याची परवानगी मिळाली आहे अशांचा म्हणजे 'लायसेन्शिएट'चा. पण यांपैकीं पहिले दोन प्रकार जवळ जवळ सारख्याच दर्जाचे दिसतात. त्यांना कित्येक वेळां 'प्रोफेसर' ही उपाधि लावण्यांत येई. साधारणतः बायबलचा कायदा जाणणारे जे तज्ज्ञ असत त्यांना 'डॉक्टर' ही पदवी हमखास लावीत. आणि वैद्यक विषयांत किंवा वाङ्मयांत पारंगत असत त्यांना 'मास्टर' हें उपपद लावण्यांत येई. कित्येक वेळां 'मास्टर'-ऐवजीं 'मॅजिस्टर' हा शब्द उपयोगांत आणल्याचें दिसतें. १५ व्या शतकांत आंग्ल विद्यापीठांतून उच्च शिक्षण देणाऱ्या सर्व महत्त्वाच्या विषयांतील तज्ज्ञांना 'डॉक्टर' ही पदवी लावण्यांत येऊं लागली व व्याकरणादि कमी दर्जाचे विषय शिकविणाऱ्या तज्ज्ञांना 'मास्टर' ही पदवी प्राप्त झाली. एकंदरींत 'डॉक्टर' पदवी प्राप्त करणाऱ्यांना जास्त मान असे व आजहि तो तसाच चालू आहे.

आरंभीं आरंभीं 'डॉक्टर' पदवी प्राप्त केलेल्या विद्वानांनीं खासगी जागा भाड्यानें घेऊन विद्यापीठें काढलीं. तेथें एकादा शिक्षक व कांहीं विद्यार्थी असत आणि कांहीं ठराविक विषयच शिकविले जात. अशा संस्थांना 'स्टडियम् पर्टिक्युलेर' म्हणत. पण याचेंच रूपांतर नंतर 'स्टडियम् जनरेल'मध्यें होई. या दुसऱ्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकारच्या संस्थेंत व्याकरण, न्याय, अलंकारशास्त्र, वक्तृत्वशास्त्र, कायदा इत्यादि एकंदर ७ विषय शिकविले जात व प्रत्येक विषयाकरितां स्वतंत्र शिक्षक असे. या संस्था म्हणजेच विद्यापीठें. अशा विद्यापीठांमुळेंच निरनिराळ्या विषयांत पारंगत असे प्राध्यापक तयार होत. सॅलामान्का विद्यापीठांत तर 'संगीताचार्य' प्राध्यापकहि तयार होत; तरीपण या कालांत विशेष महत्त्व कायद्याला असे. यामुळेंच या सुमारास कायदा विषय शिकविणाऱ्या विद्यापीठांना व त्यांतून तयार झालेल्या पंडितांना सर्वत्र मान मिळे. यानंतरचें महत्त्व वैद्यक विषयाला असे. सालेर्नो, पदुआ, मॉन्टपेलिअर वगैरे ठिकाणचीं विद्यापीठें वैद्यक विषयामुळेंच प्रसिद्धीस आलीं. येथें दूर दूर ठिकाणचे विद्यार्थी वैद्यक विषय शिकण्यास येत. कांहीं कांहीं विद्यापीठांतून निरनिराळे भाषापंडित असत. रोमन कोर्ट या विद्यापीठांत ग्रीक, अरबी, खाल्डी, हिब्रू वगैरे भाषा शिकविणारे पंडित होते. सॅलामान्का विद्यापीठांतसुद्धां प्राच्य-भाषा-तज्ज्ञ असत. १२ व्या शतकांत दक्षिण फ्रान्सच्या शहरांतून ज्यू विद्वानांनीं अरबी भाषेंतून लॅटिन भाषेंत भाषांतरें केलीं. मॉन्टपेलिअर हें भाषांतर करण्याचें एक महत्त्वाचें ठिकाण होतें व तेथील पंडितांनीं अरबी भाषेंतून पुष्कळ वैद्यक ग्रंथांचें भाषांतर केलें.

अशा प्रकारें निरनिराळे विषय शिकविणारे जे विद्वान् प्राध्यापक त्यांच्या पगाराची व्यवस्था प्रथम प्रथम विद्यार्थ्यांच्या फीमधून होई. पण पुढें पुढें त्यांच्याकरितां स्वतंत्र पगारी जागा (Chairs) राखून ठेवण्यांत आल्या. कित्येक ठिकाणीं या जागेवर प्राध्यापकांची नेमणूक करण्याचें केवळ विद्यार्थ्यांच्या हातांत असे. पण नंतर शहरांतील लोक, नगरपालिका, सरदार व राजे यांनीं या पगारी जागेची सोय करून ठेवली. फ्लॉरेन्स विद्यापीठासारख्या कांहीं विद्यापीठांतून प्राध्यापकांना फार चांगलें वेतन मिळे. प्राध्यापकांच्या बाबतींत व्हॅलॅडॉलिड विद्यापीठांत तर एक फारच चांगली सोय करून ठेविली होती. या विद्यापीठांतील ज्या प्राध्यापकाची २० वर्षें नोकरी झाली असेल त्याचा एक उत्सव (Jubilee) करण्यांत येई. हा उत्सव झाल्यानंतर पुढील काळांत त्या प्राध्यापकानें आपलें शिकविण्याचें काम दुसऱ्यास सांगितलें तरी चाले. त्याचा पगार मात्र चालू राही. कांहीं कांहीं ठिकाणीं मात्र प्राध्यापकांना पागर न मिळाल्यामुळें संपहि करावा लागे. सॅलामान्का विद्यापीठांत अशाच कारणानें प्राध्यापकांचा संप झाला व विद्यापीठ बरींच वर्षें बंद पडलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिक्षकांचें जीवन

सर्व बाजूनें विचार करतां तत्कालीन प्राध्यापकांचें जीवन समाधानकारक व मानाचें दिसत नाहीं. त्यांच्या धंद्याला शाश्वती नसे. त्यांना बहुतांशीं विद्यार्थी, नागरिक, नगरपालिका, राजे, धर्माधिकारी वगैरेवर अवलंबून रहावें लागे. विशेषत: विद्यार्थ्यांवर तर त्यांना फारच अवलंबून रहावें लागे. पगारी प्राध्यापकाची निवड करण्याचें विद्यार्थ्यांच्या हातांत ! शिक्षकानें कोणतीं पुस्तकें शिकवावींत, त्यांतील विषय कोणते घ्यावेत, वर्षांतून किती व्याख्यानें शिक्षकानें द्यावींत, हें सर्व ठरवावयाचें विद्यार्थ्यांनीं ! यामुळें प्राध्यापकाचें जीवन फारच मानहानीकारक ठरे. विद्यापीठाच्या अन्तर्गत कारभारांतहि सत्ता जास्त विद्यार्थ्यांच्या हातांत ! यामुळें विद्यार्थी व शिक्षक यांच्यांत नेहमीं झगडे होत, आणि त्यांत शिक्षकाला नेहमीं नमतेंच घ्यावें लागे. त्यांतून विद्यार्थ्यांनीं विद्यापीठ बंद पाडण्याचें ठरविल्यास शिक्षकांचें शहाणपण लुलें पडे. याशिवाय शिक्षकाकडून कामचुकारपणा झाल्यास, त्याच्या येण्यांत अनियमितपणा दिसल्यास, त्याच्या शिकविण्यांत ढिलाई आढळून आल्यास शिक्षकाची कानउघाडणी करण्यास विद्यार्थीसंघ किंवा धर्माधिकारी सज्ज ! या सर्व गोष्टींचा विचार करतां मध्ययुगीन युरोपीय विद्यापीठांतील शिक्षकांचें जीवन स्पृहणीय होतें असें कोण म्हणेल ?

नाहीं म्हणावयास त्यांच्याजवळ एकच अधिकार असे. विद्यार्थ्यानें शिक्षण संपविल्यानंतर तो ‘ पंडित ’ (डॉक्टर) ही पदवी मिळविण्यास लायख आहे किंवा नाहीं हें त्यांनीं ठरवावयाचें. त्यांच्या संमतिवांचून कोणाहि विद्यार्थ्याला डॉक्टरची पदवी मिळविण्याकरितां परीक्षा देतां येत नसे. हें एक प्रभावी शस्त्र त्यांच्याजवळ असल्यामुळेंच त्यांचा मान राहिला.

हे शिक्षक धर्माधिकाऱ्यांच्याहि किती अधीन असत हें पुढील गोष्टीवरून कळून येईल. इ. स. १२८९ सालीं मॉन्ट्पेलिअर विद्यापीठांतील शिक्षकांनीं एका विद्यार्थ्यास नापास केलें. तेव्हां त्या विद्यार्थ्यास पास करण्याबद्दल धर्माधिकाऱ्यांनीं त्यांस सांगून पाहिलें; पण त्यांनीं तें नाकारल्यामुळें त्या शिक्षकांस कैद करण्यांत आलें व विद्यार्थ्यास पास करीपर्यंत त्यांची सुटका झाली नाहीं !

या सर्व गोष्टींचा परिणाम असा झाला कीं युरोपमध्यें पुष्कळ विद्यापीठें निघूनसुद्धां तीं फार काळ टिकूं शकलीं नाहींत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मध्ययुगीन युरोपीय विद्यापीठांत शिकविण्यांत येणारे विषय

विद्यापीठांत विद्यार्थी व शिक्षक यांव्यतिरिक्त तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे विद्या. लोकांना उपयुक्त पडेल अशी कोणती विद्या विद्यापीठांतून शिकविली जाते यावर विद्यापीठाचें महत्त्व अवलंबून. प्राचीन भारतीय विद्यापीठांतून वेद, वेदांगें, इतिहास, पुराणें, ब्रह्मविद्या, व्याकरण वगैरे विद्या व पुढें बौद्ध विद्यापीठांतून १८ शिल्पें आणि जैन विद्यापीठांतून पुरुषांना ७२ विद्या व स्त्रियांना ६४ कला शिकविण्यांत येऊं लागल्या. याप्रमाणें विद्यांची संख्या वाढत गेली व त्या शिकविणारे तज्ज्ञ आचार्य मिळूं लागले. त्याप्रमाणें युरोपीय विद्यापीठांतून अत्यंत प्राचीन कालीं म्हणजे इ. स. पू. ५०० ते इ. स. २०० पर्यंत काव्य, इतिहास, तत्त्वज्ञान हे विषयच शिकविले जात असावे, हें त्यावेळच्या तयार झालेल्या ग्रंथांवरून वाटतें. पण मध्ययुगांत मात्र कायद्याचें शास्त्र, ब्रह्मविद्या व वैद्यक या विषयांनाच महत्त्व दिलेलें दिसतें. या कालांत युरोपांत जीं विद्यापीठें गाजलीं त्यांत याच विषयांना प्राधान्य दिलेलें आहे. बोलोना विद्यापीठ तर कायद्याच्या शास्त्राकरितांच गाजलेलें. येथील विद्वान् पंडितांना राजदरबारीं सर्वत्र मान मिळे. सालेर्नो, मॉन्ट्पेलिअर व पॅरिस हीं विद्यापीठें वैद्यकीय ज्ञानाकरितां प्रसिद्ध होतीं.

पॅरिस विद्यापीठांत मुख्य चार विषय शिकविले जात. त्यांत वैद्यक, वाङ्मयादि कला, ब्रह्मविद्या व बायबलचा कायदा यांची गणना होते. वैद्यकीय ज्ञान प्राप्त करण्याकरितां ३२ महिन्यांचा अवधि पुरेसा मानण्यांत येई; पण पूर्ण ज्ञान मिळविण्यास आणखी ६ वर्षें लागत. अरबी वैद्यक पद्धतीचा येथें चांगलाच परिणाम दृष्टीस पडतो. कायद्याचा अभ्यास मात्र बोलोना, ऑर्लीन्स, अँजर्स, टुलूज वगैरे विद्यापीठांच्या मानानें फारच कमी प्रतीचा होता. या कायद्याच्या अभ्यासाला ४८ महिन्यांच्या अवधीचा अभ्यासक्रम असे व तो ६ वर्षेंपर्यंत लांबविण्यांत येई. वाङ्मयीन अभ्यासांत निरनिराळ्या वेळीं निरनिराळा फरक होत गेला. तरी सर्वसाधारण अभ्यासांत काव्य, व्याकरण, तर्कशास्त्र, अलंकारशास्त्र, वक्तृत्वशास्त्र, तत्त्वज्ञान, गणित, ज्योतिष, संगीत यांचा समावेश झालेला दिसतो. हाहि अभ्यासक्रम संपवावयास ६ वर्षांचा अवधि लागे. ब्रह्मविद्या व बायबलचा कायदा शिकण्यास १५।१६ वर्षें लागत.

हा झाला सर्वसाधारण अभ्यासक्रम. तरीपण कांहीं कांहीं विद्यापीठांची ठराविक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विषयांकरितां ख्याति असे. उदाहरणार्थ, प्रेसबर्ग, क्रॅको (पोलंड), व्हिएन्ना (ऑस्ट्रिया) वगैरे विद्यापीठें तेथें शिकविण्यांत येणाऱ्या गणितविषयक व ज्योतिष-विषयक अभ्यासाकरितां प्रसिद्ध असत. व्हिएन्ना विद्यापीठांत तर काव्य व अलंकार-शास्त्र यांच्या खास प्राध्यापकांची सोय करण्यांत आली होती. जर्मन विद्यापीठांत मानवधर्मशास्त्राला (humanism) विशेष स्थान प्राप्त झालें. प्राग विद्यापीठाला महत्त्वाचें स्थान प्राप्त होण्याला एक कारण या विद्यापीठांत शिकविण्याचें माध्यम लॅटिन होतें. त्यामुळें युरोपांतील निरनिराळ्या देशांतून विद्यार्थी या विद्यापीठांत येत. येथील ग्रंथ युरोपच्या निरनिराळ्या भागांत वाचले जाऊं लागले व येथून निरनिराळ्या कल्पना सर्व ठिकाणीं प्रसृत झाल्या. यामुळेंच ऑक्स्फर्ड, प्राग व पॅरिस यांचा संबंध चांगला राहिला.

ऑर्लीन्स विद्यापीठ वाङ्मयीन अभ्यासाकरितां प्रसिद्ध असे. येथें व्याकरणशास्त्र, अलंकारशास्त्र व प्राचीन वाङ्मयाचा अभ्यास जारीनें होई. टीकात्मक ग्रंथांकरितां या विद्यापीठाची ख्याति होती. पॅरिसची तर्कशास्त्राकरितां जितकी प्रसिद्धी असे तितकीच प्रसिद्धी ऑर्लीन्सची व्याकरणशास्त्राकरितां होती. मॉन्ट्पेलिअर विद्या-पीठांत इतर सर्व महत्त्वाचे विषय असून शिवाय तेथें विद्वान् ज्यू पंडित अरबी भाषेंतून लॅटिन भाषेंत भाषांतरें करीत. ग्रीक व लॅटिन भाषेंतूनहि येथें स्थानिक भाषेंत भाषांतरें होत. लल् या पाद्र्याच्या प्रेरणेमुळें पाल्मा विद्यापीठांत प्राच्य भाषेच्या (Oriental Studies) अभ्यासाची खास सोय करण्यांत आली होती. अर्थात् पाद्री तयार करणें हाच उद्देश त्याच्या मनांत होता. याच उद्देशानें सेव्हिले विद्यापीठांत-(स्पेन) सुद्धां या प्राच्य भाषा शिकविल्या जात. विशेषतः रोमन कोर्ट विद्यापीठांत तर ग्रीक, अरबी, खाल्डी आणि हिब्रू भाषा शिकविल्या जाव्या असें व्हिएन्ना येथें भरलेल्या सभेनें १३१२ सालीं ठरविलें. धर्मप्रचार हेंच या विद्यापीठांचें साध्य होतें. सॅलामान्का विद्यापीठ इतर गोष्टींकरितां ज्याप्रमाणें प्रसिद्ध होतें त्याचप्रमाणें संगीतशास्त्राच्या अभ्यासाकरितां पण प्रसिद्ध होतें. संगीतशास्त्राचें साद्यंत शिक्षण देण्याची येथें सोय होती. येथें संगीतविशारदाला पदवीहि देण्यांत येई. याप्रमाणें युरोपीय विद्यापीठांत निरनिराळे विषय शिकविण्याची सोय करण्यांत आली होती.

विद्यापीठाची जागा

मध्ययुगीन युरोपीय विद्यापीठांत शिक्षण देण्याची जागा बहुतेक सर्वच मोठाल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शहरांतून असे. त्यामुळें विद्यार्थ्यांचा व नागरिकांचा, त्याचप्रमाणें विद्यार्थी व राजे लोक आणि धर्माधिकारी यांचा, संबंध यावयाचा. याचा परिणाम असा झाला कीं शिक्षण किंवा शिक्षणसंस्था गांवांतील किंवा राज्यांतील शिक्षणाची गरज भागविण्यापेक्षां व्यावहारिक बाबतींतील गरज भागविणाऱ्या झाल्या. शिक्षणाचा उद्देश जर केवळ पोट भरण्याचें साधन मानलें तर या विद्यापीठांतून बाहेर पडलेल्या पदवीधरास किंवा पंडितास उपाशी मरण्याची पाळी येत नसावी. पण या बाबतींत विशेष संशोधन झालेलें दिसत नाहीं. त्यामुळें निश्चित असें कांहीं सांगतां येणार नाहीं. मात्र प्राध्यापक नोकरीकरितां एका गांवाहून दुसऱ्या गांवीं जात याबद्दल उल्लेख आहेत. म्हणजे नोकरीकरितां त्यांना भटकावें लागे. ही जर प्राध्यापकांची स्थिति तर विद्यार्थ्यांची स्थिति काय असेल सांगतां येत नाहीं. इतकें मात्र खरें कीं विद्यार्थ्यांपेक्षां शिक्षकांची स्थिति वाईट होती. याला एक कारण विद्यापीठ गांवांत असल्यानें विद्यार्थी वरचढ होत. त्यांच्यांत निरनिराळे दोष शिरत व विद्यार्थ्यांच्या पेशाला न शोभणारीं कृत्यें ते करीत. विद्यापीठ जर कोणत्याहि मोठ्या शहराहून दूर असतें तर विद्यार्थ्यांत निरनिराळे दोष शिरते ना; त्यांच्यांत व शिक्षकांत भांडणें झालीं नसतीं, कीं विद्यापीठें सोडून जाण्याची धमकीहि त्यांनीं दिली नसती. जेथें जेथें क्रियावान् व चारित्र्यवान् शिक्षक असण्याचा संभव तेथें तेथें विद्यार्थी दूरदूरहून धावत गेले असते. आणि शिक्षकांची स्थिति केविलवाणी व मानहानीकारक झाली नसती. युरोपांतील विद्यापीठांत हा एक मोठा दोष दाखवितां येण्याजोगा आहे.

विद्यापीठांतील खर्च कसा भागविण्यांत येई ?

युरोपांत निरनिराळ्या ठिकाणीं विद्यापीठें एकदम स्थापन झालीं त्यांचा खर्च कसा भागविण्यांत येई व तीं चिरस्थायी होण्याकरितां कोणते प्रयत्न करण्यांत येत हें आतां आपण पाहूं. विद्यापीठें स्थापन करण्याच्या कामांत प्रमुख अंग विद्यार्थी, नागरिक, नगरपालिका, राजे किंवा धर्माधिकारी यांचें असल्यामुळें त्यांना शिक्षकाचा पगार, विद्यापीठाच्या जागेचें भाडें, विद्यार्थ्यांच्या जेवण्याकरितां व विद्यापीठ चांगलें चालावें म्हणून अवश्य लागणारा पैसा या सर्वांची सोय करावी लागे. विद्यापीठ सुरू होण्याच्या आरंभींच्या स्थितींत शिक्षक विद्यार्थ्यांकडून फी घेऊन स्वतःचा चरितार्थ चालवी. ही फी प्रत्येक विद्यार्थ्याला किती द्यावी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लागे याबद्दल कोठेंच स्पष्ट उल्लेख नाहीं. पण ही फी ठरवितांना शिक्षक व विद्यार्थी यांत बरीच घासाघीस होई. विद्यार्थीसुद्धां वेळेवर फी देत नसल्या-मुळें शिक्षक नाराज होत व विद्यार्थ्यांची कानउघाडणी करीत. अशा प्रकारें कानउघाडणी केल्याबद्दल बरेच उल्लेख सांपडतात. एका वेळीं एका प्रसिद्ध कायदेपंडितानें आपल्या विद्यार्थ्यांस कळविलें, "तुम्ही आपली फी मला वेळेवर देत नाहीं म्हणून मीहि पुढील वर्षीं तुमचीं दुपारचीं व्याख्यानें रद्द करणार आहें. तुम्हांला शिकण्याची इच्छा आहे, पण फी मात्र देण्याची तुमची इच्छा दिसत नाहीं. शिकायला पाहिजे, फी मात्र द्यायला नको!" अशा प्रकारचे उद्गार एका नामांकित विद्वान् कायदेपंडिताला काढावे लागावे हें किती विचित्र! मग साध्या शिक्षकाची गोष्ट काय?

फीसंबंधानें साधारण प्रथा अशी दिसते: एकाद्या शिक्षकानें कांहीं विद्यार्थ्यांशीं बोलणें करून आपली फी ठरवावयाची, व त्या विद्यार्थ्यांनीं इतर विद्यार्थ्यांशीं ठरवून ती फी आपापसांत वाटून घ्यावयाची; आणि अशा प्रकारें प्रत्येक विद्यार्थ्याच्या वाट्यास जितकी फी येई तितकी फी तो देऊन टाकी.

या फीशिवाय विद्यार्थ्यांकडून शिक्षकांना कांहीं देणग्याहि मिळत. या देणगींत शिक्षकांकरितां टोपी, मोजे, खाऊ यांचा समावेश होई. कित्येक वेळां तर अंग-ठीहि देण्यांत येई.

विद्यार्थी बाहेरून दूरदूरच्या देशांतून किंवा गांवांतून विद्यापीठांत येत, तेव्हां त्यांच्या राहण्याची पहिल्या प्रथम सोय व्हावयास पाहिजे. गांवकरी त्यांना सवल-तीच्या दरानें घरें देत व राहण्याचा प्रश्न आपोआप सुटे. जेवण्याखाण्याचा व इतर खर्च दर आठवड्याला शुक्रवारीं ते विद्यापीठाला देत. या खर्चाच्या रकमेला 'बर्सा' म्हणत. याशिवाय आणखीहि कित्येक प्रसंगीं विद्यार्थ्यांकडून पैसे घेण्यांत येत. या सर्व प्रकारच्या पैशांचा उपयोग विद्यापीठ चालविण्याकडे होई. अशा प्रकारें विशेष प्रसंगीं फी घेण्याची सवलत विद्यापीठांना पोपनें दिलेली असे.

वरील फी योग्य मार्गानें विद्यापीठ चालविण्यास त्रास पडूं नये म्हणून घेण्यांत येई. परंतु कित्येक विद्यापीठांतून अनीतीच्या मार्गानेंहि पैसे वसूल करण्यांत येत. कित्येक विद्यापीठांतून अन्यायानें पैसे घेऊन पदव्यांचा सौदा करण्यांत येई. अर्थात् अशा पदव्यांना बाजारांत किंमतहि फारशी नसे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नागरिक व राजे लोक यांनीं स्थापन केलेल्या विद्यापीठांतील शिक्षकांना पगार देण्यांत येत असे; पण अशा विद्यापीठांतून कित्येक वेळां शिक्षकांचा पगार न मिळाल्यामुळें संप होत असे. सॅलामान्का विद्यापीठांत याच कारणाकरितां शिक्षकांचा संप झाला होता.

विद्यापीठांची वाढ होऊं लागल्यानंतर केवळ मुलांच्या फीवर विद्यापीठ चालविणें शक्य नसे. अशा वेळीं जास्त जास्त विद्यार्थ्यांनीं त्या विद्यापीठांत यावें म्हणूनहि प्रयत्न होई; विद्यार्थ्यांना गांवकरी घरें सवलतीच्या दरानें देत. व्हर्सेलिच्या लोकांनीं ५०० चांगलीं चांगलीं घरें अशा विद्यार्थ्यांना देण्याचें कबूल केलें होतें. या व अशा गोष्टींमुळेंच प्राग विद्यापीठांत एका वेळीं बाहेरून आलेले विद्यार्थी २००० होते, तर टुलूज विद्यापीठांत ३००० विद्यार्थी होते.

पण एकंदरींत युरोपांतील विद्यापीठें निघण्याचें मूळ कारण ख्रिस्ती धर्माचा प्रसार. यामुळें पहिल्यापासून चर्चची मदत विद्यापीठांना असे; आणि चर्चहि आपल्या उत्पन्नाचा तिसरा हिस्सा विद्यापीठांच्या खर्चाला लावून देत. परंतु विद्यापीठांचा खर्च दिवसेंदिवस वाढत होता व हा पैसाहि पुरेनासा होई तेव्हां निरनिराळे कर लादण्यांत येत व तो पैसा विद्यापीठांकरितां खर्चण्यांत येई. अशा प्रकारें बैलांवर, बैलगाड्यांवर, पुलांवर किंवा मीठावर कर बसविण्यांत येत असत. निरनिराळे राजे लोक आणि सरदार-दरकदारसुद्धां कित्येक वेळां पैशानें मदत करीत. कॅटॅनिआच्या (सिसिली) ड्यूकनें तेथील स्टडियम्‌चा खर्च भागविण्याकरितां १५०० डकॅट्स् देण्याचें कबूल केलें होतें; तर ट्यूरिनच्या (इटली) विद्यापीठाला तेथील ड्यूकनें २००० फ्लोरिन्स् देण्याचें आश्वासन दिलें. इतकें करूनहि विद्यापीठांचा खर्च न भागवितां आल्यामुळें तीं बंद करावीं लागत व परिस्थिती सुधारल्यावर तीं पुनः सुरू होत.

मध्ययुगीन युरोपीय विद्यापीठांचा भानगडीचा कारभार

मध्ययुगीन पाश्चात्य विद्यापीठें व त्याच कालांतील किंवा तत्पूर्वीचीं आपल्या इकडील विद्यापीठें म्हणजे भिन्न मार्गाला वाहणारे दोन प्रवाह होत. आपल्याकडील विद्यापीठें केवळ शिक्षकांच्या आधीन. शिक्षक निःस्वार्थी, चारित्र्यवान्, संन्यस्त वृत्तीचा; पैशाकरितां, मानाकरितां किंवा सत्तेकरितां तो हपापलेला नव्हता. दोन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घरीं भिक्षा मागून पोट भरलें कीं झालें त्याचें समाधान. यामुळें विद्यार्थ्यांवर त्याच्या चारित्र्याची व विद्वत्तेची छाप पडल्यास आश्चर्य नाहीं. विद्यार्थीहि निरनिराळ्या व दूरदूरच्या गांवाहून किंवा देशांतून येत. ते निरनिराळ्या भाषा बोलत. त्यांच्या चालीरीतीहि भिन्न भिन्न असत. पण विद्यार्थी शिक्षकावर खूष असत. त्यांच्याबाबतींत कोणत्याहि प्रकारें अन्याय होईल अशी त्यांस भीति वाटत नसे. आणि कोणत्याहि प्रकारें शिक्षकांच्या व विद्यार्थ्यांच्या अधिकारांचे झगडे उडत नसत. शिक्षक व विद्यार्थी, शिक्षक व नागरिक, शिक्षक व राजे आणि शिक्षक व धर्माधिकारी यांत भांडणें झाल्याचा किंवा यांपैकीं कोणीहि आपल्या अधिकाराचें अतिक्रमण केल्याचा उल्लेख नाहीं.

पण पाश्चात्य विद्यापीठांतून तसें नव्हतें. त्यांच्या विद्यापीठांतील रचना व त्यांचा कारभार आपल्या इकडील विद्यापीठांपेक्षां फारच भिन्न व अत्यंत भानगडीचा होता. त्यांत अधिकाराकरितां झगडे झाले, व निरनिराळ्या हक्कांकरितां भांडणें झालीं. या सर्व भानगडींचा व तंट्यांचा इतिहास साद्यन्त देणें या परिशिष्टाच्या आवाक्याबाहेरचें आहे; आणि तो नीट देणेंहि कठीण आहे. अत्यंत भानगडीचा असल्यानें तो चांगला लक्षांत येणें सोपें काम नाहीं. म्हणून यापुढील परिच्छेदांत मध्ययुगीन युरोपीय विद्यापीठांच्या कारभारांत नेहमीं वापरण्यांत येणाऱ्या शब्दांचाच अर्थ देण्याचें योजिलें आहे. कारण त्यांच्या सहाय्यानें विद्यापीठांच्या बाबतींतील पुष्कळ ठळक ठळक गोष्टींचा व घटनांचा विचार करतां येईल व विद्यापीठांच्या अंतर्गत रचनेबद्दल व त्यांच्या कारभाराबद्दलसुद्धां आपणांस बरीच कल्पना येईल.

युरोपीय विद्यापीठांच्या बाबतींत वापरण्यांत येणारे शब्दप्रयोग

आपल्या आजच्या कल्पनेप्रमाणें 'युनिव्हर्सिटी' हा शब्द आपण 'विद्यापीठ' या अर्थानें वापरतों. त्याचप्रमाणें मॅट्रिक किंवा तत्सम परीक्षा पास झाल्यावर उच्च शिक्षण घेण्याकरितां ज्या ठिकाणीं आपण जातों त्याला आपण 'कॉलेज' म्हणतों. विद्यापीठाच्या सर्वोत्तम अधिकाऱ्याला आपण 'चॅन्सेलर' या नांवानें संबोधतों. आणि आज 'रेक्टर'चा संबंध विद्यापीठाशीं फारसा न लावतां कॉलेजशीं लावण्यांत येतो. परंतु या सर्व शब्दांचा अर्थ मध्ययुगीन विद्यापीठांत अगदींच निराळा होता. त्या वेळचा अर्थ आतां अगदींच बदलून गेला आहे. शिवाय त्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वेळीं विद्यापीठाशीं अगदीं निगडित असलेले असे पुढील शब्द असत : नेशन्, स्टडियम्, कॉन्सिलिअराइ, प्रॉक्टर, बर्सा, इन्सेप्शन्, डिटरमिनेशन् इत्यादि.

पाश्चात्य विद्यापीठें इतर राष्ट्रांतून किंवा देशांतून आलेल्या विद्यार्थ्यांमुळें भरभराटीस आलीं. हे जे विद्यार्थी बाहेरून येत ते आपापल्या देशापुरता संघ किंवा गट तयार करीत. उदाहरणार्थ, बोलोना विद्यापीठांत लोंबार्डी, टस्कनि, रोम येथून त्याचप्रमाणें आल्प्स् पर्वताच्या दक्षिणेकडील प्रदेशांतून विद्यार्थी येत. या चारहि देशांतून किंवा ठिकाणांहून आलेल्या विद्यार्थ्यांच्या संघांना 'नेशन्' हें नांव असे. पॅरिस विद्यापीठांतहि चार नेशन्स् (Nations) होतीं व त्यांत फ्रेंच, नॉर्मन्स्, पिकार्ड्स व इंग्लिश लोकांचा समावेश झाला होता. अशा प्रकारें निरनिराळ्या मोठ्या विद्यापीठांत निरनिराळ्या ठिकाणचे विद्यार्थी येत व ते आपापले संघ किंवा नेशन्स स्थापीत. हे विद्यार्थी ज्या ठिकाणीं शिक्षण घेत त्या ठिकाणाला 'स्टडियम्' हें नांव असे. 'स्टडियम्' याचा अर्थ आपण शाळा असा करूं. या स्टडियम्चे दोन प्रकार असत म्हणून मागें सांगितलें. एक 'स्टडियम् पर्टिक्युलेर' व दुसरा 'स्टडियम् जनरेल्'. 'स्टडियम् जनरेल्' ह्याचा अर्थ पुष्कळ दिवसपर्यंत निश्चित असा नव्हता. तो विद्यापीठ या अर्थानें निश्चित व्हावयाला पुष्कळ दिवस लागले. तोंपर्यंत 'स्टडियम् जनरेल्'ची नक्की कल्पना कोणास देतां येत नसे. इ. स. १२६३ सालीं कॅस्टाइल्च्या आल्फॉन्झोनें या संदिग्ध शब्दाचा अर्थ स्पष्ट करण्याकरितां 'द सिएते पार्तिदास' (The Siete Partidas) या नांवाचा एक कायदा तयार केला व तेव्हांपासून 'स्टडियम् जनरेल्' याचा अर्थ स्पष्ट झाला. या कायद्याला आधुनिक शिक्षण-क्षेत्रांतील पहिला कायदा (Code) म्हणून संबोधण्यांत येतें. कोणत्याहि स्टडियम्चें स्टडियम् जनरेल्मध्यें रूपांतर होण्याला तीन गोष्टींची आवश्यकता असे : (१) बाहेरील विद्यार्थ्यांना प्रवेश देणें; (२) ब्रह्मविद्या (theology), कायदा (law), वैद्यकीय शिक्षण यांपैकीं सर्व किंवा निदान एक विषय शिकविण्याची व्यवस्था करणें; आणि (३) भरपूर शिक्षकांची सोय करणें.

हें स्टडियम् जनरेल् म्हणजेच आजचें विद्यापीठ (university). या स्टडियम् जनरेल्मध्यें विद्यार्थी येत व आपलीं नेशन्स स्थापीत. या नेशन्चे आणखी विभाग पडून 'कॉन्सिलिअराइ' (consiliarii) होत. कित्येक वेळां प्रत्येक नेशन्

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एक किंवा दोन कॉन्सिलिअराइ निवडीत. या कॉन्सिलिअराइ यांची निवड करण्याकरितां सभा (congregation) होत. विद्यापीठांचें दैनंदिन काम सुकर होण्याकरितां या कॉन्सिलिअराइचा उपयोग होत असावा. निरनिराळीं नेशन्स आपला एक प्रतिनिधी निवडीत; त्याला 'प्रॉक्टर' (Proctor) म्हणत. आपापल्या नेशन्सचें मत सांगण्याचा अधिकार या प्रॉक्टरला असे. 'प्रॉक्टर' व 'रेक्टर' या दोघांच्याहि अधिकारांबद्दल बराच वाद आहे; कारण कित्येक वेळां दोनहि अधिकार एकाच व्यक्तीकडे असल्याचे उल्लेख सांपडतात. या प्रॉक्टरकडे विद्यापीठांतील न्यायदानाच्या अंमलबजावणीचें काम असे.

पण मध्ययुगीन विद्यापीठांतील 'युनिव्हर्सिटी' व 'कॉलेज' यांचा अर्थ आजच्यापेक्षां अगदींच निराळा होता. 'युनिव्हर्सिटास्' (Universitas) हा शब्द शाळेंत (Studium) किंवा विद्यापीठांत (Studium Generale) राहणाऱ्या व सर्वांचे हितसंबंध एक असून ते वाढविण्याचा प्रयत्न करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या किंवा शिक्षकांच्या संघाला किंवा समाजाला लावण्यांत येत असे. बोलोना येथील संघ (Universitas) केवळ विद्यार्थ्यांचे असत, तर पॅरिस येथील संघ (Universitas) शिक्षकांचा असे. 'युनिव्हर्सिटि' किंवा 'युनिव्हर्सिटास्' याचा मूळचा अर्थ संघ हा जाऊन त्यास विद्यापीठ हें नांव १५ व्या शतकांत रूढ झालें. त्याचप्रमाणें 'कॉलेज' या शब्दाचाहि मूळचा अर्थ 'पंडितांचा संघ' (College of doctors). निरनिराळ्या विषयांत पारंगत अशा पंडितांचे निरनिराळे संघ असत. वैद्यक व वाङ्मय यांच्या पंडितांचा एक संघ (College) झाल्याबद्दलचा उल्लेख पदुआ विद्यापीठाच्या इतिहासांत सांपडतो. पण नंतर नंतर विद्यार्थी व पंडित या दोघांचेहि संघ युनिव्हर्सिटि या एकाच शब्दानें व्यक्त होऊं लागले, व 'युनिव्हर्सिटि' या शब्दाचाहि अर्थ विद्यापीठ असा रूढ झाला.

आतां विद्यार्थ्यांच्या दृष्टीनें सर्वांत महत्त्वाचा अधिकारी 'रेक्टर' (Rector). रेक्टर होणें हा फारच मोठा मान समजला जाई. रेक्टरला अधिकारहि बरेच असत. विद्यार्थ्यांना त्यांच्या अपराधामुळें शिक्षा करून जो दंड वसूल होई त्याचा कांहीं हिस्सा रेक्टरला मिळे. परंतु रेक्टरची निवड झाल्यावर त्याला आपला बडेजाव कायम राखण्याकरितां पुष्कळ खर्च करावा लागे. त्यामुळें कित्येक वेळां या जागेला उमेदवार मिळत नसत व ही जागा स्वीकारावी म्हणून सक्ति करण्यांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

येई. साधारणतः या जागेकरितां 'डॉक्टर', 'मास्टर' किंवा 'लायसेन्शिएट' यांतून निवड करण्यांत येई. परंतु क्रॅको विद्यापीठांत विद्यार्थ्यांनाहि रेक्टर होतां येत असे. पण पुढें १३९७ नंतर ही प्रथा बंद होऊन शिक्षकच रेक्टर होऊं लागले. या रेक्टरच्या जागेची निवड प्रॉक्टर्स किंवा नेशन्स करीत. रेक्टरची आज्ञा सर्वांनीं मान्य केलीच पाहिजे असा कायदा असे. विद्यापीठांतील भांडणें मिटविणें, विद्यार्थ्यांवर देखरेख ठेवणें हींहि कामें रेक्टरकडे असत. रेक्टरची नेमणूक करण्याची प्रथा इटलींतील राज्यव्यवस्थेवरून पडली. इटलींतील लोंबार्डी परगण्यांत रेक्टर हा लोकनियुक्त न्यायाधीश असे. शहरांतील निरनिराळ्या संस्थांच्या मुख्या-लाहि रेक्टर हीच संज्ञा लावण्यांत येई. कोणत्याहि स्थानिक संस्थेची सत्ता रेक्टर या अधिकाऱ्यांत केंद्रित झालेली असे. इटलींतील विद्यापीठांची घटना राज्यघटने-वर आधारलेली असल्यामुळें रेक्टर ही संज्ञाहि विद्यापीठांत समाविष्ट झाली.

'चॅन्सेलर' हा विद्यापीठांतील दुसरा एक महत्त्वाचा अधिकारी. आजच्या विद्यापीठांतहि चॅन्सेलर हाच सर्वांत वरचा अधिकारी असतो. त्या त्या प्रांताचा गव्हर्नर हा बहुधा विद्यापीठाचा चॅन्सेलर असतो. पण मध्ययुगीन युरोपीय विद्या-पीठांतील चॅन्सेलर हा धार्मिक बाबतींतील एक महत्त्वाचा अधिकारी असे. आरंभीं आरंभीं शिक्षकांना शाळा चालविण्यास परवानगी देणें हें एक त्याचें काम असे; पण पुढें विद्यार्थ्यांना 'सनद' देण्यास परवानगी देणें इतकेंच मात्र कार्य त्याच्याकडे राहिलें. तो सनद देणें नाकारूं शके. आपला अधिकार गाजवितां यावा म्हणून तो 'वाळींत टाकण्याचें अस्त्र' उपसत असे. शिक्षक नियम व शिस्त पाळतात किंवा नाहीं हें पाहण्याचें कामहि चॅन्सेलरकडे असे. युरोपीय विद्यापीठांत चॅन्सेलर व युनिव्हर्सिटी यांत अधिकाराबद्दल आपापसांत नेहमीं भांडणें चालत, व प्रत्येक जण दुसऱ्याचा अधिकार कमी करण्याचा प्रयत्न करी.

'बर्सा' हा एक प्रकारचा कर असे. विद्यापीठ हा कर शिक्षक व विद्यार्थी यांवर लादी. विद्यापीठांचा वाढता खर्च भागविण्यास सोपें जावें म्हणून हे कर बसविण्यांत येत. बर्सा हा मूळ जेवण्याखाण्याचा आठवड्याचा खर्च; व तो साधारणतः २ शिलिंगांपासून ४ शिलिंगांपर्यंत असे. कोणीहि शिक्षक बाहेरच्या गांवाहून किंवा देशाहून आलेल्या विद्यार्थ्यास आपल्या घरीं ठेवून घेई व त्याबद्दल बर्सा किंवा त्याच्याबद्दल लागणाऱ्या खर्चाचे पैसे घेई. पण कांहीं विद्यापीठांतून या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कराचा दुरुपयोग होऊं लागला. कारण पॅरिस विद्यापीठांतहि एकादा विद्यार्थी बायबलच्या कायद्यांत (Canon law) पास झाल्यानंतर तो हा कर देऊन सनद विकत घेऊं शके. पण एकंदरींत बर्सा हें विद्यापीठांतील उत्पन्नाचें एक महत्त्वाचें अंग असे.

कोणत्याहि शिक्षकाला 'पंडित' ही पदवी मिळविण्याकरितां एक अत्यंत महत्त्वाचा विधि करावा लागे. या विधीला 'इन्सेप्शन' (Inception) म्हणत. 'इन्सेप्शन्' ऐवजीं कित्येक ठिकाणीं 'कॉन्व्हेन्टस' (Conventus) या शब्दाचाहि प्रयोग केलेला आढळतो. हा विधि झाल्याशिवाय कोणाहि विद्यार्थ्यास 'पंडित' (Doctor) ही उपाधि प्राप्त करतां येत नसे व त्याचा प्रवेश 'पंडित–संघां'त (Collegium of the Doctors) होऊं शकत नसे. हा विधि अत्यंत मनोरंजक असल्यानें त्यासंबंधानें थोडक्यांत माहिती देतों.

हा विधि चर्चमध्यें होई. ज्या विद्यार्थ्यांचा हा विधि व्हावयाचा असेल त्याला चर्चमध्यें येण्यापूर्वी आपल्या पंडित-शिक्षकांकडून एक परवाना मिळवावा लागे. या परवान्याबरोबरच शिक्षक त्या विद्यार्थ्याला एक पत्रहि देत असे. ज्या दिवशीं इन्सेप्शन्चा सार्वजनिक विधि असे त्याच्या आदल्या दिवशीं हा विद्यार्थी सर्व गांवांत घोड्यावरून फिरे व गांवांतील अधिकारी वर्गास व प्रमुख व्यक्तींस त्याचप्रमाणें आपल्या खास मित्रमंडळीस या विधीस हजर राहण्याबद्दल निमंत्रणें देई. निमंत्रणें करण्यास जातांना कोणत्याहि प्रकारचीं वाद्यें वाजवूं नयेत म्हणून सक्त ताकीद असे. दुसऱ्या दिवशीं दोन महत्त्वाचीं कार्यें असत व त्यांत मेजवानी ही एक महत्त्वाची बाब असे. दुसऱ्या दिवशीं वाजंत्रीं वाजवण्याबद्दल कोणत्याहि प्रकारें हरकत नसे. मेजवानी ही अत्यंत खर्चाची बाब असल्यानें कित्येक विद्यार्थी हा विधि पुढें ढकलीत किंवा दुसऱ्या एकाद्या विद्यापीठाकडून स्वस्तांत पदवी मिळविण्याचा प्रयत्न करीत.

मुख्य विधि जेवण झाल्यानंतर असे. हा विधि म्हणजे मुख्य परीक्षा. विद्यार्थी सभेस जाण्यापूर्वी आपल्या पंडित शिक्षकांस व मित्रांस बरोबर वेई. तेथें गेल्यावर त्याला एक व्याख्यान द्यावें लागे; कायद्याच्या एखाद्या मुद्यावरील भाष्य त्याला तयार करावें लागे व तें तो सभेंत वाचून दाखवी. तें वाचून झाल्यावर त्याचे सहाध्यायी मित्र त्याच्या भाष्यावर निरनिराळ्या शंका घेत; पण हा त्या शंकांचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निरसन करी व आपले मुद्दे त्यांना पटवून होत असे. अशा प्रकारें उत्तम शिक्षकाचें काम त्याच्या हातून होत असे. याप्रमाणें भाष्य-वाचन व त्यावरील शंकानिरसन झाल्यावर चर्चेचा मुख्य या विद्यार्थ्यासंबंधानें गौरवपूर्ण भाषण करी व पोपच्या हुकुमान्वयें त्यास शिकविण्यासंबंधानें सर्व अधिकार देई. यानंतर बारीकसारीक विधी झाल्यावर त्याला न्यायासनावर बसविण्यांत येई आणि नंतर त्याला एक पुस्तक भेट देऊन त्याच्या हातांत सोन्याची आंगठी घालण्यांत येई. एक विशिष्ट प्रकारची टोपीहि त्याच्या डोक्यांत घालण्यांत येई. आशीर्वाद दिल्यावर हा विधि संपे व विद्यार्थी खराखुरा 'डॉक्टर' म्हणजे पंडित बने. सर्व विधि संपल्यानंतर गांवांतून त्याची मोठी मिरवणूकहि काढण्यांत येत असे.

या विधीमुळें किती तरी गोष्टी साध्य होत. एक तर 'डॉक्टर' ही पदवी मिळविण्याकरितां विद्यार्थ्यानें एका चांगल्याच पंडिताच्या–डॉक्टराच्या–हाताखालीं शिक्षण घेतलें आहे ही गोष्ट नक्की होई. त्याचप्रमाणें त्याचें ज्ञानहि भरपूर वाढलें आहे, शिक्षणशास्त्राची कला त्यानें अवगत केली आहे व शिक्षकास अवश्य लागणारा धीटपणा त्याच्या अंगांत आहे या गोष्टीचीहि सर्वांना जाणीव होई. या विधीनें त्याला लोकमान्यताहि मिळे.

'डिटरमिनेशन्' (Determination) हा इन्सेप्शन्सारखा दुसरा एक विधि असे. जे विद्यार्थी शिक्षकाचा धंदा करीत व शिक्षणहि घेत ते बहुधा हा विधि करीत. हा विधि इन्सेप्शन् करतां कमी प्रतीचा असे. विधि झाल्यानंतर विद्यार्थ्यास वाङ्मयीन अभ्यासाची 'बॅचेलर' ही पदवी मिळत असे. पंडितांच्या संघांत प्रवेश मिळण्याकरितां इन्सेप्शन् विधि तर शिक्षकांच्या संघांत (Masters Guild) प्रवेश मिळविण्याकरितां डिटरमिनेशन् हा विधि असे.

विद्यापीठांचा ग्रंथसंग्रह

विद्यापीठाचा विचार करतांना एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ग्रंथ. फार फार प्राचीन कालीं लिहिण्याची कला नव्हती. शिक्षक विद्यार्थ्यास तोंडीच शिकवीत. गुरूनें सांगावें व तें विद्यार्थ्यांकडून म्हणवून घ्यावें. पण पुढें जेव्हां लिहिण्याची कला निघाली तेव्हां त्याकरितां ज्यावर लिहावयाचें तें म्हणजे दगड, वीट, ताडपत्र, चामड्याचे कागद, तांब्याचे किंवा इतर धातूचे पत्रे वगैरे तयार होऊं लागले. या बाबतींत निरनिराळ्या अनुभवांप्रमाणें निरनिराळे शोध लागले. या शोधांत कागद

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हा अगदीं शेवटचा पदार्थ. तेराव्या शतकाच्या आरंभीं कागद तयार करण्याची कृति बहुतेक ठिकाणीं माहीत होती. इतकेंच नाहीं, तर त्या कागदावर लिहिणारे, त्यावर चित्रें वगैरे काढणारे, सर्व कागद जुळवून ते चांगल्या प्रकारें बांधून ठेवण्याची कला जाणणारे व या ग्रंथांची निगा राखणारे लोक त्या कालीं तयार झाले. नवीन ग्रंथ लिहून तयार झाल्यावर तो चांगल्या प्रकारें शुद्ध करून घेत व त्यावर योग्य तीं चित्रें काढून किंवा वेलबुट्टी वगैरे काढून तो चांगल्या प्रकारें बांधून ठेवीत. असे ग्रंथ तयार झाल्यावर विद्यापीठांतील 'स्टेशनरियस्' (Stationarius)कडे पाठविण्यांत येत. विद्यापीठांत या 'स्टेशनराय्' (Stationarii) यांना फारच महत्त्वाचें स्थान असे. याशिवाय 'लायब्रेरिअस्' (Librerius) हाहि एक महत्त्वाचा वर्ग असे. स्टेशनराय्, लायब्रेराय् म्हणजे आजच्या ग्रंथसंग्रहालय संस्थेचा आरंभ होय. निरनिराळ्या लेखकांची योजना करून त्यांच्याकडून ग्रंथ लिहून घेणें हें काम स्टेशनराय् यांचें असे. ग्रंथ तयार झाल्यावर तो निरनिराळ्या व्यक्तींना किंवा व्यापाऱ्यांना विकणें किंवा त्या ग्रंथाच्या किंमतीइतकी रक्कम अनामत घेऊन तो ग्रंथ वाचावयास देणें किंवा त्याकरितां कांहीं मासिक वर्गणी घेणें हें काम लायब्रेराय् पहात. या दोनहि वर्गांवर देखरेख ठेवण्याचें काम 'पेसिअराय्' (Peciarii) कडे असे. विद्यापीठांतील ही एक महत्त्वाची संस्था होती, यांत सहा सभासद असत. प्रत्येक हस्तलिखित निर्दोष आहे किंवा नाहीं, व त्यांत कोणत्या प्रकारची चूक राहून गेली आहे किंवा कसें याबद्दल पेसिअराय् फार जागरूक असत. हस्तलिखितांत कांहीं चूक राहून गेल्यास स्टेशनराय् यांना दंड करण्यांत येई. अशी एकादी चूक राहून गेल्यास ती पेसिअराय् यांच्या नजरेस आणलीच पाहिजे अशी विद्यार्थ्यांनाहि सक्त ताकीद असे. त्याचप्रमाणें आपापल्या जवळच्या प्रती तपासून शुद्ध करून घेण्यास 'पेसिअराय्'कडे दिल्याच पाहिजेत म्हणून डॉक्टर्स व इतर विद्यार्थी यांच्यावरहि सक्ती असे. चुकी दुरुस्त करून त्या सुधारून लिहिण्याचें काम निराळ्या लोकांकडे असे. स्वतंत्र लेखक नेमून स्टेशनराय् त्यांच्याकडून ग्रंथ लिहून घेत.

तरी पण मध्ययुगांत जुने ग्रंथ विकणें किंवा ते कांहीं ठराविक दरानें वाचावयास देणें हाच धंदा जास्त प्रचारांत होता. कारण नवीन ग्रंथ महाग असत. जुने ग्रंथहि फार महाग विकले जाऊं नयेत म्हणून विद्यापीठें काळजी घेत.

मध्ययुगीन युरोपीय विद्यापीठांत ग्रंथ वाढत जाण्यास एक महत्त्वाचें कारण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मिळालें. जे जे विद्यार्थी किंवा शिक्षक डॉक्टरची पदवी घेण्याकरितां सार्वजनिक परीक्षा देत व त्याकरितां इन्सेप्शन् विधि होत असे त्यावेळीं एक निबंध वाचण्यांत येई व त्यावर चर्चा होत असे. डॉक्टर झाल्यावर हा निबंध उत्तम रीतीनें लिहून त्यांना तो स्टेशनरियसूच्या स्वाधीन करावा लागे. याप्रमाणें जर निबंध सादर केला नाहीं तर त्या डॉक्टरांना दंड करण्यांत येई. हा ग्रंथ नंतर छापून काढण्यांत येत असे. अशा प्रकारें स्टेशनरायूच्या कामांत ग्रंथ तयार करणें, तो छापवून घेणें व त्याचा प्रसार करणें यांचा समावेश होत असे.

अशा प्रकारें पुढील काळांत ग्रंथालयाची जी वाढ झाली त्याचा आरंभ वर देण्यांत आला आहे. बाकी आधुनिक पद्धतीचें प्रत्यक्ष ग्रंथसंग्रहालय विद्या-पीठांजवळ असल्याचा पुरावा फारसा मिळत नाहीं. नाहीं म्हणायला युरोपच्या बाहेर म्हणजे सिरियांतील ॲन्टिओक (इ. स. पू. ३ रें शतक) गांवीं व अलेक्झँड्रिया येथें (इ. स. पू. १ लें शतक) ग्रंथसंग्रह असल्याचा उल्लेख आहे. इ. स. १३३८ च्या सुमारास पॅरिस येथील सोर्बॉनें (Sorbonne) विद्यालयांत १७०० ग्रंथ असल्याचा दाखला आहे. नावारे (Navarre) विद्यालयांतसुद्धां उत्पन्नाच्या रकमेंतून खर्च करून बाकी राहिलेल्या पैशाचा उपयोग ग्रंथ विकत घेण्याकडे केला पाहिजे असा कायदा होता. पुष्कळ ठिकाणीं ग्रंथ सांखळीला बांधून ठेवलेले असत. बहुतेक ठिकाणीं ग्रंथ घरीं वाचावयास देत.

पंधराव्या शतकांत मात्र बऱ्याच विद्यापीठांतून मोठालीं ग्रंथसंग्रहालयें होतीं. व्याख्यानास कंटाळलेला विद्यार्थी ग्रंथसंग्रहाल्यांत जाऊन आपला वेळ ग्रंथांच्या संगतींत मजेंत घालवी.

महत्त्वाचीं विद्यापीठें

मध्ययुगीन युरोपीय विद्यापीठांबद्दल संक्षेपानें आतांपर्यंत जी माहिती दिली आहे त्यावरून तत्कालीन विद्यापीठांबद्दल साधारण कल्पना येण्यास हरकत नाहीं. आतां फक्त जीं विद्यापीठें नांवारूपास आलीं होतीं त्यांच्यासंबंधानें अगदीं महत्त्वा-च्या अशा एक दोन गोष्टी सांगून हें परिशिष्ट आटोपतें घेऊं.

मुख्य विद्यापीठें

वास्तविक तत्कालीन युरोपीय विद्यापीठें म्हणजे इटलींतील सालेर्नो व बोलोना, फ्रान्समधील पॅरिस व इंग्लंडमधील ऑक्सफर्ड हीं होत. यांचा इतिहास नीटसा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

समजला म्हणजे इतर सर्व विद्यापीठांचा इतिहास समजला असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण इतर जीं विद्यापीठें निघालीं तीं बहुतेक याच विद्यापीठांवर आधारलेलीं आणि शिवाय तीं या विद्यापीठांचीं च लेंकरें. या विद्यापीठांतून फुटून निघालेल्या विद्यार्थ्यांमुळें किंवा शिक्षकांमुळें नवीन विद्यापीठांचा जन्म झाला व मूळ विद्यापीठांचें त्यांनीं अनुकरण केलें. हीं विद्यापीठें कोणतीं याची कल्पना यावी म्हणून कांहीं महत्त्वाच्या विद्यापीठांचीं नांवें पुढें देत आहोंत :

इतर विद्यापीठें

(अ) इटली : पदुआ, पिआसेन्झा, व्हिसेंझा, ॲरेझो, नेपल्स्, व्हर्सेलि, रोमन कोर्ट, सिएना, पेरुगिआ, फ्लॉरेन्स, ट्यूरिन्, कॅटॅनिआ, पिसा.

(आ) फ्रान्स : मॉन्ट् पेलिअर, ऑर्लिन्स्, अँजर्स्, टुलूज्, ॲव्हिग्नॉन्.

(इ) स्पेन-पोर्तुगाल : सॅलामान्का, पॅलेन्शिआ, व्हॅलेन्शिआ, व्हॅलॅडॉलिड्, सेव्हिले, लेरिडा, पर्पिग्नॅन, बार्सिलोना, पाल्मा, सिगुएन्झा, ॲल्कॅला, ऑर्लिन्स्, लिस्बन्, कोइम्ब्रा.

(उ) जर्मनी–ऑस्ट्रिया : प्राग्, व्हिएन्ना, एर्फर्ट्, हाइडेलबर्ग, कोलोन्, वुर्झबर्ग, लाइप्झिग, रॉस्टॉक्, लुव्हेन्, ग्राइफ्स्वॉल्ड्, बसेल्.

(ए) पोलंड–डेन्मार्क–स्वीडन–हंगेरी : क्रॅकौ, पेक्स्, बुडा, प्रेसबर्ग्, उप्साला, कोपेनहेगेन्.

(ओ) स्कॉट्लंड : अँड्र्यूज्, ग्लासगो, ॲबरडीन्.

सालेर्नो विद्यापीठ

आरंभ तेराव्या शतकाच्या अगोदर. केवळ वैद्यक विद्येच्या शिक्षणाकरितां प्रसिद्ध. पूर्वेकडील वैद्यकीय ज्ञानाचा परिणाम. पण या बाबतींत मतभेद आहे. हवेचें उत्तम ठिकाण.

बोलोना विद्यापीठ

प्रारंभ दहावें शतक. कायद्याच्या ज्ञानाचें महत्त्व. परंतु वाङ्मय व अलंकार-शास्त्र यांचेंहि शिक्षण. वैद्यकशास्त्र व ब्रह्मज्ञान यांच्या शिक्षणाचाहि समावेश. विद्यार्थी–विद्यापीठ. विद्यापीठांत चार 'नेशन्स्'. येथील प्राध्यापक गांवांतील असूनहि त्यांना विद्यापीठाच्या अंतर्गत कारभारांत अधिकार नव्हता. त्यामुळें प्राध्यापकांचें जीवन परावलंबी म्हणून त्यांचें स्थलांतर. त्यांनीं बोलोना विद्यापीठ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सोडून जाऊं नये व इतरत्र शिकविण्याचें काम करूं नये म्हणून शपथ घेण्याची सक्ति असे. विद्यार्थीहि हें विद्यापीठ सोडून दुसऱ्या गांवीं गेले; कारण गांवांतील लोकांशीं व धर्माधिकाऱ्यांशीं भांडण. येथील वातावरण जास्त शिस्तीचें. गुरुवार हा सुट्टीचा दिवस मानण्यांत येई. वर्षाचा आरंभ ऑक्टोबर महिना. युरोपच्या इतिहासांत बोलोनाचें विशेष स्थान.

पॅरिस विद्यापीठ

आरंभ बारावें शतक. चॅन्सेलर व शिक्षक यांचें विद्यापीठांत महत्त्वाचें स्थान. म्हणून 'शिक्षकांचें विद्यापीठ'. शिक्षकांचा संघ. विद्यार्थ्यांचा दंगा. याहि विद्यापीठांत चार 'नेशन्स'. बोलोना विद्यापीठांतील 'नेशन्स' विद्यार्थ्यांचे, तर येथील 'शिक्षकांचे'. बोलोना विद्यापीठांतील विद्यार्थी-संघटनेचा पॅरिस विद्यापीठावर परिणाम. चॅन्सेलर व विद्यापीठ यांच्यांतील भांडणें व त्याकरितां कोर्टकचेऱ्या. शिकविण्याचे मुख्य चार विषय : न्यायबलचा कायदा (canon law), वाङ्मय, वैद्यक व ब्रह्मज्ञान. 'रेक्टर' हा विद्यापीठाचा मुख्य. निरनिराळ्या वेळीं दंगेधोपे व त्याचा परिणाम बहिष्कार, विद्यापीठ बंद पाडणें, शिक्षकांस घालवून लावणें इत्यादि.

ऑक्सफर्ड विद्यापीठ

सुरवात बारावें शतक. पॅरिस विद्यापीठाचें अपत्य. येथेंहि चर्चचे अधिकारी व इतर यांच्यांत भांडणें. विद्यार्थी ऑक्सफर्ड सोडून इतर गांवाला, विशेषतः केम्ब्रिजला व पॅरिसला गेले. येथील विद्यापीठांत चॅन्सेलरला विशेष महत्त्वाचें स्थान; त्याची निवड होई व तोच विद्यापीठाचा मुख्य. इ. स. १३५५ सालचें भांडण व त्याचें खून-मारामारींत रूपांतर. विद्यापीठ कांहीं काळ बंद. या भांडणामुळें गांवकऱ्यांना नमतें घ्यावें लागलें व विद्यापीठाचे अधिकार वाढले. इ. स. १४११ सालीं विद्यापीठांतील अधिकाऱ्यांनीं आर्चबिशपला ऑक्सफर्ड विद्यापीठांत येऊं न दिल्यामुळें भयंकर गोंधळ. शेवटीं विद्यापीठाला नमतें घ्यावें लागलें. शिकवण्याचे मुख्य सात विषय : व्याकरण, अलंकारशास्त्र, वक्तृत्व, तर्कशास्त्र, गणित, संगीत, भूमिति, ज्योतिषशास्त्र. याशिवाय तीन तत्त्वज्ञानाचे विषय, वैद्यकशास्त्र, कायदा व ब्रह्मज्ञान हेहि शिकविण्यांत येत. ग्रीक व हिब्रू वाङ्मयाच्या अभ्यासाला उत्तेजन. या विद्यापीठांतील महत्त्वाचीं विद्यालयें : युनिव्हर्सिटि कॉलेज, बॅलिअल, ओरिएल, क्वीन्स वगैरे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परिशिष्ट २

संदर्भ ग्रंथ

प्राचीन भारतीय विद्यापीठें

1. Allan, J. : Gupta Coins.
2. Altekar, (Dr.) A. S. : Education in Ancient India (1944).
3. Ball, Upendranath : Ancient India (1928).
4. Beal, Samuel : Buddhist Records of the Western World (1906), Vols. I & II.
5. Benziger Brothers : Round The World (1906), Vol. I. (Chicago).
6. Bose, Phanindra Nath : Indian Teachers of Buddhist Universities (1923).
7. Bernier : Travels in India.
8. Carlyle : On Heroes and Hero Worship.
9. चितळे, वि. सि. : हिंदुस्थानचा अभिनव इतिहास (१९४७).
10. MacCrindle, J. W. : (1) Ancient India (1901).
    (2) The Invasion of India by Alexander The Great.
11. Cunningham : Ancient Geography of India.
12. दाभाडे, वा. मा. (एम्. ए.) : विद्यामंदिरांत.
13. Das, Santosh Kumar : The Educational System of The Ancient Hindus (1930).
14. Das Gupta, (Dr.) D. C. : Jain System of Education (1942).
15. Dalal, V. S. : A History of India (1922), Vols. 1 & 2.
16. Fa-Hien : Records of Buddhistic Kingdom (by James Legge, 1886).
17. Havell, E. B. : The History of Aryan Rule in India (London, 1918).
18. Heras, Rev. H. : (1) Journal of the Behar and Orissa Research Society, Vol. XIV (1928), p. i.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(2) A Note on The Excavations at Nalanda and its History, J. B. B. R. A. S. II, pp. 215–216.

19. Jain, Jagmanderlal : Outlines of Jainism (1916), Jain Literature Society.

20. Kane (Mahamahopadhyaya), P. V. : Notes on Harsha Charitam.

21. Keay, F. E. : Indian Education in Ancient and Later Times (1938)

22. कोलंगडे, रा. ग., व पाध्ये, के. आ. : भगवान् गौतमबुद्ध.

23. Las, Rado Shenoy, (I. C. S.), J. P. : Madura–The Temple City (1937).

24. Law, (Dr.) B. C. : India as Described in Early Texts of Buddhism & Jainism (1941).

25. Marshall, (Sir) J. : A Guide to Taxila (1918).

26. Majumdar, R. C. : An Advanced History of India (1948).

27. Mazumder, Nogendra Nath : A History of Education in Ancient India (1916).

28. Mazumder, A. K. : The Hindu History (B. C. 3000-1200 A. D.) (1920).

29. Mookerji, Radha Kumud : (1) Ancient Indian Education (1947).
(2) Men and Thought in Ancient India.

30. Myths of Babylonia and Assyria (The Gresham Publishing Co. Ltd.).
Myths of Crete and pre–Hellenic Europe.
Myths of Melanesia and Indonesia.
Myths of Pre–Columbian America.
Myths and Traditions of South Sea Islands.

31. Puri, Vaijanath : India as Described by Early Greek Writers (Allahabad, 1939).

32. Parkhurst, C. A. : Behar : The Land of the Blessed One.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

33. Ray, (Sir) P. C. : A History of Hindu Chemistry, Vol. I (1904).
34. Raverty : Tabakat–i–Nasiri (1881).
35. Sankalia, (Dr.) H. D. : The University of Nalanda (1934).
36. Samaddar, (Prof.) J. N. : The Glories of Magadha (1927).
37. Schachner, Nathan : The Medieval Universities (1938).
38. Smith, V. A. : The Early History of India.
39. Stevenson, (Mrs.) Sinclair : The Heart of Jainism.
40. Sathianathaier, R. : Studies in Ancient History of Tondamandalam (1944).
41. Sukhthankar, (Dr.) A. S : A. S. R. 1914–1915, Part II.
42. Trivedi, R. M. : हिंदना विद्यापीठो : प्राचीन अने मध्यकालीन, भा. १.
43. Takakasu, (Dr.) J : Buddhist Practices in India (A Record of the Buddhist Religion as Practised in India and the Malaya Archipelago, A.D. 671–695, by I–tsing), (Oxford, 1896).
44. Thomas, Charles E. : European Universities, (Boston, 1936).
45. Venkateswara, S. V. : Indian Culture through the Ages, Vol. I. (Mysore, 1928).
46. Vidyabhushan (Mahamahopadhyaya), Dr. S. C. : History of Indian Logic : Mediaeval School (Calcutta, 1909).
47. Waddell : (1) Phoenician Origin of Britain.
(2) Makers of Civilization.
48. Watters, Thomas : On Yuan Chwang's Travels in India, Vols. I & II. (London, 1905).
49. Wells, H. G. : The Outline of History.
50. Archeological Survey of India Reports, VIII.
51. Epigraphia India, IV, VIII, XVII, XVIII, XX, XXI.
52. Indian Antiquary, IV, VI, VII.
53. J. A. S. B. (Asiatic Society of Bengal Journal), 1872, 1891, 1909, 1910, 1918.
54. J. B. B. R. A. S. (Journal of the Bombay Branch of Royal Asiatic Society), II

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

55. J. B. O. R. S. (Journal of The Behar and Orissa Research Society), XIV (1928), XV.
56. South Indian Inscriptions, II.
57. अंगुत्तर
58. अणुत्तरववाइयदसाओ
59. अथर्ववेद.
60. अन्तगड दसाओ
61. उत्तररामचरितम्
62. ऐतरेय आरण्यक
63. ऐतरेय ब्राह्मण
64. कथासरित्सागर
65. कल्पसूत्र व नवतत्त्व
66. कादम्बरी
67. कामसूत्र
68. काव्यमीमांसा
69. छांदोग्योपनिषद्
70. जातक
71. त्रिषष्टिशलाकापुरुष चरितम्
72. दीघनिकाय
73. धम्म अट्ठकथा
74. निर्यावलि याओ
75. बृहत्संहिता
76. बृहदारण्यकोपनिषद्
77. बौद्धयान धर्मसूत्र
78. पञ्चविंश ब्राह्मण
79. पद्मपुराण
80. प्रबन्धकोश
81. महाभारत
82. महावंस
83. महाराष्ट्रीय ज्ञानकोश
84. मालविकाग्निमित्र
85. मिलिन्दपञ्ह
86. मोरोपंतांचे समग्र ग्रंथ (पराडकर)
87. रघुवंश
88. रामायण
89. राजतरंगिणी
90. विनयपिटक
91. विष्णु पुराण
92. वाजसनेयी संहिता
93. शतपथब्राह्मण
94. शाकुन्तल
95. श्रौतसूत्र
96. शुक्रनीतिसार
97. हरिवंश
98. हर्षचरितम्

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परिशिष्ट ३

संदर्भ ग्रंथ

प्राचीन व मध्ययुगीन युरोपीय विद्यापीठें

1. The Late Hastings Rashdall : The Universities of Europe In The Middle Ages, Vols. 3, 1942, Oxford University Press. (Edited by F. M. Powicke and A. B. Emden).
2. Charles Edward Thomas : European Universities (Observations of Social Life in Continental and English Universities and Colleges). (1936. Boston).
3. Nathan Schachner : The Mediaeval Universities. (1938. London).
4. John W. H. Walden, Ph. D. : The Universities of Ancient Greece. (1909. New York).
5. W. W. Capes, M. A. : University Life In Ancient Athens. (1877. London).
6. R. S. Rait, M. A. : Life In The Medieval University. (1912. Cambridge).
7. L. F. Anderson, Ph. D. : History of Common School Education. (1909. New York).
8. H. G. Wells : The Outline of History. (1934. Cassell and Company Ltd., London).
9. S. S. Laurie, A. M. : Lectures On The Rise And Early Constitution of Universities (A. D. 200–1350). (1886. London).
10. F. S. Marvin : The Living Past. (1915. Oxford).
11. James Mulhera : A History of Education. (N. Y.), 1946.
12. William Boyd : The History of Western Education. London, 1947.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्राचीन भारतीय विद्यापीठें

अकॅडेमिक्	१८३
अगस्त्य	६,१०६,१३६
अग्रहार	१७३
अजंठा	३७,१५२
अँजर्स	१९३,१९८,२११
अजातशत्रु	९८,९९,१२४
अँटिओक	२१०
अँट्टिला	१८४
अँड्रयूज	२११
अणुत्तरोववाईय दसाओ	१४६
अतीश (दीपंकर)	९,६८–७२,७७,८०
अत्रि	६,१३६,१७५
अथर्ववेद	२८,९६,१७१
अथेन्स	९२,१८२,१८३,१८४
अध्यापक	८,९
अनाथपिंडक	१५२
अनुपमा	१११
अनुराधपुर	१५६
अनुव्याख्यान	९
अनुशासन	९
अन्नमलाई	१६६
अॅन्सेल्म (सेंट)	१८६
अपभ्रंशम्	१४४
अपोलोनिअस्	९१
अॅबरडीन्	२११
अभयकर गुप्त	७०,८०
अभिधानकोश	११४
अमरसिंह	३७
अमरावती	१५८,१५९
अमरीकला	१४४
अयोध्या	१३६,१४६,१५०
अरबस्तान	१,२२,१८६
अरायन	२,३
अॅरिस्टॉटल्	२२,१५६,१८१
अॅरिस्टोबौलस्	२२
अॅरेझो	१८६, १८७,२११
अर्काट	१७१
अर्जुन	१२
अर्हत् (ऋषभ)	१०५,१०६,१४३,१४६
अल्बेरुनी	१०२,१०४
अलंकार	१४४
,, (शास्त्र)	१९९
अलंबुसा	११६
अलाहाबाद स्तंभलेख	१५१
अलेक्झँड्रिया	१८,२१०
,, (म्युझियम्)	१४,२२,४८,९१
अल्ताई	२०
अॅल्कॅला	२११
अवन्तिका	१३६
अवन्ती सुंदरी	११२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अॅव्हिझॉन् २११
अविसेन्न १९
अशोक १४,३०,७४,७५,८५, १२७,१५१,१५२
अश्वपरीक्षा १४६
अश्वमेध यज्ञ ३६
अश्वल १२३
अश्विनीकुमार १९
अष्टाध्यायी १७२
असुर १२
असुर (अ) वनीपाल ४७,४८
अळतेकर (डॉ.) ७,६०
अक्षक्रीडा ११४
अक्षरमुष्टिका कथन ११४
अंग राजे ६०
अंतगडदसाओ १४६
अंशुवर्मन् ३६
आकरज्ञान ११४
आगम १४४,१७४,१७६
आचार्य विद्या १४४
आंध्र १५४
आफ्रिका १८२,१८४
आम (राजपुत्र) १४३
आमंद ३
आयुर्वेद १६
आयुधाभ्यास १४३
आरबी १९६,१९९
आर्तभाग १२३
आर्य (लोक) ९६,१००,१८०,१८२
,, (संस्कृति) ९७
आर्यदेव २६,४४
आर्यभट्ट ३०,३७
आर्यन् १०
आल्फॉन्झो १८८
आल्सुइन् १८५
आशिया १८५
आश्रम १५३,१७६
आसाम १५२
आज्ञापत्र (Bull) १८७,१८९
इक्ष्वाकु १२२
इंग्लंड १८४,२१०
इजिप्त २२,१८०
इटली १८१,१८२,१८३,१८७,१९२, २०६,२१०
इतिहास ९,१४४,१९८
इत्सिंग ३१,३९,४०,४७,६६,१३१, १४०,१४१
इन्द्रजाल १४४
इन्सेप्शन् २०४,२०७
इब्नसीना १९
इराक १८०
इराण १,१३,१८०
इस्लाम (धर्म) ८४,८५,८६
,, (संस्कृति) १४८
उत्कल १७४
उज्जयिनी २,१७,१५२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उत्तररामचरित् ६,१०६,१३६
उत्पादन ११४
उदक (घाट) ११३
,, (वाद्य) ११३
उद्दालक १२०
,, (आरुणि) १२३
उदयनाचार्य १२५
उदन्तपुरी ६३,७४–८८,१३४
उद्यान ७७
उद्योतकर १५६
उपकोशल ८
उपनिषद् ९७,९९,१०७,१२४
उप्साला २११
उरेइयूर १५५
उषस्त १२३
ऋग्वेद १७०,१७१
एकाम्बरेश्वर १५८
एकायन ९
एण्णायिरम् १७१,१७२–१७४
एपिक्युरिअन् १८३
एपिग्रॅफिक इंडिया १७८
एरॅटॉस्थेनेस् ९१
एश्चिलस् २२,१८१
ऐतरेय आरण्यक २८,९६
ऐन्द्रजाल ११३
ऑक्सफर्ड १८६,१९१,१९९,२१०,
२१२
ऑगस्टस् १६२
ऑर्लीन्स १९८,१९९,२११
ओव्हिड् १८२
कण्व ६,१०६,१३६,१७५
कथासरित्सागर १४७
कदम्ब (कुळ) १५३
,, (क्षेत्र) १६५
कनक (राजा) ७१
कनिंगहॅम् ६०
कनिष्क १५५
कनोज ७८,१५२
कंदाहार ३
कपट १४४
कपिलवस्तु १५२
कमलशील ४४
कर्णपत्रभङ्ग ११३
कऱ्हाड १५२
कला १५३
कल्पसूत्र ११६
काकुत्स्थवर्मा १५१,१५३
काजनीरत्न १४६
काञ्ची ७,१३६,१४८–१६०,१६९
कात्यायनी १२३
कादम्बरी ११५,११८
कान्यकुब्ज (विहार) ४१
कान्हेरी १५२
कामन्दक ३०
कामाक्षी १५८
काम्पील्य ६१,६२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कामप्री अविक्षित् ११६
कांभोज ७३
कायदा १८०,१९६,१९८,२०४
कारिकाल (चोल) १६३
कार्थेज १८२
कार्लाईल् ५,९४
कार्ला (लेणी) १५९
कालिदास ९,३७, १५७, १७६
काव्यम् १४४, १९९
काव्यमीमांसा ११२
काव्यसमस्यापूरण ११४
काशी २,८,७९,९६–१०४,१३१, १३६,१४२,१५०,१५२,१७५
काष्ठघटनम् १४४
किलरकूच् ५
कीकट २६
कुचमारयोग ११३
कुडा १५२
कुण्डिनपुर ११६–१२१
कुमारिल १५६
कुम्भकोणम् १७४
कुशान ४
कूटप्रश्न १४६
कृत्रिममणिकर्म १४४
कृष्ण (राजा) १६७
कृष्णा (नदी) १५९
केवली विधि १४४
केंब्रिज ९४
केशमार्जन कौशल ११४
कैलासनाथ १५८
कोइम्ब्रा १८८,२११
कोपेनहेगेन् २११
कोलोन् २११
कोरिया ३५,४०
कॅटेनिआ २११
कॉन्सिलिअराई २०४,२०५
कॉन्स्टन्टाइन् द ग्रेट् १८५
कॉलेज २०३,२०५
कॉवेल् (प्रो.) १३५,१४३
कौर ६१
कौशाम्बी १००,१५२
कौषितकी उपनिषद् १२३
क्रियाविकल्प ११४
क्रेसस् १९
क्रीट १८०
क्रॅको १९९,२०५,२११
क्विन्टिलिअन् १८३
खन्यवाद १४३
खरोष्ट्री ५
खाण्डववन १२
खाल्डी १९६,१९९
खिलजी १४९
ख्रिस्त १८५
ख्रिस्ती धर्म ८४,८५,८६
खेचरीकला १४४
खेमा १११

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गंगा (नदी) १२७,१२८,१२९
गंगालहरी १२९
गंगेश १२४,१२५
गजारोहण १४३
गणित १४३,१९९
गणेशरथ १५८
गन्तुर १७६
गंध (युक्ति) ११३
,, (वाद) १४४
गरबर्ट १८६
गहडवाल (राजे) १०१
गाथा ९
गान्धार ३,११,१३,१८,४२,९०
,,(शिल्पकला)१५८,१५९,१७५,१८०
गान्धारी ३
गांधी (महात्मा) ७६
गारुडम् १४४
गार्गी ९,१२३
गार्ग्यबालाकि १०२,१२४
गिबन ५
गीत ११३,१४३
गीतगोविन्द १२४,१२७
गुणमति ४३,१४०
गुणशीला ११०,११५,१४३
गुप्त (राजे) २५,३३,३४,३६,३७,
३९,५१,५३-५५,५८,
६२,६५,७८,१३४,१३९,१८९
,, (वाकाटक) १४०
गुप्त (शिल्पकला) १५८
गुरुकुल १७५,१७६
गुहसेन १३९
गोपाल ७८
गोयम (राजपुत्र) १०६,१४३,१४६
गौतमबुद्ध १३७
ग्रंथभाण्डार (संग्रह) ४६–४८,७२,
८०–८१,९४,२०८–२१०
ग्लासगो २११
ग्राइफ्सवॉल्ड् १८८,२११
ग्रीक १५८,१९६,१९९
,, (कला) २०
ग्रीस ८,१४,१९,२२,१६२,
१८०,१८१
गॉथ् १८३
घटिका ६,७,१५३,१५४,१७३
चण्डप्रद्योत १७
चन्द्रगुप्त १६२
चन्द्रपाल ४३
चन्द्रवर्मा ४२
चन्द्रेश्वर ठक्कुर १२४
चम्पानगर ६०,१००
चरक १९
चर्मकर्म १४४
चाक्रायण १२३
चाणक्य १४,३०
चातुर्वर्ण्य ८४
चालुक्य घराणें ११२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चिंगलपट १६,१७८
चित्रकर्म १४४
चित्रकला ११३,१६४
चिम्मा (विद्यापीठ) १४१
चीन ८,२४,३५,८३,१५२
चेंगिझखान ८७
चैतन्य (श्रीगौरांग) ९८,९९,१३३
,, (पंथ) १३३
चोळमंडळ १५४
चॅन्सेलर २०३,२०६,२१२
च्युलि (विद्यापीठ) १४१
छन्दस् १४३
छंदोज्ञान ११४
छलितकयोग ११४
छांदोग्य उपनिषद् ६
जगद्धर १२४,१२७
जगन्नाथ (पंडित) १२९
जगय्या पेठ १५९
जनक १२२,१२३–२४,१७५
जनमेजय २,१२,१००
जपान ८३,८७
जयगुप्त ४२
जयदेव (कवि) १२७
जरासंध ३०
जंबुद्वीप १०३
जर्मनी १८४
जागद्दल ८८–९५
जातक १,२,३,७,९८,९९,१०१
जाह्नवी १२८
जादूटोणा १५३
जावा १५२,१५९
जिन ७६
जीवक १४,१६,१७,१८
जुगार १४६
जुन्नर १५२
जुम्मामिया १२०
ज्युलिअस् सीझर १८३
जेतारि ६८–७१
जैन (धर्म) १,७,२५,२९,६५,७४, ७६,९२,९७,९८,१०० १३६–१३९,१४२–३
,, (विद्यासंप्रदाय) १०५
,, (शिक्षणसंप्रदाय) १०५
,, (तीर्थंकर) १३७
जैमिनीय उपनिषद् १२३
जोतिपाल १५
ज्योतिष १३२,१४३,१९९
झेनोफेनिस १८१
टर्की १८०
टुलूज १९८,२०२,२११
टोलेमी २,१६२
ट्यूरिन् २११
डायनोशियन २
डिटरमिनेशन् २०४,२०८
डे (नंदलाल) ६०
डॉक्टर १९५,१९७,२०५,२०८,२०९, २१०

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तण्डुल–कुसुम–बलि विकार ११३
तंजावर १५९,१७४
तथागतरक्षित ७०
तंत्रविद्या ५५,५६,५८,८६,८८,९५, १३२,१५७,१७४
तन्नाकात्–इ–नासिरी ७३
तमोयुग (Dark Ages) १८४,१८५, १९०
तत्त्वचिंतामणि १२४,१२५,१३१
तयोःशिक्षा १४३
तर्कवाद १४४
तर्कशास्त्र १९९
तर्कुकर्म ११४
तक्ष ३,११
तक्षक ११,१२,१००
तक्षण ११४
तक्षशिला १–२४,४८,९९,१४७, १५०,१५२–५३,१५६,१५८,१६९, १७५
तामीळ१५६,१५७,१६१,१७३,१७५
तामीळसंगम १६२,१६३
तालगुण्ड १७९
,, (स्तंभलेख) १५१,१५३
तिबेट ३५,४०,६८,७३,८३,९०, ९१,९३
तिबेटी भाषा ९३
तिपिटक (चिनी) १५५
तिरुमुक्कुडल १६९-१७०
तिरुवाडुतुराई १७४
तिरुविडैक्कळि १७४
तिलोशिक विहार ४१
तिरुवोरियुर १७८,१७९
तुरगारोहणम् १४३
तुलसीदास ९८
तृणबिंदु ११६,
तैत्तिरीय ब्राह्मण १२३
तोखारा ३५,४०
तोण्डमंडलम् १७४,१७५,१७६
त्रयीपुरुष १६७
त्रिपिटक ९०
त्रिभुवनी १७३,१७४
त्रिषष्टिशलाका पुरुषचरित १०५,१०६
थिओडोसिअस् १८५
थिब्रॉट् २३
थिरुवल्लुवर १६२
थुसिडाइड्स् १८१
थेरीसामा १११
दण्डी ३७,११२
दत्त (पद्मनाभ) १२४
दर्शनसूत्र २५
दर्शनसंस्कार १४४
दशकुमारचरित ११५
दशनवसनाङ्गराग ११३
दानशील ९१,९३
दासगुप्त (डॉ.) १०५
दिगंबर १३८,१३९

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिङ्नाग २५,४४,१५५,१५७
दिवाकर (सिद्धसेन) २५
दीघ निकाय १०१
दीधिति १३२
दीपंकर (अतीश) ९,६८
दुड्डा १३९
दुर्योधन १६५
दुर्वाचक योग ११४
दुर्वासस् २७
देवर्द्धिज्ञानी १३९
देवविद्या ९
देवी माहात्म्य १२४
देशभाषाविज्ञान ११४
दैव ९
दंतकथा १६२,१६३
द्यूत १४६
द्रविड ९७,१६१,१६५
,, (शिल्पकला) १५९,१६०,१६५
द्वारका १४३,१४६,१५२
द्वारावती १३६
द्वारपंडित २५,४४,५१,६३,६४, ६५,६८,७०
धनुर्विद्या १९,२०
धनुर्वेद १५,१०८,१४६
धम्मदिन्ना १११
धर्मगंज ४६
धर्मपाल ४३,४४,५९,६२,६४,६९, १५५,१५७
धातुकर्म १४४
धातुवाद ११४
धारणमातृका ११४
धारवाड १७९
धूर्तशम्बलम् १४४
धृत्चवल १९
धृतराष्ट्र ३
धौम्य १४
ध्रुवसेन १३९
नकुल १९
नखच्छेद्यम् १४३
नगरधन विहार ४९
नटराज १६३,१६४
नंद ३०
नंदा (राणी) १०६,१११
नदीया १२६
नरोप ६८,६९
नवतत्त्व ११६
नवद्वीप ७९,१२५,१२६–१३५,१७८
नव्यस्मृति १३२
नक्षत्र विद्या ९
नाग (लोक) २८,२९,१००,१६१,१६५
,, (राजा) १२,१५६
,, (पूजा) १६१
,, (विद्या) ९५
,, (संस्कृति) ११,१६१
नागमलाई १६६
नाटकाख्यायिकादर्शन ११४

१५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाट्य ११३
नाल ३१
नालंद ३१
नालंदा २५–५६,५७,५८,५९,६१, ६५–६७,७१,७६,७८,८०, ८८, ९०, ९९,१२५,१३१, १३४, १३७, १३८, १३९,१४१,१४७,१४९,१५०,१५२-५३,१५६-५७,१६९,१९०
नागार्जुन ९,२६,३१,४४,६८,७२, १५५,१५६
,, (कुण्ड) १५२,१५८,१५९
नाराशंसी ९
नारायण (मंत्रि) १६७
नावारे २१०
निघण्टु ११७,१४३
निगमांत विद्या ६
निमि (राजा) १२२
निमित्तज्ञान ११४
निरुक्तम् १४३
निर्ग्रंथी १३८
नृत्य ११३,१४३,१४६,१६३,१६४
नृपतुङ्गवर्मा १७३
नेपथ्यप्रयोग ११३
नेपल्स १८६,१८८,२११
नेशन् १९१,१९३,२०४,२०६,२११, २१२
नेपाळ १३९
न्याय १७६,१७८
न्यायमुख १५६
न्यायभाव्य १५६
न्यायकुसुमांजलि १२५,१३१
न्यूमन् ५
पञ्चतंत्र १४५
पंचविंश ब्राह्मण २८,९६
पंजाब १२,१८०
पट्टिकावेत्रवान् विकल्प ११४
पठितम् १४३
पणकर्म १४४
पतञ्जलि ३०,१५१
पत्रच्छेद्यम् १४३
पदुआ १८६,२१०
पथ्थरद्वार ६०
परिषद् ६
पर्पिग्नॅन् २११
पर्शिया १
पल्लव (शिल्पकला) १५८,१५९
पल्लवेन्द्रपुरी १५१
पशुमलाई १६६
पक्षधर १२६,१३०,१३२,१३५
पाञ्चाल ६
पाटलीपुत्र ७५,१३८,१३९,१५६
पाणिनि १४,३०,१७८
पाणक रसरागासवयोजन ११३
पाण्डय (राजे) १६१–१६३
पांडेचरी १७३
पाताळ १२,१५६

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पातालसिद्धि १४४
पार्थियन १९
पार्थिया १
पायथॉगोरस् २३
पाल (नयन) ६९
पाल (राजे) ३४,३६,५१,५३,५५, ५८,५९,६२,६६,७८,९०,९३, १२७,१३४,१८९
पाली ७९,९२
पार्श्व १०३
पाविट्टगे १६७
पाल्मा १९९,२११
पाषाणकर्म १४४
पिआसेन्झा २११
पिंगल ३०
पिंडार १८१
पिसा १९३,२११
पित्र्य ९
पिशाच विद्या ९५
पुष्यवर्धन विहार ४१
पुन्नवयिल १७९
पुराणम् ९,१४४,१९८
पुस्तक वाचन ११४
पुष्पास्तरणम् ११३
पेरिपॅटेटिक १८३
पेरुगिआ २११
पेसिअराय २०९
पैशाचिकम् १४४
पोप १८७,२०८
पोलिबिअस् १८२
प्रतिमाला १४४
प्रभाकर ८०
,, (मीमांसा) १७१
प्रभामित्र ४३
प्रभुदेवी ११२
प्रसादलक्षणम् १४४
प्रसेनजित् १०१
प्रहेलिका ११३
प्रज्ञाकरमति ६८
प्रयोगोपाय १४४
प्रमाणसमुच्चय १५६
प्राकृतम् १४४
प्राग (विद्यापीठ) १८८,१९९,२०२, २११
प्राणेश्वर (मंदिर) १७९
प्रेसव्वर्ग १९९,२११
प्रॉक्टर १९१,२०४-२०६
प्लिनी २,३,२२
प्लुटार्क २,१८२
प्लेटो २२,१८१
पॅलेन्शिया (विद्यापीठ) १८८, १९५,२११
पॅरिस् (विद्यापीठ) १८६,१९०, १९५,१९८,१९९,२००,२०५,२०७, २१०,२१२
पॉल १८५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फा-हायेन २,१३,३१,३३,५९,१५१
फ्रान्स १८३,१८४,१८७
फ्रँक्स् १८४
फ्लॉरेन्स १९६,२११
बख्त्यार (खिलजी) ५३,५६,८१,
८२,८५,१२६
बप्पपाद विहार १४०
बप्पभट्टि १४३
बर्सा २०१,२०४,२०६
बहात्तर विद्या १४६
बर्निअर १०२
बारहूत १५९
बालक्रीडनकम् ११४
बालपुत्रदेव ३९,४०
बालादित्य (नरसिंह गुप्त) ५५
बाण ११२
बाहूर ताम्रपट १७३
बाहुयुद्ध १४६
बार्सिलोना २११
बिन्दुसार १४
बिंबिसार १६,१७,१०१,१०६
बुडा (विद्यापीठ) २११
बुद्ध (गौतम) १६,२९,३१,७४,७६,
८३,८४-८७,९८,९९,१५६,१५८
बुद्धकीर्ति ५८
बुद्धघोष १५५,१५६,१६६
बुद्धाज्ञानपाद ७०,७१
बुर्झबर्ग (विद्यापीठ) २११
बृहदारण्यकोपनिषद् ६,९,१२३
बेनेडिक्ट १८५,१८७
बुल्वर्द १८६
बेझन्ट (ॲनी) १०४
बोलोना (विद्यापीठ) १८६,१८९,
१९०,१९२,१९४,१९५,१९८,
२०४,२०५,२१०,२१२
बोस (फणिन्द्रनाथ) ६०
बौधायन धर्मसूत्र २८,१७१
बौद्ध (धर्म) १,७,२५,२९,३८,५५,
५६,५८,६५,६९,७२,७४,७६,७७-
७९,८१,८३,८५,८६,८८, ९२, ९५,
९७,९८,१००,१३६,१४०
,, (परिषद्) ७५
,, (महायान) २५
बॅक्ट्रिया १
बॅनर्जी ६१
ब्रह्मगुप्त ३५
ब्रह्मदत्त (राजे) १०३
ब्रह्मदेय १७३
ब्रह्मदेव १६२
ब्रह्मदेश ८३
ब्रह्मविद्या ९,१९०,१९८,२०४
ब्राह्मण १५३
,, (धर्म) ८४-८६
ब्राह्मी ५
ब्रिटिश (म्युझियम्) १५९
भगवद्गीता १२४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भगीरथ १२८
भट्टवृत्ति १७३,१७४
भट्टाचार्य (रघुनंदन) १३२
भरत ३
,, (राजे) १०३
भविष्यपुराण २७
भागलपुर ६०
भागवत ११५
भाजा १५२
भाण्डारकर (डॉ.) १०४
भारवी ३७
भाष्यवृत्ति १७४
भुवया १०६,१११
भूतविद्या ९
भूमध्यसमुद्र १६२
भूव्रणयोजन ११३
भेडसा १५२
भोजक २७
मग २६,२७
मगध १,१७,२४,२६,२७-२९,४३, ४५,५७,६९,७६,८४,९०,९६,१००, १३७,१३८,१५६,१८०
मठ १५३,१७३,१७६,१८५
मणिभूमिकाकर्म ११३
मणिमेखलाई १५१
मणिरागज्ञान ११४
मण्डणमिश्र ९
मंगोलिया ३५,४०,८३,८६,८७,१८४
मतिपुर विहार ४१
मथुरा १३६,१५९
मदुरा २३,१५२,१५५,१६१–१६६
मधु १६५
मधुरा १६५
मनू ३०
मंत्रवाद १४३
मय १२,१६५
मरुत्त ११६
मल्कापुरम् १७३–१७७
मलिक कफुर १६५
महम्मद ८४
महम्मदी धर्म १४८
महागोविंद १०१
महापंडित ९३
महाबोधि विहार ४१
महाभारत १,२,११,१२,१२३, १२९,१६५
महायान ४५,६९,७७,९५,१५६,१५७
महाभाष्य ११५,१५१
महाराष्ट्र १७३,१७६
महावंश ७५,१५१,१६१
महावीर (वर्धमान) २९,९८, १११,११७,१३८
महिंदवृक्ष १५६
महीपाल ७१,७९
मझुमदार ६०
माणिकराव (प्रो.) ११९

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मानसीकाव्य क्रिया ११४
मानवधर्मशास्त्र १९९
माध्यम (शिक्षणाचें) १०
मामल्लपुरम् १५८,१५९
माया १३६
मारीच ६
मार्शल जे. १०
मार्कण्डेय पुराण ११६
मालविकाग्निमित्र ९
मालवीय (पंडित) १०४
माल्यग्रथन विकल्प ११३
मार्कस् ऑरिलिअस् १८३
मास्टर (पदवी) १९५,२०५
मिडिया १
मित्रसेन ४२
मिथि १२२
मिथिला २८,१२२-१२५,१३०,
१३१,१५२,१७८
मिश्र (भानुदत्त) १२४
मिहिर (भोज) ११२
मिहिरकुल ३,८,५३,५५,८५
मीनाक्षी १६५
मीमांसा १७४,१७९
मुकर्जी (डॉ. राधाकुमुद) ५२
मुक्तेश्वर (देऊळ) १५८
मुष्टियुद्ध १४६
मूरी ११
मृगदान ९७
मेगॅस्थेनीस ३०,१२९,१६१,१६२
मेगीस २७
मेघदूत १२४,१५७
मेघा (राजपुत्र) १०६,११०,११५
मेषकुक्कुटलावकयुद्धविधि ११४
मेसोपोटेमिया १
म्लेच्छितविकल्प ११४
मैत्रक १३९,१५२,१८९
मैत्रेय ६४
मैत्रेयी १२३
म्हैसूर १३९
मोंघीर ४१
मोहेंजो-दडो ११,१५८
मोक्षदायक शहरें १५०
मोक्षाकर ९१,९३,९४
मौर्य (चंद्रगुप्त) १४,१२७
,, (स्थापत्यकला) १५८
मौर्यशर्मा (मयूरशर्मा) १५३
मॅजिस्टर १९५
मॉन्टपेलिअर १९२,१९३-९४,
१९६-९९,२११
यजुर्वेद (कृष्ण) १७१
,, (शुक्ल) १७१
यंत्रकरसवंती १४४
यंत्रमातृका ११४
यंत्रवाद १४३
यक्षविद्या १५
याज्ञवल्क्य ९,१२३,१२४,१७५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

युक्लिड् ९१
युरिपिडीज् २२,१८१
युरोप १६१,१६२,१८०,१८१
येशूख्रिस्त ७६
युनिव्हर्सिटि १९१,२०३,२०५
रक्तमृत्तिका विहार ४१
रघुनाथ १२५
,, (शिरोमणि) १३२,१३५
रघुवंश ३
रत्नकीर्ति ६८
रत्नपरीक्षा १४३
रत्नरंजक ४७
रत्नवज्र ६८,७१
रत्नसागर ४७
रत्नाकर शांति ६८,७०,८०
रत्नोदधि ४७
रसवाद १४३
रसायनम् १४४
राजगृह १७,१००,१०३,११०,१५२
राजतरंगिणी १२८
राजशेखर (कवि) ११२
,, (पाण्डय) १६३
राज्यवर्धन ३८
रामायण १,२,३,११,१२,११५,११६, १२२
रामावती ९०
रामेश्वर १३२
राशी ९
राष्ट्रकूट १६७
रूपावतार १७१
रेक्टर १९१,१९३,२०३,२०५,२०६
रोम १८,२२,१६२,१८२
रोमन १९,२२
,, (नार्णी) १६२
रोमनकोर्ट(विद्यापीठ)१९६,१९९,२११
रॉस्टॉक् (विद्यापीठ) १८८,२११
लंडन १५९
लल् १९९
लक्ष्मणसेन १२६,१२७
लाइप्झिग् (विद्यापीठ) १८८,२११
लायब्रेरिअस् २०९
लायसेन्शिएट् १९५,२०५
लिखितम् १४३
लिस्बन् १८८,२११
लुक्रेशिअस् १८२
लुग्मेन् (विद्यापीठ) १४१
लुव्हेन् २११
लुशिअन् १८२
लेपकर्म १४४
लेरिडा २११
लॅटिन् १९६,१९९
लॅन् फ्रँक् १८६
वक्तृत्वशास्त्र १८२,१९६
वज्र ३८
वज्जी १५५
वटगांव २६

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वंदल १८४
वररुचि ३०
वराहमिहिर ३७
वलभी ७५,१३६-१४७,१५०,१७२, १७५,१९०
वल्लभाचार्य ९८,९९
वश्यकर्म १४४
वस्त्रगोपन ११४
वसिष्ठ ६,१२२
वसुबंधु २५,४४,१५६
वाईगाई १६१
वाकाटकगुप्तयुग १५२
वाकोवाक्य ९
वागीश्वरकीर्ति ६८
वागूर १७३
वाग्भट १९
वाचक्नवी १२३
वाजसनेयीसंहिता २८,९६
वात्सायन १५५–१५७
वाद्य ११३,१४३
वामन ११२
वाल्मीकि ६,१०६,१७५
वासुदेव ९,१२५,१३०-१३५
वास्तुविद्या ११४
विकटनितम्बा ११२
विक्रमणिपुर ६९
विक्रमशिला ५४,५५,५७–७३,७९, ८०,८३,८५,१२५,१३१,१५७,१९०
विक्रमादित्य १२७
विजय (राजा) १६१
विजयाङ्का ११२
विजापुर १६७
विजिङ्का ११२
विदग्धशाकल्य १२३
विद्या (त्रहात्तर) १५३
विद्याकोकिल ६९
विद्यानुवाद १४४
विद्यापीठ (व्याख्या) ५,६
विद्याभूषण ३०
विद्याभोग १७३
विद्यास्थानत्तार १७३
विद्यार्थी विद्यापीठें १९२
विधि १४४
विनयपिटक १६,५२
विभूतिचंद्र ९१,९३
विशाल ११६
विशेषकच्छेद्य ११३
विषवाद १४४
विष्णुपुराण १२९
विष्णुशर्मा १४५
विश्वामित्र ६
विसुद्धिमग्ग १५६
विज्ञानम् १४४
वीणाडमरूकवाद्य ११३
वीरवज्र ७०
वीर्यसेन ४२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वृक्षचिकित्सा १४४
वृक्षायुर्वेदयोग ११४
वेङ्कटेश पेरुमल मंदिर १६९
वेद १५,१०१,१३८,१४४,१५३, १७१,१७४,१९८
वेदांग १९८
वेदान्त ६,१५,१३१,१७१,१७२, १७४,१७९
वेरूळ ३७,१५२
वेल्स २०,४८,८४
वैजयिकीज्ञान ११४
वैदिक (धर्म) १,२५,५५,६५,७९, ८६,८८,९८,९९,१०३,११६,१३८, १४२,१४८
,, (विद्यापीठें) १३४
वैद्यकम् १९,१४४
वैद्यक विद्या ९,१६,१००,१७४,१९०, १९६,२००
वैनायिकी ज्ञान ११४
वैरोचन ७०
वैवस्वत मनु १२२
वैशालि ११६
वैष्णव पंथ ८६,९८
वॉटर्स ३४
व्याकरणम् ९,१४३
व्याख्यान ९
व्यायामशास्त्र ११७–१२१
व्यायामिकी ज्ञान ११४
शकद्वीप २७
शकुनज्ञान १४६
शकुन्तला १०६
शंकर १६१,१६३,१६४,१६६,१७८
,, (पूजा) ९७,१६१
शंकराचार्य ९,९८,९९,१२९,१३९, १४२
शक्रादित्य ३८
शतपथब्राह्मण १२२,१२३
शयनरचना ११३
शरीरविज्ञानचिकित्सा ९
शशांक ३८,५३,८५
शस्त्रविद्या ९
शाकुन्तम् १४४
शाकुन्तल ६,१०६
शाक्यश्रीभद्र ७३
शाखायुद्ध १४६
शांतकीर्ति ५८
शांतरक्षित ४४,८०
शार्लमन् १८५
शिकंदर ३,४,१३,१६,२०
शिकारपुर १७९
शिच्यु (विद्यापीठ) १४१
शिलास ६०
शिल्पकला २०,१००,२५७
शिल्पज्ञान ९
शिल्पें (अठरा) ९,१५
शिशुनाग २९

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिक्षा १४३
शीलभट्टारिका ११२
शीलभद्र ३५,४२,४३,७६
शीलरक्षित ६९
शुकसारिकालापन ११४
शूद्र १५३
शेखरापीडयोजन ११३
शैवपंथ ८६
श्रावस्ती १७,१००,१०३,१५२
श्रीकृष्ण ८,८६
श्रुघ्नविहार ४१
श्रोडर २३
श्रौतसूत्र २८,९६
श्लोक ९
श्वेतकेतु ६,१२३
श्वेतांबर १३८,१४०,१४२
सगर (राजपुत्र) १०६,१०७,१०८
संकालिया (डॉ.) ९५
संगमयुग १५५,१७३
संगीत १६४
संगीतशास्त्र १९९
संगीताचार्य १९६
समद्दर (प्रो.) ६०
समुद्रगुप्त ३०,१२७,१५१,१५२
संपाठ्य ११४
सरस्वती ९,१६२
सर्पदेवज्ञानविद्या ९
सर्पपूजा २८
सर्पसत्र २,१२,१००
सर्वंकरणी १४४
संस्कृत ९२,९३,९९
संस्कृतिसंगम १४८
सराईकला १०
सहदेव १९
साकेत १००
सांख्यायन आरण्यक २८
सांची १५९
सामवेद १७१
सामुद्रिकम् १४४
सांत्र २७
सारनाथ ३७,९७,१५८
सारिपुत्त ३१
सालेर्नो (विद्यापीठ) १८६, १९०,१९६,१९८,२१०
सिएना १८८,१९४,२११
सालोटगी १६७,१६८
सिगुएन्झा (विद्यापीठ) २११
सिदियन (संस्कृति) ४
सिद्धांत १४४
सिद्धार्थ ११८
सिंध १२,१८०
सिलोन ७३,१५२
सिंहलद्वीप ८३,९०,१५०,१५६, १६१,१७३
सिसेरो २२
सीता १२२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सीरध्वज १२२
सुजाता १११
सुत्तपट्टण १६६
सुदामा ८
सुंदरेश्वर १६४,१६५
सुपार्श्वनाथ ९८
सुमात्रा ३५,७३,८७,१५२,१५९
सुलतानगंज ६०
सुव्रया १०२
सुवर्णयुग ३७
सुवर्णरौप्यरत्नपरीक्षा ११४
सुश्रुत १९
सूचिवायकर्म ११३
सूत्र ९
सूत्रक्रीडा ११३
सूरि (हेमचंद्र) १०५
,, (सिद्धसेन) १४३
सूर्यमंदिर २१,२७
सेन राजे ५३,१२६,१२७,१३४
सेमेटिक १०
सेव्हिले १९९,२११
स्ट्रॅबो २,३
सोफोक्लस् २२,१८१
सोमा १०२
सोरबॉने २१०
सोफिस्ट १८१
सॅक्सन् १८४
सॅलामान्का १८८,१९६,१९९
२०२,२११
सॉक्रेटीस् २२,१८१,१८२
सौराष्ट्र १३७,१४१,१४६,१४८,१७५
स्टडियम् १९०,२०२,२०४
,,(जनरेल)६,१९१,१९५,२०४,२०५
,,(पर्टिक्युलेर) १९१,१९५,२०४
स्थलपुराण १६३
स्थापत्यकला ११,१२,२०,२३
१५७,१६०
स्थिरमति ४३,४४,१४०
स्टेशनरिअस् २०९
स्पेन १८४
स्टॉइक् १८३
स्मार्त (धर्म) ९८
स्मृति १४४
स्मृतिरत्नाकर १२४
स्याद्वाद १०८
हक्स्ले (अल्डूस) ५
हजारा ११
हरप्पा ११,१५८
हर्षवर्धन ३४,३६,३८,४२,५१,१२७
हलायुध १२७
हसितम् १४४
हस्तलाघव ११३
हस्तिविद्या १४६
हायडेलबर्ग २११
हिंदु (धर्म) ८३,९७,१३६
,, (संस्कृति) १४८
हिप्पारकस ९१

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिब्रू १९६,१९९
हिरोडोटस् २२,१८१
हिरोफिलस् १८
हीनयान ४५,६९,९५,१४२,१५७
हुएनत्संग २,३,३२-३५,३९,४०-४३,
५१,५२,६६,७६,८५,९९,१३५,
१४०,१५१,१५७
हूण १३,२३,२४,३८,५६,८६,
८७,१८४
हेव्वळ १७९
हेसिअड् १८१
हॅझ्लिट् ५
होमर १८१
होरेस् १८२
क्षत्रविद्या ९
क्षांतिसिंह ४२
ज्ञानचन्द्र ४३
ज्ञानश्रीमित्र ६८

पुस्तकालय
गुरुकुल कांगड़ी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar